# यशवंतराव चव्हाण



लेखक

अनंतराव पाटील

Y.C.P. LIBRARY
M923.254/CHA/PA1
009699

# यशवंतराव चव्हाण

यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय
9699

M
923.254
CHA/PAT
Cop. 3

लेखक
**अनंतराव पाटील**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान निर्मिती

प्रथमावृत्ती

१ जुलै, १९९७

मुद्रक

महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय,
'आर्यभूषण भवन' फर्ग्युसन कॉलेज रोड,
शिवाजीनगर, पुणे ४.

प्रकाशक

मा. दादासाहेब रुपवते
उपाध्यक्ष,
यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

निर्मिती

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

किंमत : रु. ८०/-

९६९९

# मनोगत

स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांचे चरित्र प्रकाशित करण्याचा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचा मानस असून ती जबाबदारी मी स्वीकारावी अशी इच्छा प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष श्री. दादासारहेब रुपवते यांनी गेल्या नोव्हेंबरात व्यक्त केली. पुण्यातील भेटीत हे अचानक घडले आणि मला आश्चर्य, आनंद आणि अभिमानही वाटला. मी दादासाहेबांना म्हटले, 'दादासाहेब, यशवंतरावजी हे आपणा सर्वांचे दैवत, त्यांनीच आपल्याला घडविले, वाढविले आणि मोठे केले. साहेबांची आतांपर्यंत बरीच चरित्रे प्रसिद्ध झालेली आहेत. मराठीत आणि इंग्रजीत त्यांच्याबद्दल पुस्तकरूपाने बरेच लिखाण झालेले आहे. वृत्तपत्रातूनही खूप लिहिले गेले आहे. स्नेही-सहकाऱ्यांनी आग्रह केल्यानंतर यशवंतरावजींनी आत्मचरित्रपर लेखन करण्यास सुरुवात केली. 'कृष्णाकांठ' हा चरित्राचा पहिला खंड प्रसिद्धही झाला. त्यानंतर 'सागरकांठ', 'यमुना कांठ' हे दोन उरलेले खंड त्यांना लिहावयाचे होते. तथापि नियतीने ती संधी न देता अचानकपणे आमच्यापासून त्यांना दूर नेले. यशवंतरावजींच्या संपूर्ण आत्मचरित्राला आम्ही मुकलो. राजकारण आणि प्रशासन, दौरे आणि जाहीर सभा, विधिमंडळ आणि पार्लमेंट या व्यापांत यशवंतरावांना निवांत वेळ मिळू शकला नाही. त्यामुळे आम्ही एका चांगल्या आत्मचरित्रापासून वंचित राहिलो.'

यशवंतरावांसंबंधी प्रकाशित झालेले यापूर्वीचे कांही ग्रंथ, कांही पुस्तके, कांही लिखाण मी मिळविले आणि टांचणे काढण्यास सुरुवात केली. चव्हाणसाहेबांचे चरित्र लिहायचे ही कामगिरी किती मोठी आणि बिकट आहे याची कल्पना आली. तथापि ही कामगिरी पार पाडायची असा निर्धार करून वाचन, टिपण, गांठीभेटी, मुलाखती असा क्रम सुरू केला. चरित्र लेखनाबाबतचा आत्मविश्वास वाढू लागला. प्रतिष्ठानचे अध्यक्ष, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, लोकसभेतील कॉंग्रेस पक्षाचे नेते

खासदार शरद पवार यांची डिसेंबरात पुण्यात गांठ पडली. त्यांच्या कानावर प्रकल्पाची माहिती घातली. त्यांनीही सर्व प्रकारचे सहकार्य देऊ केलें. नंतर २६ जानेवारी, १९९७ ला कार्याध्यक्ष श्री. मोहन धारिया भेटले. ते म्हणाले, 'यशवंतरावजींच्या चरित्र लेखनाची जबाबदारी तुम्ही अंगावर घेतली हे फार चांगले झाले. वास्तविक हे काम यापूर्वीच व्हायला हवे होते, आता मात्र उशीर नको.' बोलता बोलता त्यांनी दोन कल्पना माझ्यापुढे मांडल्या. ते म्हणाले, 'अनंतराव, तांतडीने आज कशाची गरज असेल तर ती विद्यार्थ्यांनी, नव्या तरुण पिढीने, लिहिता वाचता येणाऱ्या सर्वसामान्य मराठी माणसाने, मराठी जाणणाऱ्या महाराष्ट्रातील अमराठी माणसाने यशवंतरावांचे चरित्र वाचण्याची, ते जाणून घेण्याची गरज आहे. ज्यांना राजकारणात पडावयाचे आहे, राजकारण करायचे आहे त्यांनी यशवंतराव चव्हाण जाणून घ्यायला हवेत. त्यांच्या चरित्रापासून खूप शिकण्यासारखे असल्याने प्रथम वरील वाचकांसाठी चव्हाणसाहेबांचे चरित्र त्वरित उपलब्ध करून देऊ आणि नंतर यशवंतरावजींचे समग्र विस्तृत ग्रंथवजा चरित्र प्रकाशित करू' मला त्यांची कल्पना रुचली. मी म्हटले, "मोहनभाई, दहा-बारा फॉर्मचे (२०० पाने) छोटे चरित्र तुम्हाला लवकरात लवकर लिहून देण्याची शिकस्त करतो. तुम्ही छपाईची, प्रकाशनाची तयारी करा. साहेबांच्या ८३ व्या वाढदिवशी, १२ मार्चला आपण ते उपलब्ध करून देऊ." धारियांनी माझ्या पाठीवर थाप मारली आणि 'गो अहेड' म्हणत निरोप घेतला. तथापि ही तारीख काही कारणांनी पुढे न्यावी लागली आणि १ ऑगस्टपर्यंत देण्याचे निश्चित करण्यात आले.

यशवंतरावजींच्याबद्दल आजपर्यंत जे काही लिहिले गेले आहे त्यापैकी बरेच वाचून झालेले असल्याने, तसेच प्रत्यक्षात चव्हाणसाहेबांचे सान्निध्य जवळ जवळ चाळीस वर्षे लाभल्याने लेखन करताना मला सुकर वाटले. साहेबांना मी जवळून पाहिलेले, त्यांचे मार्गदर्शन लाभलेले, आणि त्यांच्यापासून खूप शिकायला मिळालेले. त्यामुळे लिहायला खूप हुरुप-उत्साह वाटला, समाधान वाटले. यशवंतरावजींबरोबर काँग्रेस पक्षात काम करताना, पार्लमेंटमध्ये काम करताना कार्यकर्ता कसा असावा, नेता कसा असावा, पार्लमेंटेरियन कसा असावा, प्रशासक कसा असावा याचे आदर्श उदाहरण पहायला मिळाले. त्याचबरोबर स्नेही कसा असावा, सहकारी कसा असावा, माणूस कसा असावा याचे आगळे दर्शन घडले, आगळा अनुभव मिळाला. पत्रकार या नात्याने १९४५ मध्ये त्यांचा माझा प्रथम परिचय झाला. १९४६ मध्ये

ते खेर मंत्रिमंडळात गृहखात्याचे पार्लमेंटरी सेक्रेटरी झाल्यावर परिचय वाढत गेला. कालांतराने परिचयाचे रूपांतर स्नेहांत आणि सहकाऱ्यांत झाले. यशवंतरावांनी अगदी धाकट्या भावासारखे मला वागविले हे माझे भाग्य असेच मी मानतो. अनेक वर्षे काँग्रेस संघटनेत पदावर, महाराष्ट्र राज्यात मुख्यमंत्रीपदावर, केंद्र सरकारात संरक्षणमंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री, परराष्ट्र मंत्री, उपपंतप्रधान अशा मोठ्या आणि महत्त्वाच्या पदावर राहूनही यशवंतराव स्वच्छ राहिले, साधे राहिले, चारित्र्यसंपन्न राहिले, याचा मला खूप अभिमान वाटायचा. त्याचबरोबर त्यांच्या माणुसकीच्या गहिवारांबद्दल कौतुक वाटायचे. एक नेता आणि प्रशासक हा साहित्यप्रेमी, कलाप्रेमी, क्रीडाप्रेमी, माणूसप्रेमी असू शकतो हे अगदी विरळच ! यशवंतराव या विरळात उठून दिसणारे होते. 'मी यशवंतराव होणार' असे गुरुजींना शाळेत उत्तर देणारा यशवंता भावी आयुष्यात खरोखर यशवंतराव झाला. गुणवंत, कीर्तीवंत झाला, महाराष्ट्राचा नेता आणि देशाचा रक्षणकर्ता झाला. हे कसे घडले याबद्दल अनेकांना कुतुहल वाटणे स्वाभाविक आहे.

माझ्या सार्वजनिक जीवनात मी अनेक कार्यकर्ते आणि नेते पाहिले, अनेक मंत्री, मुख्यमंत्री पाहिले, अनेक मुत्सद्दी पाहिले, तथापि यशवंतरावजी हे मला सर्वांपेक्षा आगळे-वेगळे वाटले. गरिबांबद्दल कणव वाटणारा, हरिजन-गिरिजनांबद्दल आत्मीयता वाटणारा, शेतकरी-कष्टकरी-कामगार यांच्याबद्दल आस्था बाळगणारा, कलावंत-लेखक-साहित्यिक-क्रीडापटू यांच्याबद्दल आदर-आपुलकी दाखवणारा, रसिक मनाचा, खंबीर, धैर्यवान, कर्तृत्ववान, बुद्धिमान नेता मी प्रथमच पाहिला. 'माणूस' म्हणून यशवंतराव फार मोठे होते. यशवंताचा 'यशवंतराव चव्हाण' होणार हे शब्द सार्थ करून दाखविणारी ही व्यक्ती महाराष्ट्राला तर ललामभूत ठरलीच पण त्याचबरोबर देशाचे तारु योग्य दिशेने पुढे नेण्यासाठीही ते सहाय्यक ठरले.

यशवंतरावांच्या आत्मचरित्राच्या पहिल्या खंडाचा 'कृष्णाकांठचा - खूप उपयोग झाला. १९१३ मधील जन्मापासून १९४६ च्या निवडणुकीतील यशापर्यंतच्या घटनांची नोंद त्यांनी स्वतःच केलेली असल्याने त्या घटनांना अधिकृतपणा प्राप्त झालेला आहे. कराडचे माजी नगराध्यक्ष पी. डी. पाटील आणि ग्रंथालय व ग्रंथप्रेमी विठ्ठल पाटील यांचेहि लेखनाचे कामी चांगले सहकार्य मिळाले. विठ्ठल पाटील म्हणजे चव्हाणसाहेबांचा चालता-बोलता इतिहास. यशवंतरावांबद्दल त्यांना खूप आदर, प्रेम, आस्था. यशवंतरावांच्या सानिध्यात, स्नेहात जी जी मंडळी

आली, सहकारी म्हणून ज्यांनी ज्यांनी काम केले त्यांची यादी करून समक्ष भेटण्याचा व त्यांचे तोंडून घटनांची हकिकत ऐकण्याचा प्रयत्न मी केला. तथापि अशी माणसे आता बोटावर मोजण्याइतकीच उरली आहेत असे आढळून आले. सातारा-सांगली-कोल्हापूर-सोलापूर-नगर-जळगांव-धुळे-ठाणे या जिल्ह्यात तसेच मुंबई व दिल्लीस पण जाऊन आलो. त्यावेळची बरीचशी कार्यकर्ती मंडळी, नेते मंडळी मला ठाऊक होती, परिचित होती. कारण मी पण १९४२ च्या चळवळीत होतो, येरवडा तुरुंगात होतो, काँग्रेस संघटनेत होतो, पार्लमेंटचा सभासद पण होतो. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ जवळून पाहिलेली असल्याने, घडलेले सारे रामायण माझ्या चांगले स्मरणात राहिले आहे.

यशवंतराव संयुक्त महाराष्ट्राच्या बाजूचे होते, विरोधी नव्हते. संयुक्त महाराष्ट्र मिळविण्याबाबत समितीपेक्षा त्यांचा मार्ग भिन्न होता. म्हणूनच त्यांनी द्विभाषिकाचा स्वीकार करून मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र मिळविण्याचा प्रयत्न चालू ठेवला होता. द्विभाषिकाच्या काळातच चव्हाणसाहेबांच्या प्रोत्साहनाने मी "विशाल सह्याद्रि" दैनिक सुरू करण्याचे धाडसी पाऊल उचलले. चोवीस वर्षे यशवंतराव माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले आणि आम्ही "विशाल सह्याद्रि" खेडोपाड्यापर्यंत पोहोचवून लोकप्रिय केला. नंतर त्यांच्याच आग्रहामुळे मी दिल्लीला पार्लमेंटमध्ये गेलो. लोकसभेचा सदस्य या नात्याने दिल्लीचे राजकारण, इंदिरा गांधींचे राजकारण, विविध राज्यांचे नेते, वृत्तपत्रे यांच्याशी माझा परिचय झाला आणि सत्तेच्या राजकारणाचा अनुभव पण घेता आला. मा. यशवंतरावांची गृहमंत्री, अर्थमंत्री, परराष्ट्रमंत्री या पदावरील कामगिरी प्रत्यक्ष पाहता आली. मराठी माणसाला अभिमान वाटेल असेच यशवंतराव वागले आणि बोलले. भारताच्या उपपंतप्रधानपदापर्यंत पोहोचलेल्या या मराठी नेत्याची अखेर मात्र त्यांच्या मनाला आणि आमच्यासारख्या चाहत्यांचे मनाला व्यथा देणारी झाली.

एका विरोधी पक्ष नेत्याने यशवंतरावांचे जे वर्णन केले होते ते येथे मुद्दाम उद्‌धृत करीत आहे. विरोधी असूनही चव्हाणांचा तो चाहता होता. हा नेता एकदा आपल्या भाषणात म्हणाला, "सुसंस्कृत नेतृत्व, कुशल प्रशासक, अफाट वाचन, कला-क्रीडा प्रेम, संगीत-साहित्याची आवड, लेखन शैली व वक्तृत्व शैली यांचा सुंदर मिलाप कोण्या एका व्यक्तीमध्ये पहावयाला मिळेल असे कोणी विचारले तर मी यशवंतराव यांचा निर्देश करीन. चव्हाणांच्या ठायी कुशाग्र बुद्धिमत्ता आहे,

मुत्सद्दीपणा आहे, लोकसंग्रहही दांडगा आहे. एवढे असूनही गरिबांबद्दल कणव आहे, माणुसकीचा गहिवर आहे'' या उद्‌गारात मला अतिशयोक्ती वाटली नाही की यशवंतरावांची खुशामतखोरी वाटली नाही. यशवंतरावांनी अहंकाराचा वारा कधी लागू दिला नाही, संपत्तीचा मोह कधी बाळगला नाही. कित्येक वर्ष सत्तेत राहूनही भ्रष्टाचारापासून दूर राहिलेला यशवंतराव चव्हाणांसारखा नेता विरळाच ! त्यांनी स्वतःचेच मोठेपणाला खतपाणी घातले नाही तर गुणी, हुशार, कर्तृत्वान, कार्यकर्ते जवळ केले, त्यांना संधी देऊन वाढविले, मार्गदर्शन करून मोठे केले. नेतृत्वाची दुसरी तिसरी फळी जाणीवपूर्वक तयार केली.

यशवंतरावांचे सान्निध्यात बरीच वर्षे घालविल्यामुळे, कित्येक घटना-प्रसंग-शिबिरे-चर्चासत्रे-जाहीर सभा आदि कार्यक्रमांना स्वतः जातीने हजर राहिल्यामुळे माझ्या स्वतःच्या नांवाचा उल्लेख कांही ठिकाणी करणेभाग पडले आहे. हा उल्लेख माझा मोठेपणा दर्शविण्यासाठी केलेला नाही. चव्हाणांबरोबर महाराष्ट्रात मी चौदा वर्षे होतो आणि दिल्लीत दहा-बारा वर्षे. कॉंग्रेस संघटनेत एकत्र होतोच पण त्याचबरोबर विशाल द्विभाषिकात, संयुक्त महाराष्ट्रात अधिक निकट होतो. दिल्लीतील वास्तव्यात यशवंतरावांना जेवढ्या जवळून मी पाहिले, त्यांच्या गुणांचा परिचय करून घेतला. कर्तृत्वाचा अनुभव घेतला, त्यांच्या वाचनाचे, संगीत श्रवणाचे, नाट्यावलोकनाचे वेड पाहिले तेवढे फार थोड्या कार्यकर्त्यांना पाहायला मिळाले असेल. म्हणूनच कांही प्रसंगांचे, घटनांचे उल्लेख करताना मी माझा स्वतःचा उल्लेख टाळू शकलेलो नाही. वाचकांनी कृपया गैरसमज करून घेऊ नये.

सातारा जिल्ह्यात आणि महाराष्ट्रात यशवंतरावांचे जे स्नेही व सहकारी होते, मंत्रिमंडळात जे मंत्री होते त्यांचेशी माझा परिचय असल्याने, तसेच १९४६ च्या निवडणुकीनंतर ज्या ज्या घटना घडल्या, जे जे प्रसंग घडले त्यांचा मी साथीदार असल्यामुळे चरित्र लिहिताना त्या त्या व्यक्ती, ते ते प्रसंग माझ्या डोळयापुढे उभे राहिले. थोडा भावनावश होऊन मी ते प्रसंग चितारले आहेत. राघुअण्णांच्या बरोबर मी तुरुंगात होतो. के. डी. पाटील, गौरीहर सिंहासने, व्यंकटराव पवार आदींचा सहवास असेंब्ली अधिवेशनाच्या वेळी लाभलेला होता. आत्मारामबापू पाटील पुण्यात माझ्या शेजारीच रहायला होते. मोरारजी, इंदिराजी आदींच्या बरोबर मी लोकसभेत काम केलेले आणि दिल्लीत दहा वर्षे यमुनेचे पाणी चाखलेले. त्या पाण्याचे गुणधर्म व राजकारणावरील त्याचा परिणाम अनुभवलेला,

त्यामुळे लेखनातून शब्द साकार झाले. ज्यांनी ज्यांनी आतांपर्यंत यशवंतरावांच्या चरित्र लेखनाची कामगिरी पार पाडली ते सर्वस्वी बाबूराव काळे, रामभाऊ जोशी, विठ्ठल पाटील, कुन्ही कृष्णन, राम प्रधान यांचा माझा दृढ परिचय. त्यामुळे लिहिताना मला अवघडल्यासारखे वाटले नाही, मदतच झाली. यशवंतरावांच्या जीवनातील कांही मर्यादित काळापुरती ही चरित्रे असल्याने शेवटपर्यंत काय काय घडले, कसे कसे घडले याचे रेखाटन करून मी हे चरित्र पूर्ण केले आहे. यात त्रुटी नाहीत असा माझा दावा नाही. तथापि वाचकांना ते आवडेल-भावेल अशी माझी खात्री आहे.

यशवंतराव चव्हाण समजावून घ्यावेत, त्यांचे विचार समजावून घ्यावेत, त्यांची निर्णयाची आणि कृतीची पद्धत समजावून घ्यावी असे नव्या पिढीतील तरुण कार्यकर्त्यांना आणि नेत्यांना वाटणे स्वाभाविक आहे. त्यांच्यासाठी आणि चव्हाणप्रेमी जनतेसाठी हे पुस्तक लिहून सादर केले आहे. यात कृष्णाकांठी, सागर किनारी आणि यमुनातीरी ज्या महत्त्वाच्या घटना घडल्या, जे निर्णय घेतले गेले त्यांचा थोडक्यात समावेश केला आहे. वाचकांना तो उद्बोधक वाटेल अशी आशा आहे. या पाठापोठ यशवंतरावजींचे विस्तृत चरित्र लिहिण्याचा मानस आहे. चव्हाणसाहेबांचे माझ्यावर प्रेमाचे, मायेचे, लोभाचे मोठे ऋण आहे. त्या ऋणातून मुक्त होण्याची संधी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी चरित्र लेखनाच्या रूपाने दिलीं याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. माझे स्नेही श्री. ज्ञानेश्वर ऊर्फ बापूसाहेब खैरे यांनी या कामी मला प्रोत्साहन दिले, दादासाहेब रुपवते यांनी लेखनाबद्दल आग्रही भूमिका घेतली, मोहन धारिया यांनी व्यवहार्य सूचना केली आणि मा. शरद पवार यांनी लेखनास प्रारंभ करून दिला त्याबद्दल चौघांनाही धन्यवाद.

महाराष्ट्र सहकारी मुद्रणालयाने सुबक आणि वक्तशीर छपाई करून उत्तम सहकार्य दिले, त्याबद्दल संस्थेचे चेअरमन श्री. नरुभाऊ लिमये, सहाय्यक व्यवस्थापक श्री. सातपुते यांचेही आभार मानणे जरुर आहे. मराठी वाचकांना हे चरित्र आवडेल, मार्गदर्शक ठरेल अशी अपेक्षा व्यक्त करून माझे मनोगत पूर्ण करतो.

**अनंतराव पाटील**

# ✧ यशवंतराव चव्हाण ✧





यशवंतरावांच्या मातोश्री श्रीमती विठाबाई



पत्नी सौ. वेणूताई आणि मातोश्री विठाबाई
समवेत यशवंतराव



पं. नेहरूंच्या समवेत यशवंतराव



पंतप्रधान इंदिरा गांधी समवेत यशवंतराव



राज्यपाल श्री. श्रीप्रकाश
यशवंतरावांचे अभिनंदन करताना



प्रतापगड चढतांना पं. नेहरु, यशवंतराव
आणि मालोजीराजे नाईक निंबाळकर



राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन यशवंतरावांना
संरक्षण मंत्री म्हणून शपथ देत आहेत.
शेजारी पंतप्रधान नेहरू आणि गुलझारीलाल नंदा.







वडील बळवंतराव चव्हाण आणि बंधु ज्ञानोबा व गणपतराव



विद्यार्थी दशेतील यशवंतराव



यशवंतरावांचे स्वीय सचिव श्रीपाद डोंगरे

# : १ :

यशवंतराव यांचा जन्म त्यांचे आजोळी देवराष्ट्र येथे १२ मार्च, १९१३ रोजी झाला. देवराष्ट्र गांवाचा आसमंत ऐतिहासिक अवशेषांनी भरलेला. गांवात लेणी व देवळे बरीच होती. जुने मंदिर म्हणजे सागरेश्वराचे. त्याला 'सागरोबा' संबोधिले जाई. देवराष्ट्र ही पूर्वी एका राजाची राजधानी होती. यशवंतरावांचे बालपण देवराष्ट्र्यालाच गेले. सागरोबा आणि सोनहिरा यांचे यशवंतरावांना बालपणापासून सान्निध्य लाभले. सोनहिरा या छोट्या नदीच्या पाण्याने यशवंतरावांचा पिंड पोसला गेला. त्यांचे मूळ गाव सातारा जिल्ह्याच्या खानापूर तालुक्यातील विटे. वडील बळवंतराव चव्हाण यांचे विट्याला घर आणि छोटी शेती होती. शेतीवर उपजीविका, तथापि उत्पन्न तुटपुंजे. शेतीसाठी जनावरांचे गोठ्यात बैल होते आणि त्याचबरोबर दूधदुभत्यासाठी गाय-म्हैस पण होती. खर्चाला हातभार म्हणून दुधाचे एक-दोन रतीब पण लावले होते. त्यांपैकी एक रतीब होता एका जज्जांकडे. विटे हे तालुक्याचे ठिकाण. जज्जसाहेबांना बळवंतरावांनी एकदा विनंती केली की कुठेतरी नोकरी लावून द्या. शिक्षण नव्हते म्हणून जज्जांनी आपल्या कोर्टात बेलिफाची नोकरी दिली. विट्याला तीन-चार वर्षे नोकरी केल्यावर बळवंतरावांची बदली कराडला झाली. पत्नी विठाबाई आणि ज्ञानोबा, राधाबाई, गणपतराव व यशवंतराव या मुलांसह बळवंतराव कराडला राहू लागले. चव्हाण कुटुंब कराडला स्थिरस्थावर होते ना होते तेवढ्यात प्लेगची मोठी साथ सुरू झाली. या साथीने बळवंतरावांचा बळी घेतला. कुटुंबाचा आधार नाहीसा झाला. कर्ता पुरुषच नाहीसा झाल्याने चव्हाण कुटुंबावर मोठी आपत्ती कोसळली. ही घटना १९१७ मधील.

बळवंतरावांच्या निधनाचे वेळी थोरल्या ज्ञानोबाचे वय जेमतेम चौदा वर्षांचे, गणपतराव दहा वर्षांचे आणि यशवंतराव चार-पाच वर्षांचे होते. या तिघा भावंडांना वडिलांच्या मायेचे छत्र अल्पकाळ लाभले. आई विठाबाई मोठ्या धीराची बाई. दुःखाची कुऱ्हाड कोसळली असताना तिने आपल्या मुलांना धीर देऊन त्यांचे संगोपन मोठ्या जिद्दीने केले. ज्ञानोबा नोकरीच्या वयाचे झाल्यावर विठाबाई त्यांना बरोबर घेऊन डिस्ट्रिक्ट जज्जांना (जिल्हा न्यायाधीश) भेटण्यासाठी सातारला गेल्या. कोरेगाव रेल्वे स्टेशन ते सातारा हा प्रवास त्यांनी बैलाच्या छकड्याने केला. बरोबर वडिलांचे बेलीफ मित्र शिंगटे होते. त्यांची खूप मदत झाली. कराडला जे सबजज्ज होते ते सज्जन आणि दयाळू अंतःकरणाचे होते. जिल्हा न्यायाधीश हे इंग्रज गृहस्थ होते. सब जज्जांनी त्यांना सगळी हकीकत समजावून सांगून त्यांचे मन वळविले आणि ज्ञानोबांना कराडला बेलिफाची नोकरी देवविली. मुलाला नोकरी मिळाली पण कराडसारख्या शहरात प्रपंचाचा गाडा कसा हाकायचा ही विठाबाईंची विवंचना दूर होऊ शकली नाही. मुलाबाळांचे शिक्षण करावे, त्यांना पोटभर जेऊ-खाऊ घालावे, त्यांच्या अंगावर बऱ्यापैकी कपडे असावे ही मनीषा कशी पुरी करायची हा प्रश्न भेडसावत राहिला.

यशवंतरावांचे मामा श्री. दाजी घाडगे यांनी यशवंतरावांना देवराष्ट्र्याला नेले आणि प्राथमिक शाळेत घातले. चव्हाण कुटुंबाला जी कांही थोडी फार मदत करता येईल ती केली. यशवंतरावांचे बालपण देवराष्ट्र येथेच गेले व तेथेच त्यांनी आपले प्राथमिक शिक्षण पूर्ण केले. इंग्रजी शिक्षण घ्यावे अशी त्यांची इच्छा होती म्हणून ते कराडला आले. घरातील लोकांना वाटले की, यशवंता जर मराठी सातवी इयत्ता पास झाला तर त्याला नोकरी मिळू शकेल. कुटुंब चालविणेस नोकरीची गरज भासत होती. तथापि यशवंतरावांनी मराठी सातवी इयत्ता पास केली आणि नोकरीचा मार्ग न चोखाळता इंग्रजी शिक्षणाच्या ओढीने टिळक हायस्कूलमध्ये स्वतः जाऊन आपले नांव विद्यार्थी म्हणून नोंदविले. त्यावेळी ते तेरा वर्षांचे होते. थोरले बंधू ज्ञानोबा कुटुंब चालवीत होते, ते यशवंतरावांना वडिलांच्या ठिकाणी होते. ज्ञानदेव नोकरीनिमित्त कराडला आले म्हणून यशवंतरावांना कराड येथे येण्याची संधी मिळाली. हायस्कूलमध्ये शिकत असताना त्यांच्या डोळ्यापुढे विशाल क्षितिज दिसू

लागले आणि भावी जीवनाचा आराखडा मनाशी रंगविण्यात ते दंग होऊ लागले. कृष्णा-कोयनेच्या संगमावर सायंकाळी ते एकटेच विचार करीत बसायचे. कृष्णेचे पाणी आणि कृष्णाकांठची माती यांची त्यांना खूप आस्था आणि ओढ वाटायची.

गणपतराव आणि यशवंतराव या दोघा बंधूंचे खूप सख्य असायचे. दोघेही धोतर, सदरा आणि फेटा असा पेहराव करायचे. गणपतरावांना पैलवानी षौक होता. ते यशवंतरावांना तालमीत न्यायचे, कुस्तीचे डाव शिकवायचे. यशवंतराव त्यांना "गणपू" म्हणायचे. गणपतराव कर्तबगार होते, महत्त्वाकांक्षी होते. त्यांचे मॅट्रिकपर्यंत शिक्षण झाल्यावर आणखी शिकण्याची त्यांची इच्छा होती. तथापि परिस्थितीमुळे ते शक्य झाले नाही. आपल्याला नाही शिकता आले तरी धाकटा भाऊ यशवंताने खूप शिकावे असे त्यांना वाटायचे आणि त्या दृष्टीने ते प्रयत्न करून यशवंतरावांना प्रोत्साहन द्यायचे. महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीचे त्यांना आकर्षण वाटायचे. शोषणशाहीबद्दल त्यांना घृणा वाटायची. कराडात त्यांनी कळंबे गुरुजींना साथ दिली, चळवळीच्या प्रचारात भाग घेतला. यशवंतरावांनीही आपल्याबरोबर यावे असे गणपतरावांना वाटायचे. दोघांत चर्चा व्हायची, यशवंतराव विचार करायचे. शोषण करणाऱ्या वर्गाबद्दल त्यांचे मत प्रतिकूल होते. तथापि महाराष्ट्रात भटजी-शेटजी विरोधी वातावरण तयार केले जात असतांना यशवंतरावांना गांधीजींच्या राजकीय चळवळीचे आकर्षण अधिक वाटायचे. त्यांनी गांधीजींच्या चळवळीत सामील होण्याचा मनाशी निर्णय घेतला.

यशवंतराव अभ्यासात हुशार होते. यशवंता चव्हाण हा वर्गाचे आकर्षण असायचा. त्यांच्या वाचनाच्या आवडीबद्दल आणि वक्तृत्वाबद्दल शिक्षकवर्ग खूष असायचा. खेळाची आणि त्यातल्या त्यात क्रिकेट खेळायची त्यांना खूप मजा वाटायची. क्रिकेटची बॅट विकत घेणे किंवा क्रिकेटची मॅच तिकीट काढून बघायला जाणे आर्थिकदृष्ट्या शक्य नसल्याने त्यांनी वाचनावर आणि वक्तृत्वावर अधिक भर दिला. टिळक हायस्कूलमध्ये शिकत असताना १९३० मध्ये पुण्यात विद्यार्थ्यांसाठी एक वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत भाग घ्यावा असे यशवंतरावांना मनोमनी वाटले. पण पुण्याला जायचे कसे, मोटार भाड्यासाठी पैसे कोठून आणायचे हा प्रश्न त्यांचेपुढे पडला. तथापि बटाणे नांवाचा

मित्र मदतीला धावून आला, त्याने पैसे दिले आणि यशवंतराव पुण्याला जाऊन स्पर्धेच्या ठिकाणी हजर झाले. स्पर्धेच्या आयोजकांनी त्यांना "ग्रामसुधारणा" हा आयत्या वेळचा विषय दिला. परीक्षकांत होते तात्यासाहेब केळकर, प्रा. श्री. म. माटे आणि तात्यासाहेब करंदीकर. यशवंतरावांच्या भाषणाचे त्यांनी कौतुक केले. यशवंतरावांना पहिल्या नंबरचे बक्षीस म्हणून रोख रक्कम रु. १५०/- मिळाले. तथापि या रकमेचा विनियोग स्वतःसाठी अथवा कुटुंबासाठी करता आला नाही. गांधीजींच्या असहकार चळवळीत भाग घेतला (१९३०) म्हणून त्यांना शिक्षा व दंड झाला आणि दंडापायी मिळालेली रक्कम कोर्टात भरावी लागली.

पोवाडे, मृदुंगाच्या साथीचे संगीत भजन यांचा छंद विद्यार्थीदशेतच लागला आणि यशवंतरावांनी तो जोपासला. काशीनाथपंत देशमुखांच्या बरोबर यशवंतराव गांवोगाव भजनाला जात. चैत्र-वैशाखात गांवोगाव ज्या जत्रा होत त्या जत्रेतील कुस्त्यांचे फडाला आणि रात्रीच्या तमाशाला पण जात. यशवंतराव कुशाग्र बुद्धीचे होते, तसेच संगीत-कला-क्रीडाप्रिय पण होते. त्यांच्या आत्मविश्वासाचा आणि स्वाभिमानाचा प्रत्यय त्यांच्या विद्यार्थीदशेतच शिक्षकांना, विद्यार्थ्यांना, मित्रांना आणि समाजातील तथाकथित प्रतिष्ठितांना वेळोवेळी आला. एकदा शेणोलीकर मास्तरांनी विद्यार्थ्यांना, "तूं पुढे कोण होणार?" असा प्रश्न आळीपाळीने विचारला. एकजण म्हणाला, "मी टिळक होणार", दुसरा म्हणाला, "मी कवी यशवंत होणार", तिसरा म्हणाला, "मी उत्तम क्रिकेटपटू होणार." यशवंतरावांना विचारले असताना त्यांनी उत्तर दिले, "मी यशवंतराव चव्हाण होणार." स्वतःच्या बुद्धीने, कर्तृत्वाने मोठा होणार अशी या उत्तरात ग्वाही होती, घमेंड नव्हती. हायस्कूलची फी माफ व्हावी म्हणून त्यांनी नादारीचा अर्ज केला असता व्यवस्थापनातील श्री. पांडुअण्णा शिराळकरांनी नकार दर्शविला. आपल्या गरिबीचा हा अपमान समजून यशवंतरावांनी नंतर देऊ केलेली नादारी नाकारली. भ्यायचे नाही, धडाडीने पुढे जायचे, आलेल्या संकटांना धैर्याने तोंड द्यायचे हा त्यांचा स्वभाव बनला. विद्यार्थीदशेत चळवळीत भाग घेतला तेव्हा त्यांची धडाडी प्रकर्षाने दिसून आली. टिळक हायस्कूलच्या आवारातील लिंबाचे झाडावर तिरंगी ध्वज फडकावल्यावर आणि झेंडावंदन केल्यावर आपल्या शाळेवर गंडांतर येऊ नये म्हणून यशवंतरावांनी

ध्वज फडकावण्याची आणि ध्वजवंदनाची जबाबदारी स्वतःवर घेतली. या प्रकरणी त्यांना अठरा महिन्यांचा सश्रम कारावास ठोठावण्यात आला व तो त्यांनी आनंदाने पत्करला. कोवळ्या वयात त्यांनी येरवडा तुरुंगात बेडरपणे प्रवेश केला आणि राजकीय कैदेचा काळ वाचन-मनन-चिंतनात घालविला. सुदैवाने आचार्य भागवत यांच्यासारख्या प्रखर बुद्धिमत्तेच्या राजबंद्याचा सहवास त्यांना लाभला, वाचायला भरपूर पुस्तके मिळाली. देशभक्तांची चरित्रे तसेच इतिहासाची पुस्तके वाचून यशवंतरावांनी भावी नेतृत्वाचा आणि कर्तृत्वाचा पाया रचिला.

येरवडा तुरुंगात वाचनाची जी आवड निर्माण झाली ती आवड यशवंतरावांनी बाहेर आल्यावर जोपासली. त्यांची स्मरणशक्ती दांडगी होती. वाचनाबरोबर ते विचारही करीत, लेखन करीत. कराडमधील छत्रपती शिवाजी मेळ्यासाठी पदे यशवंतराव लिहून देत. काव्यामुळे त्यांचे कविमन बनले आणि पैलवानकीच्या आवडीमुळे स्वभाव उमदा बनला. गरिबीचे चटके बसल्यामुळे ते हळवे आणि कनवाळू बनले. यशवंतरावांकडून आई विठाई ज्ञानेश्वरी वाचून घ्यायची, त्यांना पंढरपूरला घेऊन जायची. ईश्वराबद्दल ते विचार करायचे. ज्या मूर्तीपुढे समाजपुरुष शेकडो वर्षे नतमस्तक होत आला तेथे आपण नतमस्तक व्हायला काही बिघडत नाही असे मानून ते श्री विठ्ठलाच्या किंवा तुळजाभवानीच्या मूर्तीपुढे नतमस्तक होत असत. आईच्या संस्कारामुळे धीरोदात्तपणा आणि स्वाभिमान अंगी बाणविला गेला.

मॅट्रिक झाल्यानंतर कॉलेजच्या शिक्षणासाठी यशवंतरावांना कराड सोडून कोल्हापूरला जावे लागले. राजाराम कॉलेजमध्ये त्यांनी प्रवेश घेतला. त्यावेळी प्राचार्यपदी डॉ. बाळकृष्ण होते. तर्कशास्त्र विषय प्रा. ना. सी. फडके शिकवीत. फडके यांची शिकविण्याची पद्धत यशवंतरावांना खूप आवडायची. एक अभ्यासू, हुशार मुलगा या नात्याने डॉ. बाळकृष्ण यांचे ते आवडते विद्यार्थी बनले. वाचन-मनन-चिंतन या संवयीचा यशवंतरावांना कॉलेज जीवनात खूप फायदा झाला. कोल्हापुरातील वास्तव्यात त्यांनी छत्रपती शाहू महाराजांचे बहुमोल कार्य प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिले. सत्यशोधक चळवळीचाही जवळून अनुभव घेतला. त्यांना या चळवळीबद्दल खूप आपुलकी वाटायची. तथापि या चळवळीत सामील होण्याऐवजी त्यांनी राष्ट्रीय विचारांच्या कॉंग्रेसची निवड केली. बहुजनांचे हित कॉंग्रेसच्यामार्फत

साध्य करता येईल असे त्यांचे ठाम मत झाले होते. म्हणून त्यांनी बंधू गणपतराव हे कराड म्युनिसिपल निवडणुकीत काँग्रेस विरोधी उमेदवार म्हणून उभे राहिले असता त्यांच्या विरोधी प्रचार केला आणि त्यांना पराभूत केले. तत्त्वाच्या आड बंधुप्रेम येऊ दिले नाही.

कॉलेजात शिकत असताना वेगवेगळी राजकीय विचारसरणी समजावून घेण्याची, समाजवादी, साम्यवादी, तत्वज्ञानाचा परिचय करून घेण्याची भूमिका स्वीकारून यशवंतरावांनी उपलब्ध राजकीय ग्रंथांचे वाचन केले. "रशियन राज्यक्रांती"चा अभ्यास करताना त्यांनी मनाला विचारले की भारताला हे ठोकळेबाज तत्त्वज्ञान मान्य होईल का, ते या भूमीत रुजेल का ? रॉयवादाकडे ते आकर्षित झाले होते, तथापि डोळसपणाने ते वेळीच त्यापासून दूर झाले. आपल्या देशाला समाजवाद हवाय पण तो भारतीय संस्कृतीशी सुसंगत लोकशाही समाजवाद हवा अशी त्यांची धारणा बनली होती. आपण नवे नवे शिकावे, त्यासाठी नवे नवे वाचावे, चर्चा करावी, संवाद करावा या मनोधारणेमुळे कॉलेज जीवनातच त्यांनी भावी सार्वजनिक जीवनाचा पाया भक्कम केला. कोल्हापुरातील वास्तव्यामुळे त्यांना साहित्याचा, कलांचा, कुस्तीसारख्या क्रीडेचा आनंद लुटता आला. राजाराम कॉलेजात त्यांचा के. डी. पाटलांशी स्नेह जडला. हा स्नेह व सहकार्य पुढे राजकारणातही लाभले. १९४६ च्या निवडणुकीत यशवंतराव आणि के. डी. पाटील हे दोघेही काँग्रेसच्या तिकिटावर निवडून येऊन आमदार झाले. आमदार चंद्रोजी पाटील उर्फ कारभारी यांच्या खून प्रकरणी के. डी. पाटलांवर संशय व्यक्त करण्यात येऊन त्यांचाही खून करण्यात आला. यशवंतराव एका तरुण-उमद्या मित्राला पारखे झाले. यशवंतरावांना या प्रकरणी बदनाम करण्याचा प्रयत्न झाला. पण तो अयशस्वी ठरला.

महाराष्ट्रातील सत्यशोधक चळवळीमागे महात्मा ज्योतिराव फुले यांची प्रेरणा होती. केशवराव विचारे यांच्यासारखे कार्यकर्ते सत्यशोधक विचाराचा प्रसार मोठ्या तळमळीने करीत होते. १९२२-२३ पर्यंत लोक या चळवळीकडे आकृष्ट झालेले होते. पण पुढे या चळवळीचे रूपांतर ब्राह्मणेतर चळवळीत झाले. राजकीय सत्तेत, नोकऱ्यांत आपल्याला योग्य वाटा मिळावा यासाठी ही चळवळ चालविण्याचा

प्रयत्न झाला. काँग्रेसच्या १९३० च्या कायदेभंगाचे चळवळीला लोकांचा पाठिंबा मिळू लागताच ब्राह्मणेतर चळवळ चालविणाऱ्यांची पंचाईत झाली. ब्रिटिश सरकार पण अस्वस्थ झाले. प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या निवडक लोकांना हाताशी धरून त्यांनी चळवळ मोडण्याचा प्रयत्न करून पाहिला. तथापि तो अयशस्वी ठरला. सातारा जिल्ह्यात धनजी कूपर आणि त्यांचे बंधू, कच्छी नांवाचे कराडचे बडे व्यापारी यांना हाताशी धरून ब्रिटिश अधिकारी डावपेच लढवीत होते. कच्छी यांनी कराड नगरपालिकेचे अध्यक्ष या नात्याने पालिका आपल्या ताब्यात ठेवलेली होती. या पालिकेने एक ठराव संमत करून मुंबईचे गव्हर्नर फ्रेडरीक साईक्स यांना मानपत्र देण्याचे ठरविले. लोकांमध्ये संतापाची लाट उसळली. मानपत्र देण्याच्या विरुद्ध चळवळ उभी करण्यात आली. जाहीर सभांतून विरोध दर्शविण्यात आला. गव्हर्नरचे कराडमध्ये आगमन होताच त्यांना काळे झेंडे दाखविण्यात आले. या निदर्शनात २०-२५ लोक सामील झाले होते. गणपतराव आळतेकर आणि बाबूराव गोखले यांनी निदर्शनाचे नेतृत्व केले. गव्हर्नरला जनजागृतीचे दर्शन घडले. स्वातंत्र्याची चळवळ ही केवळ शहरापुरती मर्यादित नसून ती खेड्यापर्यंत पोहोचली आहे याची जाणीव ब्रिटिश सरकारला झाली. १९३० च्या चळवळीने गांधीजींनी सारा समाज ढवळून काढला. "स्वराज्य हा आपला हक्क आहे" याची जाणीव खेड्यापाड्यात राहणाऱ्या कोट्यवधी लोकांना झाली. कराडमधील गव्हर्नरविरोधी निदर्शनाच्या वेळी यशवंतराव हायस्कूलमध्ये शिकत होते. अभ्यास सांभाळून ते राजकीय घडामोडी समजून घेत होते. कार्यकर्ते तुरुंगात जात होते, काही सुटून बाहेर येत होते. यासंबंधीची वार्ता यशवंतराव आपणहून 'ज्ञानप्रकाश' या पुण्यातील वृत्तपत्राकडे पाठवीत होते आणि त्यांच्या बातम्यांना 'ज्ञानप्रकाश' प्रसिद्धी देत असे. विद्यार्थी, छोटा कार्यकर्ता, पत्रकार या विविध भूमिका यशवंतराव पार पाडीत. १९३१ मध्ये गांधी-आयर्विन यांची भेट होऊन उभयतांत चर्चा झाली. चर्चेअखेर एक करार करण्यात आला. नेत्यांची तुरुंगातून सुटका करण्यात आली. आंदोलनाला यश मिळाल्याने काँग्रेस पक्षाबद्दल जनतेचा आदर, आपुलकी वाढली. यशवंतराव मनोमनी खूष झाले. वार्षिक परीक्षा संपल्यानंतर यशवंतराव आपल्या आजोळी देवराष्ट्रला गेले. जाताना त्यांनी वाचण्यासाठी बरीच पुस्तके नेलेली होती. सोनहिऱ्याच्या कांठच्या आंबराईत बसून ते वाचन करीत. हरिभाऊ आपटे यांच्या

सामाजिक-ऐतिहासिक कादंबऱ्या त्यांनी वाचून काढल्या. नाथ माधवांच्याही कादंबऱ्या वाचल्या. 'मी', 'पण लक्षात कोण घेतो' या कादंबऱ्यांबरोबर त्यांनी केतकरांची 'ब्राह्मण कन्या' ही पण वाचून काढली. संस्कृत चांगले व्हावे म्हणून मेघदूताचे पाठांतर केले. मॅट्रिकच्या परीक्षेला चांगला अभ्यास करायचा, चांगले मार्क्स मिळवायचे असे मनाशी ठरवून यशवंतराव कराडला परतले.

या सुमाराला सातारा जिल्ह्यात राजकीय परिषद घ्यायची आणि तीही कराडला घ्यायची यादृष्टीने हालचाली सुरू झाल्या. मसूरकरांनी परिषदेची जबाबदारी स्वीकारली. राघूअण्णा लिमये, डॉ. फाटक, विष्णु मास्तर आदि मंडळी मोठ्या उत्साहाने कामाला लागली. वऱ्हाडचे माधव श्रीहरी अणे यांना अध्यक्ष म्हणून निमंत्रित करण्यात आले. ते त्यावेळी राष्ट्रीय काँग्रेसचे हंगामी अध्यक्ष होते. कोल्हापूरच्या माधवराव बागलांना पण निमंत्रण देण्यात आले होते. पुण्या-मुंबईहून बडी बडी मंडळी आली होती. त्यांत सौ. लीलावती मुन्शी यांचा समावेश होता. ही परिषद खूप गाजली. बागलांनी आर्थिक स्वरूपाच्या ज्या मागण्या उपसूचनेद्वारे सुचविल्या होत्या त्या मागण्यांनी धमाल उडवून दिली. त्या शेतकऱ्यांच्या हिताच्या होत्या, तरीही त्यांना परिषदेत विरोध करण्यात आला. माधवरावांनी जाहीर अधिवेशनात जोरदार भाषण केले. उपसूचना लोकांनी टाळ्यांच्या गजरात मान्य केल्या. राजकीय प्रश्नांसमवेत सामाजिक-आर्थिक कार्यक्रम हाती घेतला नाही तर स्वराज्याच्या चळवळीला अर्थ नाही हे बागलांचे ठाम मत होते. ते सत्यशोधक आहेत, ब्राह्मण-ब्राह्मणेतर चळवळीला पाठिंबा देणारे आहेत असे टोमणे हितसंबंधियांनी मारले, तरीही बागल आपल्या भूमिकेवर ठाम राहिले. या परिषदेच्या निमित्ताने यशवंतरावांचा कित्येक कार्यकर्त्यांशी परिचय झाला. सातारा, वाई-वाळवे, तासगांव या तालुक्यांतील कार्यकर्ते कोण कोण, त्यांनी कायदेभंग चळवळीत काय कामगिरी केली याची माहिती मिळू शकली. वाईचे किसन वीर, वाळव्याचे आत्माराम पाटील व पांडू मास्तर, गौरीहर सिंहासने आदि भेटलेले कार्यकर्ते नंतर यशवंतरावांचे स्नेही झाले, सहकारी झाले.

महात्मा गांधी १९३१ च्या सप्टेंबरमध्ये गोलमेज परिषदेसाठी लंडनला जायला निघाले तेव्हां वृत्तपत्रांनी त्यांच्या प्रयाणासंबंधीच्या बातम्या रकाने भरभरून

छापल्या. इतर पुढारीही लंडनला गेले होते. तथापि गोलमेज परिषद अयशस्वी ठरली. गांधीजी डिसेंबरअखेर मुंबईला परतले. दरम्यान व्हाईसरॉय आयर्विन जाऊन त्यांचे जागी लॉर्ड विलिंग्डन यांची नियुक्ती झाली होती. दडपशाहीच्या तंत्रात हे महाशय तरबेज होते. मुंबईत काँग्रेस कार्यकारिणीची बैठक झाल्यावर गांधीजींनी विलिंग्डन यांच्या भेटीची मागणी केली. भेटीऐवजी गांधीजींच्या अटकेचा हुकूम देण्यात आला. ४ जानेवारी रोजी गांधीजींची येरवडा तुरुंगात रवानगी करण्यात आली. सरकारच्या या धोरणाविरुद्ध देशभर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली गेली. तांबव्याला प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक झाली. जमलेल्या कार्यकर्त्यांत काशिनाथपंत देशमुख, राघुअण्णा लिमये आदि प्रमुख कार्यकर्ते होते. जंगल सत्याग्रह संघटित करण्याचे ठरले. २६ जानेवारीला तालुक्यातील प्रमुख गांवी जाहीर झेंडावंदन करायची जबाबदारी यशवंतरावांनी उचलली. कराड शहरातील प्रमुख ठिकाणी तारीख २५ ला रात्री झेंडे लावायचे, कायदेभंगासंबंधीची पत्रके वाटायची असे यशवंतराव आणि त्यांच्या मित्रांनी ठरविले. म्युनिसिपालिटीच्या कचेरीवर आणि हायस्कूलच्या प्रांगणातील झाडावरही झेंडा लावायचाही निर्णय घेण्यात आला. रात्री कामाला सुरुवात करण्यात आली. दुसऱ्या दिवशी सकाळी ८ वाजता शाळेच्या आवारातील झाडावर झेंडा रोवून ध्वजवंदन करण्यात आले. 'वंदेमातरम्' च्या घोषणा देण्यात आल्या. राष्ट्रगीताचा कार्यक्रम झाला. हे सारे शिक्षणाधिकाऱ्याने पाहिले. डोईफोडेला अटक करण्यात आली. सकाळी अकराला यशवंतराव शाळेत गेल्यावर पोलिस अधिकाऱ्यांनी त्यांना वर्गातून बाहेर बोलावून अटक केली. कराडच्या जेलमध्ये बंद करण्यात आले. जेलमधील त्यांच्या कोठडीत शिक्षा झालेला एक कैदी होता. सहा फूट उंची, गोरापान, तरतरीत नाक, डोळे लखलखणारे, दाढी वाढलेली. हातापायात बेड्या असणारा हा कैदी दुसरा-तिसरा कोणी नव्हता, तर तुरतीचा कृष्णा धनगर होता.

थोड्या दिवसांनी यशवंतरावांना मॅजिस्ट्रेटपुढे उभे करण्यात आले. आरोप वाचून दाखविण्यात आले. गुन्हा कबूल करण्यात आला. अठरा महिन्यांची शिक्षा ठोठावण्यात आली. शिक्षा झालेला पक्का कैदी म्हणून पुन्हा कराड जेलमध्ये नेण्यात आले. दुसऱ्या दिवशी यशवंतरावांना भेटण्यासाठी मातोश्री विठाबाई, घरची मंडळी

व शाळेतील शिक्षक तुरुंगात गेले. फौजदाराचे उपस्थितीत भेट झाली. मास्तर म्हणाले, ''यशवंता, फौजदार दयाळू आहेत, माफी मागितलीस तर सोडून देतील.'' त्यावर विठाबाई म्हणाल्या, ''मास्तर, काय बोलताय ! माफीबिफी मागायची नाही. यशवंता तब्येतीची काळजी घे, देव आपल्या पाठीशी आहे.'' समाजसेवक बाबूराव गोखलेही जेलमध्ये होते. एके दिवशी पोलिस पहाऱ्यात यशवंतराव व बाबूराव गोखल्यांना रेल्वेने पुण्याला नेण्यात आले. बाबुरावांना 'बी' क्लास असल्यामुळे येरवडा तुरुंगात ठेवले आणि यशवंतरावांना कॅम्प जेलमध्ये पाठविण्यात आले. तारेचे वर्तुळाकार कुंपण घालून, त्यात तंबूच्या बराकी उभारून, हा कॅम्प जेल तयार करण्यात आला होता. हजारावर राजबंदी कैदी राहतील एवढा मोठा होता. यशवंतरावांनी फेब्रुवारी १९३२ मध्ये या जेलमध्ये प्रवेश केला. सव्वा वर्षांनी मे १९३३ मध्ये त्यांची सुटका करण्यात आली. नंबर बारा या बराकीत निवडक शंभर राजबंदी होते. हायस्कूल विद्यार्थी असल्याने यशवंतरावांचा या बराकीत नंबर लागला.

✦ ✦ ✦

# : २ :

तुरुंगात आचार्य भागवत, रावसाहेब पटवर्धन यांच्यासारख्या थोर मंडळींचा सहवास यशवंतरावांना लाभला. पुस्तके वाचायला मिळाली, चर्चा ऐकायला मिळाल्या. एस. एम. जोशी, विनायकराव भुस्कुटे आदि मंडळीही याच बराकीत होती. पुणे-नगर येथील विद्यालयांचे काही विद्यार्थी पण होते. एके दिवशी आचार्य भागवतांनी विद्यार्थ्यांना एकत्र बोलाविले आणि सांगितले, 'येथील वेळ बुद्धी आणि मन संस्कारित करण्याचे प्रयत्नांत घालवा. उपलब्ध होणारी पुस्तके वाचा. वामन बापट, डॉ. लागू, कराडचे श्री. दयार्णव कोपर्डेकर, सोलापूरचे भोसले आदींनी एकत्र येऊन आचार्य भागवतांचा सल्ला कृतीत आणायचे ठरविले. राघुअण्णा लिमये, ह. रा. महाजनी हे पण तुरुंगात दाखल झाले. त्यांच्या ज्ञानाचा उपयोग करून घेण्यासाठी वाचनाचे वर्ग सुरू करण्यात आले. ह. रा. महाजनी विद्वान आणि पंडित. संस्कृत भाषेवर त्यांचे प्रभुत्व. म्हणूनच त्यांना महाजनीशास्त्री असे संबोधिले जाई. महाजनींनी राजबंदी विद्यार्थ्यांना 'शाकुंतल' नाटक आणि आचार्य भागवतांनी 'ज्युलियस सीझर' नाटक शिकविले. आचार्य भागवत गांधीवादी होते. गांधीवाद ते उत्तम प्रकारे विशद करून सांगत. बराकीत गांधीवादाबरोबरच समाजवाद, मार्क्सवादाचीही चर्चा होत असे. एस. एम. जोशी, ह. रा. महाजनी आदि मंडळी गांधीवाद स्वीकारण्याऐवजी समाजवादाचा विचार मांडीत. विनायकराव भुस्कुटे मार्क्सवादाचा आग्रह धरीत. 'टेन डेज, दॅट शुक द वर्ल्ड' हे जॉन रीड यांचे पुस्तक बाराव्या बराकीत लोकप्रिय झाले होते. यशवंतरावांनी ते वाचल्यावर लेनिन यांच्यासंबंधीची आपली आदराची भावना द्विगुणित झाली असे त्यांनी श्री. महाजनींजवळ बोलून दाखविले. चर्चेत महाजनी मानवेंद्रनाथ रॉय यांचा

वरचेवर उल्लेख करीत. लेनिनबरोबर एम. एन. रॉय यांनी काम केलेले आहे, मेक्सिकोमध्ये त्यांनी कम्युनिझमचा स्वीकार कसा केला हे महाजनी आणि भुस्कुटे यांच्याकडून यशवंतरावांना ऐकायला मिळायचे. तुरुंगातून सुटल्यावर कांही मित्रांच्या सहवासामुळे आणि आग्रहामुळे यशवंतरावांनी रॉय यांच्या विचारांचा पाठपुरावा करण्यास सुरुवात केली. एका बाजूला आचार्य भागवत आणि दुसऱ्या बाजूला विनायकराव भुस्कुटे. एक गांधीवादी तर दुसरा मार्क्स-लेनिनवादी. 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' वाचल्यावर मार्क्सच्या विचारांचा यशवंतरावांच्यावर पगडा बसला. तथापि मार्क्सच्या मार्गाने भारताचे प्रश्न सुटतील अशी त्यांना खाात्री वाटत नव्हती. बराकीत महाराष्ट्राच्या राजकारणावरही चर्चा होत असे. त्या चर्चेतून यशवंतरावांना आढळून आले की, शहरी नेत्यांचा ग्रामीण समाजाबद्दल मोठा गैरसमज आहे. त्यातली उच्चभ्रू मंडळी सत्यशोधक चळवळ आणि महात्मा फुले यांच्याविषयी फारशी माहिती नसताना टीकेच्या स्वरूपात काहीही बोलायची. एस. एम. जोशी, ह. रा. महाजनी यांच्यासारखे कांही अपवाद होते. बारा नंबरच्या बराकीचे वैशिष्ट्य असे होते की त्या बराकीत चर्चा, वादविवाद, शिक्षण एवढेच काम चालायचे नाही तर बराकीचे एक बुलेटिन पण निघायचे. ह. रा. महाजनी एका पाटीवर 'बजरंग' या नावाने मजकूर लिहायचे आणि सर्वत्र फिरवायचे. त्यांची शैली, त्यांचा अभ्यास पाहिल्यावर कित्येकांनी बोलून दाखविले की महाजनी हे पुढे मोठे लेखक होणार आणि ते खरेही झाले.

१९३२ मध्ये महात्मा गांधींनी जातीय निवाड्याविरुद्ध (कम्युनल ॲवार्ड) आमरण उपोषण सुरू केले. शेड्यूलकास्टना (दलितांना) स्वतंत्र मतदार संघ देण्याची योजना जाहीर करून ब्रिटिश सत्तेने देशात मतभेदाचे वातावरण निर्माण केले. एका समाजापासून दुसऱ्या समाजाला दूर करून देशात दुहीचे बीज पेरण्याचा डाव इंग्रजांनी टाकल्याचे गांधीजींच्या लक्षात आले. मुसलमानांना वेगळा मतदार संघ दिल्याने देशात दुफळीचे वातावरण निर्माण झाले होते याची गांधीजींना पूर्ण कल्पना होती. त्यांच्या उपोषणामुळे चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. गांधीजींच्या जीवाला धोका आहे असे जाणून मध्यस्थीचे प्रयत्न सुरू करण्यात आले. यशवंतराव या काळात तुरुंगातच होते. डॉ. आंबेडकरांनी गांधीजींची भेट घ्यावी आणि त्यांना

उपोषण सोडण्याची विनंती करावी या दृष्टीने प्रयत्न सुरू करण्यात आले. उपोषणासंबंधी तुरुंगात साधकबाधक चर्चा व्हायची. यशवंतराव या चर्चेत भाग घेऊन सांगायचे की गांधीजींचे प्राण निश्चितपणे वाचवायला हवेत. पण त्याचबरोबर दलित समाजाच्या वेदना पण समजून घ्यायला हव्यात. दलितांच्या मनांत राष्ट्रीय भावना निर्माण व्हावी या दृष्टीनेही पावले उचलायला हवीत. डॉ. आंबेडकरांनी मनाचा मोठेपणा दाखवून स्वतंत्र मतदार संघाची योजना सोडून दिली. पुणे करारावर सही केली आणि गांधीजींचे प्राण वाचविण्याची मोलाची कामगिरी केली. गांधीजी येरवडा जेलमध्ये असताना कॅम्प जेलमधील राजबंद्यांना गांधीजींची भेट घ्यावी, त्यांचेशी खूप बोलावे असे वाटायचे. जेलच्या प्रमुख अधिकाऱ्यांजवळ त्यांनी आपली इच्छा बोलून दाखविली. गांधीजींशी बोलून तुरुंगाधिकाऱ्याने महिन्यातून दोन प्रतिनिधींना गांधीजींना भेटण्याची परवानगी दिली. या व्यवस्थेत यशवंतरावांचा नंबर काही लागू शकला नाही. तथापि शेजारच्या तेरा नंबरच्या बराकीत त्यांचे मित्र गौरीहर सिंहासने होते, त्यांचा नंबर लागला. सिंहासने गांधीजींना भेटून आले. गांधीजींबरोबर काय बोलणे झाले ते त्यांनी यशवंतरावांना सांगितले. त्यानंतर यशवंतरावांना येरवड्यावरून विसापूरच्या तुरुंगात नेण्यात आले. विसापूर जेलची ख्याती वाईट होती. हवामान वाईट, पाण्याची टंचाई, निर्दय अधिकारी, कष्टप्रद जीवन असा या तुरुंगाचा लौकिक होता. यशवंतरावांना ज्या बराकीत ठेवण्यात आले होते तेथे बडोद्याचे काँग्रेसचे नेते मगनभाई पटेल होते. दुसऱ्या बराकीत मुंबईचे स. का. पाटील होते. कांही दिवसांनी ह. रा. महाजनी यांना पण येरवड्यामधून विसापूरला पाठविण्यात आले. पाटलांकडे तुरुंगात पुस्तकांचा मोठा संग्रह असायचा. यशवंतरावांना त्यांची पुस्तके वाचायला मिळायची आणि महाजनींबरोबर चर्चा करण्याची संधी मिळायची. दिवस भरभर जात असताना १९३३ च्या मे महिन्यात यशवंतरावांची तुरुंगातून मुक्तता करण्यात आली आणि त्यांना दौंडमार्गे पुण्याला जाणाऱ्या रेल्वे गाडीत बसवून देण्यात आले.

१९३५ च्या कायद्यानुसार प्रांतिक सरकारांच्या निवडणुका घेतल्या जाणार आणि त्यात सर्व राजकीय पक्ष उतरणार असे वातावरण दिसू लागले. त्यावेळी यशवंतराव ज्युनिअर बी. ए. च्या वर्गात होते. १९३७ च्या प्रारंभी निवडणुका

होणार असे जाहीर करण्यात आले. काँग्रेसने या निवडणुकात भाग घ्यावा की नाही यावर खूप चर्चा झाली आणि अखेर निवडणुका लढवाव्यात असा निर्णय झाला. सातारा जिल्ह्यात काँग्रेसला विजयी करण्याचा निश्चय सर्व तरुण कार्यकर्त्यांनी केला. यशवंतरावांना ज्युनिअर बी. ए. ची विद्यापीठाची परीक्षा नव्हती. त्यामुळे त्यांनी जिल्ह्यात हिंडून कार्यकर्त्यांचा कानोसा घेतला व त्यांची मने व मते निवडणुकीच्या दृष्टीने तयार केली. दोन वर्षांपूर्वी झालेल्या मध्यवर्ती असेंब्लीच्या निवडणुकीची आठवण त्यांनी आपल्या सहकारी तरुण कार्यकर्त्यांना करून दिली. ही निवडणूक काँग्रेसतर्फे श्री. काकासाहेब गाडगीळ आणि तात्यासाहेब जेधे यांनी जिंकली होती. त्यावेळी जिल्ह्यातील सर्व कार्यकर्त्यांनी पराकाष्ठेचे प्रयत्न केले होते. विधिमंडळाच्या निवडणुकीसाठी उमेदवार कोण याची चर्चा सुरू झाली. भाऊसाहेब सोमण हे जिल्ह्याचे नेते होते. त्यांना जाऊन भेटायचे आणि ग्रामीण भागातला आपला उमेदवार मागून घ्यायचा असे यशवंतरावांसह सर्व तरुण कार्यकर्त्यांनी ठरविले. त्याप्रमाणे आत्मारामबापू पाटील, रामभाऊ पाटील आणि यशवंतराव हे तिघेजण भाऊसाहेबांना भेटले. भाऊसाहेबांनी त्यांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले. भाऊसाहेब शेवटी म्हणाले, "तुमचे म्हणणे ठीक आहे. तथापि उमेदवार हा पोक्त असला पाहिजे. लोकांमध्ये चांगला माहीत असायला पाहिजे आणि निवडणुकीचा मोठा खर्च करू शकेल असा ऐपतदार पाहिजे." भाऊसाहेबांच्या या बोलण्यातून जो अर्थ काढायचा तो यशवंतरावांनी काढला आणि बोरगांवला निवडक दहा-बारा कार्यकर्त्यांची बैठक बोलावली. बरीच चर्चा झाली. वाळव्यातून कांही लोक आले होते. कराड तालुक्यामधून राघूअण्णा लिमये व यशवंतराव चव्हाण उपस्थित होते. आत्मारामबापू पाटील यांनी निवडणूक लढवावी असा कल चर्चेतून दिसून आला. भाऊसाहेबांचा शब्द अखेरचा न मानता प्रांतिकच्या नेत्यांना पटवून द्यायचे असे या बैठकीत ठरविण्यात आले. महाराष्ट्र काँग्रेसचे नेतृत्व शहरी आहे, त्याला ग्रामीण भागाची व तेथील कार्यकर्त्यांची जाण नाही हे सर्वांना ठाऊक होते. केळकर-भोपटकर आदि काँग्रेसची नेते मंडळी, एखादा वृद्ध वकील किंवा डॉक्टर यांची निवड करतील याचाही अंदाज तरुण कार्यकर्त्यांनी बांधला होता. सातारा आणि कराड असे दोन मतदारसंघ होते. कराडमध्ये कराड, वाळवा आणि आसपासचा

भाग होता. या मतदार संघासाठी आत्मारामबापू पाटील यांचा आग्रह धरण्यात आला. ते शेतकरी कुटुंबातील होते आणि त्यांच्या दोघा बंधूंनी निवडणूक लढविण्याची त्यांना मुभा दिली होती. बापू अविवाहित होते. शिक्षण मॅट्रिकपर्यंत झालेले होते, वक्तृत्व चांगले होते. भाषा शुद्ध, स्वच्छ होती. व्यक्तिमत्त्व रुबाबदार होते. १९३० व १९३२ च्या दोन्ही आंदोलनात त्यांनी तुरुंगवास भोगला होता. सोमणांचे मन वळविण्याकरिता बुवासाहेब गोसावी व शंकरराव साठे यांची मदत घेण्यात आली. राघूअण्णा लिमये व यशवंतराव या दोघांनी या दोन्ही नेत्यांपुढे आपली बाजू मांडताना बदलत्या राजकारणाची, बदलत्या नेतृत्वाची त्यांना कल्पना दिली.

साठे हुशार आणि धूर्त. त्यांनी प्रश्न टाकला की, कूपर गट निवडणुकीत उतरल्यावर त्यांच्या उमेदवारांपुढे काँग्रेसचे उमेदवार टिकतील का ? त्यावर यशवंतरावांनी उत्तर दिले, "शंकररावजी, आम्ही फक्त एक जागा मागत आहोत, ती पण कराड-वाळव्याची. मराठा समाजाचा उमेदवार तेथे निश्चित निवडून येईल." सोमणांनी उमेदवारीचा प्रश्न प्रांतिकवर सोपविला. आत्मारामबापूंनी सातारा-पुणे असे बरेच हेलपाटे घातले. त्यांच्याकडून यशवंतरावांना हकिगत कळत असे. प्रांतिकला जुनी, जमीनदार माणसे हवी होती असे प्रांतिक नेत्यांशी झालेल्या चर्चेत आत्मारामबापूंना आढळून आले. अखेरीस वल्लभभाई पटेल यांना भेटून त्यांच्या कानावर सारी स्थिती घालावी असे ठरले आणि त्याची जबाबदारी यशवंतराव चव्हाण यांच्यावर टाकण्यात आली. यशवंतराव मुंबईला गेले. बाबूराव गोडसे यांच्याकडे उतरले. त्यांच्या मदतीनेच सरदार पटेलांच्या घरापर्यंत पोहोचले. वल्लभभाई हे आपले चिरंजीव डाह्याभाई यांच्याकडे उतरले होते. थोड्या प्रयासाने भेट झाली. सरदारांनी यशवंतराव चव्हाणांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले आणि शेवटी विचारले, "तुमचा, शेतकऱ्यांचा प्रतिनिधी पडला तर त्याची जोखीम कोण घेणार ?" यशवंतरावांनी तात्काळ उत्तर दिले, "जिल्ह्यातील सर्व तरुण कार्यकर्ते जबाबदारी घेतील." पटेलांची मुलाखत संपली आणि यशवंतराव पुणेमार्गे सातारला परतले. त्यांनी आत्मारामबापूंसह सर्व कार्यकर्त्यांना घडलेला वृत्तांत सांगितला. यानंतर यशवंतराव शिक्षणाचे उरलेले वर्ष पुरे करण्यासाठी कोल्हापूरला गेले.

चार-दोन दिवसांत त्यांना निरोप समजला की, आत्मारामबापूंची उमेदवार म्हणून निवड करण्यात आली. यशवंतरावांना आनंद झाला. आपले प्रयत्न फळाला आल्याबद्दल समाधान वाटले. ग्रामीण भागातील नेतृत्वाचा उदय होण्यास सुरुवात झाली अशी खूणगांठ त्यांनी मनाशी बांधली.

आत्मारामबापूंच्या उमेदवारीचे सबंध सातारा जिल्ह्यात स्वागत झाले. निवडणूक अटीतटीची झाली. आत्मारामबापूंच्या विरोधात अण्णासाहेब कल्याणी आणि शंकरराव मोहिते उभे राहिले. त्यांच्या जवळ पैशाची, साधनांची कमतरता नव्हती. आत्मारामबापूंचा प्रचार कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांनी सायकलवरून, सर्व्हिस मोटारीतून हिंडून हिरिरीने केला. जिल्ह्यात कॉंग्रेसचे एकूण तीन उमेदवार उभे होते. एक ब्राह्मण, एक मराठा आणि एक जैन. श्री. शिराळकर, आत्मारामबापू आणि भाऊसाहेब कुदळे हे ते तीन उमेदवार. पंडित नेहरू प्रचारासाठी आले आणि त्यांच्या प्रचारसभा सातारा व कराड येथे झाल्या. कराडला कृष्णाकांठी प्रचंड सभा झाली. पंडितजींचे भाषण ऐकण्यासाठी शेतकरी लांबलांबून आले होते. त्यांच्यावर नेहरूंच्या भाषणाचा अनुकूल परिणाम झाल्याचे दिसून आले. दुसरे मोठे नेते मानवेंद्रनाथ रॉय पण प्रचारासाठी आले होते. यशवंतरावांनी त्यांना प्रथमच पाहिले आणि प्रथमच त्यांच्याशी भेट झाली. निवडणुकीचा प्रचार अत्यंत प्रभावी झाल्याने आत्मारामबापू पाटील प्रचंड बहुमताने निवडून आले. पांडुअण्णा शिराळकर पण निवडून आले. कॉंग्रेसला बहुमत मिळाले. तथापि मंत्रिमंडळ बनवायचे की नाही याबाबत नेत्यांत मतभेद झाले. वर्किंग कमिटीने सत्ता राबवावी असा ठराव केल्यावर मात्र मतभेदाचे वादळ शांत झाले आणि मंत्रिमंडळाविषयी चर्चा सुरू झाली. आत्मारामबापूंना मंत्रिपद मिळण्याची शक्यता वाटत नव्हती. तथापि विधिमंडळात ते शेतकऱ्यांचे, गरिबांचे प्रश्न हिरिरीने मांडतील अशी खात्री सर्वांना वाटत होती. आत्मारामबापूंकडे कार्यकर्त्यांचे जाणे-येणे सुरू झाले व तेही कार्यकर्त्यांकडे येऊ-जाऊ लागले. मंत्रिमंडळ बनविण्यात आले. नरिमन यांच्याऐवजी बाळासाहेब खेरांना मंत्रिमंडळ बनविण्याची संधी देण्यात आली.

मुंबई कौन्सिलचे अधिवेशन पुण्यात भरले असताना आत्मारामबापू पाटलांच्या पाहुणचारासाठी यशवंतराव चार दिवस पुणे येथे गेले होते. 'महार वतन

नष्ट करा' या मागणीसाठी एक मोठा मोर्चा श्री. खेर यांना भेटण्यासाठी गेला असताना खेरांनी मोर्चेवाल्यांची भेट घेऊन त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. महारांना जमिनी वतन म्हणून दिल्यानंतर त्या मोबदल्यात त्यांच्याकडून पिढ्यान् पिढ्या, जन्मभर गांवगाड्याचे काम करून घ्यायचे ही पद्धत या महार वतनात होती. त्यात बदल होण्याची गरज होती. डॉ. आंबेडकरांनी त्यासाठी प्रयत्न सुरू केले होते. आत्मारामबापूंना आणि यशवंतरावांना आंबेडकरांची मागणी न्याय्य वाटत होती. कांही आमदारांना त्यादृष्टीने त्यांनी तयार केले. पण त्याचा कांही उपयोग झाला नाही. राजकारण करताना सामाजिक जाणिवांचे भान ठेवून पुढे गेले पाहिजे तरच मुख्य प्रवाहापासून अलग राहिलेला समाज राष्ट्रीय चळवळीत येईल याची खूणगांठ यशवंतरावांनी मनाशी बांधली. इंग्रजांचे राज्य गेले, स्वातंत्र्य मिळाले, म्हणजे सर्व कांही मिळाले असे होणार नाही. राजकीय स्वातंत्र्याबरोबर सामाजिक, आर्थिक जीवनही बदलेले पाहिजे, विषमता दूर झाली पाहिजे असा अर्थ निश्चित करून यशवंतराव समाजवादाच्या विचाराकडे वळले.

आचार्य नरेंद्र देव, जयप्रकाश नारायण आदि नेत्यांनी काँग्रेस अंतर्गत समाजवादी पक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेतला. राघूअण्णा लिमये आदि सहकारी कार्यकर्त्यांचे मत पडले की या पक्षात सामील व्हावे. त्याप्रमाणे यशवंतरावांनी काँग्रेस समाजवादी पक्षाचे सदस्यत्व घेण्याचा निर्णय मनाशी घेतला. एस. एम. जोशी, ना. ग. गोरे यांच्याशी चर्चा करून राघूअण्णा लिमये कराडला परतले की ते कार्यकर्त्यांना जोशी-गोरे यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वर्णन करून सांगत. याच सुमारास मानवेंद्रनाथ रॉय यांच्या विचारसरणीने प्रभावित होऊन आत्मारामबापू पाटील, लक्ष्मणशास्त्री जोशी, ह. रा. महाजनी, वामनराव कुलकर्णी मंडळी त्यांच्याकडे वळली होती. काँग्रेस समाजवादी पक्षाचे महाराष्ट्राचे अधिवेशन १९३५ मध्ये कराड येथे घेण्याचे निश्चित झाले. यशवंतराव आणि राघूअण्णा यांनी चिटणीस, सहचिटणीस म्हणून परिषदेची जबाबदारी स्वीकारली. अध्यक्षस्थानी युसूफ मेहेरअली होते. त्यांचा आणि यशवंतरावांचा परिचय झाला. मेहेरअली यांचे व्यक्तिमत्त्व, त्यांचा त्याग, त्यांचा उमदेपणा याचा यशवंतरावांवर प्रभाव पडला. ही परिषद कराडमध्ये चालू असताना रॉयवादी मंडळी कराडमध्ये मुक्काम ठोकून

होती आणि समाजवाद्यांना हिणवीत होती. परिषद संपल्यावर यशवंतरावांनी काँग्रेस समाजवादी पक्षाचा राजीनामा देण्याचा निर्णय घेतला. रॉय यांच्या प्रभावाखाली काम करणाऱ्या मंडळींनी त्यांना आपल्याकडे ओढण्यात यश मिळविले होते. रॉय यांचे विचार, त्यांची बुद्धिमत्ता, त्यांचा त्याग, त्यांचा कम्युनिझमचा अभ्यास आदि बाबी यशवंतरावांना आकर्षित करीत होत्या. आत्मारामबापू पूर्णतः रॉयवादी बनले होते. महाजनी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री प्रभृती यशवंतरावांना मानवेंद्रनाथ रॉय यांचे वाङ्मय वाचायला देऊन आपल्या कळपात ओढण्याचा पराकाष्ठेचा प्रयत्न करीत होते. तथापि काँग्रेस संघटना, नेहरू-गांधी यांचे नेतृत्व, काँग्रेस कार्यकर्त्यांचा संच, शेतकरी, कामगार, गरीब, दलित यांचे हित डोळ्यापुढे ठेवून काँग्रेसमध्येच राहण्याचा ठाम निर्णय यशवंतरावांनी घेतला.

हायस्कूलमधील विद्यार्थी जीवन आणि राजकारण, चळवळीतील सहभाग आणि तुरुंगवास असा जीवनाचा प्रवास चालू असताना कॉलेजचे शिक्षण संपवून यशवंतरावांनी पदवी मिळविली. कायद्याचा अभ्यास करून एलएल. बी. व्हायचे हे त्यांनी कॉलेजात असतानाच मनाशी ठरविले होते. पुणे की कोल्हापूरला, खर्चाचे काय याबाबत बंधूंशी विचारविनीमय करून पुण्याची निवड केली. दोन वर्षांच्या खर्चाची तरतूद म्हणून बंधूंनी विट्याची जमीन विकून टाकली. एक ऐतिहासिक शहर आणि महत्त्वाचे शैक्षणिक केंद्र असा पुण्याचा लौकिक. राजकीय- सांस्कृतिक चळवळीचे उगमस्थान. लॉ कॉलेजात नांव दाखल केल्यावर शुक्रवार पेठेतून सायकलवरून लॉ कॉलेजला जाण्याचा दिनक्रम यशवंतरावांनी सुरू केला. हनुमान टेकडीच्या पायथ्याशी असलेल्या कॉलेज इमारतीपर्यंत पोहोचायला सायकलवरून किमान अर्धा तास वेळ लागायचा. प्रिं. घारपुरे, कायदेतज्ज्ञ ल. ब. भोपटकर आदि प्राध्यापक शिकवायला होते. पुण्याच्या मुक्कामात विष्णुपंत चितळे यांच्याशी यशवंतरावांचा परिचय झाला. आत्मारामबापू पाटील आणि शांताबाई पिंगळे हा आंतरजातीय विवाह बराच गाजला. बापूंच्या रजिस्टर्ड विवाहाला केवळ संमतीच न देता यशवंतराव साक्षीदार राहिले होते. बापूंनी पुण्यात बिऱ्हाड करायचे ठरविले. त्यांनी स्नेही-सहकारी यशवंतरावांना आपल्या घरी ठेऊन घेतले. एक वर्ष बापूंकडे काढल्यावर मग यशवंतरावांनी दुसरीकडे राहावयाची सोय केली. १९३९ मध्ये

यशवंतराव एलएल.बी. परीक्षेला बसले तथापि उत्तीर्ण झाले नाहीत. नंतर ऑक्टोबर परीक्षेत पास झाले. नापासाला कारण होते बापूंच्या घरी राहून कायद्याचा अभ्यास करणे कठीण जात होते. तिथे सारखे राजकारणच चालायचे आणि तेही रॉय यांच्या विचारांचे.

१९३६-३७ च्या सुमारास सातारा जिल्ह्यात कूपरशाहीने मस्तवालपणा सुरू केला होता. सरंजामदार वर्गाला हाताशी धरून जिल्ह्यातील राजकीय सत्ता आपल्या मुठीत ठेवण्याचा प्रयत्न चालविला होता. कूपरशाहीचे प्रमुख धनजीशहा कूपर हे बडे कारखानदार होते. सातारा रोड स्टेशनलगत त्यांचा मोठा कारखाना होता. जिल्ह्यातील सर्व दारूचे मक्ते त्यांच्याकडे होते, मोठा व्यापार होता, आणि भरपूर धनसंपत्ती होती. धनजीशहा हुशार होते आणि महत्त्वाकांक्षी होते. इंग्रज सरकारच्या दरबारात त्यांचे वजन होते. प्रथम त्यांनी जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्षपद मिळविले. त्यानंतर सातारा जिल्हा स्कूल बोर्ड काबीज करून ते प्रांताच्या राजकारणाकडे वळले. १९३७ सालच्या कौन्सिल निवडणुकीला धनजी कूपर उभे राहिले होते. १९३७ पर्यंत त्यांनी सातारा जिल्ह्याच्या स्थानिक स्वराज्य संस्थांवर आपली हुकुमत गाजविली असल्याने ते कौन्सिलवर निवडून आले. १९३५ च्या कायद्याखाली पहिले मुंबई सरकार बनले तेव्हा कांही महिने कूपर मुख्यमंत्री होते. कूपर मंत्रिमंडळ असे त्याला संबोधिले जायचे. काँग्रेसने मंत्रिमंडळ बनवायचे ठरविल्यावर कूपर बाजूला झाले. त्यानंतर त्यांच्या गोटातील अण्णासाहेब कल्याणी, सरदार पाटणकर आदि मातब्बर मंडळी बाजूला झाली. लोकल बोर्डाची निवडणूक जिंकण्यास तरुण कार्यकर्त्यांनी काँग्रेसला चांगली मदत केली. या निवडणुकीत यशवंतरावांनी पुढाकार घेऊन के. डी. पाटील, किसन वीर, बाबासाहेब शिंदे (आखाडकर) आदी सहकाऱ्यांची मदत घेऊन काँग्रेस पक्षाला विजयी केले. सातारा जिल्हा लोकल बोर्ड काँग्रेसच्या ताब्यात आले. बाबासाहेब शिंदे हे जुने, निष्ठावान काँग्रेस कार्यकर्ते होते. त्यांना जिल्ह्यात मान होता. अध्यक्षपदाच्या लढतीत आनंदराव चव्हाण आणि बाळासाहेब देसाई हे दोन तरुण वकील उतरले. आनंदरावांना कूपर गटातील लोकांनी पाठिंबा दर्शविला. बाळासाहेब देसाईंना पाठिंबा देऊन निवडून आणावयाचे असे यशवंतरावांनी ठरविले. देसाई निवडून आले. कूपर गट पराभूत झाला. या

निवडणुकीपासून चव्हाण-देसाई खूप जवळ आले, त्यांचा स्नेह जडला आणि तो बरीच वर्षे टिकला. आनंदराव चव्हाण मात्र निष्कारण दुखावले गेले. या निवडणुकीत यशवंतराव चव्हाणांनी जीवाचे रान करून काँग्रेसचा प्रचार केला. 'लोकक्रांती' नांवाचे साप्ताहिक चालवून निवडणूक प्रचाराला मोलाचा हातभार लावला. या साप्ताहिकातील लेखन यशवंतरावच करीत. निवडणूक प्रचारात त्यांना आत्माराम पाटील यांची विशेष मदत झाली.

१९३८-३९ च्या दरम्यान महाराष्ट्रातील बुद्धिवादी तरुणांची संघटना बांधण्याचा प्रयत्न झाला. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आदींनी त्यात पुढाकार घेतला होता. या मंडळींवर बंगालमधील क्रांतिकारकांची छाप पडलेली होती. ते सशस्त्र क्रांतीचा विचार करीत होते आणि तेवढ्यासाठी पैसे गोळा करण्याचा प्रयत्न करीत होते. यांपैकी काहीजण स्वतःला रॉयवादी म्हणवून घेत होते. रॉय गटाकडे यशवंतराव आकर्षित झाले होते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री, जी. डी. पारीख, ह. रा. महाजनी, बॅरिस्टर वि. म. तारकुंडे आदि रॉयवादी कार्यकर्त्यांशी यशवंतराव चर्चा करीत. रॉय यांच्या विचारांशी आपली तार जुळते असे त्यांना मनोमनी वाटू लागले होते. आत्मारामबापू पाटील हे पूर्णतया रॉयवादी झाले होते. यशवंतरावांनीही रॉय यांचे विचार स्वीकारून रॉयवादी व्हावे असा आत्मारामबापूंनी प्रयत्न करून पाहिला. तथापि काँग्रेस सोडण्यास यशवंतरावांचे मन तयार होत नव्हते. समाजवादी विचारसरणी त्यांना मान्य होती. तथापि देशातील कोट्यवधी शेतकरी व कामगार यांना संघटित करून त्यांच्या प्रश्नाची तड लावणे हे बिकट काम फक्त काँग्रेस संघटनाच करू शकेल असा विश्वास त्यांना वाटत होता. गांधी-नेहरू हेच आपले नेते आहेत हे त्यांनी रॉयवाद्यांना स्पष्टपणे सांगितले होते.

१९३९ मध्ये तासगांवला परिषद घेण्यात यशवंतरावांनी पुढाकार घेतला. या परिषदेत मानवेंद्रनाथ रॉय यांच्यावर विश्वास व्यक्त करण्यात येऊन त्यांचा दौरा आंखण्याचा निर्णय घेण्यात आला. रॉय यांना नेते मानून रॉयवादी व्हावे की महात्मा गांधींच्या काँग्रेसचे निष्ठावान कार्यकर्ते व्हावे यासंबंधी यशवंतराव मनाशी सारासार विचार करीत असतानाच दुसरे महायुद्ध सुरू झाले. रॉयवाद्यांनी ब्रिटिश सरकारशी सहकार्य करण्याची भूमिका घेतली. रॉय गट काँग्रेसपासून दूर झाला

आणि यशवंतराव हे रॉय गटापासून दूर झाले. हिटलरच्या हुकूमशाहीचा पाडाव केल्यानंतर ब्रिटिश सरकार आपल्या हाती आपोआप स्वातंत्र्य देईल अशी रॉयवाद्यांनी भूमिका मांडावयास सुरुवात करताच, ब्रिटिशांशी लढा दिल्याशिवाय भारताला स्वातंत्र्य मिळायचे नाही अशी भूमिका काँग्रेसने घेतली. यशवंतरावांनी बुद्धीचा निकष लावला आणि जाहीर केले की काँग्रेसचीच भूमिका बरोबर आहे. साम्राज्यशाहीशी युद्धात सहकार्य केल्याने आपला कसलाच फायदा होणार नाही. ब्रिटिश सरकारच्या शब्दावर विश्वास ठेवणे हिताचे ठरणार नाही. काँग्रेसने यानंतर तीन वर्षांनी १९४२ साली सुरू केलेल्या स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व सातारा जिल्ह्यात यशवंतरावांकडे आले आणि त्यांनी आपण समर्थ नेतृत्व देऊ शकतो हे दाखवून दिले.

✦✦✦

## : ३ :

१९४० मध्ये काँग्रेसने वैयक्तिक सत्याग्रहाचा निर्णय घेतला आणि देशातील वातावरणाला कलाटणी मिळाली. काँग्रेसभवनवर जाऊन कार्यकर्ते सत्याग्रहासाठी आपली नांवे नोंदवू लागले. श्री. काकासाहेब गाडगीळ व केशवराव जेधे यांनी सत्याग्रहाचा दिवसही निश्चित केला. महायुद्धाला मदत करायची नाही, लष्करात भरती व्हायचे नाही, ब्रिटिशांचे बाजूने लढण्यासाठी एकही माणूस मिळू द्यायचा नाही, अशी घोषणा केली की, पोलिस सत्याग्रहींना पकडू लागले. पुणे, ठाणे, नाशिक आदि ठिकाणचे तुरुंग राजबंद्यांनी भरून गेले. या धामधुमीत यशवंतराव पुण्यात लॉ कॉलेजमध्ये कायद्याचा अभ्यास करीत होते. फर्स्ट एलएल. बी. परीक्षा उत्तीर्ण झाले होते आणि सेकंड एलएल. बी. चा विचार करीत होते. सातारा जिल्हा काँग्रेसच्या अध्यक्षपदाची जबाबदारी त्यांनी सांभाळावी असा साताऱच्या कार्यकर्त्यांनी आग्रह सुरू केला आणि यशवंतराव राजी झाले. अध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळून त्यांनी सेकंड एलएल.बी. ची परीक्षा दिली. परीक्षेत उत्तीर्ण होऊन ते १९४१ मध्ये वकील झाले. या सुमारास जर्मनीने रशियावर स्वारी केल्यामुळे युद्धाला गंभीर वळण लागले. जपानने पूर्वेकडे ब्रिटिशांची लष्करी ठाणी उद्ध्वस्त करून सिलोन ब्रह्मदेशपर्यंत मुसंडी मारली. १९४२ सालात काय होणार याकडे भारतीय जनतेचे लक्ष लागले. सुभाषचंद्र बोस यांनी आझाद हिंद फौजेची उभारणी करून ब्रह्मदेशमार्गे भारताच्या सरहद्दीपर्यंत मजल मारली. "चलो दिल्ली" ही गर्जना आणि त्या दृष्टीने त्यांची वाटचाल भारतीय जनतेला दिलासा देऊ लागली. काँग्रेसचे नेते आपापसात चर्चा करू लागले. काँग्रेस कार्यकारिणीची बैठक वर्धा येथे भरून सुमारे आठ तास चर्चा, विचारविनिमय झाला. ब्रिटिश साम्राज्यशाहीला

शेवटचा धक्का देण्याचे निश्चित करण्यात आले. तसा ठरावही करण्यात आला. अखिल भारतीय काँग्रेसच्या अधिवेशनाची तारीखही निश्चित करण्यात आली. मुंबईत हे अधिवेशन ऑगस्टच्या ७ व ८ तारखेला भरेल असे जाहीर करण्यात आल्यावर ब्रिटिश सरकार अस्वस्थ झाले. अधिवेशनापूर्वीच काँग्रेसला चिरडून टाकण्याचे मनसुबे इंग्रज सरकार रचू लागले. तिकडे इंग्लंडमधील ब्रिटिश सरकार भारताला कांहीतरी आश्वासन देऊन अंतिम लढा टाळण्याच्या दृष्टीने प्रयत्न करू लागले. तथापि सरदार पटेलांनी जाहीरपणे सांगून टाकले की, काँग्रेसचा हा शेवटचा लढा असेल. यात ब्रिटिशांचा शेवट होईल किंवा काँग्रेसचा. ब्रिटिशांना या देशातून हुसकावून लावून आम्ही भारताला स्वतंत्र करणारच अशी गर्जना सरदारांनी केली.

१९४२ च्या प्रारंभी सर स्टॅफर्ड क्रिप्स कांही राजकीय सुधारणा घेऊन भारतात आले. त्यांनी गांधीजी, बॅरिस्टर जिना, डॉ. आंबेडकर यांचेशी वेगवेगळी चर्चा केली. तथापि कुणालाही क्रिप्स योजना मान्य झाली नाही. अमान्यतेला एम. एन. रॉय हे एकटेच अपवाद होते. क्रिप्स अपयश घेऊन मायदेशी परतले. भारतात असंतोषाचे वातावरण वाढू लागले. गांधीजींचे "हरिजन" पत्रातील लेख जहाल बनू लागले. जपानने पूर्वेकडे अधिक आक्रमक पवित्रा घेताच गांधीजींनी ब्रिटिश सत्तेला खणखणीत इशारा दिला की ब्रिटिशांनी हिंदुस्थानातून काढता पाय घेण्याची वेळ येऊन ठेपली आहे. १९४२ च्या एप्रिल महिन्यात काँग्रेस वर्किंग कमिटीची मिटिंग अलाहाबाद येथे झाली. गांधीजींनी स्वच्छ शब्दांत कार्यकारिणीला कळविले की, ब्रिटिशांनी ताबडतोब भारत सोडून जावे, जपानचे काय करावयाचे ते आम्ही बघून घेऊ. गांधीजी वर्धा येथे मुक्कामाला होते. त्यांचे मन जाणून घेण्यासाठी नेत्यांची तिकडे रीघ लागली होती. जुलैत वर्ध्यालाच वर्किंग कमिटीची बैठक घेण्याचे ठरले. गांधीजी या बैठकीला हजर राहिले आणि त्यांनी चर्चेत भाग घेतला. गांधीजींच्या भूमिकेला नेत्यांनी पाठिंबा दर्शविला आणि ठराव एकमताने करण्यात आला. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीची बैठक मुंबईत ७ ऑगस्टला बोलावण्यात आली. या बैठकीतील निर्णयाबद्दल काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये फार मोठे कुतूहल निर्माण झाले होते. यशवंतरावांनी आपल्या मित्रांसमवेत मुंबईला जाण्याचे ठरविले. के. डी. पाटील, चंद्रोजी पाटील, तात्यासाहेब कोरे आदींच्या समवेत यशवंतराव मुंबईला गेले. विवाह

होऊन अवघा महिना दीड महिना लोटलेला होता. राजकारणातील सहभागाची पत्नीला त्यांनी फारशी कल्पना दिलेली नव्हती. मुंबईला प्रयाण करण्यापूर्वी बंधू गणपतरावांना मात्र कल्पना दिली होती.

अखिल भारतीय काँग्रेसची बैठक ७ आणि ८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईला गवालिया टॅन्क मैदानावर झाली. जनतेची अलोट गर्दी जमली होती. लोकांचे कुतुहल आणि उत्साह ओसंडून जात होता. पंडित जवाहरलाल नेहरूंनी ''भारत छोडो''चा ठराव मांडला. त्यावर प्रदीर्घ भाषण करून ठरावामागील भूमिका स्पष्ट केली. ''करेंगे या मरेंगे'' (करू अथवा मरू) असा निर्धार व्यक्त करण्यात येऊन लढ्याचे आवाहन करण्यात आले. गांधीजींचेही भाषण झाले. त्यांनी सांगितले की आजपासून तुम्ही स्वतंत्र झाला आहात असे समजून कामास लागा. हा अखेरचा लढा असून ''करू किंवा मरू'' हा या स्वातंत्र्य लढ्याचा मंत्र आहे समजा. दुसऱ्या दिवशी ९ ऑगस्टची पहाट उजाडताच लोकांना समजले की, गांधी, नेहरू, पटेल, आझाद आदि नेत्यांची सरकारने रात्रीच धरपकड केली असून त्यांना पुण्याकडे नेले आहे. जनता रस्त्यावर आली. हरताळ, मिरवणुका, मोर्चे यांनी मुंबई शहर दणाणून गेले. दगडफेक, लाठीमार, अश्रुधूर हे प्रकार ठिकठिकाणी सुरू झाले. ब्रिटिशांनी दडपशाहीचा वरवंटा फिरविण्यास सुरुवात केली. यशवंतरावांनी मित्रांशी चर्चा केली. मुंबई शहर सर्वांनी एकत्रपणे सोडून न जाता आपापल्या पद्धतीने गांवी परतायचे, पोलिसांच्या हाती सांपडायचे नाही, असे ठरविण्यात आले. यशवंतराव मुंबईत एक दिवस मागे राहिले आणि दहा ऑगस्टला रात्री पुण्यास पोहोचले. पुण्यातही निदर्शने, मोर्चे, मिरवणुका आदि कार्यक्रमामुळे वातावरण तंग झाले होते. यशवंतरावांनी रात्री रेल्वे पकडली आणि तिसऱ्या वर्गाच्या गर्दीच्या डब्यात बसून कराडच्या दिशेने प्रयाण केले. कराडला उतरण्यात धोका आहे हे जाणून अलीकडच्या शिरवडे स्टेशनावर ते गाडीतून उतरले आणि मसूरच्या दिशेने पायी चालू लागले. पहाट झाली होती. रस्त्यात त्यांना कळले की, मसूरमध्ये बरीच धरपकड झाली आहे. मसूरची वाट सोडून यशवंतराव इंदोलीच्या रस्त्याला हातात बॅग घेऊन पायी चालू लागले. एक अनोळखी माणूस भेटला. त्याचे समवेत यशवंतराव कृष्णा नदी ओलांडून इंदोलीच्या आसमंतात पोहोचले. दिनकरराव निकमांना निरोप पाठवून बोलावून घेतले. निकम

हे एक कार्यकर्ते आणि पुढारी होते. त्यांनी गांवाबाहेरच थांबून पुढे काय करावयाचे याबाबत यशवंतरावांशी चर्चा केली. पोलिसांचे हाती सांपडायचे नाही हे चर्चेत ठरले. एक दिवस इंदोलीत काढल्यावर यशवंतराव कराडला गेले. तथापि आपल्या घरी न जाता स्नेही नारायणराव घाडगे यांचे घरी गेले व तेथे त्यांनी मुक्काम केला. घाडगे मंडळींनी गणपतरावांना निरोप दिला. थोड्या विश्रांतीनंतर पुढील कामाची आंखणी सुरू झाली. शांताराम इनामदार व इतर कार्यकर्त्यांना एकत्र येण्याबाबत निरोप दिले. विंगकरांच्या मोठ्या वाड्याच्या माडीवर सर्वजण एकत्र जमले, बोलणी झाली.

जास्तीत जास्त गावांत जाऊन, कार्यकर्त्यांना भेटून त्यांना कामाला लावण्याचे काम प्रथम करायचे असे यशवंतरावांनी सर्वांना सांगितले. भूमिगत चळवळीतील भूमिका पार पाडण्याचे कामाला यशवंतरावांनी इंदोलीपासूनच सुरुवात केली. आठ दिवसात त्यांनी कवठे, तांबवे, येळगांव आदि ठिकाणांना भेटी दिल्या. कवठ्याला किसन वीर यांची भेट घेतली, त्यांचेशी चर्चा केली. भूमिगत राहणे याचा अर्थ लपूनछपून जीवन कंठणे नव्हे तर मोकळेपणाने हिंडून प्रचार करणे अशी भूमिका यशवंतरावांनी घेतली होती. कार्यकर्त्यांनी पोलिसांच्या हाती सांपडून तुरुंगात जाऊ नये हे प्रयत्न बरेच यशस्वी होऊन भूमिगतांचा एक मोठा संच तयार करण्यात चव्हाणांना यश मिळाले. जनतेचा स्वयंस्फूर्त उघड उघड पाठिंबा दिसू लागताच सरकारची जी शक्ती केंद्रे होती त्यावर हल्ले करावयाचे, तिरंगी झेंडा लावून त्यांची तेथील सत्ता संपुष्टात आणावयाची, असे ठरविण्यात आले. कराडच्या मामलेदार कचेरीवर २४ ऑगस्टला मोर्चा नेण्याचे ठरले. यशवंतराव तांबव्याला गेले. तेथे काशिनाथपंत देशमुख यांचेशी बोलून आले. देशमुख हे लोकप्रिय काँग्रेस कार्यकर्ते होते, अहिंसात्मक पद्धतीचे आग्रही होते. त्यांनी खेड्यातील लोकांना मिरवणुकीने कराडला आणण्याची व्यवस्था केली. हजारो लोक मामलेदार कचेरीसमोर जमले. निदर्शकांचे नेतृत्व बाळासाहेब पाटील उंडाळकर यांचेकडे देण्यात आले होते. शांतारामबापू, कासेगावकर वैद्य, सदाशिव पेंढारकर, माधवराव जाधव आदि कार्यकर्ते तरुणांची - मुलांची सेना घेऊन सज्ज होतेच. पोलिसांची कुमक आणण्यात आली, तथापि कुठलाही अनुचित प्रकार घडला नाही. मोर्चाचा पहिला प्रयत्न यशस्वी झाला.

भूमिगत चळवळीचे नेतृत्व यशवंतरावांनी करावे, त्यांच्या सल्ल्यानुसार सर्व कार्यकर्त्यांनी पावले टाकावीत असे ठरविण्यात आल्यावर तालुका-तालुक्यांत मित्रमंडळींच्याद्वारे, पत्राद्वारे यशवंतरावांनी जागोजागी सूचना पाठविल्या. मोर्चानंतर दुसरे आणखी कांही कार्यक्रम हाती घ्यावे लागतील असेही या सूचनांत त्यांनी नमूद केलेले होते. शेतकऱ्यांची एकजूट करून साराबंदीची चळवळ हाती घ्यावी असेही यशवंतरावांनी सूचित केले होते. कराडनंतर पाटणला मोर्चाचा कार्यक्रम झाला. त्यानंतर तासगांवला फार मोठा मोर्चा काढण्यात आला. विठ्ठलराव पागे, कृष्णराव कुऱ्हाडे आदि कार्यकर्त्यांनी तो यशस्वी केला. मामलेदार कचेरीवर तिरंगा ध्वज फडकावण्यात आला. मामलेदार निकम यांच्या डोक्यावर गांधी टोपी घालण्यात येऊन महात्मा गांधी यांच्या नांवाचा जयजयकार करण्यात आला. तासगांव मोर्चाच्या यशामुळे ब्रिटिश सत्तेतील अधिकारी गडबडून गेले. त्यांनी पोलिसांना आक्रमक बनण्याच्या सूचना दिल्या. इस्लामपूर आणि वडूज या दोन ठिकाणच्या मोर्चाचे वेळी लाठीमार, गोळीबार करण्यात आला. वडूजच्या मोर्चाचे नेतृत्व परशुराम घारगे या लोकप्रिय पुढाऱ्याने केले. मोर्चा शांततेने काढणार आहोत असा निरोप बंडोपंत लोमटे यांनी संबंधित सरकारी अधिकाऱ्यांना पाठविला असतानाही मोर्चावर अमानुष गोळीबार करण्यात आला. परशुराम घारगे आणि त्यांचे कांही साथीदार या गोळीबारात ठार झाले. इस्लामपूरच्या मोर्चाची बांधणी पांडू मास्तरांनी केली होती. जिल्ह्यात पांडू मास्तरांचा लौकिक होता. कामेरीहून मोर्चा पुढे सरकल्यावर इस्लामपूरच्या अलीकडेच पोलिसांनी गोळीबार करून लोकांना पांगविण्याची कारवाई केली. पांडू मास्तर व त्यांच्या प्रमुख सहकाऱ्यांना पोलिसांनी अटक केली. गोळीबारामुळे लोक चिडून गेले आणि त्यांनी अधिक उत्साहाने काम करण्यास सुरुवात केली. जनआंदोलनाच्या शक्तीचा प्रभाव किती असतो आणि सर्वसामान्य जनता त्यागाला, बलिदानाला कशी तयार होते याचा प्रत्यय ब्रिटिश अधिकाऱ्यांना आला. कराड, पाटण, वडूज, इस्लामपूर आदि ठिकाणचे मोर्चे म्हणजे १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासातील सातारा जिल्ह्याचे सोनेरी पान म्हणावे लागेल.

सातारा जिल्ह्यात कराड, कुंडल, सांगली ही चळवळीची केंद्रे होती. नाना

पाटील, जी. डी. पाटील, वसंतदादा पाटील आदि मंडळी लोकांना संघटित करून सरकारला त्राहि भगवान करून सोडीत होते.. वाळवे-शिराळा भाग बरडे गुरुजींनी पिंजून काढला होता. ते त्यांच्या क्रांतिकारी पद्धतीने काम करीत होते. कवठ्याचे किसन वीर हे प्रवासात असताना पुण्यात पोलिसांकडून पकडले गेले. त्यांना येरवडा तुरुंगात डांबण्यात आले. त्यांनी यशवंतरावांना निरोप पाठविला की, संधीची वाट पाहात आहोत, तुरुंग फोडून बाहेर येण्याची योजना आंखीत आहोत. तीन महिने झाले आणि एके रात्री किसन वीर, छन्नूसिंग, पांडू मास्तर तुरुंग फोडून बाहेर पडले आणि कराडच्या आसपास यशवंतरावांना भेटले. रेठरे (बुद्रुक) येथे ढवळ्यांच्या मळ्यात प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक यशवंतरावांनी आयोजित केली होती. तिला काशिनाथपंत देशमुख, कुऱ्हाडे, सांगलीचे धुळाप्पा नवले, वाळव्याचे बरडे गुरुजी, कासेगांवकर वैद्य, पाटणचे विठ्ठलराव घाडगे, कराडातील शांताराम इनामदार, सदाशिव पेंढारकर, व्यंकटराव माने, माधवराव जाधव आदि बरेच जण हजर होते. मोर्चात लोक सहभागी होतात, सरकारविरुद्ध वातावरण तयार होते हे खरे असले तरी गोळीबारामुळे जीवितहानी होते, कार्यकर्ते गोळ्यांना बळी पडतात म्हणून मोर्चाचा कार्यक्रम बदलून दुसरा कार्यक्रम हाती घेण्याचे ठरले. युद्ध प्रयत्नांना खीळ घालावयाची असेल तर युद्धसाहित्य घेऊन जाणाऱ्या मालगाड्या रोखून धराव्यात, रेल्वे लाईन नादुरुस्त करावी, रेल्वे स्टेशन्स जाळावीत अशा सूचना पुढे आल्या. हे कार्यक्रम हाती घेण्यास संमती देण्यात आली. या नवीन कार्यक्रमांबाबत यशवंतरावांनी ठिकठिकाणी कळविण्याची व्यवस्था केली. यशवंतराव हे चळवळीची सूत्रे हलवितात म्हणून त्यांना पकडा असे पोलिसांना आदेश देण्यात आले. चव्हाणांना पकडण्यासाठी सरकारने एक हजार रुपयांचे बक्षीसही जाहीर केले. रेठरे येथील बैठक संपल्यानंतर साधारणपणे एके ठिकाणी एकदोन दिवसांपेक्षा जास्त राहावयाचे नाही असा नियम करून यशवंतराव सारखे स्थान बदल करीत होते. कराडातही ते पाच-सहा ठिकाणी अदलून बदलून राहात असत. नंतर त्यांनी कराड सोडले व पार्ले गांठले. यशवंतराव पाटील पार्लेकर यांचेकडे दोन दिवस थांबले. तेथून निघून मसूर-खराडे गांवच्या हद्दीतील दत्तोबा काटकर यांचेकडे गेले. काटकरांनी उभ्या पिकात झोपडी बांधून देऊन यशवंतरावांची राहण्याची व्यवस्था

केली. या ठिकाणी कार्यकर्ते यशवंतरावांना भेटून त्यांचा सल्ला घेत. संभाजीराव थोरात, आत्माराम बापू जाधव, माधवराव जाधव येऊन भेटत. भूमिगत चळवळ आणि या चळवळीतील धामधुमीचे जीवन जगत असताना यशवंतरावांना खूप चांगले स्नेही व सहकारी मिळाले. त्यांचा स्नेह नंतरही खूप वर्षे लाभला. यशवंतरावांनीही या स्नेह्यांची, सहकाऱ्यांची, कार्यकर्त्यांची शेवटपर्यंत आठवण ठेवली.

कराड जवळचे शिरवडे स्टेशन जाळण्याचा कार्यक्रम कासेगांवकर वैद्य यांनी आंखल्यावर सदाशिव पेंढारकर यांच्याकडे त्या कार्यक्रमाचे नेतृत्व देण्यात आले. त्यांनी दहा-पांच निवडक कार्यकर्ते बरोबर घेऊन मोठ्या हिंमतीने कामगिरी यशस्वीरित्या पार पाडली. यशवंतरावांचे भाचे श्री. बाबूराव कोतवाल यांनी स्टेशन जाळण्याच्या कामात महत्त्वाचा भाग उचलला. त्यावेळी बाबूराव हायस्कूलमध्ये शिकत होते. पोलिसांच्या हातून त्यांच्या बंदुका हिसकावून घेऊन त्या पळवून मग स्टेशनला आग लावण्यात आली. त्या रात्री यशवंतराव हे ओगलेवाडीला व्यंकटराव ओगले यांच्याकडे मुक्कामाला होते. भूमिगत चळवळीतील कार्यकर्त्यांना ओगले यांनी मोलाची मदत केली. भाचा बाबूराव याने लहान वयात धाडसाच्या कार्यक्रमात भाग घेतला याचा यशवंतरावांना अभिमान वाटला. शिरवडे स्टेशन जाळले गेल्यानंतर धरपकडीची मोहीम हाती घेऊन पोलिसांनी धाडी घालण्यास सुरुवात केली. रोज रात्री धाडी पडू लागल्या. लोकांचा छळ सुरू झाला. यशवंतरावांना पकडण्यासाठी पोलिसांनी शिकस्तीचे प्रयत्न सुरू केले. मित्रांनी त्यांना सल्ला दिला की कांही दिवस दूर कोठेतरी जावे. तथापि आपल्या कार्यकर्त्यांच्या रक्षणाची जबाबदारी अंगावर घेतली गेली असल्याने चव्हाण दूर जायचे टाळीत होते. श्री. अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांनी मुंबईला या असा निरोप पाठविल्यावर मात्र यशवंतराव नोव्हेंबरमध्ये नीलकंठराव कल्याणी यांच्या मोठ्या गाडीतून मुंबईला गेले. मुंबईत सातारा जिल्ह्यातील बरेच कामगार होते. त्यांच्याकडे चव्हाणांची अदलून बदलून राहण्याची व्यवस्था केली गेली. त्यांना अच्युतराव पटवर्धनांना भेटावयाचे होते. पण तो हेतू सफल झाला नाही. एस. एम. जोशी मात्र भेटले. बोहरी मुसलमानाच्या वेशात ते राहायचे आणि मुंबईत वावरावयाचे. अण्णासाहेबांच्या मध्यस्थीतून यशवंतरावांची आणि राम मनोहर लोहिया यांची भेट झाली. लोहियांना

उत्तर प्रदेश आणि बिहारमधील चळवळीची इत्थंभूत बातमी समजत असे. लोहिया बेडरपणे वावरावयाचे. अण्णासाहेब सहस्रबुद्धे कार्यकर्त्यांना चळवळीबाबत मार्गदर्शन करावयाचे. गुप्त बैठका व्हायच्या, कार्यकर्ते मनातील प्रश्न वा कल्पना मोकळेपणाने बोलून दाखवायचे. माहीमच्या बैठकीत उभी पिके जाळण्याच्या प्रस्तावाला यशवंतरावांनी विरोध केला. शेतकऱ्यांची पिके जाळून त्यांच्याशी कां लढावयाचे आहे असा प्रश्न त्यांनी बैठकीत विचारला. अण्णासाहेबांनी यशवंतरावांच्या विचारांना पाठिंबा दर्शविला. मुंबईतून सातारच्या चळवळीला मदत होत होती. तसेच उत्तर प्रदेश, बिहारला सूचना रवाना केल्या जात होत्या. मुंबईतला मुक्काम संपवून सातारा जिल्ह्यात जाण्यासाठी यशवंतराव आतूर झाले होते. तथापि यशवंतरावांना त्यासाठी बऱ्याच युक्त्या योजाव्या लागल्या. प्रथम ते शिराळ्याला गेले, तेथून चिखलीला. आनंदराव नाईकांच्या मळ्यात दोन दिवस राहिले. तेथून के. डी. पाटलांना भेटण्यासाठी कामेरीला गेले. तेथे त्यांना के. डी. पाटलांकडून समजले की, फरारी गुन्हेगार संघटित होत आहेत. सुरुवातीला या गुन्हेगारांची चळवळीला मदत झाली. नंतर मात्र ते डोईजड होऊ लागले. त्यांना बाजूला करावे, जरूर पडल्यास संघर्ष करावा लागला तरी करावा असा सूर कार्यकर्त्यांच्या चर्चेतून निघाला. सरकार आणि गुन्हेगार या दोन आघाड्यांविरुद्ध लढण्याची कार्यकर्त्यांनी तयारी दर्शविली.

यासंबंधी यशवंतरावांनी चंद्रोजी पाटील यांच्याशी चर्चा केली. कामेरीहून यशवंतराव सरळ मोठ्या रस्त्याने कराडला निघाले. डोक्याला फेटा बांधून सायकलवरून त्यांनी कराड गांठले. घरी जावे अशी मनाला ओढ वाटत होती. सरळ घरी गेले आणि आईला भेटले. माऊलीच्या डोळ्यात आनंदाश्रू उभे राहिले. दोघा भावांची भेट पण झाली. भूमिगत कार्यकर्ते पोलिसांना सांपडत नव्हते, म्हणून ते चिडल्यासारखे झाले होते. घरी फार वेळ थांबणे धोक्याचे होते म्हणून यशवंतराव सर्वांच्या गांठीभेटीनंतर बाहेर पडले आणि पुढील कामाच्या आंखणीला लागले. यशवंतरावांवर दडपण आणण्यासाठी त्यांचे बंधू गणपतरावांना अटक करून विजापूर तुरुंगात डांबण्यात आले. त्यांच्या अटकेमुळे घरची परिस्थिती बिकट झाली. डिसेंबरात प्रमुख कार्यकर्ते काले या गांवी एकत्र आले आणि त्यांनी निर्णय घेतला की प्रमुख मंडळींनी सातारा जि्हा सोडून कांही दिवस बाहेर रहावे. यशवंतरावांनी

पुण्याला जायची तयारी दर्शविली. पण जाणार कसे? मोटारीने शक्यच नव्हते. रेल्वेने प्रवास करण्याचे ठरवून ते एके रात्री कराड स्टेशनजवळच्या पिकात जाऊन बसले. वेश बदलण्याची खबरदारी घेतली होती. जोधपुरी कोट आणि फरची ऊंच टोपी घातलेल्या चव्हाणांनी गाडी स्टेशनात येताच हातातील बॅगेसह दुसऱ्या वर्गाच्या डब्यात प्रवेश केला. जवळ तिकीट नव्हतेच. डबा रिकामाच होता. गाडी सुटल्यावर एक माणूस आंत शिरला आणि त्याने तिकिटाची मागणी केली. तो तिकीट तपासनीस नव्हता तर हेड कॉन्स्टेबल होता. त्याने तिकिटाचे पैसे घेऊन रात्रभर यशवंतरावांचे रक्षण केले. पुणे स्टेशनऐवजी घोरपडी स्टेशनवरच यशवंतराव उतरले. पुण्यात दारुवाला पुलानजीक बबनराव गोसावी यांच्या घरी त्यांनी मुक्काम केला. दिवसभर घरात थांबायचे आणि रात्री बाहेर पडायचे असा त्यांनी दिनक्रम सुरू केला. १९४३ मधील जानेवारीचे दिवस पुण्यात असे चालले असताना एके दिवशी कराडहून यशवंतरावांना निरोप आला की त्यांची पत्नी वेणूताई यांना अटक करून कराड जेलमध्ये ठेवले आहे. १४ जानेवारीला पहिल्या संक्रांतींच्या दिवशी ही घटना घडल्यामुळे यशवंतराव व्यथित झाले. लग्नानंतर पत्नीला अल्पावधित तुरुंगवास घडावा याचा त्यांना विषाद वाटला. सौ. वेणूताईंनी कराड व इस्लामपूर तुरुंगात सहा आठवडे काढले. बंधू गणपतराव तुरुंगात, पत्नी वेणूताई तुरुंगात आणि आपली भूमिगत भटकंती, कुटुंबाचे कसे होणार हा विचार यशवंतरावांना यातना देऊ लागला. गणपतरावांना तुरुंगातून सोडवून आणावे यासाठी यशवंतरावांचे थोरले बंधू श्री. ज्ञानोबा यांनी आपल्या पाठीवरील आवाळूवर शस्त्रक्रिया करून घेतली. शस्त्रक्रियेनंतर जखमेचे सेप्टिक झाले, त्यातून न्यूमोनिया झाला आणि आठ-दहा दिवसांनी श्री. ज्ञानोबा यांचे निधन झाले. ही बातमी यशवंतरावांना पुण्यात १०-१५ दिवसांनी समजली. त्यांना अतीव दुःख झाले. आईला भेटायला जाण्यासाठी ते तगमग करू लागले.

सातारा जिल्ह्यातील भूमिगत चळवळ सशस्त्र चळवळीचे रूप धारण करू लागल्यावर "पत्री सरकार" या नांवाने ती ओळखली जाऊ लागली. कार्यकर्त्यांजवळ हत्यारे जमली होती आणि त्यांचा वापर ते सरकारविरुद्ध आणि समाजकंटकांविरुद्ध करू लागले होते. सातारा जिल्ह्यात परतण्याची इच्छा असूनही शक्य न झाल्याने यशवंतरावांनी मुंबई गांठली. मुंबईत वावरणे, कार्यकर्त्यांना भेटून

चर्चा करणे शक्य होत असल्याने मुंबई शहर हे चळवळीचे केंद्र बनले होते. किसन वीर मुंबईतच होते. त्यांनी सातारा जिल्ह्यात जाऊन चळवळीवर नजर ठेवावी असे ठरले आणि वीरांनी ते मान्यही केले. यशवंतराव घरातील आजार, अडचणी यामुळे अस्वस्थ झाले होते. सौ. वेणूताईंची तुरुंगातून मुक्तता झाल्यावर त्यांनी आजारी ज्ञानोबांची शुश्रूषा केली. दिराच्या निधनाचा धक्का घेऊन त्या स्वतः आजारी पडल्या. अशक्तता वाढून वरचेवर बेशुद्ध पडण्यापर्यंत मजल गेली. यशवंतरावांनी मुंबई सोडली आणि पुणे गांठले. पत्नीला पुण्याला आणविले. एक-दोन तज्ज्ञ डॉक्टरांना दाखविले. निश्चित निदान होत नाही हे लक्षात आल्यावर वेणूताईंना फलटणला माहेरी पाठवून दिले. त्यानंतर यशवंतराव पण आजारी पडले. डॉक्टरांनी सांगितले की, पुणे सोडून ग्रामीण भागात राहायला जा. यशवंतराव घोडनदीला गेले आणि तेथे एका सामान्य कुटुंबात दोन आठवडे विश्रांतीसाठी राहिले. पंधरा दिवसांनी पुण्याला परतले. पुणे शहर आणि जिल्ह्याच्या ग्रामीण भागात भूमिगत पद्धतीने कसे काम करता येईल याचा विचार यशवंतराव करीत असताना सौ. वेणूताई फारच आजारी असल्याचा निरोप पोहोचला. त्यांनी रात्री भाड्याची टॅक्सी केली आणि पहाटे फलटण गांठले. त्यांच्या आगमनाचा वेणूताईंच्या प्रकृतीवर फार चांगला परिणाम झाला. बर्वे डॉक्टरांनी वेणूताईंच्या आजारावर इलाज करण्याची जबाबदारी स्वीकारल्यावर एक दिवस राहून, रात्री निघून जायचे यशवंतरावांनी मनाशी ठरविले. तथापि दुपारीच फलटणच्या पोलिसांनी सासरे श्री. मोरे यांच्या घराला वेढा घातला. पोलिसांनी यशवंतरावांना अटक करून फलटण संस्थानच्या तुरुंगात टाकले. यशवंतरावांच्या अटकेची बातमी समजताच त्यांची आई कराडहून फलटणला भेटायला आली. मायलेकांची तुरुंगात भेट झाली. आठ-दहा दिवसांनी यशवंतरावांना फलटणहून हलवून सातारा जेलमध्ये बंदिस्त करण्यात आले. त्यांना स्थानबद्ध करावे की त्यांच्यावर खटला भरावा याचा खल अधिकाऱ्यांमध्ये बरेच दिवस चालू राहिल्याने यशवंतरावांची आणि जिल्ह्यातील कित्येक कार्यकर्त्यांची तुरुंगात भेट होऊ शकली.

यशवंतरावांना सत्याग्रहींच्या संगतीत न ठेवता तुरुंगातील अधिकाऱ्यांनी एका अट्टल दरोडेखोराच्या खोलीत ठेवले होते. त्याचे नांव म्हातारबा रामोशी. गुन्हेगार असूनही माणूस नीटनेटका, टापटीपीत राहणारा, सरळ, स्वच्छ बोलणारा.

दरोड्यात स्त्रियांचे अंगावर हात टाकायचा नाही आणि दरोड्यातील मिळकती-पैकी चौथा हिस्सा गोरगरिबांना वाटून टाकायचा हा त्याचा बाणा. म्हातारबांची आणि यशवंतरावांची चांगलीच दोस्ती जमली असे दिसून आल्यावर त्यांना त्या खोलीतून दुसरीकडे हलविण्यात आले. नंतर सातारहून कराडला हलविण्यात आले. तांबवे येथील सभेत भाषण केल्याबद्दल खटला भरण्यात येऊन यशवंतरावांना सहा महिने सक्त मजुरीची राजकीय शिक्षा ठोठावण्यात आली आणि येरवडा तुरुंगात ठेवण्यात आले. 'बी' वर्गाच्या राजकीय कैद्यांसाठी ज्या राहुट्या बांधलेल्या होत्या त्यापैकी एका राहुटीत यशवंतरावांना ठेवण्यात आले. स्वामी रामानंद, सदाशिवराव पेंढारकर याच तुरुंगात राजबंदी होते. शेजारी 'अ' वर्गाच्या राजबंद्यांची छावणी होती. आपापसांत चर्चा करणे, पुस्तके वाचणे असा राजबंद्यांचा दिनक्रम असायचा. पांच महिने संपल्यावर १९४४ च्या जानेवारीत यशवंतरावांची तुरुंगातून मुक्तता झाली. पुण्याहून ते कराडला गेले. घरी गेल्यावर ते गणपतरावांना आणि इतर कुटुंबियांना भेटले. गणपतरावांची तुरुंगातून मुक्तता झालेली होती. तथापि जेलमधून बाहेर पडताना त्यांनी बरोबर क्षयासारखा आजार आणला होता. दोन-तीन आठवडे घरी मुक्काम केल्यावर यशवंतराव पत्नीसह फलटणला गेले. सातारा जिल्ह्याचे पोलीस त्यांच्या मागावर होते. स्थानबद्धता कायद्याचे वॉरण्ट त्यांना बजावयाचे होते. येरवड्याचा प्रवास पुन्हा सुरू झाला. या खेपेला यशवंतरावांना 'ब' वर्ग मिळालेला नव्हता तर 'क' वर्ग देण्यात आलेला होता. 'थर्ड सर्कल' मधील एक बराकीत व्यवस्था केलेली होती. जाधव, लाड आदि कार्यकर्ते याच बराकीत होते. समोरच्या बराकीत ना. ग. गोरे वगैरे मंडळी होती. तीन महिन्यानंतर पॅरोलवर सुटून यशवंतराव बाहेर पडले. पॅरोलची मुदत दोन महिन्यांची होती. गणपतरावांना उपचारासाठी मिरज येथे ठेवण्यात आले. मिरज आणि कराड या दोन्ही ठिकाणच्या खर्चाची जबाबदारी अंगावर येऊन पडल्यावर यशवंतरावांनी वकिली व्यवसायाला सुरुवात केली. त्यांची स्थानबद्धता मागे घेण्यात आली. वकिली करत असताना यशवंतरावांचे लक्ष 'पत्री सरकार'कडे होते, पत्री सरकार चालविणाऱ्या नेते मंडळींकडे होते. किसन वीर हे भूमिगत चळवळीचे संघटनात्मक प्रमुख म्हणून काम करीत होते. त्यांच्याशी संपर्क साधून यशवंतरावांनी त्यांना सांगितले की, वेगवेगळे गट आणि त्यांच्यातील स्पर्धा टाळायला हवी. लोकांमध्ये चळवळीबद्दल जे चांगले

मत झाले आहे त्याला जपा असेही निरोप देण्यात आले.

१९४४ च्या जूनमध्ये महायुद्धाने वेगळे वळण घेतले. युरोपात दुसरी आघाडी उघडली गेली. नॉर्मंडीत उतरविलेले सैन्य पॅरिसच्या दिशेने पुढे सरकू लागले. याचा परिणाम असा झाला की रशियावरील जर्मनीचा दबाव ढिला पडला. रशियन सैन्याने पोलंडमध्ये आणि बाल्कन देशामध्ये मुसंडी मारली. १९४५ साल निर्णायक ठरून युद्धाचा निकाल लागणार असे अंदाज व्यक्त होऊ लागले. पूर्वेकडे जपानची प्रगती रोखली जाऊन दोस्त राष्ट्रांचे मनोधैर्य वाढू लागले होते. अशातच ॲटमबॉम्बने जपानी युद्धाचा शेवट केला. ब्रिटनमध्ये राजकीय क्षेत्रात उलथापालथ झाली. राष्ट्रीय सरकार संपुष्टात आले. ॲटलींनी १९४५ मध्ये राष्ट्रीय सरकार पुढे न चालविता निवडणुका घेण्याचे ठरविले. चर्चिल निवडणुकांना उत्सुक नव्हते. तथापि जुलैमध्ये निवडणुका झाल्या. चर्चिल यांचा पराभव झाला. युद्धकाळात इंग्लंडचे नेतृत्व केलेला नेता पराभूत पक्षाचा नेता ठरला. भारताच्या स्वातंत्र्याच्या दृष्टीने ही घडामोड महत्त्वाची ठरली. भारतातही निवडणुका होणार असे बोलले जाऊ लागले. ॲटलींनी चर्चेसाठी एक शिष्टमंडळ भारतात पाठविले.

स्थानबद्ध केलेले पुष्कळ बंदी १९४५ मध्ये सुटून बाहेर आले. राजकारणात मोकळे वातावरण निर्माण झाले. कराड शहरात 'शिवाजी एज्युकेशन सोसायटी' नांवाची शिक्षण संस्था स्थापन करण्यात यशवंतरावांचा हातभार लागला. शंकरराव करंबेळकर यांनी पुढाकार घेतला आणि त्यांना रामविलास लाहोटी, राजाराम पाटील, यशवंतराव पार्लेकर, गौरीहर सिंहासने आदींनी आपापल्या परीने मदत केली. यशवंतरावांचा ट्रस्टी म्हणून समावेश करण्यात आला. कराड सोडून जाताना एका शिक्षण संस्थेशी आपण संबंधित आहोत याची ठेवलेली जाणीव यशवंतरावांनी अखेरपर्यंत जपली. करंबेळकर यांच्यानंतर पी. डी. पाटलांनी जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली. १९४६ मध्ये निवडणुका जाहीर झाल्या. उमेदवारीबाबत चर्चा सुरू झाली. स्वामी रामानंद भारती यांच्या अध्यक्षतेखाली वाळवे तालुक्यात कार्यकर्त्यांची मिटिंग झाली. या सभेत यशवंतराव चव्हाण यांच्या नांवाला स्थानिक लोकांचा सर्वाधिक पाठिंबा मिळाला. यशवंतराव त्यावेळी आपल्या बंधूंच्या आजारपणात मिरजेत त्यांची देखभाल करीत होते. त्यांच्या स्नेह्यांनी मिरजेला जाऊन त्यांना उमेदवारीच्या तयारीला लागा असे सांगितले. यशवंतरावांनी नकार

दर्शविला. आजारी बंधू गणपतराव यांनी मध्यस्थी केली आणि उमेदवारी स्वीकारण्याबाबत यशवंताला गळ घातली. भावाला नकार देणे शक्य नव्हते. यशवंतरावांच्या बरोबर के. डी. पाटील, व्यंकटराव पवार, बाबूराव गोखले यांचीही उमेदवार म्हणून निवड झाली. चारही उमेदवारांनी एकत्र प्रचार केला. लोकांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. काँग्रेसलाच पाठिंबा द्यायचा असे लोक बोलून दाखवीत होते. मतदान झाले आणि काँग्रेसचे चारही उमेदवार प्रचंड बहुमताने निवडून आले. मार्च महिन्याच्या ३० तारखेला पार्लमेंटरी बोर्डाची बैठक मुक्रर करण्यात आली. भाऊसाहेब सोमण यांच्यासह चारही विजयी उमेदवार मोटारने मुंबईला गेले. मिटिंगला सरदार वल्लभभाई पटेल हजर होते. श्री. बाळासाहेब खेर यांची पक्षनेते म्हणून निवड झाली. मंत्रिमंडळाबाबत चर्चा सुरू झाल्यावर खेरांकडे वर्दळ सुरू झाली. भाऊसाहेब सोमण यांनी गणपतराव तपासे यांचेसाठी शब्द टाकला. यशवंतरावांसाठी शब्द टाकण्यास सातारचे कोणी नव्हते. यशवंतराव हे खेरांना जाऊन भेटण्यास, आपल्या स्वतःसाठी प्रयत्न करण्यास नाखूष होते. के. डी. पाटलांना खूप वाटायचे की यशवंतरावांनी खेरांना भेटावे, पण यशवंतराव नकार द्यायचे. शेवटी आमदार बाबासाहेब शिंदे यांनी निरोप आणला की खेरांनी भेटायला बोलाविले आहे. माधवराव देशपांडे यशवंतरावांना आपल्या गाडीतून घेऊन खेरांचे बंगल्यावर भेटावयास गेले. खेर यांनी यशवंतरावांचे स्वागत करून म्हटले, "चव्हाण, मी तुम्हाला मंत्रिमंडळात घेऊ शकत नाही, पण पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून तुमची निवड केलेली आहे." यशवंतरावांनी त्वरित होकार दर्शविला नाही. 'नंतर सांगतो' एवढेच म्हणून ते बाहेर पडले. बाबासाहेब शिंदे यांनी सल्ला दिला की पार्लमेंटरी सेक्रेटरीपदाला होकार दर्शवा. के. डी. पाटलांचेही तेच म्हणणे पडले. तथापि यशवंतराव कांही राजी होईनात. बाळासाहेब खेरांनी आपले मंत्रिमंडळ जाहीर केले. त्यात पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून यशवंतरावांचे नांव होते. यशवंतराव कराडला जाऊन परत मुंबईला आले. तो दिवस १४ एप्रिल होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्मदिवस.

✦ ✦ ✦

M
923.254
CHA/PAT
Cop. 3

यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय
9699

## : ४ :

खेरांच्या मंत्रिमंडळात मोरारजीभाई देसाई यांना गृहमंत्रिपद देण्यात आले होते. बाळासाहेब खेर यांना भेटावे म्हणून यशवंतराव गेले असताना मोरारजीभाईंची भेट झाली. त्यांनी यशवंतरावांची आस्थेने चौकशी करून गृहखात्याकडे पार्लमेंटरी सेक्रेटरीपद घ्याल कां असे त्यांना विचारले. यशवंतरावांनी मोरारजीभाईंना होकार दर्शविला. मोरारजीभाई पूर्वी सरकारी नोकरीत 'साहेब' होते. त्यांना प्रशासनाचा अनुभव होता. ते साहेब होते तरी त्यांनी यशवंतरावांशी संबंध ठेवताना साहेबीपणा कधी दर्शविला नाही. दोघांनाही एकमेकांच्या कर्तृत्वाचा चांगला अंदाज होता. आपल्याकडे आलेल्या कामाचा चोखपणे उरक करून यशवंतरावांनी मोरारजींचा विश्वास संपादन करण्यात अल्पकाळात यश मिळविले. १९४८–४९ च्या दरम्यान हिंदु-मुसलमानांत दंगे सुरू झाल्यावर नागरिकांच्या संरक्षणासाठी नागरिकांनीच पुढाकार घेण्याची गरज आहे हे यशवंतरावांनी हेरले. होमगार्ड संघटना उभी केल्यास तिचा चांगला उपयोग होईल असे त्यांच्या मनाने ठरविले. यासंबंधात एक योजना त्यांनी सादर केली. 'होमगार्ड'च्या रुपाने संरक्षणसिद्ध अशी नागरिकांची एक पलटणच उभी राहिली. सातारा जिल्ह्यातील भूमिगत चळवळीत जे गुन्हेगार शिरले होते, त्यांच्या बंदोबस्ताची जबाबदारी यशवंतरावांवर सोपविण्यात आली. पुष्कळसे गुन्हेगार बाहेर आले. कित्येक पोलिसांच्या तावडीत सांपडले. कित्येक बंदुकीच्या गोळ्यांना बळी पडले. सखाराम बारबटे याचे नांव वृत्तपत्रात खूप गाजले. वाळवे तालुक्यातील भाऊबंदकीने डोके वर काढले. आमदार चंद्रोजी पाटील यांच्या खुनाचा आळ कांही हितसंबंधी लोकांनी यशवंतरावांचे मित्र के. डी. पाटील यांच्यावर

घातला. त्यांच्याविरुद्ध काहूर उठवून यशवंतरावांनाही या प्रकरणी बदनाम करण्याचा पद्धतशीर प्रयत्न केला गेला. खरे तर चंद्रोजी पाटलांबद्दल यशवंतरावांना आदर होता आणि कारभारी चंद्रोजी यांचे पण यशवंतरावांवर मुलाप्रमाणे प्रेम होते. तथापि भाऊबंदकी, गांवातील मतभेद यातून प्रकरण उद्‌भवले. के. डी. पाटील हे तरुण वकील, आमदार, उमद्या मनाचे. त्यांच्या हातून असा प्रकार घडणे अशक्य असेच बहुसंख्यांचे मत होते. तथापि वाळवे तालुक्यातील कांही मंडळींनी विखारी प्रचार करून के. डी. पाटलांचा नाहक बळी घेतला. आपल्या निरपराध मित्राचा अमानुषपणे खून व्हावा याचे यशवंतरावांना अतोनात दुःख झाले.

खेर मंत्रिमंडळाच्या कारकिर्दीत दक्षिणी संस्थाने विलीन झाली. संस्थानी मुलुख मुंबई राज्यात सामील झाला. त्यामुळे त्या भागाला प्रतिनिधित्व मिळणे क्रमप्राप्त झाले. मंत्रिमंडळात वाढ करण्याची गरज निर्माण झाली. यशवंतराव चव्हाण आणि डॉ. जीवराज मेहता यांची संभाव्य मंत्री म्हणून नांवे वृत्तपत्रातून झळकू लागली असताना वेगळेच घडले. सातारा जिल्ह्यातून फलटणचे राजेसाहेब मालोजीराव नाईक निंबाळकर यांचा मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला. त्यावेळी यशवंतरावांनी भूमिका मांडली की संस्थानातील प्रतिनिधी वाढल्यामुळे राजेसाहेबांना मंत्रिपद देणे सयुक्तिक ठरेल. गणपतराव तपासे आणि मालोजीराव नाईक निंबाळकर ही जोडी मोरारजींची पाठराखी आहे, पर्यायाने बाळासाहेब खेरांचीही ती माणसे आहेत अशी टीका त्यावेळी झाली. तथापि राजे नाईक निंबाळकरांनी यशवंतरावांना वेळोवेळी ज्या पद्धतीने पाठिंबा दिला, त्यांच्या पाठीशी राजेसाहेब उभे राहिले, त्याची अनेकांना कल्पना आली नाही. फलटणची गाजलेली सभा घेण्यात आणि प्रतापगडावरील पंडित नेहरूंची सभा आयोजण्यात मालोजीराजे नाईक निंबाळकर यांचा महत्त्वाचा वाटा होता. राजेसाहेब पुरोगामी विचारांचे होते. शेतकरीप्रेमी होते, बहुजन समाजाविषयी त्यांना कळवळा होता. खेरांच्या राजवटीत बहुजन समाजाची उपेक्षा केली जात होती, हितसंबंधियांचे कोडकौतुक केले जात होते. बाळासाहेब खेर सांगूनही ऐकत नाहीत अशा आमदारांच्या तक्रारी सुरू झाल्या. असेंब्लीतील ७५-८० आमदार एकत्र येऊन मुंबईत पाठोपाठ दोन बैठका घेण्यात आल्या. एका बैठकीचे अध्यक्ष होते यशवंतराव आणि दुसरीचे शंकरराव

मोरे. भाऊसाहेब राऊत यांच्या निवासस्थानी जी बैठक झाली, त्या बैठकीत काँग्रेस अंतर्गत शेतकरी कामगार गट स्थापन करण्याचे ठरले.

खेर मंत्रिमंडळाच्या धोरणासंबंधात मतभेदाचे प्रदर्शन सुरू झाले, वादही बरेच झाले. बहुजन समाजातील हुशार, बुद्धिवादी, कर्तबगार अशा नेत्यांना बाजूला ठेवून भलतीच माणसे मंत्रिमंडळात घेतली असे जेधे, मोरे, काकासाहेब वाघ जाहीरपणे बोलू लागले. शिक्षणातून इंग्रजीची हकालपट्टी करून शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावी अशा आशयाचे एक बिल राज्य विधिमंडळात सादर करण्यात आल्यावर बहुजनांचे नेते खवळून उठले. इंग्रजी बंद करून ज्ञानाच्या आमच्या किती पिढ्या बाद करणार असा प्रश्न हे नेते जाहीरपणे विचारू लागले. श्रीमंत वर्ग, अधिकारी वर्ग आपल्या मुलांना कॉन्व्हेंटमध्ये घालून इंग्रजीतून शिक्षण देणार, ज्ञानाची कवाडे त्यांना खुली करणार, मग गरिबांच्या मुलांनी, ग्रामीण भागातल्या शेतकऱ्यांच्या-कष्टकरी लोकांच्या मुलांनी काय पाप केले आहे असे प्रश्न विचारले जाऊ लागले. ग्रामीण भागातून जे नेतृत्व तयार होत होते त्याची धास्ती घेऊन हा नवा डाव टाकण्यात आला असावा असा ग्रह पक्का होऊ लागला. आपल्याला पुन्हा शे-दीडशे वर्षे मागे ढकलण्यात येत असल्याचे जेधे, मोरे सांगू लागले. काँग्रेसच्या अंतर्गत एक स्वतंत्र गट स्थापन करण्यात आला. त्यात शंकरराव मोरे, भाऊसाहेब हिरे, केशवराव जेधे, भाऊसाहेब राऊत, तुळशीदास जाधव, दत्ता देशमुख आदि मंडळी होती. त्यांच्या बैठका सुरू झाल्या, चर्चा सुरू झाली, दौरे सुरू झाले. जाहीर सभांतून प्रचार सुरू झाला. त्यातच टेनन्सी बिलाची भर पडली. सर्वसामान्य जनतेकडून पाठिंबा मोठ्या प्रमाणावर मिळतोय असे दिसून येताच जेधे-मोरे-जाधव आदि मंडळींनी "शेतकरी कामगार पक्ष" नांवाचा वेगळा पक्ष स्थापन करण्याची योजना तयार केली. १९४८ च्या जानेवारी महिन्यात नथूराम गोडसे यांनी दिल्लीत प्रार्थनेच्या वेळी महात्मा गांधींची हत्या केल्यावर महाराष्ट्राच्या काही भागांत जाळपोळ, लुटालुटीचे प्रकार घडले. ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद दक्षिण महाराष्ट्रात वर उफाळून आला. लोकांनी राग व चीड व्यक्त केल्यावर नेत्यांनी त्यांना शांत केले. याच काळात मुंबईत भाऊसाहेब राऊतांच्या निवासस्थानी खेर-मोरारजी विरोधी गटाची बैठक झाली. जेधे-मोरे-हिरे-जाधव आदि नेत्यांखेरीज यशवंतराव चव्हाण व पी. के. सावंत

तसेच र. के. खाडिलकर हेही उपस्थित होते. काँग्रेसमधून फुटून निघून वेगळा पक्ष काढायचा या योजनेला यशवंतराव चव्हाणांनी विरोध दर्शविला. काँग्रेस अंतर्गत गट स्थापन केल्यावर त्या गटातर्फे ग्रामीण विकासाचे काम करणे शक्य आहे, वेगळी चूल मांडण्याची गरज नाही असे यशवंतरावांनी स्पष्ट सांगितले. नेहरूंसारखे पुरोगामी नेते, समाजवादी विचारांचे नेते असताना काँग्रेसच्या मुख्य प्रवाहापासून कशासाठी दूर व्हायचे असाही प्रश्न यशवंतरावांनी विचारला. बरीच चर्चा झाली आणि अंतिम निर्णय न घेता ही बैठक समाप्त झाली.

यशवंतरावांच्या जीवनात काँग्रेसपासून अलग होण्याबाबतचा हा पहिला प्रसंग नव्हता तर तिसरा होता. पहिला प्रसंग समाजवादी काँग्रेसच्या वेळी, दुसरा रॉयवाद्यांच्या सान्निध्याचे वेळी आणि तिसरा राऊतांचे निवासस्थानातील वरील चर्चेच्या प्रसंगी. चव्हाणांच्या नकारानंतर जेधे-मोरे गट आणि चव्हाण गट असे दोन गट काँग्रेस आमदारात निर्माण झाले. जेधे-मोरे यांनी काँग्रेसचा त्याग केल्यानंतर हिरे-गाडगीळ ही जोडी बहुजन समाजापुढे आली. भाऊसाहेब हिरे यांना बहुजन समाजाचा पाठिंबा होताच. तथापि सर्व समाजाचे नेतृत्व त्यांना पेलवेल की नाही याबद्दल अनेकांच्या मनात शंका होती. शे. का. पक्षाने काँग्रेसला जो हादरा दिला होता त्यातून सांवरण्याकरिता हिरे यांच्या नेतृत्वाला पाठिंबा दर्शवून यशवंतरावांनी बहुजन समाजाच्या मनावर हे बिंबविले की काँग्रेसच बहुजनांच्या हिताचे रक्षण करू शकेल, अन्य पक्ष नव्हे. १९४७ साल या दृष्टीने घालमेलीचे गेले. जेधे बाहेर गेल्यानंतर हिरे यांनी गाडगीळांबरोबर काँग्रेसची बाजू सांभाळण्याचे काम केले. त्यांच्या नेतृत्वास यशवंतरावांनी निष्ठापूर्वक साथ दिली. कारण हिरे यांचे काम सोपे नव्हते, अवघड होते. त्यांना एकेकाळच्या आपल्याच नेतृत्वाविरुद्ध सामना द्यावयाचा होता. या कामी हिरे-चव्हाण-घोरपडे यांनी महाराष्ट्रभर दौरे काढून काँग्रेसला सांवरून धरण्याचा जोमाने प्रयत्न केला. घोरपडे हे ''सकाळ''चे संपादक होते, आमदार होते. मोरारजीभाईंचा त्यांच्यावर लोभ होता. कोल्हापुरात त्यांच्या शब्दाला मान होता. भाऊसाहेब हिरे आणि यशवंतराव चव्हाण या दोन नेत्यांबद्दल त्यांना ममत्व होते, अभिमान होता.

मुंबईत तांबे यांच्या आरोग्य भवनमध्ये ३० मार्च, १९४८ रोजी काँग्रेसजनांची बैठक आयोजित करण्यात आली होती. शे. का. पक्षाला आणि

समाजवादी पक्षाला तोंड देऊन काँग्रेसचे ऐक्य कसे राखावयाचे हा या बैठकीचा उद्देश होता. बैठकीला सुमारे ७० ते ८० आमदार हजर होते. बैठकीत महाराष्ट्र काँग्रेसचा एक धोरणात्मक मसुदा मान्य करण्यात आला. बैठकीसाठी जे पत्रक तयार करण्यात आले होते त्याच्यावर यशवंतराव चव्हाण, स्वामी सहजानंद, बाबासाहेब आखाडकर शिंदे, बाबासाहेब घोरपडे, शिवराम राणे, डॉ. कृ. भि. अंत्रोळीकर, अमृतराव रणखांबे आदींच्या सह्या होत्या. काँग्रेस पक्ष हा कुणाशीही वैरभावाने वागणार नाही, काँग्रेसजन हे पक्षाशी निष्ठावंत राहून काँग्रेसचा कार्यक्रम राबविण्याचा प्रयत्न करतील असे त्या पत्रकात म्हटले होते. जेधे-मोरे यांच्या आवाहनाला अनुसरून काँग्रेसमधील बहुजन मंडळी गठ्ठ्याने शेकापमध्ये गेली असती तर महाराष्ट्र काँग्रेस पक्ष संपुष्टात आला असता. तथापि यशवंतरावांनी जी वैचारिक भूमिका मांडली, भाऊसाहेब हिरे आदि मंडळींनी काँग्रेससाठी जी पायपिट केली त्यामुळे काँग्रेस पक्ष टिकला, नंतर वाढला व बळकट झाला. यशवंतराव आणि नानासाहेब कुंटे यांनी महाराष्ट्रभर दौरा करून जनतेला वस्तुस्थिती समजावून दिली. काकासाहेब गाडगीळ त्यावेळी मंत्री म्हणून दिल्लीत होते आणि शंकरराव देव घटना समितीत मग्न होते. जेधे-मोरे-दत्ता देशमुख यांच्या प्रचाराला तोंड देण्याची त्यांची तयारी नव्हती असे दिसून आले. १९४८ मध्ये शेकापची स्थापना झाली. महाराष्ट्रातील जनता आणि विरोधी पक्ष कुतुहलाने या पक्षाकडे पाहू लागले. अशा स्थितीत १९५० मध्ये नाशिकला काँग्रेसचे अधिवेशन भरविण्यात आले. भाऊसाहेब हिरे यांच्याकडे स्वागताध्यक्षपद आले आणि त्यांची काँग्रेस वर्किंग कमिटीवर नियुक्ती करण्यात आली. या अधिवेशनामुळे भाऊसाहेबांना पंडित नेहरूंच्याजवळ जाण्याची संधी मिळाली. तथापि ना नेहरूंच्यावर ते प्रभाव पाडू शकले ना वर्किंग कमिटीवर. हिरे यांनी यशवंतराव चव्हाण यांच्यापासून दूर व्हावे यासाठी काही हितसंबंधियांनी प्रयत्न केला. प्रस्थापित नेतृत्वापैकी देव-गाडगीळ-कुंटे यांनी भाऊसाहेबांच्या भोवती कोंडाळे केले. त्यांच्या कमकुवत प्रवृत्तीचा फायदा घेतला. यशवंतरावांनी हा डाव ओळखून, प्रसंगी पडते घेतले आणि भाऊसाहेबांना सांवरून धरले. शंकरराव देवांची मजल तर त्यापुढे गेली. काँग्रेसचे सभासद नसतानाही त्यांनी मागणी केली की, ''यशवंतरावांना

काँग्रेसमधून हांकलून द्या.'' देवांनी भाऊसाहेबांचे कान भरविण्याचा खूपच प्रयत्न केला. प्रांताध्यक्षपदासाठी हिरे आणि चव्हाण यांच्यात चुरस लावण्याचा प्रयत्न केला गेला. तथापि यशवंतरावांनी तो डाव उधळून लावला. दिवसेंदिवस भाऊसाहेब हलक्या कानाचे बनत गेले. यशवंतरावांविरुद्ध उघड बोलण्यात, त्यांच्यावर तोंडसुख घेण्यात त्यांनी मागेपुढे पाहिले नाही.

१९५२ च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुका महाराष्ट्रात मोठ्या हिरिरीने लढविण्यात आल्या. काँग्रेसचा सामना शेकापक्षाशी होता. जेधे-मोरे यांनी शिकस्त केली. तथापि त्यांना बहुमत न मिळता काँग्रेसलाच प्रचंड बहुमत मिळाले. मोरारजीभाई देसाई यांनी मंत्रिमंडळ बनविले. हिरे आणि चव्हाण या दोघांचाही त्यांनी मंत्रिमंडळात समावेश केला. हिरे यांच्याकडे महसूल खाते देण्यात आले आणि यशवंतराव चव्हाणांना नागरी पुरवठा, समाज कल्याण आणि वन ही खाती दिली गेली. भाऊसाहेब हिरे यांच्याकडे प्रांताध्यक्षपदही होते. त्यांचा सल्ला न घेता मोरारजीभाईंनी मालोजीराजे नाईक निंबाळकर आणि गणपतराव तपासे यांचा मंत्रिमंडळात समावेश केला त्यामुळे भाऊसाहेब चिडले आणि त्यांनी हा प्रश्न धसास लावण्याचे ठरविले. तथापि यशवंतरावांनी त्यांना त्यापासून परावृत्त केले. मुख्यमंत्र्याला आपले सहकारी निवडण्याचा अधिकार असतो हे यशवंतरावांनी हिरे यांना पटवून दिले. शंकरराव मोरे यांनी ''दाभाडी प्रबंध'' सादर केल्यावर शेकापमध्ये धुसफूस सुरू झाली. केशवराव जेधे यांना मोरे यांचे विचार, त्यांची उक्ती व कृती मान्य झाली नाही. काँग्रेसला शर्थीने विरोध करण्यात शेकापने बरेच यश मिळविले होते. तथापि पक्षाला कम्युनिस्टांच्या मार्गाने नेले जात असल्याची शंका बऱ्याच कार्यकर्त्यांच्या मनात उद्‌भवली आणि जिल्ह्याजिल्ह्यांतून पक्ष प्रचाराचे आणि प्रसाराचे जे काम जोम धरून चालले होते त्याला खीळ पडली. केशवराव जेधे हे खूपच नाराज झालेले होते. काही काळाने जेधे-जाधव-खाडिलकर-मोरे आदि मंडळी शेकाप बाहेर पडून त्यांनी काँग्रेस पक्षात पुन्हा प्रवेश केला.

पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून काम करताना यशवंतरावांनी महाराष्ट्रातील प्रश्नांचा आणि प्रशासनाचा अभ्यास केलेला होता. उत्तम प्रशासक म्हणून मोरारजीभाईंचा विश्वासही संपादन केलेला होता. महाराष्ट्रात अन्नधान्याची

परिस्थिती बिकट बनल्यामुळे पुरवठा खात्याबद्दल जनतेत तिरस्काराची भावना निर्माण झालेली होती. यशवंतरावांनी मोठ्या हिंमतीने या खात्याच्या अडचणी जाणून घेऊन व्यापारी वर्गाचे मनोगत समजावून घेऊन योग्य ती पावले उचलली आणि जनतेत विश्वासाची भावना निर्माण केली. केंद्रात अन्नखाते रफी अहंमद किडवाई सांभाळीत होते. यशवंतरावांनी रफीसाहेबांची भेट घेतली आणि मुंबई राज्याची अन्नधान्याची समस्या त्यांच्यापुढे मांडली. श्री. किडवाईजी हुशार होते, कर्तृत्ववान होते. पंडित नेहरुंच्याकडे त्यांचे वजन होते. किडवाईंनी मुंबई राज्याची अन्नधान्य समस्या सोडविण्यासाठी यशवंतरावांना जेवढी मदत करता येईल तेवढी केली. दोघांत स्नेह निर्माण झाला. पुरवठा खात्याचे काम पहाताना यशवंतरावांना किडवाईंच्या मार्गदर्शनाचा खूप उपयोग झाला. डिसेंबर १९५२ मध्ये यशवंतरावांनी नवे अन्नधान्य धोरण जाहीर केले. पत्रकारांशी बोलताना यशवंतरावांनी सांगितले की, "साठेबाजी, नफेबाजी आदि समाजाची अडवणूक करणाऱ्या कृत्यांची गय सरकार करणार नाही. किंमती वाढतात असे दिसून आले की पुन्हा नियंत्रणे बसविण्यात येतील. नियंत्रण उठविल्यामुळे जो नोकरवर्ग कमी होईल त्यांना झळ पोहोचणार नाही याची सरकार काळजी घेईल." तांदळाखेरीज सर्व धान्यांवरील नियंत्रण उठविण्यात आले. या धोरणाचा चांगला परिणाम दिसून आला. उत्पादक आणि ग्राहक यांच्यावरील जाचक बंधने दूर झाली आणि नियंत्रणमुक्त धान्य बाजारात चांगल्या पद्धतीने मिळू लागले. वर्षअखेरीस आवश्यकता नसल्याने पुरवठा खाते बंद करण्यात आले. यशवंतरावांकडे स्थानिक स्वराज्य, वन आणि विकास ही खाती देण्यात आली.

स्थानिक स्वराज्य आणि वनसंपत्ती यांत यशवंतरावांनी खूप रस घेऊन नव्यानव्या कल्पना राबविल्या. स्थानिक स्वराज्य संस्थांनी छोट्या छोट्या परिषदा घेऊन त्यात आपल्या अडचणींची चर्चा करावी असा त्यांनी स्थानिक स्वराज्य मंत्री या नात्याने सल्ला दिला. त्यानुसार धारवाडला एक परिषद झाली. दुसरी पूर्व खानदेश आणि प. खानदेशचे म्युनिसिपल अध्यक्ष, चेअरमन, चीफ ऑफिसर यांची परिषद झाली. बडोद्याच्या परिषदेत बोलताना चव्हाण म्हणाले, "नगरपालिकेच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करण्याची सरकारची इच्छा नाही. कर बसविण्याचे धैर्य दाखवून

स्थानिक संस्थांनी उत्पन्न वाढवावे. गलिच्छ वस्त्यांचे निर्मूलन करावे. ग्रामपंचायतींना आवश्यक ते महत्त्व त्यांनी दिले. यशवंतराव चव्हाण सांगायचे की, " ग्रामपंचायत हा लोकशाहीचा पाया आहे. त्यांच्या संघटनांची जरुरी आहे." १९५४ साली मुंबई राज्य ग्रामपंचायत संघाची स्थापना करण्यात आली. हा संघ वर्षभरात चांगलाच कार्यक्षम झाला. "ग्रामपंचायत म्हणजे खेडेगांवच्या नागरी कारभार चालविणाऱ्या यंत्रणा नव्हेत. त्यांनी खेड्यातील समाजाचा विकास, लोकांचे कल्याण साधण्याचा प्रयत्न करावयास हवा." असेही यशवंतरावांनी पदाधिकाऱ्यांना सांगितले. "ग्रामपंचायतींना सारा वसुलीचे काम देण्याचा सरकारचा विचार आहे. तथापि केवळ महसूल वांट्यात वाढ केली आणि सत्तेतही अधिक वांटा दिला म्हणजे ग्रामपंचायतींचा कारभार सुधारेलच असे नाही. त्यासाठी सभासदांच्या दृष्टिकोनात बदलाची गरज आहे असे सांगून यशवंतरावांनी संघाच्या पुण्यातील अधिवेशनात पंचायत सेक्रेटरींचे 'केडर' बनविण्याची कल्पना विशद करून सांगितली. वनसंपत्तीचे रक्षण व्हावे, जंगलात वाढ व्हावी म्हणून वनमहोत्सवांना यशवंतरावांनी चालना दिली. जंगली प्राण्यांच्या संरक्षणावरही भर दिला. जंगली प्राणी शेतीचे रक्षण करतात, शेतातील पिकांना मदत करतात हे उदाहरणासह पटवून दिले. आकाशवाणीवरून बोलताना यशवंतरावांनी उंदीर, वाघ, चित्ते आदि प्राणी शेतकऱ्यांचे कसे सहकारी आहेत याची उद्‌बोधक माहिती सांगितली. अनेकांना ही माहिती ऐकून आश्चर्य वाटले. १९५२ ते १९५७ या दरम्यानच्या मंत्रिपदाच्या कारकिर्दीत यशवंतरावांनी आपल्या प्रशासकीय कौशल्याने जनतेवर चांगलीच छाप पाडली. आपल्या वागण्या-बोलण्याने जनतेची आपुलकी संपादन केली. मोरारजींचे मंत्रिमंडळ संघटितरित्या काम करीत होते. महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक या भागांतील आमदारांत एकोपा होता.

भाषिक राज्य पुनर्रचनेचे वारे वाहू लागल्यावर मुंबई राज्याचा गाडा जो सुरळीत चालू होता त्याला धक्के बसू लागले. फाजलअली कमिशनचा अहवाल ऑक्टोबर १९५५ मध्ये प्रसिद्ध झाला आणि महाराष्ट्राची सारी घडी पुढील काळात विस्कटली गेली. १९५५ ते १९६० म्हणजे संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात येईपर्यंतचा पाच-सहा वर्षांचा काळ यशवंतरावांच्या कर्तृत्वाचा, मुत्सद्दीपणाचा, बुद्धिमत्तेचा-

कसोटीचा काळ ठरला. संशय, गैरसमज, विश्वासघात, एकांगी, विघातक टीका, कट-काटशह यांचे घाव बसत होते. ते सर्व घाव झेलत यशवंतराव सर्व कसोट्यांना उतरले आणि संयुक्त महाराष्ट्राचा कलश त्यांनी आणला.

भाषावार प्रांतरचनेचे तत्त्व काँग्रेसने फार पूर्वी मान्य केले होते. १५ ऑगस्ट, १९४७ ला हा देश स्वतंत्र झाल्यावर राज्य पुनर्रचनेच्या प्रश्नाने डोके वर काढायला सुरुवात केली. बेळगांवला १९४६ मध्ये महाराष्ट्र साहित्य संमेलन भरले होते. या संमेलनात संयुक्त महाराष्ट्राचा ठराव संमत करण्यात आला होता. त्यानंतर मुंबईत भरलेल्या महाराष्ट्र परिषदेत "मुंबईसह महाराष्ट्र" असा ठराव मंजूर झाला. मिळालेले स्वातंत्र्य स्थिरस्थावर होईपर्यंत राज्य पुनर्रचनेचा प्रश्न काही काळ स्थगित ठेवावा असे सरदार वल्लभभाई पटेलांचे मत होते. काकासाहेब गाडगीळ आदींचे म्हणणे पडले की प्रश्न लांबणीवर टाकण्यात धोके आहेत. तत्त्वे ठरविण्यासाठी न्यायमूर्ती दार यांची नियुक्ती करण्यात आली. त्यांनी अनेकांच्या साक्षी घेऊन तत्त्वे ठरविली. तथापि हा प्रश्न कांही काळ तहकूब ठेवावा असे मत व्यक्त केले. त्यावर खूप उलटसुलट प्रतिक्रिया उमटल्या. जयपूर काँग्रेसमध्ये हा प्रश्न पुन्हा उपस्थित करण्यात आला. त्यातून त्रि-सदस्य समितीची सूचना पुढे आली. नेहरू-पटेल-पट्टाभी सीतारामय्या या तिघांची समिती नेमण्यात आली. या समितीने असे सुचविले की मुंबई सोडून स्वतंत्र महाराष्ट्र बनवावा, मद्रास वगळून आंध्र बनवावा, कर्नाटकाला नंतर प्रांताचे स्थान द्यावे. मुंबईला महाराष्ट्रापासून दूर करण्याचे विष पेरण्यात आले. मुंबई शहराचे स्वतंत्र राज्य करावे ही कल्पनादेखील पुढे मांडण्यात आली. यामागे मुंबईतील गर्भश्रीमंत गुजराती मंडळी होती. त्यांनी महाराष्ट्र राज्यात मुंबई शहर नको असे सरदारांच्या मनात भरवून देण्याचा प्रयत्न केला. तथापि महाराष्ट्र व गुजरात यांनी एकत्र नांदावे असा सल्ला पटेलांनी दिला. महाराष्ट्राच्या नेत्यांना हा सल्ला पटला नाही. दरम्यान सरदारांचे निधन झाले. द्विभाषिकास महाराष्ट्र व गुजरात यांनी नंतर मान्यता दिली.

✦✦✦

## : ५ :

**भा**षावार राज्य पुनर्रचनेबाबतचे धोरण काँग्रेसने मान्य केलेले असताना नेतृत्वाने त्याबाबत खूपच घोळ घातला. आंध्रच्या प्रश्नाबाबत धरसोडीचे धोरण ठेवल्याने १९५२ च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत आंध्रमध्ये काँग्रेसने मार खाल्ला. स्वतंत्र राज्यासाठी आंदोलन सुरू करण्यात आले. पोट्टी श्रीरामलू यांचे उपोषण सुरू झाले. तरीही दिल्ली थंडच राहिली. श्रीरामलूंचे निधन झाल्यावर उग्र आंदोलन सुरू करण्यात आले आणि त्यात विध्वंसक प्रकार घडले. जाळपोळ, रेल्वे गाड्या पाडणे आदि घटना एकामागून एक सुरू झाल्या. दहशतीच्या आणि जनतेतील घबराटीच्या वातावरणामुळे दिल्लीला जाग आली. आंध्रने मद्रासवरील हक्क सोडला तर स्वतंत्र आंध्र प्रांताची निर्मिती करण्यात येईल असे आंध्रच्या नेत्यांना सांगण्यात आले. प्रश्नाचा निकाल त्वरित लागावा म्हणून नेते तयार झाले. केंद्र सरकारने बिलाची तयारी केली. आंध्र प्रांत प्रत्यक्ष अस्तित्वात आला ऑक्टोबर १९५३ मध्ये. भाषावार प्रांतासाठी उग्र आंदोलन केले की काँग्रेसचे पुढारी हालचाल करतात असे दिसून आल्यावर महाराष्ट्रातही हालचाली सुरू झाल्या. संयुक्त महाराष्ट्र परिषद निर्माण करण्यात आली. परिषदेने संयुक्त महाराष्ट्र निर्मितीसाठी आंदोलन उभे केले. दिल्लीने वेळोवेळी निर्णय बदलत प्रश्न लोंबकळत ठेवला. महाराष्ट्रातील वेगवेगळे राजकीय पक्ष, संस्था, व्यक्ती यांनी एकत्र येऊन संयुक्त महाराष्ट्राची मागणी धसास लावण्याचा निर्धार केला. सत्ताधारी काँग्रेस पक्षाचे नेते, विरोधी पक्षनेते, वृत्तपत्रे, पत्रकार, विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठित असामी, शहरातील आणि ग्रामीण भागातील जनता संयुक्त महाराष्ट्राचे ध्येयासाठी एकत्र आली. श्री. यशवंतराव चव्हाण हेही अन्य नेत्यांबरोबर संयुक्त महाराष्ट्राची मागणी मान्य

करून घेण्यासाठी झटू लागले. बडे भांडवलवाले मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राला अनुकूल नव्हते. भांडवलदारांच्या दबावामुळे दिल्लीचे वरिष्ठ काँग्रेस नेते निर्णय करण्याबाबत चालढकल करू लागले. १९५३ मध्ये फाजलअली कमिशन नेमण्यात आले. पंडित हृदयनाथ कुंझरू आणि डॉ. के. एम. पणीक्कर या दोघा सदस्यांसह तिघांचे राज्यपुनर्रचना कमिशन अस्तित्वात आले.

संयुक्त महाराष्ट्र परिषदेने कमिशनला सादर करावयाच्या निवेदनाची तयारी सुरू केली. डॉ. धनंजयराव गाडगीळ यांच्या मार्गदर्शनाखाली एक समिती नियुक्त करण्यात आली. संयुक्त महाराष्ट्र परिषदेत शंकरराव देव, काकासाहेब गाडगीळ, भाऊसाहेब हिरे, देवकीनंदन नारायण, कॉ. श्री. अ. डांगे, डॉ. नरवणे, ना. ग. गोरे, एस. एम. जोशी, यशवंतराव चव्हाण, डॉ. धनंजयराव गाडगीळ आदि सर्व पक्षीय नेते मंडळी होती. डॉ. गाडगीळांनी निवेदन तयार केले. त्यावर चर्चा होऊन ते संमत करण्यात आले. काँग्रेसची नेते मंडळी इतर विरोधी पक्षांच्या मंडळींबरोबर बसतात, चर्चा करतात, निवेदनाला संमती देतात हे पाहून मुख्यमंत्री मोरारजींचे पित्त खवळले. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून देवकीनंदन यांची उचलबांगडी करण्यात येऊन त्या पदावर मामासाहेब देवगिरीकर यांना बसविण्यात आले. शंकरराव देव संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे अध्यक्ष आणि गाडगीळ-जेधे-हिरे-चव्हाण आदि मंडळी सदस्य असताना देवगिरीकरांनी प्रांताध्यक्ष बनताच नवी भूमिका घेतली. फाजलअली कमिशनला काँग्रेसतर्फे स्वतंत्र निवेदन द्यावे असा आग्रह त्यांनी धरला.

डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या वतीने तयार केलेले एक निवेदन आणि महाराष्ट्र काँग्रेसचे वेगळे निवेदन अशी दोन निवेदने फाजलअली कमिशनपुढे सादर करण्यात आली. यामुळे संयुक्त महाराष्ट्र परिषदेत मतभेदाला सुरुवात होऊन काँग्रेस अलग होण्याची शक्यता निर्माण झाली. फाजलअली कमिशनकडे लोकांनी दोन हजार निवेदने दिली. कमिशनने १०४ ठिकाणी जाऊन सुमारे ८ ते ९ हजार लोकांच्या मुलाखती नोंदविल्या. पुण्यात शंकरराव देव, डॉ. धनंजयराव गाडगीळ आणि भाऊसाहेब हिरे कमिशनला भेटले. या चर्चेत फाजलअली यांनी बोलताना असे दर्शविले की ते मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र स्थापन करण्यास अनुकूल आहेत. तथापि त्यांच्या अहवालात नेमका उलटा निर्णय

नोंदविला होता. भाऊसाहेब हिरे तोंडाने फटकळ. त्यांनी या बदलाबाबत विधान करताच कमिशनने गुजराती नेत्यांच्या दबावाला बळी पडून आपले मत बदलले अशी टीका सुरू झाली. काकासाहेब गाडगीळांनी पंडित नेहरूंना पत्र लिहून मूळच्या अहवालात मुंबईच्या आणि गुजरातच्या नेत्यांचे दबावामुळे बदल करण्यात आल्याचे स्पष्ट शब्दात नमूद केले. तथापि नेहरूंनी कमिशनला खरे धरून हिरे यांनाच दोष दिले. कमिशनचा अहवाल जाहीर झाल्यावर सर्वांनाच धक्का बसला. संयुक्त महाराष्ट्रापासून मुंबई शहर तर वेगळे काढले होतेच, त्याशिवाय स्वतंत्र महा-विदर्भाची सूचना पण केली होती. महाराष्ट्रातील वातावरण झपाट्याने तापण्यास सुरुवात झाली.

फाजलअली कमिशनच्या शिफारसीविरुद्ध काँग्रेस श्रेष्ठींकडे दाद मागावी असे महाराष्ट्रातील काँग्रेसच्या नेत्यांनी ठरविले. देव-देवगिरीकर-गाडगीळ-कुंटे-चव्हाण यांचे शिष्टमंडळ पंडित नेहरूंना भेटण्यासाठी दिल्लीला रवाना झाले. देव यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाची पंडित नेहरूंशी चर्चा झाली. महाराष्ट्रावर अन्याय झाला असे पंडितजींच्या निदर्शनास आणून देण्यात आले. अहवालास मान्यता देणे इष्ट ठरेल असे नेहरूंनी शिष्टमंडळाला आग्रहाने सांगितले. विरोधकांची मागणी त्वरित मान्य करणे म्हणजे त्यांना मोकळे रान करून देणे असाही युक्तिवाद करून नेहरूंनी थोडा काळ थांबा असा सल्ला दिला. मुंबईला स्वतंत्र राज्याचा दर्जा दिला जाऊ नये याला मात्र पंडितजी कबूल झाले. मौलाना आझादांनी मात्र मुंबई, महाराष्ट्र, व गुजरात या त्रि-राज्य योजनेला आपला पाठिंबा आहे असे प्रतिपादन केले. नंतर महाविदर्भाची योजना पुढे आली. तथापि विदर्भाने महाराष्ट्रात सामील व्हावे यासाठी तेथील लोकांचे मन वळवावे असे सुचविण्यात आले. काँग्रेसश्रेष्ठी घोळ घालीतच राहिले.

शिष्टमंडळाने पंडित पंत यांचेशी चर्चा करण्याचे ठरविले. या चर्चेत कोणत्याही प्रकारचे एकमत होऊ शकले नाही. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची आपली मागणी सोडायची नाही असे महाराष्ट्रातील नेत्यांनी मनात पक्के ठरविले होते. शंकरराव देवांच्या मनात मात्र वेगळेच कांही आले. काँग्रेस श्रेष्ठींनी विशाल द्विभााषिकाचा जो पर्याय सुचविला त्याला देव अनुकूल असावेत अशी शंका इतर नेत्यांचे मनात आली. डॉ. धनंजयराव गाडगीळ हेही या पर्यायाला अनुकूल दिसले.

काकासाहेब गाडगीळांनी आपली संमती दर्शविली. देव-गाडगीळांनी हिरे आणि कुंटे यांना निरोप पाठवून त्यांचेपुढे द्विभाषिकाची योजना ठेवली. हिरे यांनी मान्यता दर्शविली. कुंटे यांनी योजनेला कबुली दर्शविली नाही. या घटनेपूर्वी काँग्रेस श्रेष्ठींनी विसंगतीने भरलेली वक्तव्ये एकामागून एक केली, योजनांची कसरत केली. या धरसोडीमुळे महाराष्ट्रातील लोकांचे मन बिथरले, कलुषित झाले. मुंबई शहर केंद्रशासित करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतल्यावर हा निर्णय महाराष्ट्र काँग्रेसच्या सूचनेवरून घेण्यात आला असे शंकरराव देव यांनी जाहीर केले. वातावरण निवळेपर्यंत पांच वर्षांची मुदत सांगण्यात आली.

जूनमध्ये पुण्यात महाराष्ट्रातील जिल्हा काँग्रेस अध्यक्षांची बैठक झाली. पंधरा-वीस तास चर्चा झाली. तथापि एकमत होऊ शकले नाही. नेतृत्वात दोन तट पडले. पंडित नेहरूंच्या योजनेने आपले समाधान होत नसले तरी राष्ट्राच्या आणि महाराष्ट्राच्या हितार्थ ती स्वीकारावी असे मत यशवंतरावांनी आग्रहाने मांडले. यशवंतराव चव्हाण यांचा एक गट आणि हिरे-कुंटे-गाडगीळ यांचा एक गट असे दोन गट काँग्रेसमध्ये निर्माण झाले. हिरे-कुंटे यांचे म्हणणे होते की, मंत्रिपदाचा राजीनामा देऊन सरकारशी असहकार करावा. जिल्हाध्यक्षांचे बैठकीनंतर महाराष्ट्र काँग्रेसची सर्वसाधारण सभा लगोलग झाली. राजीनामा देण्याबाबतच्या ठरावाला आपण विरोध करणार आहोत असे यशवंतरावांनी आदल्या रात्री जाहीर करून टाकले. भाऊसाहेब हिरे यांनी आपला हेका न सोडता अधिकार त्यागाबाबतचा ठराव बैठकीत मांडला. त्याला मा. बाळासाहेब भारदे यांनी उपसूचना मांडून अधिकारपदाच्या त्यागाचे कलम गाळावे अशी मागणी केली. या उपसूचनेला यशवंतरावांनी पाठिंबा दिला. तथापि उपसूचना मतदानाने फेटाळली गेली आणि मूळ ठराव संमत करण्यात आला. ठराव मांडताना हिरे यांनी जे विचार व्यक्त केले आणि उपसूचनेला पाठिंबा देताना यशवंतरावांनी जे विचार मांडले त्यांतील भिन्नता दोघांच्या विचारसरणीवर प्रकाश टाकणारी होती. हिरे आपल्या भाषणात म्हणाले, "महाराष्ट्रात आम्हांला कोणी बोलावीत नाही. काँग्रेसच्या नेत्यांना कुणीही विचारीत नाही." यशवंतराव आपल्या भाषणात म्हणाले, "आजच्या घटकेला राजीनामा देण्याचे पाऊल उचलले तर घटनात्मक पेच निर्माण होईल. अधिकारपद सोडल्याने लोक आपल्यामागे येतील, हे खरे नाही. महाराष्ट्राची या ठरावामुळे आपण हानी

करू. भाऊसाहेबांच्या बरोबर माझा संघर्ष नाही. हिरे यांनी राजीनामा दिला तर महाराष्ट्राची मोठी हानी होईल. भाऊसाहेबांनी राजीनामा देऊ नये अशी माझी कळकळीची विनंती आहे.''

काँग्रेस श्रेष्ठींनी राजीनामे देण्यास परवानगी नाकारली. भाऊसाहेबांना विरोध करण्याची पाळी यावी, भाऊसाहेबांनी गाडगीळ-कुंटे यांच्याबरोबर फरफटत जावे याचे यशवंतरावांना दुःख झाले. ते त्यांनी स्नेह्यांजवळ, सहकाऱ्यांजवळ बोलून दाखविले. यानंतर हरिभाऊ पाटसकर यांचे दिल्लीतील निवासस्थानी बैठक झाली. तिला शिष्टमंडळाचे सर्व सदस्य उपस्थित होते. चिंतामणराव देशमुख हेही हजर राहिले. शंकररावांनी विशाल द्विभाषिकाचा पर्याय असलेला कागद पुढे केला. हा नवा पर्याय पाहून यशवंतराव गोंधळून गेले. त्यांनी देव यांना बैठकीत चांगलेच सुनावले. यशवंतराव म्हणाले, ''सर्वांना विश्वासात न घेता तुम्ही परस्पर हे काय केलेत ? तुमचे असेच चालू राहणार असेल तर शिष्टमंडळाबरोबर न राहता आम्हांला मुंबईला परतावे लागेल.'' त्यानंतर मौलाना आझाद यांच्या निवासस्थानी काँग्रेस श्रेष्ठींशी चर्चा करण्याचे ठरले. त्याप्रमाणे प्रदीर्घ चर्चा झाली. वरिष्ठ नेत्यांचे मन वळविण्यात शिष्टमंडळाला यश मिळू शकले नाही. देव यांनी सांगून टाकले की द्विभाषिक आम्हांला मान्य आहे. पाच वर्षानंतर गुजरातने वाटले तर बाजूला व्हावे. काँग्रेस कार्यकारिणीच्या उपसमितीने यावर चर्चा केली पण निश्चित उत्तर दिले नाही. शिष्टमंडळाची अशाप्रकारे बोळवण केली गेल्यानंतर सर्व मंडळी नाराजीसह महाराष्ट्रात परतली.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसची बैठक लगोलग ऑक्टोबरमध्ये बोलाविण्यात आली. पहिल्या दिवशी कार्यकारिणीच्या बैठकीला वऱ्हाडचे रामराव देशमुख आणि मराठवाड्यातील नेते मंडळी उपस्थित होती. भरपूर चर्चा झाली. कार्यकारिणीने द्विभाषिकाच्या योजनेला मान्यता दिली. नंतर सर्वसाधारण सभेत काकासाहेब गाडगीळांनी द्विभाषिकाचा ठराव मांडला आणि यशवंतरावांनी त्यास पाठिंबा दिला. ठरावावर प्रदीर्घ चर्चा झाली, कांही उपसूचना मांडण्यात आल्या. देव, रामानंद तीर्थ, हिरे यांनी ठरावाचे समर्थन केले. यशवंतरावांनी आपल्या भाषणात देशी वसाहतवादाचा उल्लेख करून गुजराती नेत्यांवर तोफ डागली. संयुक्त महाराष्ट्राला नकार आणि गुजराथी भाषिकांसाठी स्वतंत्र गुजरात राज्य, हा काय प्रकार आहे

असे त्यांनी विचारले. मुंबई शहरावरील महाराष्ट्राचा हक्क नाकारणाऱ्या महागुजरातच्या नेत्यांच्या वृत्तीचे वर्णन त्यांनी "वसाहतवाद" असे केले. चव्हाणांच्या भाषणाचे अनेकांना आश्चर्य वाटले. चव्हाणांनी राजीनामा द्यावा अशीही मागणी कांही प्रतिष्ठित मंडळींनी केली. चव्हाण यांनी द्विभाषिक योजनेला दिल्लीत विरोध दर्शविला होता. पुण्याच्या सभेत मात्र द्विभाषिकाला पाठिंबा दिला. त्याबद्दल त्यांना विचारले असता ते म्हणाले, "संयुक्त महाराष्ट्रासंबंधीची माझी प्रेरणा कायम आहे. संयुक्त महाराष्ट्राची मागणी नाकारणे हा महाराष्ट्राचा उपमर्द आहे. स्वतंत्र गुजरात राज्याला मान्यता आणि मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राला विरोध यातून अर्थ काय घ्यायचा ? गुजरातवाल्यांचा वसाहतवाद हाच ना ! द्विभाषिकातून संयुक्त महाराष्ट्र निर्मिती होणार असेल तर प्रयोग करून पाहायला हरकत कां असावी !"

बुद्धिनिष्ठ म्हणविणाऱ्यांनी यशवंतरावांवर नाना प्रकारचे आरोप केले. डॉ. र. पु. परांजपे यांनी यशवंतरावांनी राजीनामा द्यावा असा अनाहूत सल्ला दिला. मोरारजी देसाई धार्जिणे अशी टीका करण्यात आली. टीका करणाऱ्यात विरोधी पक्षांचे लोक जसे होते तसेच काँग्रेसचीही काही मंडळी होती. महाराष्ट्र काँग्रेसने द्विभाषिकाच्या योजनेला संमती दिली, तथापि गुजरात काँग्रेस कमिटीने द्विभाषिकाची योजना फेटाळली. राज्य पुनर्रचना समितीच्या शिफारसी मान्य असल्याचा ठराव संमत केला. मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटीनेही महाराष्ट्र काँग्रेसच्या ठरावाला प्रतिकूलता दर्शविली. नागपूर प्रदेश काँग्रेस कमिटीने स्वतंत्र विदर्भाचे स्वागत करून मराठवाड्याच्या पांच जिल्ह्यांना विदर्भात समाविष्ट होण्याचे आवाहन केले. अशा प्रकारे महाराष्ट्राला अडचणीत आणण्याचा प्रयत्न सर्वांनीच केला. संयुक्त महाराष्ट्र मिळणे तर दूरच राहिले पण द्विभाषिक अस्तित्वात येणे आणि मुंबई शहर मिळणे हेही अवघड होऊन बसले.

संयुक्त महाराष्ट्र परिषदेने द्विभाषिकाची योजना फेटाळून मुंबईत विविध कामगार संघटनांचा मेळावा बोलाविला. एस. एम. जोशी अध्यक्ष आणि कॉम्रेड एस. ए. डांगे उद्घाटक अशी योजना करण्यात आली. या भव्य मेळाव्यात इशारा देण्यात आला की, राज्य पुनर्रचना अहवाल १९ नोव्हेंबरला असेंब्लीत चर्चेला येणार त्या दिवशी पोलिसांनी मिरवणुकीवर घातलेली बंदी मागे घ्यावी. दिवसेंदिवस संयुक्त

महाराष्ट्र परिषदेला लोकांचा अधिकाधिक पाठिंबा मिळू लागला आणि महाराष्ट्र कॉंग्रेसवर जोराची टीका होऊ लागली. कॉंग्रेसचे डॉ. नरवणे यांनी दोन हजार कॉंग्रेसजनांसह बाहेर पडून संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीला पाठिंबा दर्शविला. कॉंग्रेसच्या वर्किंग कमिटीने त्रि-राज्य योजनेला मान्यता दिली त्याची महाराष्ट्रात तीव्र प्रतिक्रिया उमटली. कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष देवगिरीकरांनी वर्किंग कमिटीत आपली बाजू मांडण्याचा प्रयत्न केला पण त्याचा कांहीही उपयोग झाला नाही. महाराष्ट्रात वातावरण तापू लागले. पोलिसांचा मुंबईतील बंदी हुकूम मोडण्याची तयारी सुरू झाली. पश्चिम महाराष्ट्राच्या इतर भागात सभांतून यशवंतरावांविरुद्ध गलिच्छ भाषा वापरणे, शिविगाळ करणे आदि प्रकार सुरू झाले. त्यांना प्रत्युत्तर देण्याऐवजी आपली भूमिका पटवून देण्याचा अटोकाट प्रयत्न करायचा ही भूमिका यशवंतरावांनी स्वीकारली. "सय्यद बंडा," "मोरारजींचा महाराष्ट्रातील सूर्याजी पिसाळ, चमचा" आदि भाषा वापरून कांही विरोधी नेत्यांनी आपल्या संस्कृतीचे दर्शन घडविले. काहींची मजल भर सभेत चव्हाणांच्या दिशेने चपला फेकण्यापर्यंत गेली. सगळ्यांच्या नजरा मुंबईत १९ नोव्हेंबरला काय होते यावर खिळून राहिल्या.

प्रांताध्यक्ष मामासाहेब देवगिरीकर त्रि-राज्य योजनेचा वर्किंग कमिटीचा निर्णय घेऊन दिल्लीहून परतल्यावर त्यांनी प्रदेश कॉंग्रेसची बैठक पुण्यात तारीख १६ नोव्हेंबरला बोलाविली. कारण नोव्हेंबर १८ तारखेला मुंबई असेंब्लीची बैठक सुरू होणार होती. कॉंग्रेस आमदारांनी कोणते धोरण स्वीकारावयाचे याबद्दल चर्चा करून धोरण ठरविणे आवश्यक बनले होते. बैठकीत बरीच चर्चा झाली. मुंबई शहर हे वेगळे राज्य केल्याबद्दल नाराजी व्यक्त करण्यात येऊन मुंबई महाराष्ट्राला देण्याबाबत वर्किंग कमिटीने फेरविचार करावा अशी विनंती करण्यात आली. "हृदय परिवर्तन करू या" हा शब्दप्रयोग गाडगिळांनी वापरला. यशवंतरावांनी पाठिंबा दर्शविताना, "कॉंग्रेसची शिस्त सांभाळून आपण आपले उद्दिष्ट गांठू या. देशाच्या एकतेस व स्वातंत्र्यास विघातक ठरेल अशा कृत्यापासून दूर राहू या" असे आवाहन केले. मोर्चे, हरताळ, लढा या मार्गाऐवजी मन वळविण्याचा मार्ग अवलंबू असेही यशवंतराव चव्हाण म्हणाले. विरोधी पक्षांच्या नेत्यांचे कॉंग्रेसच्या या भूमिकेमुळे समाधान न होता त्यांनी लढ्याचे रणशिंग फुंकले. मुंबई असेंब्लीच्या बैठकीच्या दिवशी १८ नोव्हेंबरला बंदी हुकूम मोडून प्रचंड मिरवणूक काढण्याची

घोषणा करण्यात आली. सेनापती बापट यांनी मिरवणुकीचे नेतृत्व करावे असे ठरले. सुमारे ५०० सत्याग्रहींनिशी बापट, आचार्य अत्रे, मिरजकर मंडळींनी बंदी हुकूम मोडला. त्यांना अटक करण्यात आली. महाराष्ट्रासाठी लढ्याचे दुसरे पाऊल पडले आणि हा लढा रस्त्यावर आला.

मुख्यमंत्री मोरारजीभाईंनी नोव्हेंबर १८ रोजी दुपारी बोलाविलेल्या काँग्रेस आमदारांच्या बैठकीत असे सांगितले की, "त्रि-राज्य योजनेचा ठराव सभागृहात मांडण्यात येईल. त्या ठरावाविरुद्ध कोणाला बोलता येणार नाही, विरोधी मतदान करता येणार नाही. दिल्लीच्या वर्किंग कमिटीचा हा आदेश आहे." अशी पुस्ती त्यांनी जोडली. पेचप्रसंग उभा राहिला. भाऊसाहेब हिरे उभे राहिले आणि म्हणाले, "मी एक निवेदन वाचून दाखविणार आहे. बहुमत आपल्या बाजूला आहे हे पाहून मोरारजींनी हिरे यांची सूचना अमान्य केली. हिरे यांच्या निवासस्थानी काँग्रेस आमदारांची बैठक झाली. काही आमदारांनी राजीनाम्याची भाषा सुरू केली. राजीनाम्याचे भूमिकेस शंकरराव देव यांनी पाठिंबा दर्शविला. हिरे आणि डॉ. नरवणे यांनी राजीनाम्याची तयारी दर्शविली. यशवंतराव चव्हाण यांनी राजीनाम्याचा मार्ग शहाणपणाचा ठरणार नाही, तो आत्मघात ठरेल असे सांगून राजीनामा सादर करण्यास विरोध दर्शविला. देवगिरीकरांनीही चव्हाणांच्याप्रमाणे विरोध दर्शविला. एकूण अंदाज घेण्यात आला. संभाव्य तटस्थ आमदारांची यादी तयार करण्यात आली. मूळ ठराव संमत होणार आणि काँग्रेस अंतर्गत फूट पडणार हे स्पष्ट झाले. यशवंतरावांनी मोरारजींची भेट घेऊन काँग्रेसमधील फूट टाळण्यासाठी मार्ग काढायला हवा असे सांगितले. दिल्लीत काकासाहेब गाडगीळांना ही माहिती समजताच त्यांनी नेहरूंची भेट घेऊन त्यांचे मन वळविले. मोरारजींना दिल्लीहून आदेश मिळाला. ठरावावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली. मुंबईतील वातावरण तारीख १८ नोव्हेंबरच्या सत्याग्रहापासून तापलेले होते. त्यातच स. का. पाटील यांच्या सहाय्याने मोरारजींनी मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटीला २० नोव्हेंबरला चौपाटीवर जाहीर सभा घेण्यास उद्युक्त केले. काँग्रेस पक्षाची भूमिका समजावून देण्यासाठी जाहीर सभा असे जरी म्हटले होते तरी त्यामागे हेतू वेगळाच होता. मोरारजीभाईंना खरे तर या सभेत सामील करून घ्यायला नको होते. गडबड, अशांतता, गुंडगिरी करून मुंबई महाराष्ट्राला मिळणार नाही असे मोरारजीभाईंनी

भाषणात सांगितले तर स. का. पाटलांनी पुढील ५००० वर्षांत मुंबई महाराष्ट्राला मिळणार नाही असे बोलून लोकांच्या भावना भडकावल्या. सभेवर दगडफेक झाली. चपला फेकण्यात आल्या. या गोंधळामुळे महाराष्ट्र काँग्रेसचे नेते अस्वस्थ झाले. त्यांनी मोरारजी, स. का. पाटील यांना दोष देण्याऐवजी लोकांनाच दोष दिला. शंकरराव देवांनी प्रायश्चित म्हणून पाच दिवसांचे उपोषण केले.

संयुक्त महाराष्ट्र कृति समितीने २१ तारखेला हरताळ पाळण्याबाबत आदेश दिलेला होता. हा हरताळ प्रचंड प्रमाणावर यशस्वी झाला. दुसऱ्या दिवशी संतापलेले हजारो लोक कौन्सिल हॉलच्या रोखाने चालत निघाले. पोलीस-होमगार्ड यांनी रस्ते अडवून धरले होते. फ्लोरा फौंटनजवळ पोलीस आणि लोक यांच्यात रेटारेटी सुरू झाली. लोकांची संख्या प्रचंड असल्यामुळे त्यांना मागे रेटणे पोलिसांना अशक्य होऊन बसले. पोलिसांनी प्रथम लाठीहल्ला केला, नंतर अश्रुधुराचा वापर केला आणि पाठोपाठ गोळीबार सुरू केला. गोळ्यांना न जुमानता लोक पुढे सरकण्याचा प्रयत्न करू लागले. परिस्थिती पोलिसांच्या आटोक्याबाहेर गेली. गोळीबारात १५ लोक ठार व ३०० जखमी झाले. माणसे गोळ्यांनी मारली जात आहेत असे वृत्त कौन्सिल हॉलवर पोहोचताच एस. एम. जोशी, नौशेर भरुचा, अमूल देसाई गृहाबाहेर पडले. त्यांनी बेभान झालेल्या लोकांना आवरले. चौपाटीवर सभेला चला म्हणून सांगितले. चौपाटीवर तांतडीने सभा आयोजित करण्यात आली.

अशांत बनलेल्या परिस्थितीत सभागृहात ठरावावर चर्चा चालू ठेवणे अयोग्य वाटून यशवंतराव चव्हाण, भाऊसाहेब हिरे, बाळासाहेब देसाई, बॅ. जी. डी. पाटील हे मोरारजींना भेटले आणि चर्चा तहकुबीसाठी दिल्लीची संमती त्वरित मिळवा अशी त्यांच्याकडे मागणी केली. मोरारजीभाईंनी फोनवर संमती मिळविली व पक्षांतर्गत निर्माण झालेला पेच तात्पुरता सुटला. नोव्हेंबर २२ ला असेंब्लीत २४२ विरुद्ध २८ असे मतदान होऊन चर्चा तहकुबीला मंजुरी देण्यात आली. घटना वेगाने घडत होत्या. गुंतागुंत वाढतच होती. श्री. हिरे यांच्या निवासस्थानी नेते मंडळी जमली. सभापती नानासाहेब कुंटे हे पण प्रथा बाजूला सारून उपस्थित राहिले. महाराष्ट्र काँग्रेसच्या आदेशाप्रमाणे वागायचे की काँग्रेस वर्किंग कमिटीची आज्ञा प्रमाण मानावयाची यावर बराच खल झाला. भाऊसाहेब हिरे यांनी चर्चेचा एकूण रंग पाहून सांगितले की, ११६ आमदारांनी आपल्याकडे राजीनामे आणून दिले आहेत. कुंटे

यांनी यावर सुचविले की हे राजीनामे प्रदेश काँग्रेसच्या अध्यक्षांकडे न पाठविता सभापतींकडे पाठवून द्यावेत. कुंटे यांच्या या सूचनेशी शंकरराव देव आणि भाऊसाहेब हिरे यांनी असहमती दर्शविली. यशवंतराव चव्हाण यांनी सांगितले की, आपण काँग्रेस वर्किंग कमिटीची आज्ञा मानणार आहोत. प्रदेश काँग्रेसच्या कांही नेत्यांच्या मताप्रमाणे वागणे आपल्याला मान्य नाही. चव्हाणांना पाठिंबा देणाऱ्यांचे राजीनामे आलेले नव्हते. चव्हाणांच्या भूमिकेवर टीका करण्यात येऊन त्यांना विश्वासघातकी असे संबोधण्यात आले. देव हे यशवंतरावांबद्दल तुच्छतेने बोलू लागले. देवांना यापुढील सभेला बोलाविण्यात येऊन नये अशी भूमिका यशवंतरावांनी घेतली. देव आणि हिरे वाटाघाटीसाठी दिल्लीला गेल्यावर देवांचे नेतृत्व आपण झुगारून देत आहोत असे यशवंतरावानी जाहीर केले.

शंकरराव देव यांनी पांच दिवसांचे उपोषण समाप्त केल्यावर (नोव्हेंबर २६) श्री. हिरे यांच्या समवेत दिल्लीला प्रयाण केले. पंडित पंत यांच्याबरोबर चर्चा करण्यासाठी जात आहोत असे त्यांनी आपल्या निकटवर्तियांना सांगितले होते. देवांच्या दिल्लीतील मुक्कामात महाराष्ट्र काँग्रेसमधील मतभेदाचा स्फोट करण्यात आला. सातारा जिल्हा काँग्रेसच्या वतीने फलटणला एक सभा आयोजित करण्यात आली. त्या सभेला यशवंतराव चव्हाण, नाईक-निंबाळकर आणि गणपतराव तपासे हे तिन्ही मंत्री उपस्थित होते. मोरारजींनी त्रि-राज्य योजना असेंब्लीत मांडली तेव्हा राजीनामा कां दिला नाही हे कार्यकर्त्यांना समजावून सांगावे हा हेतू फलटणच्या सभेच्या मागे होता. या सभेत शंकरराव देवांवर प्रखर हल्ला करण्यात आला. भाऊसाहेब हिरे यांचा उल्लेख अप्रत्यक्षपणे करण्यात आला. काँग्रेस पक्षाचा आदेश नसताना महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसने आमदारांकडून राजीनामे घेण्याचे पाऊल उचलणे योग्य नव्हे असे सांगून यशवंतराव चव्हाण म्हणाले, "राजीनामे, संप, उपोषण अशा प्रकारच्या दबाव तंत्राचा काहीही उपयोग होणार नाही. देवांनी काँग्रेसचे नांव घेऊन हे तंत्र वापरू नये, कारण ते काँग्रेसचे सभासद नाहीत." फलटणच्या सभेत यशवंतरावांनी केलेल्या आणखी एका विधानाबद्दल खूपच गदारोळ झाला. "संयुक्त महाराष्ट्र की नेहरू असे मला कोणी विचारले तर मी नेहरूंच्या बाजूने कौल देईन" हे ते विधान होय. नेहरूंच्या धोरणाचा पाठपुरावा म्हणजे महाराष्ट्र विरोधी धोरणाचा पाठपुरावा चव्हाण करीत आहेत अशी टीका सुरू झाली. यशवंतरावांनी संयुक्त

महाराष्ट्राची व मुंबई शहराची मागणी सोडून दिलेली नव्हती आणि त्याचा निर्वाळा फलटणच्या सभेत दिलेला होता. र. के. खाडिलकर, माधवराव बागल आदींनी चव्हाणांच्यावर कडाडून हल्ला चढविला. हिरे यांचे नेतृत्व चव्हाणांनी झुगारून दिले याबद्दल बागलांनी विशेष दुःख प्रगट केले. यशवंतरावांची भूमिका हिरे नेतृत्वाचे विरोधी नव्हती किंवा संयुक्त महाराष्ट्र विरोधी पण नव्हती. आपली मागणी न्याय्य आहे हे राष्ट्रीय पुढाऱ्यांना पटवून द्यायला हवे, तसेच मुंबई महाराष्ट्रात घातल्याने कुणी धास्ती बाळगण्याचे कारण नाही याचीही खात्री पटवून द्यायला हवी अशी त्यांची भूमिका होती. त्रि-राज्य योजना फेटाळणे म्हणजे महाराष्ट्राच्या जवळ येत असलेल्या विदर्भास दूर ढकलणे असे होईल. विरोधकांचे मार्ग वेगळे आहेत. त्या मार्गाने महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाने जाणे हिताचे ठरणार नाही असेही यशवंतरावांनी स्पष्ट केले.

यशवंतरावांची लोकशाहीवर नितांत निष्ठा होती. मतस्वातंत्र्याबाबत आणि निर्भयपणे मतप्रदर्शन करण्याबाबत ते आग्रही होते. त्यांच्याविरुद्ध खालच्या पातळीवर जाऊन टीका केलेल्यांच्यावर ते कधी तुटून पडले नाहीत. त्याचा संयम दांडगा होता. हिरे आणि चव्हाण यांच्यात शंकरराव देवांमुळे जो दुरावा निर्माण झाला होता त्याचे शल्य यशवंतरावांना अधिक जाणवत होते. हिरे यांचे नेतृत्व महाराष्ट्रातील सर्वसामान्यांना, ग्रामीण भागातील जनतेला, शेतकऱ्यांना अधिक उपयुक्त ठरू  शकेल अशी त्यांची धारणा होती. हिरे आणि चव्हाण यांच्यात एकोपा राहणे हे महाराष्ट्राच्या भल्याच्या दृष्टीने आवश्यक आहे हे जाणून उभयतांतील दुवा म्हणून वसंतदादा पाटील आणि नरुभाऊ लिमये यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. नरुभाऊ हे भाऊसाहेब हिरे यांच्या गटाचे म्हणून ओळखले जाऊ लागले होते. तथापि नरुभाऊंनी यशवंतरावांना भेटण्याची, त्यांची आणि भाऊसाहेबांची दिलजमाई घडवून आणण्याची खटपट चालू ठेवली होती. अमूक हिरे गटाचा, तमूक चव्हाण गटाचा ही भाषा यशवंतरावांना आवडायची नाही. ते म्हणायचे, मतभेद म्हणजे गट नव्हेत. लिमये, वसंतदादा आदि मंडळींनी यशवंतराव आणि भाऊसाहेबांची भेट एके दिवशी घडवून आणली. दोघांना एका खोलीत बसवून चर्चा करावयास लावली. तासाभराने ते दोघेजण हातात हात घालून हसत खोलीच्या बाहेर आले. कार्यकर्त्यांना आनंद वाटला. मने स्वच्छ असल्यावर असे घडणारच याचा दादांना आणि नरुभाऊंना विश्वास वाटत होता आणि तो खराही ठरला.

नरुभाऊंचा या कामगिरीच्या निमित्ताने जो उल्लेख झाला आहे त्याला तशी कारणेही आहेत. लिमये हे सातारचे. काँग्रेसचे कार्यकर्ते, सातारा जिल्हा काँग्रेसच्या कार्यात यशवंतरावांचे सहकारी. त्याशिवाय ते पत्रकार. ''प्रकाश'' नांवाचे साप्ताहिक ते चालवीत. यशवंतरावांचा सल्ला घेऊन त्यांनी साप्ताहिकाचे रूपांतर दैनिकात केले. कांही काळाने पुण्याचे 'लोकशक्ती' दैनिक अडचणीत आल्यावर, डबघाईला आल्यावर भाऊसाहेब हिरे यांनी नरुभाऊंना सातारहून पुण्याला बोलाविले आणि 'लोकशक्ती' दैनिक चालविण्याची जबाबदारी त्यांच्यावर टाकली. आर्थिकदृष्ट्या काम अवघड होते. तथापि हिरे यांच्या शब्दाखातर नरुभाऊंनी हे काम स्वीकारले. लोकशक्तीचा संसार चालविताना नरुभाऊंना आपले हात पोळून घ्यावे लागले. आर्थिकदृष्ट्या आपल्या संसाराची हानी करून घ्यावी लागली. यशवंतरावांच्या कर्तृत्वाबद्दल, बौद्धिक उंचीबद्दल, राजकीय आणि वैयक्तिक जीवननिष्ठेबद्दल लिमये यांच्या मनात आदर होता. यशवंतरावांच्या प्रशासन कौशल्याची, लोकसंग्रहाची, वाचनाची, कला-संगीत प्रेमाची, लेखनाची, वक्तृत्वाची वाखाणणी करण्यात नरुभाऊंनी कधी हात आणि जीभ आंखडती घेतली नाही. काकासाहेब गाडगीळ, यशवंतराव चव्हाण आणि वसंतदादा पाटील ही त्यांची आदरत्रयी. ''नरु, माझ्यावर रागावला असशील. काय करू, या खेपेला माझा नाईलाज झाला. थोडे थांबशील ना !'' यशवंतरावांचे हे उद्‌गार कालांतराने त्यांनी खरे करून दाखविले आणि नरुभाऊंना कौन्सिलवर पाठविले.

यशवंतराव हे संयुक्त महाराष्ट्राच्या विरोधी आहेत अशी हांकाटी पिटून ज्यांनी त्यांना शिव्याशाप दिले त्यांनी यशवंतरावांच्या असेंब्लीतील भाषणाकडे खऱ्या अर्थाने लक्ष दिले नाही. मुख्यमंत्री मोरारजीभाईंनी दिनांक २७ मार्च, १९५६ रोजी प्रांतपुनर्रचना बिल असेंब्लीत मांडल्यावर, या बिलावर बोलताना यशवंतरावांनी जे विचार व्यक्त केले त्यात मुंबईवरील महाराष्ट्राच्या न्याय्य हक्काची कैफियत गृहापुढे सादर केली. यशवंतराव म्हणाले, ''मुंबई कुठे आहे हे भूगोल सांगेल. भौगोलिकदृष्ट्या मुंबई महाराष्ट्रातच आहे. महाराष्ट्र, गुजरात आणि कर्नाटक अशी तीन राज्ये निर्माण करण्यात आली आहेत. गुजरातला त्यांच्या मताप्रमाणे सर्व काही मिळाले आहे, कर्नाटकाला १०५ टक्के मिळाले आहे. महाराष्ट्राचे राज्य निर्माण करताना मात्र त्यात अपुरेपणा ठेवण्यात आला आहे. मराठवाडा आमच्यात आला याचा आम्हाला आनंद होत आहे. निजामशाहीच्या कचाट्यातून मराठी भाषिकांची

मुक्तता होऊन महाराष्ट्राशी ते एकरूप होत आहेत. तसेच विदर्भासह महाराष्ट्र राज्य निर्माण होत आहे याचा पण आनंद होत आहे. मुंबई महाराष्ट्रात न घातल्याबद्दल आम्हास दुःख होत आहे. मुंबई महाराष्ट्राची आहे की नाही हा वाद निर्माण होण्याचे कारण नाही. मुंबई भौगोलिकदृष्ट्या महाराष्ट्रातच आहे आणि पंडित नेहरूंनीही ही गोष्ट मान्य केलेली आहे. इतिहास बदलू शकेल, पण भूगोल बदलता येणार नाही. मुंबा देवीवरून मुंबई हे नांव पडलेले आहे. वाळकेश्वर मंदिर हे मराठी भाषिकांचे आहे. प्राचीन काळापासून मुंबईचे रहिवासी, कोळी, पाठारे प्रभू हे मराठी भाषिकच आहेत. मग मुंबई महाराष्ट्राला कां बरे दिली गेली नाही? मुंबई हे महाराष्ट्राचे महत्त्वाचे बंदर आहे. गुजरातला ओखा व कांडला बंदर आहे, आंध्रला विशाखापट्टण, ओरिसाला कटक, बंगालला कलकत्ता, तामिळनाडूला मद्रास बंदर आहे. मग महाराष्ट्राचे मुंबई बंदर कां बरे काढून घेण्यात येत आहे. महाराष्टाच्या राजधानीसाठी मुंबईखेरीज कोणते शहर आहे बरे !"

फ्लोरा फौंटनजवळील गोळीबारामुळे मुंबई शहर अशांत बनले होते. अशा स्थितीत मोरारजींच्या बिलावर असेंब्लीत चर्चा करीत राहणे योग्य नाही हे जाणून हिरे-चव्हाण-देवगिरीकर-देसाई आदींनी मोरारजींची भेट घेतली आणि चर्चा तहकूब करावी अशी मागणी केली. मोरारजींनी दिल्लीचे परवानगी मिळविली आणि पेच तात्पुरता सुटला. काँग्रेस आमदारांच्या राजीनाम्याचा आग्रह धरून ते जर सभापतींच्या हवाली केले असते तर परिस्थितीस वेगळेच वळण लागले असते. राजीनामे देण्यास सर्व आमदार राजी नव्हते. त्यांच्यावर दबाव आणला गेला असता तर मोरारजींची आणि काँग्रेस वर्किंग कमिटीची पंचाईत झाली असती. यशवंतरावांनी ही स्थिती श्री. कुंटे यांना समजावून दिली. काँग्रेसअंतर्गत दोन गट पडले, फूट पडली आणि ती वाढत गेली. हिरे आणि देव हे दिल्लीत काय सौदेबाजी करतात याकडे एका गटाचे लक्ष लागून राहिले. राज्य पुनर्रचना समितीच्या अहवालावर लोकसभेत १४ डिसेंबर, १९५५ ला चर्चा सुरू झाल्यावर काकासाहेब गाडगिळांनी चर्चेत भाग घेऊन काँग्रेस श्रेष्ठींच्या भूमिकेवर कडाडून टीका केली. नेत्यांनी संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न सोडविला नाही तर लोक रस्त्यावर येऊन तो सोडवतील असा इशारा दिला. स. का. पाटील यांनी मुंबई शहर महाराष्ट्रात येऊ नये यावर आपल्या भाषणात जोर दिला.

लोकसभेत चर्चा झाली पण निर्णय झाला नाही. देव-गाडगीळ-मोरारजी यांनी एकत्र बसून निर्णय करावा असे गृहमंत्री पंडित पंत यांनी आपल्या उत्तराच्या भाषणात सुचविले. याच सुमारास मुंबई कॉर्पोरेशनने ठराव संमत केला की मुंबईचा समावेश महाराष्ट्रात करावा. या ठरावाने स. का. पाटील यांचा नक्षा उतरविला गेला. मोरारजींनी डॉ. नरवणे यांचा राजीनामा मागितला आणि नरवणे यांनी त्वरित मंत्रिपदाचा राजीनामा सादर केला. हिरे यांना हात लावण्याची मोरारजींची हिंमत झाली नाही. पंतांनी सुचविल्याप्रमाणे शंकरराव देवांनी मोरारजींची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली. द्विभाषिकाचा पर्याय स्वीकारण्यास मोरारजीभाई तयार झाले. तथापि पांच वर्षांनी विभक्त होण्याची अट त्यांनी मान्य केली नाही. द्विभाषिकाचे मुख्यमंत्रिपद आपल्याकडे रहावे असे त्यांना मनातून वाटले. देव यांनी त्याला तयारी पण दर्शविली. देव-मोरारजी यांच्यातील खलबताबद्दल काँग्रेसजन आणि विरोधक या दोघांतही अस्वस्थता निर्माण झाली. तरीही देवांनी धांवपळ चालूच ठेवली. या संदर्भात हिरे यांच्या निवासस्थानी भरलेल्या काँग्रेस नेत्यांच्या बैठकीत देवांच्या योजनेचा कुणीच पुरस्कार न केल्यामुळे ती बारगळली.

✦ ✦ ✦

## : ६ :

१९५५ साल संपत आले होते. परिस्थिती "जैसे थे" होती. कॉँग्रेस पक्षात फूट पडली होती. तशी फूट संयुक्त महाराष्ट्र परिषदेतही पडली. संयुक्त महाराष्ट्र कृतिसमिती नांवाची नवी समिती मोर्चा संघटित करण्यासाठी परिषदेने स्थापन करताच प्रजासमाजवादी पक्षाने कम्युनिस्ट, शेकाप नेत्यांचा यामागील डाव ओळखून समितीचा राजीनामा दिला. नव्या कृतिसमितीने दिनांक ७ जानेवारी १९५६ ला "संयुक्त महाराष्ट्र दिन" पाळण्याचा फतवा काढला. परिषदेच्या कार्यकारिणीची बैठक बोलावण्याबाबतच्या मागणीकडे शंकरराव देव यांनी दुर्लक्ष केले. दिल्लीत हिरे यांनी केंद्रिय मंत्री चिंतामणराव देशमुख यांची भेट घेतली. मुंबईचे स्वतंत्र राज्य करावे असे हिरे त्यांना कबूल करून आले. देशमुखांनी पंडित पंत यांची भेट घेऊन त्यांना मुंबईबाबतचा निर्णय कळविला. नंतर हिरे बदलले. 'मुंबई केंद्रशासित असावी' असे आपण म्हटल्याचे देशमुखांना ते सांगू लागले. देशमुख रागावले. पंडित नेहरूंनी मंत्रिमंडळाचा निर्णय मुंबई केंद्रशासित राहील असा जाहीर केला. देशमुख हे केंद्रिय मंत्रिमंडळाचे सदस्य असतानाही त्यांना हा निर्णय कळविला गेला नव्हता. नव्या महाराष्ट्राची राजधानी मुंबई असणार नाही हे समजताच संयुक्त महाराष्ट्रवादी कॉँग्रेसजनांनी मुंबईत १५ जानेवारी रोजी बैठक बोलाविली. बैठकीत गाडगीळ, नरवणे आदिंची भाषणे झाली. हिरे सभेत कांहीच बोलले नाहीत. पंडित नेहरूंच्या निर्णयावर मुंबईत तीव्र प्रतिक्रिया उमटेल हे जाणून मोरारजींनी प्रतिबंधक उपाययोजना म्हणून ४३५ लोकांना अटक केली. त्यात कांही नेतेही होते. हा निर्णय मोरारजींनी एकट्याने घेतला होता. हिरे यांनी थोडी कुरबूर केली, बस्स!

नेहरूंचा निर्णय आकाशवाणीवरून ऐकल्यानंतर मुंबई शहरात दंगल सुरू झाली. ट्राम-बसेसवर दगडफेक, जाळपोळीचे प्रकार सुरू झाले. पोलिसांचा लाठीहल्ला, गोळीबार, धरपकड आदि प्रकार आठ दिवस चालू होते. मोरारजींनी १७५ लोक ठार मारले असे वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाले. पोलिसांनी स्वैरपणे गोळीबार केला होता आणि त्यासाठी ३०३ नंबरच्या गोळ्या वापरल्या होत्या. दंगलीबाबतचा जो अहवाल केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला तो मोरारजींनी आपल्या मराठी सहकाऱ्यांना दाखविला देखील नव्हता. त्याबद्दल मुख्यमंत्री मोरारजींना जाब विचारण्याऐवजी शंकरराव देवांनी नेहरूंकडे फक्त नाराजी व्यक्त केली. आत्मशुद्धीसाठी अकरा दिवसांचे उपोषण जाहीर केले. वर्किंग कमिटीच्या संमती शिवाय मंत्र्यांनी राजीनामे देऊ नयेत अशा सूचना देण्यात आल्या. चिंतामणराव देशमुख यांनी मात्र राजीनामा देण्याचे धाडसी पाऊल उचलले. नेहरूंनी त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न केला, पण तो फोल ठरला.

काँग्रेसची प्रतिमा डागाळली गेली. देवप्रणीत संयुक्त महाराष्ट्र परिषद संपुष्टात आली. पुण्यात टिळक स्मारक मंदिरात ६ फेब्रुवारी, १९५६ ला संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन करण्यात आली. तिकडे दिल्लीत गृहमंत्री पंत थोडे अस्वस्थ झाले. त्यांच्या मनात द्विभाषिकाची कल्पना पुन्हा घोळू लागली. अमृतसर काँग्रेस अधिवेशनात काँग्रेस श्रेष्ठींशी, महाराष्ट्रातील नेत्यांशी यासंबंधी चर्चा केली. ढेबरभाई यांनी पंडित पंतांचे सूचनेस मान्यता दर्शविली. मुंबई जर महाराष्ट्रात राहत असेल तर द्विभाषिक राज्य मान्य करण्यास हरकत नाही असा महाराष्ट्रातील नेत्यांचा सूर पंडित पंताना ऐकावयास मिळाला. मोरारजींनी प्रथम विरोध दर्शविला. पण नंतर सांगितले की, वर्किंग कमिटीला आणि केंद्र सरकारला द्विभाषिक मान्य असेल तर आपण विरोध करणार नाही. अमृतसरला निर्णय झाला नाही पण मतांचा अंदाज येऊ शकला. महाराष्ट्रात परतल्यावर यशवंतराव चव्हाणांनी दक्षिण महाराष्ट्राचा दौरा केला. सांगली येथे "अमृतसरचा संदेश" यावर त्यांचे महत्त्वपूर्ण भाषण झाले. विरोधकांनी दूसलीही गडबड न करता चव्हाणांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले. यशवंतराव भाषणात म्हणाले, "मुंबई महाराष्ट्रात नको असे आपण कधीही म्हटलेले नाही. मुंबई मिळाली नाही याचे मला दुःख आहे. पण मुंबई मिळत

नाही म्हणून देश जाळावयाचा आहे की काय ? काँग्रेसबाहेर पडा आणि झगडा करा असे सांगण्यात येत आहे. झगडा कुणाशी करावयाचा ? भावाशी कां ! झगड्याने, वैराने मुंबई मिळणार नाही. लढ्याची भाषा बंद झाली पाहिजे. साधनांचा स्वीकार विचार करून करावयाचा असतो. साध्याबरोबर साधनही महत्त्वाचे असते. गांधीजींनी हे आम्हांस शिकविले आहे. गांधी-नेहरूंना आम्ही मानतो, मोठे म्हणतो म्हणून काहींची तक्रार आहे. ज्यांनी मातीतून सोने काढले त्यांना मोठे कां म्हणू नको ! ज्यांनी स्वातंत्र्यदिनाचे दिवशी घरावर काळे झेंडे लावले त्यांना मोठे म्हणू ? कणाकणाने राबून ज्यांनी देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले, शेवटी आपला प्राणही दिला त्यांना मी मानणार, मोठे म्हणणार. यासाठी कुणी "सूर्याजी पिसाळ" म्हणत असेल तर त्याची मला पर्वा नाही. मी सूर्याजी पिसाळ तर या प्रश्नात शिवाजी आणि औरंगजेब कोण ! शिवाजी काय काळी निशाणे घेऊन हिंडतो ! यशवंतराव चव्हाण पालापाचोळ्यासारखा राजकारणातून उडून जाणारा नाही. चव्हाणाचा पिंड कृष्णेच्या पाण्यावर आणि मातीवर वाढलेला आहे. चव्हाणाच्या कांही जीवननिष्ठा आहेत, कांही मूलभूत विचार आहेत."

सातारा जिल्ह्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांपुढे बोलताना यशवंतराव म्हणाले, "भारतनिष्ठा, काँग्रेसनिष्ठा आणि शांततेचा मार्ग या मी माझ्या तीन मर्यादा मानल्या आहेत. आईशी भांडण्याचा हक्क जरूर बजावा. पण एकदा आईने सांगितले की मार्ग हा आहे, त्यावेळी आईचे ऐकायला हवे. लढा, बंड, असहकाराची भाषा ऐकायला मिळते. दिल्लीशी दोन हात करायचे म्हणजे काय ? कोण दिल्लीपती आणि कोण महाराष्ट्र ! 'काँग्रेसपेक्षा देश मोठा आहे' ही माझी पूर्वीपासूनची भूमिका आजही कायम आहे. देवाजवळ मागताना मी सुराज्य मागतो. स्वातंत्र्य टिकावे असेही मागतो. काँग्रेसच जगावी असे मागत नाही. मन स्वच्छ असायला हवे. "लढू या" असे शब्द वापरून लोकांची फसवणूक कशाकरिता करायची ? संयुक्त महाराष्ट्रासाठी "रक्त द्या" असे कोणीतरी म्हटले आहे. मी म्हणेन रक्त सांडण्याची गरज नाही, घाम गाळण्याची गरज आहे. जे राज्य मिळाले आहे ते अपूर्ण आहे. तथापि ते राज्य उत्तम रीतीने, नेकीने, कुशलतेने चालविण्यानेच आपण मुंबई मिळविणार आहोत. मुंबईवर महाराष्ट्र अवलंबून आहे आणि मुंबईवर साऱ्या देशांचे

जीवन अवलंबून आहे. भौगोलिकदृष्ट्या मुंबई ही महाराष्ट्राची आहे हे मान्य केले गेले आहे. आपल्या मागणीमागील न्याय्य हक्क मानला गेला आहे. काळवेळ लागेल पण मुंबई महाराष्ट्राला मिळेलच. योग्य मार्गाने जाऊन आपण मुंबई मिळवू या. विरोधकांपैकी ज्यांनी मला शिव्या ऐकविल्या त्याचे मला वाईट वाटले नाही. मी मनाने निश्चित केले आहे की शिवीला शिवीने उत्तर द्यायचे नाही, त्याबद्दल तक्रार करायची नाही. विरोधकच कंटाळतील आणि त्यांना सुविचार सुचेल. माझे विचार कार्यकर्त्यांना पटलेले आहेत. कार्यकर्त्यांनी आता विचारांच्या प्रसाराचे काम करावयाचे आहे.'' यशवंतरावांनी सातारा जिल्ह्याचा चार दिवसांचा दौरा केला. कोरेगांवला सभा झाली, नंतर पुसेसावळी येथे. दोन्ही ठिकाणी निदर्शनांचा प्रयत्न झाला. गोळीबार करावयाचा नाही अशी ताकीद यशवंतरावांनी पोलिसांना देऊन ठेवलेली होती. त्यानंतर कराडला कार्यकर्त्यांची फार मोठी सभा झाली. फलटणच्या बैठकीतील आपली भूमिका त्यांनी सर्वांना पटेल या भाषेत समजावून दिली. लोकांनी मोठ्या संख्येने यशवंतरावांचे स्वागत केले आणि त्यांना निरोप दिला. विरोधकांची निदर्शने फुसकी ठरली.

पंडित नेहरूंनी पुण्यात १ ऑगस्टला टिळक पुण्यतिथीच्या निमित्ताने जे भाषण केले त्यात त्यांनी स्पष्ट शब्दात सांगितले की, मुंबईत जेव्हा शांतता नांदेल तेव्हां आपण स्वतः मुंबई महाराष्ट्रात घालावी अशी महाराष्ट्रातर्फे वकिली करू. या भाषणाचा परिणाम गुजराती नेत्यांवर आणि मुंबईतील नेत्यांवर निश्चितपणे झाला. महाराष्ट्राने सुचविलेल्या द्विभाषिक राज्याला मान्यता दिली तर महाराष्ट्राची तक्रार राहणार नाही आणि आपल्यालाही मुंबईत राहता येईल असा मतप्रवाह लोकसभेतील मुंबई व गुजरातमधील सभासदांत आढळून येऊ लागला. आचार्य कृपलानी आणि अशोक मेहता, तसेच चिंतामणराव देशमुखही या नव्या योजनेला अनुकूल झाले. एच. व्ही. कामथ, आचार्य कृपलानी, अशोक मेहता, फिरोज गांधी आदींनी पुढाकार घेऊन द्विभाषिकासंबंधी एक खलिता तयार केला. त्यावर २८२ खासदारांच्या सह्या घेतल्या आणि पंडित नेहरूंना सादर केल्या. संसदीय काँग्रेस पक्षाने द्विभाषिकाच्या योजनेला आपला पाठिंबा व्यक्त केला. १० ऑगस्टला लोकसभेने विशाल द्विभाषिकाच्या बिलाला संमती दर्शविली.

दुसऱ्याच दिवशी ११ ऑगस्टला पुण्यात काँग्रेस भवनवर यशवंतरावांचे काँग्रेस कार्यकर्त्यांपुढे भाषण झाले. यशवंतराव म्हणाले, "सार्वभौम लोकसभेने जो द्विभाषिकाचा निर्णय घेतला आहे तो शिरोधार्य मानून आपण सर्व कार्यकर्त्यांनी जनतेला समजावून द्यायला हवाय. मुंबईच्या प्रश्नावर खूप रण माजले. महाराष्ट्राच्या प्रश्नापुढे देशावरील निष्ठा विसरली गेली. ज्यांनी गोंधळ माजविला, अशांतता पसरविली त्यांचेवरच एकसंध भाषिक महाराष्ट्र न मिळण्याची जबाबदारी आहे. लोकसभेचा निर्णय यशस्वी करण्यासाठी आपण प्रयत्नांची शर्थ करू या !" यानंतर यशवंतरावांनी पुणे जिल्ह्याचा दौरा केला. सासवड, बारामती, इंदापूर, दौंड आदि ठिकाणी त्यांच्या सभा आयोजित केलेल्या होत्या. यशवंतरावांचा दौरा निर्धाराने आणि छातीठोकपणे चालू असल्याचे पाहून विरोधकांनी निदर्शने करण्याचा, अत्रे यांच्या सभा आयोजित करण्याचा प्रयत्न करून पाहिला. अत्रे आणि कोठारी ही दुक्कल पत्रकार होती, संपादक होती. तथापि त्यांनी आपल्या बोलण्यात, लेखनात सभ्यता दाखवावयाची नाही असा निर्धार केला होता. विनोद आणि बाष्कळपणा यामुळे लोकांची थोडावेळ करमणूक होत असे. पण लोक अत्र्यांना गंभीरपणे घेत नसत. यशवंतरावांची बारामतीची मिरवणूक व सभा एवढी प्रचंड झाली की समितीवाल्यांना परिस्थितीचा अंदाज येऊन चुकला आणि त्यांनी अत्र्यांच्या सभा बंद केल्या.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या कार्यकारिणीने १० ऑगस्टला विशाल मुंबई राज्यास एकमुखी पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला. सर्वसाधारण सभेत पाठिंब्याचा ठराव भाऊसाहेब हिरे यांनी मांडला. या ठरावाला पाठिंबा दर्शविणाऱ्या भाषणात यशवंतराव म्हणाले, "राज्य पुनर्रचना ही कारभारविषयक सोयीची बाब समजली पाहिजे. राज्य पुनर्रचनेच्या प्रश्नाहून अधिक महत्त्वाचे प्रश्न देशाच्या विकासाचे आहेत. त्याकडे आपण लक्ष द्यायला हवे. विरोधी पक्षांनी संयुक्त आघाडी उभारण्याचे जे प्रयत्न चालविले आहेत त्यात त्यांची राजकीय दिवाळखोरी स्पष्टपणे दिसून येते. त्यांचेजवळ आर्थिक कार्यक्रम वगैरे कांही नसून लोकांच्या भावनांशी खेळण्याचे त्यांचे उद्योग चालू आहेत. यामागे काँग्रेसचा द्वेष, काँग्रेसला खाली खेचण्याचा प्रयत्न आहे." भाऊसाहेब हिरे यांनी द्विभाषिकाचा ठराव मांडला होता

तरी त्यांची भूमिका डळमळीत होती. संयुक्त महाराष्ट्रवादी गाडगीळ आणि कुंटे यांच्या बाजूला त्यांचा कल अधिक होता. यशवंतरावांपुढे पेच निर्माण झाला होता. द्विभाषिक राज्य यशस्वी करून दाखवायचे म्हणजे निवडणुकीत यश मिळवून राज्याला स्थिर सरकार द्यायचे. निवडणुकीच्या संदर्भात पार्लमेंटरी बोर्ड, तिकीट वांटप आदि अडचणी उभ्या होत्या. पूर्वी निवडलेल्या पार्लमेंटरी बोर्डात हिरे, चव्हाण, कुंटे, देवगिरीकर आणि पी. के. देशमुख होते. या बोर्डात यशवंतराव चव्हाण अल्पमतात होते. पार्लमेंटरी बोर्डाची पुनर्घटना करायला हवी असे त्यांनी हिरे यांना सांगून पाहिले. तथापि हिरे यांनी चव्हाणांची सूचना फेटाळून लावली. मग प्रदेश काँग्रेसची खास सभा बोलाविण्यासाठी ८३ सदस्यांच्या सह्या गोळा केल्या गेल्या. खास सभा बोलाविण्याबाबत दोन वेगवेगळे अर्ज सादर करण्यात आले. एकात नव्या बोर्डाची निवड व्हावी अशी मागणी होती आणि दुसऱ्यात जुन्या बोर्डात आणखी नवे सदस्य घेऊन ती संख्या घटनेप्रमाणे नऊ करावी. प्रथम घटनात्मक वाद आणि नंतर तडजोड होऊन देवकीनंदन नारायण, गणपतराव तपासे, बापूसाहेब गुप्ते आणि हरिभाऊ पाटसकर असे आणखी चार सदस्य स्वीकृत करण्यात येऊन प्रदेश काँग्रेसमधील वादळ शमविण्यात आले. समितीवाले मात्र असहिष्णु वृत्तीचे प्रदर्शन करीत राहिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि चिंतामणराव देशमुख यांच्यासारख्यांनी जे विचार प्रदर्शित केले, जो सल्ला दिला तो देखील समितीवाल्यांनी न मानता उपराष्ट्रवादाचे टोक गांठले.

लोकसभेने आपल्या ठरावाने निर्माण केलेल्या विशाल मुंबई राज्याच्या नेतेपदाची निवड करण्याकरिता जुने मुंबई राज्य, सौराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाडा येथील आमदारांची संयुक्त बैठक मुंबई येथे दिनांक १६ ऑक्टोबर रोजी झाली. नेतेपद नव्या निवडणुका होईपर्यंत सहा महिनेच राहणार होते. मोरारजीभाई देसाई या उरलेल्या सहा महिन्याकरिता नेतेपदी राहतील अशी बऱ्याच जणांची अपेक्षा होती. काही जणांची अपेक्षा होती की, यशवंतराव चव्हाण नेते बनतील. मोरारजींचे नांव यशवंतरावांकडून सुचविले जाताच त्यांनी सांगून टाकले की एकमताने निवड होणार असेल तर नेतेपद स्वीकारीन, नाही तर आपल्याला नको. भाऊसाहेब हिरे यांनी मोरारजींचे नांवाला विरोध दर्शविताच मोरारजींनी नांव मागे घेतले.

बाळासाहेब देसाई आदि आमदारांनी लगेच यशवंतरावांचे नांव सुचविले. चव्हाण आणि हिरे यांच्यात निवडणूक होऊन यशवंतराव ३३३ विरुद्ध १११ मतांनी कॉंग्रेस पक्षाच्या नेतेपदी निवडून आले. मुंबई, कच्छ, सौराष्ट्र, गुजरात येथील आमदारांनी चव्हाणांना पाठिंबा दिला. मराठवाडा-विदर्भात मात्र फाटाफूट झाली. नेतेपदी निवड झाल्यावर यशवंतरावांनी १ नोव्हेंबर, १९५६ रोजी विशाल मुंबई राज्याच्या मुख्यमंत्रिपदाची सूत्रे आपल्या हाती घेतली. त्यावेळी त्यांचे वय अवघे ४२ वर्षाचे होते. एवढ्या लहान वयात विशाल राज्याच्या मुख्यमंत्रिपदी आरूढ झालेले यशवंतराव हेच पहिले मुख्यमंत्री होत. शेतकऱ्याचा मुलगा मुख्यमंत्री झाला. मातोश्री विठाईला खूपखूप आनंद झाला. आपला यशवंता मोठा साहेब झाला असे त्या माऊलीने बोलून दाखविले.

महाराष्ट्रातील शेतकरी, कामगार, सामान्य जनता यांना यशवंतराव मुख्यमंत्री झाल्याबद्दल आनंद वाटला. म्हणूनच सत्काराचा पहिला मान मुंबईमधील गोदी कामगारांनी मिळविला. २१ ऑक्टोबरला पुण्यात कॉंग्रेस-भवनवर सत्कार झाला आणि साताऱ्यातील कामगारांच्यावतीने २८ ऑक्टोबरला मुंबईत सत्कार झाला. या सर्व सत्कारप्रसंगी यशवंतरावांनी आपली भूमिका स्पष्ट शब्दांत मांडली. यशवंतराव म्हणाले, ''द्विभाषिक राज्य हे आव्हान असून महाराष्ट्र त्यात यशस्वी होईल अशी मी खात्री देतो. आपला सर्व कारभार स्वच्छ आणि खुला राहील. आंत एक, बाहेर एक अशी लपवाछपवी राहणार नाही. लोकांची सेवा करण्याचे साधन या दृष्टिकोनातून मी सत्तेकडे पाहतो. सेवेचे कंकण बांधून मी कामाला सुरुवात केली आहे. माझ्या कचेरीचा दरवाजा सर्वांना सतत खुला राहील. मी चुकतो आहे असे कोणाला वाटले तर त्याने हक्काने मला येऊन सांगावे. चूक असेल तर मी दुरुस्त करीन. मला सर्वांचे सहकार्य हवे आहे. मी शेतकऱ्यांच्या भल्यासाठी झटेन. खेड्यातील दारिद्र्याची आणि अंधःकाराची मला कल्पना आहे. ते कमी व्हावे यादृष्टीने माझे प्रयत्न राहतील.

नव्या मुंबई राज्याच्या उद्घाटन प्रसंगी जनतेला जो संदेश दिला त्या संदेशात यशवंतराव म्हणाले, ''आज दिवाळीचा सण आहे, म्हणूनच या दिवसाला मंगल स्वरूप प्राप्त झाले आहे. आपल्या नव्या राज्यात पांच कोटी लोकसंख्या असून

१ लाख ९० हजार चौरस मैल प्रदेश आहे. क्षेत्रफळ, उत्पन्न आणि आर्थिक विकास क्षमता, औद्योगिक प्रगती याचा विचार केला तर आपल्या राज्याची इतर कोणतेही राज्य बरोबरी करीत नाही. सर्व मराठी आणि गुजराथी बांधव एकत्र आले आहेत आणि मुंबईसह या विशाल राज्याला आपण पुढे नेणार आहोत. लोकशाही समाजवादी समाजरचनेचे जे ध्येय साध्य करण्याचा भारताने निर्धार केला आहे, त्याला अनुसरूनच नव्या राज्याचा कारभार चालविला जाईल. या कामी विरोधी पक्षांचे सहकार्य मी घेऊ इच्छितो. उत्पादनवाढ, आर्थिक व सामाजिक समता, बेकारी निवारण आदि उद्दिष्टांचे पूर्ततेसाठी सर्व राजकीय पक्षांना सरकारशी सहकार्य करता येईल. लोकशाहीत हे गृहीत धरलेले आहे. सरकारवर चुकांबद्दल टीका जरूर व्हावी. तथापि त्या टीकेचे स्वरूप विधायक व तात्विक असावे, विघातक वा वैयक्तिक नसावे. वृत्तपत्रे ही मोठी शक्ती आहे. त्यांनी सरकारला सहकार्य द्यावे असे मी त्यांना आवाहन करतो. लोकहिताच्या योजनांना जनतेची साथ मिळवून देण्याचे कामी वृत्तपत्रांच्या मदतीची नितांत आवश्यकता आहे. नव्या राज्यात जात, धर्म, भाषा असा भेद न करता निःपक्षपातीपणे कारभार केला जाईल. झाले गेले विसरून निर्मळ मनाने आपण सर्वजण कामाला लागू या.'' यशवंतरावांनी जनतेशी हितगुज करताना आपली भूमिका, आप्रले धोरण आणि धारणा स्पष्ट शब्दांत व्यक्त केली. थोरांचे आशीर्वाद मागितले. बरोबरीच्यांचे सहकार्य मागितले आणि लहानांचे साहाय्य अपेक्षिले. नवे राज्य यशस्वी करून दाखविण्याबाबत विश्वास व्यक्त केला. शेवटी परमेश्वराजवळ प्रार्थना केली की लोकांची अधिकाधिक सेवा करण्यासाठी शक्ती-बुद्धी दे !

मुख्यमंत्री झाल्याबद्दल यशवंतरावांचे महाराष्ट्रात ठिकठिकाणी सत्कार करण्यात आले. कराडला अभूतपूर्व सत्कार करण्यात आला. त्या पाठोपाठ सांगलीनेही भव्य सत्कार केला. लोकल बोर्डाने मानपत्र दिले. यावेळी बोलताना यशवंतराव म्हणाले, ''भाषिक राज्याचा प्रश्न भावनेचा बनविला गेल्यामुळे भाऊ भाऊ होते ते वैरी बनले. सुदैवाने ही घटना तात्पुरती ठरली. भाऊ भाऊ पुन्हा एकत्र आले आहेत. विखुरलेला सर्व मराठी प्रदेश आता १ नोव्हेंबरपासून एकत्र आला आहे. इतिहासात पूर्वी असे कधी घडले नव्हते. विशाल राज्य ही इतिहासातील नवी

घटना आहे. या राज्यात त्या त्या विभागीय भाषांना महत्त्व दिले जाईल, त्यांचा विकास केला जाईल. ललित कला वाढतील. संत एकनाथांचे पैठण, कुलस्वामिनी भवानीचे तुळजापूर, अजिंठा-वेरुळची लेणी, सारे कांही नव्या मराठी मुलखात आहे. सोरटी सोमनाथचा काठेवाडी भाऊ आमच्यात आला आहे. मुंबई ही आमची आई असून तिने आम्हा सर्वांना एकत्र आणले आहे. आमचा वारसा टिळक-गांधींचा आहे. त्यांनी आम्हांला एकराष्ट्रीयत्वाचे महान तत्त्व शिकविलेले आहे." सांगलीनंतर १७ नोव्हेंबरला सोलापूर येथे पार्क मैदानावर जिल्हा काँग्रेसने प्रचंड असा सत्कार केला. त्याप्रसंगी यशवंतराव भाषणात म्हणाले, "भ्रातृभाव आणि समानतेच्या भूमिकेवर आधारलेली लोकशाही आम्हांला निर्माण करावयाची आहे. प्रथम आपण भारतीय आहोत आणि नंतर महाराष्ट्रीय हे कृतीने पटवून द्यायला हवे." यशवंतरावांचे दक्षिण महाराष्ट्रात जे मोठमोठाले सत्कार झाले, त्या प्रसंगी त्यांनी जे विचार व्यक्त केले त्यांतून एक गोष्ट स्पष्टपणे दिसून आली, ती ही की द्विभाषिकाचा प्रचार यशवंतराव निष्ठेने करीत आहेत. प्रभावीपणे करीत आहेत, काँग्रेसजनांना प्रचाराचे कामाला उद्युक्त करीत आहेत आणि विरोधकांना हितोपदेश सुनावीत आहेत. द्विभाषिकाबाबत वृत्तपत्रांनी यशवंतरावांना जेवढे सहकार्य द्यायला हवे होते तेवढे त्यांचेकडून मिळत नव्हते. टीकाटिपणीच अधिक व्हायची. हक्काचे वृत्तपत्र हाताशी नाही. सत्कार-सभा-समारंभातून आपण एकटे किती बोलणार आणि प्रचार करणार हे लक्षात आल्यावर यशवंतरावांच्या मनात नव्या वृत्तपत्राची कल्पना घोळू लागली. त्यांनी आपला विचार काही सहकाऱ्यांजवळ बोलून देखील दाखविला.

नवे वृत्तपत्र काढणे आणि ते चालविणे किती अवघड आहे, खर्चाचे आहे याची यशवंतरावांना कल्पना होती. 'प्रकाश,' 'लोकशक्ती' आदि दैनिकांचा अनुभव त्यांच्या गांठीशी होता. द्विभाषिक राज्य आपण कसोशीने चालवीत असताना, आपल्या धोरणांचे आणि निर्णयांचे स्वागत होत असताना आपण लोकांपर्यंत, खेड्यातील सर्वसामान्य जनतेपर्यंत जाऊन पोहोचत नाही हे त्यांना प्रकर्षाने जाणवले. प्रचाराचे, प्रसाराचे माध्यम आपल्याजवळ नाही ही खंत यशवंतरावांनी एके दिवशी श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर यांचेजवळ बोलून

दाखविली. वृत्तपत्राबद्दल त्यांनी बोलणे केले. त्यानंतर काँग्रेसचे एक निष्ठावान कार्यकर्ते, वृत्तपत्रसृष्टीतील अनुभवी पत्रकार श्री. अनंतराव पाटील यांना मुंबईला बोलावून घेऊन आपल्या कल्पनेतील वृत्तपत्राच्या शक्या-शक्यतेबद्दल त्यांचेशी चर्चा केली. अनंतराव पाटील त्यावेळी 'सकाळ'मध्ये सहसंपादक होते. त्यांच्या पाठीशी पंधरा वर्षाचा पत्रकारितेचा अनुभव होता. वृत्तपत्राच्या गरजेबद्दल अनंतरावांनी सहमती दर्शविली. तथापि काँग्रेस पक्षाचे पत्र म्हणून वृत्तपत्र चालू करणे आणि ते टिकविणे अवघड आहे याची स्पष्ट कल्पना दिली. पत्राचे स्वरूप व नियंत्रण विश्वस्त संस्थेकडे ठेवले, काँग्रेसवाल्यांचा दैनंदिन हस्तक्षेप होणार नाही याबद्दलची व्यवस्था केली गेली, संपादकीय धोरणाची सर्वसाधारण रूपरेषा विश्वस्तांनी ठरवून दिल्यावर संपादकांचे कामात व्यत्यय येणार नाही याची खबरदारी घेतली गेली तर दैनिकाचा प्रयोग आणि प्रयत्न करायला हरकत नाही असे परखड मत अनंतराव पाटलांनी व्यक्त केले. १९४६ पासून यशवंतरावांचा अनंतरावांच्यावर लोभ आणि विश्वास. 'सकाळ' मध्ये जेष्ठता प्राप्त केलेला हा पत्रकार 'सकाळ' सोडून नवी जबाबदारी घेईल का असा विकल्प क्षणभर यशवंतरावांच्या मनात आला. पण तो न दर्शविता यशवंतराव म्हणाले, "अनंतराव नव्या पत्राची जबाबदारी तुम्ही घ्यावी अशी माझी इच्छा आहे, तुमच्याखेरीज दुसरा विश्वासू काँग्रेसजन मला दिसत नाही." अनंतरावांच्या पुढे प्रश्न उभा राहिला. यशवंतरावांच्या इच्छेला मान द्यायचा की नम्र नकार दर्शवायचा. अनंतराव म्हणाले, "साहेब, तुमच्या शब्दाखातर अंधारात उडी मारायलाही मी तयार आहे. अट फक्त एकच - यशवंतराव चव्हाणांच्या धोरणांना, निर्णयांना वृत्तपत्रातून मी उचलून धरीन. काँग्रेसच्या धोरण-निर्णयांना पाठिंबा देण्यास मी बांधील राहणार नाही. मला काँग्रेसच्या नेत्यांचा, आमदार, खासदार, मंत्र्यांचा हस्तक्षेप चालणार नाही. माझे सहकारी निवडण्याचे स्वातंत्र्य द्या, मी दैनिक वृत्तपत्र यशस्वीपणे चालवून दाखवीन."

दैनिक वृत्तपत्र म्हटले की जागा, छापखाना, माणसे, पैसे आदि जुळवाजुळव आलीच. यशवंतरावांनी हे काम नाईक-निंबाळकर आणि अनंतराव पाटील यांचेवर सोपविले. मालोजीराजे यांनी बडोदे नरेश फत्तेसिंह महाराज गायकवाड यांच्याकडून एक लक्ष रुपये बिनव्याजी कर्ज म्हणून मिळविले. सुरुवातीला चित्रशाळा प्रेसमध्ये

वृत्तपत्राच्या छपाईची व्यवस्था करण्यात येऊन त्यांचेकडूनच कचेरीला जागा मिळविण्यात आली. संपादकीय, व्यवस्थापकीय खात्यातील सहकाऱ्यांची जुळवाजुळव, संपादक अनंतराव पाटील यांनी केली. तत्पूर्वी 'सकाळ' मधील सहसंपादकपदाचा राजीनामा त्यांनी दिला. प्रथम दैनिकाच्या नांवाचे दृष्टीने, रजिस्ट्रेशनच्या दृष्टीने कामाला जुंपून घेतले. दैनिकाचा पहिला अंक दिनांक ३० मे रोजी प्रकाशित व्हावा अशी सूचना त्यांना देण्यात आली होती. ''सह्याद्रि'' हे नांव यशवंतरावांनी पसंत केले होते. त्याप्रमाणे अर्जही करण्यात आला. तथापि केसरी-मराठा संस्थेचे 'सह्याद्रि' नांवाचे मासिक अधूनमधून निघत होते म्हणून त्यांनी हरकत घेतली. यातून मार्ग काढण्याकरिता सह्याद्रिच्या मागे विशाल हा शब्द टाकून ''विशाल सह्याद्रि'' नांवाला परवानगी मिळविण्यात आली. पहिल्या संपादकीय मजकुरात पत्राच्या ध्येय-धोरण-कार्यक्रमाबद्दलची भूमिका स्पष्ट करण्यात आली होती. मतपत्राऐवजी वृत्तपत्र यावर अधिकाधिक भर दिला जाईल अशी ग्वाही देण्यात आली होती. थोड्याच दिवसांत ''विशाल सह्याद्रि ट्रस्ट'' नांवाची विश्वस्त संस्था स्थापन करण्यात येऊन या संस्थेकडे पत्राची मालकी-व्यवस्थापन देण्यात आले. विश्वस्त पत्र तयार करून ते नोंदविण्याचे कामी माजी लीगल रिमेम्ब्ररन्स श्री. धुरंधर यांनी खूप मदत केली. पहिल्या विश्वस्तांमध्ये फत्तेसिंह गायकवाड, मालोजीराजे नाईक-निंबाळकर, के. के. शहा आणि रा. ब. उर्फ बाबासाहेब घोरपडे या चौघांचा समावेश करण्यात येऊन गायकवाड महाराजांना चेअरमन आणि घोरपडे यांना सेक्रेटरी करण्यात आले. वर्षभराने चित्रशाळा प्रेसमधून दैनिक हलवून भावे स्कूलनजीकच्या पेंडसे यांचे जागेत नेण्यात आले. तेथे स्वतःच्या मालकीची शेड उभारून छपाईची यंत्रसामुग्री बसविण्यात आली. १९६१ मधील पानशेत धरणफुटीने पुराचे पाणी प्रेसमध्ये-कचेरीत शिरून अतोनात नुकसान झाले. यशवंतरावजींच्या समवेत पंतप्रधान नेहरूंनी प्रेसला भेट दिली, नुकसानीची पाहणी केली. विश्वस्तांना आणि संपादकांना धीराचे दोन शब्द सांगून 'आगे बढो' हा संदेश दिला.

यशवंतरावांनी दैनिकाला वेळोवेळी उत्तेजन देऊन फार मोठा आधार दिला. संपादकांना त्यांच्या कामात पूर्ण स्वातंत्र्य दिले. स्वतःवर टीकेची परवानगी देऊन

त्या टीकेबद्दल कधीही तक्रार केली नाही. प्रसिद्धी वा प्रचाराबाबत कोणी त्यांचेकडे तक्रार केली तर "वृत्तपत्र स्वातंत्र्यात" आपण ढवळाढवळ करणार नाही असे स्पष्टपणे तक्रार करणाऱ्यांना ते सांगत. द्विभाषिकानंतर संयुक्त महाराष्ट्राचे राज्य आले. नंतर लगेचच यशवंतराव दिल्लीला संरक्षणमंत्री म्हणून गेले. दिल्लीत त्यांचे बरेच वर्षे वास्तव्य राहिले. तथापि 'विशाल सह्याद्रि'कडे त्यांनी दुर्लक्ष केले नाही. टिळक रोडवरील 'सह्याद्री सदन' ही ट्रस्टची भव्य वास्तू त्यांच्याच आशीर्वादाने आणि प्रेरणेने उभी राहिली. ट्रस्टी आणि ट्रस्टी सेक्रेटरी बदलत गेले म्हणून नाउमेद न होता यशवंतराव संपादकांच्या पाठीशी सातत्याने, खंबीरपणे उभे राहिले, अडीअडचणीला धांवून गेले. वृत्तपत्राच्या वाढदिवशी पानसुपारी समारंभाला आवर्जून हजर राहून ते आल्यागेल्यांचे स्वागत करायचे आणि कर्मचारी वर्गाला उत्तेजन व शाबासकी द्यायचे. वृत्तपत्रांनी व पत्रकारांनी द्विभाषिकाला पाठिंबा देण्यात हात आंखडता घेतला होता तरी यशवंतरावांनी सगळ्यांशी स्नेहाचे संबंध कायम राखले होते. ह. रा. महाजनी, द्वा. भ. कर्णिक हे तर त्यांचे स्नेहीच होते. तरुण भारतचे ग. त्र्यं. माडखोलकर हे अधूनमधून चिमटे घ्यायचे, तरीही यशवंतराव त्यांची टीका हंसत-खेळत झेलायचे. 'सकाळ'कार डॉ. नानासाहेब परुळेकर हे यशवंतरावांच्या प्रशासन कौशल्याची, वक्तृत्वाची आणि कर्तृत्वाची वाखाणणी करायचे. वृत्तपत्राच्या संपादक मंडळींव्यतिरिक्त सहसंपादक, वार्ताहर, स्तंभलेखक यांचेशीही स्नेह-सलोखा राखण्याबाबत यशवंतरावांनी कधी हात राखला नाही. पुण्याला आले की प्रसन्नकुमार अभ्यंकर, मा. वि. साने, दिनू महात्मे, वागळे, करेकट्टी यांना बोलावून घेऊन त्यांचेशी मोकळेपणाने गप्पागोष्टी करायचे. अभ्यंकरांकडून त्यांची कॅपस्टन सिगरेट मागून घेऊन ओढायचे. विदर्भाच्या पहिल्या दौऱ्यात तिकडील पत्रकार यशवंतरावांच्या साधेपणाबद्दल, मोकळेपणाबद्दल खूपच भारावून गेले होते. पत्रकारांशी अनौपचारिक गप्पा मारताना यशवंतराव खूपच रंगून जायचे. जणू कांही सर्वांशीच त्यांची खूप जुनी ओळख. पश्चिम महाराष्ट्राबद्दलची अढी आणि गैरसमज पहिल्याच दौऱ्यात यशवंतरावांनी दूर केले. त्याबाबत एक पत्रकार त्यांना म्हणाले, "यशवंतराव आले, त्यांनी पाहिले आणि आम्हांला जिंकले.

वृत्तपत्रांना मुलाखती देणे, सवड काढून खास अंकासाठी लिहिणे याचा यशवंतरावांनी कधी कंटाळा केला नाही. सोपी-सुलभ भाषा आणि छोटी छोटी

वाक्ये. साहित्यिक म्हणून बिरुदावली न मिरविता लेखणी हातात धरली की यशवंतराव साहित्यिकासारखे लिहीत. भाषणाचे बाबतीतही असेच घडत असे. भाषण ऐकताना श्रोते तल्लीन होऊन जायचे. कायकर्त्यांच्या शिबिरात सगळ्यांची भाषणे ते लक्षपूर्वक ऐकत, मुद्दे लक्षात ठेवत. शेवटी आपल्या छोट्या भाषणात महत्त्वाच्या मुद्यांचा परामर्श घेत. कार्यकर्त्यांची शिबिरे घेणे हा त्यांचा एक आवडता कार्यक्रम होता. कार्यकर्त्यांना बौद्धिक खाद्य दिल्याशिवाय ते तयार कसे होणार असा त्यांचा सवाल असे. राहुरी, महाबळेश्वर, खुलताबाद. आळंदी आदि शिबिरे त्या त्या वेळी गाजली. कार्यकर्त्यांना खूपच विचारधन मिळाले. कार्यकर्त्यांना प्रशिक्षित करण्याबाबत यशवंतरावांचा कटाक्ष असे.

यशवंतरावांनी पश्चिम महाराष्ट्राच्या दौऱ्यानंतर गुजरातचा दौरा केला आणि नंतर विदर्भाचा. या दौऱ्यात त्यांनी नव्या राज्याची भूमिका आणि हेतू विशद करून सांगितला. विदर्भातील दौरा खूपच गाजला. मुख्यमंत्री होण्यापूर्वी यशवंतराव विदर्भवासियांना माहीत नव्हते. एक तरुण, तडफदार नेता एवढेच लोकांना माहीत होते. आपल्या वक्तृत्वाने आणि विचारांनी यशवंतरावांनी पहिल्याच भेटीत विदर्भावर चांगलीच छाप पाडली. या दौऱ्यात अनंतराव पाटील पत्रकार म्हणून सामील झाले होते. वर्धा येथील सभेत भाषण करताना यशवंतराव म्हणाले. “भारताच्या स्वातंत्र्याची जी वास्तू आपण दीर्घ प्रयत्नाने, झगड्याने, त्यागाने उभी केली आहे त्यामागे बंधुत्वाची भावना महत्त्वाची आहे. या देशात आपण सगळे भाऊभाऊ आहोत. राज्य कोणत्या तत्त्वाने चालवायचे, कम्युनिस्टांच्या की हिंदुसभेच्या की काँग्रेसच्या याबाबत मतभेद होऊ शकतील. तथापि भावाभावाप्रमाणे वागावे यात दुमत होण्याचे कारण नाही. या देशातील एकजण दुसऱ्याचा भाऊ आहे ही जाणीव ज्या दिवशी नाहीशी होईल त्या दिवशी देशाचे स्वातंत्र्य, देशाचा गौरव, देशाचे तेज सारे काही नाहीसे होईल.” ‘यशवंतरावजी भाषणात पुढे म्हणाले,“माझ्या या भूमिकेबद्दल टीका करणारे आहेत याची जाणीव आहे. कानडी बोलणारांचे कर्नाटक राज्य, तामिळ बोलणारांचे तामिळनाडू राज्य, मग मराठी व गुजराथी बोलणाऱ्यांचे एकत्र राज्य कशासाठी असा प्रश्न विचारला जातो आहे. लोकमान्य टिळक आणि गांधीजी ज्या महाराष्ट्रात व गुजरातेत जन्माला आले त्यांनी एकत्र येऊन राज्य चालविले तर बिघडले कुठे ? आपल्याला भूगोल

मोठा करावयाचा नसून इतिहास मोठा करावयाचा आहे. त्यासाठी माणसात कर्तृत्व निर्माण करावयाचे आहे. आपली दृष्टी विशाल हवी. त्यासाठी विश्वासाची, सदिच्छेची आणि सहकार्याची गरज आहे. आपले राज्य आकाराने मोठे आहे. ते कर्तृत्वाने मोठे करावयाचे आहे. या राज्यातील लोक मनाने एक झालेले आहेत, विचारांनी एक झालेले आहेत, भावनेने एक झाले आहेत अशी परिस्थिती आपल्याला निर्माण करावयाची आहे.''

''नव्या निवडणुका जवळ आलेल्या आहेत, अनेक पक्षांची मिळून एक मोट बांधण्यात आली आहे. असे सांगून यशवंतराव म्हणाले, निवडणुकीत विरोधी पक्ष जरूर असावेत. पण त्यांनी निवडणूक कार्यक्रमावर लढवायला हवी. कम्युनिस्ट आणि हिंदुसभा यांच्यात काय बरे साम्य आहे ? काँग्रेसजवळ कार्यक्रम आहे. एकत्र आलेल्या विरोधकांजवळ कोणता कार्यक्रम आहे ? कुणाला महाराष्ट्र हवा, कुणाला गुजरात हवा हाच कार्यक्रम ना? या देशात कुणातरी राजांची राज्ये होती, घराण्याची राज्ये होती, जमातीची राज्ये होती. १४ ऑगस्ट, १९४७ च्या रात्री या देशात प्रथम लोकांचे राज्य जन्माला आले. हे राज्य चिरंतर राहावे, अखंड राहावे अशीच माझी परमेश्वराजवळ प्रार्थना असते. जोपर्यंत चंद्रसूर्य उगवत आहेत तोपर्यंत हे जनतेचे राज्य राहावे अशीच मी देवाजवळ करुणा भाकत असतो. महागुजरात परिषदेने आंदोलनाचा पवित्रा घेऊन गुजरातचे वातावरण अशांत करण्याची मोहीम हाती घेतली होती. यशवंतरावांच्या अहमदाबाद भेटीच्या वेळी जनता कर्फ्यू पुकारण्यात आला होता. महागुजरातचे प्रश्नावर अशांतता कायम ठेवण्याचा परिषदेचा हा पूर्वनियोजित कट होता. अहमदाबाद शहर काँग्रेसच्या सभेत बोलताना यशवंतराव म्हणाले, ''विशाल द्विभाषिक राज्य स्थापन झाल्यामुळे महाराष्ट्र व गुजरात यांच्या मागण्या बव्हंशी मान्य झाल्या आहेत. महागुजरात मिळवावयाचा असेल तर लोकसभेतर्फेच मिळू शकेल. गुंडगिरीने, चळवळीने नव्हे.'' अहमदाबादला यशवंतरावांच्या मोटारीवर दगडफेक करण्यात आली. त्यांच्या मोटारीवरील राष्ट्रध्वज काढून घेण्यात येऊन तो पायाखाली तुडविण्यात आला. वृत्तपत्रांनी या घटनेचा जोरदार निषेध केला. भाषिक राज्याचे पुरस्कर्ते म्हणवून घेणारे गोंधळ घालत होते. तरी यशवंतराव अडचणींना तोंड देऊन विशाल मुंबई राज्याचा जोरदार प्रचार करीत फिरत होते.

विदर्भात नागपूर व अकोला येथील त्यांच्या सभा गाजल्या. नंतर पुण्यात नागरिकांच्या वतीने फुले मार्केटमध्ये महापौर बाबुराव सणस यांच्या अध्यक्षतेखाली त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला. यावेळी नागरिक फार मोठ्या संख्येने हजर होते. संयुक्त महाराष्ट्र समितीच्या लोकांनी आरडाओरडीचा, सभा उधळण्याचा प्रयत्न करून पाहिला. तथापि सभेतील कांही लोकांनी उसाची दांडकी करून निदर्शकांना पिटाळून लावले. ओरड करणाऱ्यांना उद्देशून यशवंतराव आपल्या भाषणात म्हणाले, "आरडाओरड, गोंधळ अशा प्रकारांना घाबरून जाण्याइतका मी लेचापेचा नाही. विचारांची मक्तेदारी फक्त पुणेकरांकडे आहे असा अहंकार बाळगू नका. माझे विचार ऐकण्यास घाबरायचे कारण काय? माझा लोकशाहीवर विश्वास आहे आणि लोकशाही मार्गानेच मी माझे विचार जनतेला पटवून देत आहे. निवडणुकीत अनेक पक्ष एकत्र येऊन निवडणूक लढविण्याचा प्रयत्न करतील. त्यामागे जनतेच्या सेवेची व हिताची कळकळ मुळीच नाही. जवळ नाही नेतृत्व आणि निष्ठा. तसेच एक विचाराची एकसंध संघटना नाही. या खिचडीपक्षाने का जनतेचे पोट भरणार आहे ? काँग्रेसजवळ कार्यक्रम आहे, नेतृत्व आहे, जनहिताची कळकळ आहे. म्हणूनच लोक काँग्रेसला निवडून देणार आहेत."

उमेदवारांचे निवडीबाबत समितीमधील विविध पक्षांच्या नेत्यांत बराच मतभेद झाला. फेब्रुवारी संपत आला तरी आपापसात खटके उडतच होते. मराठवाडा आणि विदर्भात समितीचा प्रभाव यथातथाच होता. गुजरातमध्येही महागुजरात समितीचा प्रभाव तीन-चार जिल्ह्यांतच होता. सौराष्ट्र, कच्छ भाग द्विभाषिकाबाबत समाधानी होता. पश्चिम महाराष्ट्रात मात्र समितीचा जोर होता. पंडित नेहरू, पंडित पंत, जगजीवनराम यांच्यासारखे थोर नेते काँग्रेसच्या प्रचारासाठी येऊन गेले. दुय्यम पातळीवरील नेत्यांनीही प्रचाराची पराकाष्ठा केली. यशवंतराव 'कराड' या मतदारसंघातून निवडणुकीला उभे होते. त्यांचे निवडणुकीबद्दल महाराष्ट्रात आणि दिल्लीत कुतूहल दिसून येत होते. समितीने या मतदारसंघात प्रचाराची पराकाष्ठा करून रणधुमाळी माजविली होती. केशवराव पवार वकील हे समितीचे उमेदवार होते. १९५७ च्या मार्चच्या पहिल्या आठवड्यात मतदान झाले. मतमोजणीचे वेळी काँग्रेसचे स्थानिक कार्यकर्ते दुपारपर्यंत काळजीत होते. केशवराव पवारांचे मताधिक्य वाढत होते. अखेर कराड शहराची मतमोजणी

सुरू झाली. तेथे यशवंतराव लीड घेतील अशी सर्वांचीच अपेक्षा होती. या अपेक्षेप्रमाणे केशवराव पवारांचा लीड तोडून यशवंतराव ६०० मतांच्या फरकाने निवडून आल्याचे जाहीर करण्यात आले. दैवाने खैर केली. सरदारगृहाचे उपाध्ये यांनी दीड महिन्यापूर्वी एक पाकिट बंद करून सौ. वेणूताईंच्या हवाली केले होते. त्यात त्यांनी निवडणुकीचे भविष्य वर्तविले होते आणि यशवंतरावांना मतदान कसे होईल याचा अंदाज वर्तविला होता. यशवंतराव ६०० ते ७०० मतांनी निवडून येतील असे पाध्ये यांनी आपल्या पाकिटातील मजकुरात म्हटले होते. त्यांचे भविष्य तंतोतंत खरे ठरले.

या निवडणुकीने पश्चिम महाराष्ट्रात काँग्रेसला चांगलाच धक्का दिला. काँग्रेसची भली भली मंडळी समितीच्या साध्या उमेदवाराकडून पराभूत झाली. पुण्यात एस. एम. जोशींनी बाबूराव सणसांचा पराभव केला तर जयंतराव टिळकांनी सौ. नलिनीबाई शिंदे यांना पराभूत केले. पोपटलाल शहांना शिवरकरांनी हरविले आणि लोकसभेच्या मतदानात ना. ग. गोरे यांनी काकासाहेब गाडगीळांचेवर मात केली. महाराष्ट्रात इतरत्र हरिभाऊ पाटसकर, जनरल जगन्नाथराव भोसले आदि मातब्बर मंडळींचा समितीच्या साध्या उमेदवारांनी पराभव केला. समितीची हवाच पसरली होती. मालोजीराजे नाईक-निंबाळकर, पी. के. सावंत, नानासाहेब कुंटे, गणपतराव तपासे आदि मंडळींनाही पराभव पत्करावा लागला. पश्चिम महाराष्ट्रात काँग्रेसला अवघ्या ३३ जागा मिळाल्या तर समितीने १०२ जागा जिंकल्या. मुंबईत काँग्रेसला १३ आणि समितीला ११ जागा मिळाल्या. मुंबईसह पश्चिम महाराष्ट्रात काँग्रेसचे ४६ आणि समितीचे ११३ आमदार निवडून आले. विदर्भ आणि मराठवाड्यात मात्र समितीला नाममात्र जागा मिळल्या. विदर्भात एकूण ६३ जागांपैकी विरोधकांना फक्त ८ जागा मिळाल्या. मराठवाड्यात ४२ पैकी फक्त सात जागांवर समितीला समाधान मानावे लागले. गुजरातने काँग्रेसला चांगला हात दिला. गुजरात, कच्छ, सौराष्ट्र मिळून १३२ जागांपैकी १०० जागा काँग्रेसने जिंकल्या. त्यामुळे काँग्रेसला असेंब्लीत बहुमत मिळू शकले. यशवंतरावांची नेतेपदी निवड झाली आणि ते मुख्यमंत्रिपदावर पुन्हा आरूढ झाले.

पश्चिम महाराष्ट्रातील पराभवाने काँग्रेसच्या नेत्यांना अंतर्मुख बनविले. प्रदेश काँग्रेस समितीच्या कार्यकारिणीची बैठक बोलाविण्यात येऊन पराभवाची चिकित्सा करण्यात आली. द्विभाषिकास लोक मनातून अनुकूल नाहीत असा निष्कर्ष काढण्याऐवजी विरोधकांच्या प्रक्षोभक, भडक प्रचारावर टीका करण्यात आली. मोरारजींनी केलेल्या गोळीबारात १०५ लोक ठार झाले होते. आचार्य अत्रे यांच्या "मराठा" पत्रात त्यांचे फोटो छापण्यात आले होते. काँग्रेसला चेष्टेचा विषय बनविण्यात अत्रे यांनी पुढाकार घेतला होता. तथापि त्यामुळे संयुक्त महाराष्ट्र समितीची प्रतिष्ठा वाढली अशातला भाग नव्हता. यशवंतरावांनी निवडणुकीतील यशाबद्दल मतदारांचे आभार मानणारे पत्रक काढून विजयाचे श्रेय काँग्रेस संघटनेला आणि कार्यक्रमाला दिले. स्थानिक प्रश्नांपेक्षा देशाच्या कल्याणाला लोकांनी प्राधान्य दिले याबद्दल त्यांना धन्यवाद दिले. काँग्रेस संघटनेच्या पुनर्बांधणीचे दृष्टीने पावले टाकण्याची गरज आहे हे निवडणूक निकालातून दिसून आल्याबरोबर मराठवाडा आणि महाराष्ट्र काँग्रेस कमिट्यांचे अध्यक्ष बदलण्यात आले. बाबासाहेब सावनेस्कर आणि राजे नाईक-निंबाळकर यांचेकडे अध्यक्षपद सोपविण्यात आले. द्विभाषिक यशस्वी करण्याचे दृष्टीने प्रत्येक विभागाच्या विकासासाठी मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद, अहमदाबाद, राजकोट अशी सहा विभागीय विकास मंडळे स्थापन केली. पश्चिम महाराष्ट्रातील काँग्रेसवर लक्ष केंद्रित करून विरोधकांवर मात करण्याचे डावपेच यशवंतराव लढवू लागले.

डावपेचातील पहिली चाल होती ती पंडित नेहरूंची प्रतापगड भेट. शिवस्मारक समितीने प्रतापगडावर शिवरायांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यासाठी पंडित नेहरूंना आणण्याचा निर्णय घेतला आणि पंडितजींना रीतसर निमंत्रण दिले. नेहरूंनी यायचे मान्य केले. पुतळा अनावरण समारंभाचा निवडणुकीशी कांहीही संबंध नव्हता. तथापि समितीला नेहरू भेटीत राजकारणाचा वास येऊ लागला. नेहरूंच्या भेटीनिमित्त ग्रामीण भागातील शक्ती काँग्रेसच्या मागे उभी करण्याचा हा डाव आहे असा आरोप करून समितीच्या नेत्यांनी उग्र निदर्शने करण्याचा निर्णय जाहीर केला. शिवस्मारकाचे उद्‌घाटन आम्ही होऊ देणार नाही, नेहरूंना आमच्या प्रेतावरून जावे लागेल अशी टोकाची भाषा वापरली जाऊ लागली. समितीच्या या आडमुठेपणामुळे

महाराष्ट्रात थोडी खळबळ माजली. प्रतापगडावर शिवस्मारक असण्याची गरज मुंबईचे राज्यपाल हरेकृष्ण मेहताब यांनी आपल्या प्रतापगड भेटीत बोलून दाखविली होती. या सूचनेनुसार सातारच्या राणीसाहेब सुमित्राराजे यांच्या अध्यक्षतेखाली शिवस्मारक समिती स्थापन करण्यात येऊन पुतळा उभारण्याचे काम सुरू करण्यात आले होते. नेहरूंच्या हस्ते अनावरण करण्याचे समितीनेच ठरविले होते. यात द्विभाषिकाचा किंवा काँग्रेसच्या राजकारणाचा कांहीही संबंध नव्हता. संयुक्त महाराष्ट्र समितीची वरील आक्रस्ताळी भूमिका यशवंतरावांच्या कानावर येताच त्यांनी पंतप्रधानांसारखी थोर व्यक्ती शिवरायांच्या स्मृतीला वंदन करण्यासाठी येत असताना त्यांचेविरुद्ध निदर्शने करून कृपया महाराष्ट्राचे मांगल्य बिघडवू नये, असे आवाहन केले. समितीच्या नेत्यांनी या आवाहनाचा आदर न करता नेहरूंची प्रतापगडची वाट अडवून धरण्याचा कार्यक्रम आंखून त्याचा प्रचार जाहीर सभांतून सुरू केला. महाराष्ट्रात यादवी युद्ध सुरू होते आहे की काय, जातीय झगड्यांना प्रारंभ होतो आहे की काय अशी परिस्थिती निर्माण झाली. ब्राम्हण-मराठे असा वेगवेगळा उल्लेख होऊ लागला. जातीयवाद फैलावण्याची शक्यता दिसताच यशवंतरावांनी त्याला आळा घालण्यासाठी एकेक पाऊल उचलण्यास सुरुवात केली.

रँग्लर र. पु. परांजपे, प्राचार्य सोनोपंत दांडेकर, बाबूराव जगताप, वि. द. घाटे आदि पुण्यातील विचारवंतांनी आणि काही थोर व्यक्तींनी पत्रक काढून समितीला निदर्शने न करण्याबाबत आवाहन केले. पुण्याचे मेयर बाबूरावजी सणस, कर्मवीर भाऊराव पाटील यांनीही निदर्शनाबाबत नापसंती व्यक्त करणारे कडक पत्रक काढले. रावसाहेब पटवर्धन यांनीही पत्रक काढून यादवी टाळण्याचे आवाहन केले. एस. एम. जोशी यांच्या वक्तव्याने रावसाहेब अस्वस्थ झाले होते. नेहरूंना शिवछत्रपती स्मारकाचे उद्घाटन करण्याचा काय हक्क आहे असा सवाल एस. एम. जोशींनी एका सभेत केला होता. रावसाहेबांनी समितीवाल्यांना समजावून दिले की हा कार्यक्रम सरकारचा नसून शिवस्मारक समितीचा आहे आणि या समितीमागे महाराष्ट्रातील जनतेच्या भावना आहेत. 'रक्ताचे पूर वाहतील', 'तीन कोटी वाघनखे बाहेर येतील' या भाषेबद्दल रावसाहेबांनी तीव्र नापसंती व्यक्त केली होती.

सांगली-सातारा-कोल्हापूरच्या कित्येक सूज्ञ नेत्यांनी समितीवाल्यांना प्रथम समजावून सांगण्याच्या भाषेत आणि नंतर इशाऱ्याचे भाषेत सांगितले की, नियोजित निदर्शने मोडून-तोडून काढू, हस्तक्षेपाचा, घोषणांचा खेळ चालू दिला जाणार नाही. समारंभाची तारीख जसजशी जवळ येऊ लागली तसतशी परिस्थिती गंभीर बनू लागली. 'निदर्शने होणारच' आणि 'निदर्शने मोडून काढणारच' असे दोन्ही आवाज जोरजोरात घुमू लागले.

या वातावरणात मुख्यमंत्री या नात्याने समारंभ शांतपणे, व्यवस्थितपणे पार पाडण्याची जबाबदारी यशवंतरावांवर येऊन पडली होती. प्रतापगडावर समारंभाची जय्यत तयारी त्यांनी सुरू केली. छत्रपतींचा ३८ फूट उंचीचा पुतळा प्रतापगडावर पोहोचविलेला होता. छत्रपतींच्या आणि महाराष्ट्राच्या इतमामाने समारंभ थाटात साजरा झाला पाहिजे या दृष्टीने तयारी चालू होती. समितीनेही निदर्शनाचे दृष्टीने प्रचाराचे काम जोरात सुरू केले होते. शिवराळ भाषेचा वापर होऊ लागला होता. समितीच्या निदर्शनाच्या दुराग्रहावर वृत्तपत्रांनी जेव्हां जोरदार टीका सुरू केली, रावसाहेब पटवर्धन-पागे यांच्यासारखे नेते जेव्हा जाहीर नापसंती व्यक्त करू लागले तेव्हां समितीच्या नेत्यांनी आपल्या हटवादी भूमिकेत बदल करण्यास सुरुवात केली. "पंडित नेहरूंच्या आगमनप्रसंगी प्रतापगडावर मोर्चा नेऊन द्विभाषिक राज्याबद्दलची नापसंती शांततेच्या मार्गाने व्यक्त करावी" असा ठराव समितीच्या कार्यकारिणीने केला व पुढची योजना आंखली. मालोजीराजे नाईक-निंबाळकर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष होते. त्यांनी प्रतापगडावरील समारंभ यशस्वी व्हावा म्हणून खूप कष्ट घेतले. सातारा जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी त्यांना सर्वतोपरी सहकार्य दिले. काँग्रेस कार्यकर्त्यांचे जथेच्या जथे प्रतापगडाकडे रवाना झाले. जनतेतही अपूर्व उत्साह निर्माण होऊन लोकांनी मोठ्या संख्येने प्रतापगडाकडे कूच केले. जनता शिवस्मारक समारंभात सामील आणि समितीचे नेते व कार्यकर्ते निदर्शनात सामील असे परस्पर विरोधी दृष्य प्रतापगडाच्या वाटेवर पाहायला मिळाले. नेहरूंच्या कार्यक्रमाला लक्षावधी लोक हजर राहिले. पुणे ते प्रतापगड या मार्गावर पंडितजींचे जागोजागी प्रचंड स्वागत करण्यात आले. परिस्थितीला मिळालेली ही कलाटणी पाहून समितीवाल्यांनी आपली खेळी बदलून वाई आणि

पोलादपूर या दोन ठिकाणी निदर्शने करण्याचा निर्णय घेतला. पांच-सहा हजार निदर्शक छावण्या ठोकून पंडितजींच्या आगमनाची वाट पाहू लागले. नोव्हेंबर ३० ला निदर्शकांनी निदर्शने केली आणि प्रतापगडाकडे तोंड वळविले. तथापि तेथे आपला फज्जा उडेल हे पाहून वाईजवळच सरकारने आपल्याला अटकाव करावा अशी इच्छा यशवंतरावांचे कानावर घातली. निदर्शकांच्या नेत्यांची अडचण ओळखून यशवंतरावांनी निदर्शकांना वाईजवळ थांबविण्याची आणि कार्यक्रम संपल्यावर निघून जाण्याची व्यवस्था केली. समारंभ यशस्वी करायचा आणि निदर्शकांचा आब राखावयाचा ही दोन्ही कामे यशवंतरावांनी कौशल्याने पार पाडली.

पंडित नेहरूंनी अपूर्व उत्साहाच्या आणि आनंदाच्या वातावरणात शिवछत्रपतींच्या अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण केले. नंतर जमलेल्या जनसागरापुढे अर्धा तास सुरेख भाषण केले. शिवाजीमहाराजांची थोरवी त्यांनी गायली, त्यांचे यथायोग्य वर्णन केले. शिवाजीमहाराज हे कांही एकट्या महाराष्ट्राचे नसून साऱ्या देशाचे महान सुपुत्र आहेत, या शब्दांत महाराजांना भावपूर्ण मुजरा केला. पंडितजींच्या भाषणाचा सारांश यशवंतरावांनी आपल्या भाषणात सांगून पंडितजींचे आभार मानले. चव्हाण म्हणाले, "एका युगपुरुषाचे हातून दुसऱ्या युगपुरुषाच्या पुतळ्याचे अनावरण हा प्रसंग महाराष्ट्राच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिण्यासारखा आहे." पुण्याला परतल्यावर नेहरूंचे इंजिनिअरिंग कॉलेजच्या मैदानावर जाहीर भाषण झाले. त्यात त्यांनी द्विभाषिकाचा निर्णय का घ्यावा लागला याचे सविस्तर वर्णन करून संयुक्त महाराष्ट्र झाला तर आपला विरोध राहणार नाही असेही सांगून टाकले.

निदर्शकांना अडविण्यात आले, प्रतापगडाकडे जाण्यास प्रतिबंध केला म्हणून समितीच्या आमदारांनी असेंब्लीत तहकुबीची सूचना आणली. या सूचनेवरील चर्चेला उत्तर देताना यशवंतराव म्हणाले, "विरोधी पक्षांच्या लोकांना अडविण्यामागे त्यांची निदर्शने बंद पाडावीत असा हेतू नव्हता तर संभाव्य संघर्ष टाळावा, शांतता-सुव्यवस्था राखावी हा हेतू होता. दोन्ही बाजूला रागावलेली माणसे होती. त्यांनी एकमेकांशी भिडू नये यासाठी उपाय योजणे गरजेचे होते. म्हणूनच जेथे रस्ता अरुंद

नव्हता, घाट नव्हता, मोकळे मैदान होते, वाई गांव जवळ होते, कृष्णा नदी जवळून वाहत होती अशा सोयीच्या ठिकाणी निदर्शकांना थोपवून धरण्यात आले होते. त्यांना रात्र काढायची होती आणि वरील सोयीच्या ठिकाणी थांबविण्यात यावे अशी त्यांचीच इच्छा होती." समितीचे प्रतापगड समारंभाबाबतचे धोरण चुकले होते. त्यांनी दोन चुका केल्या होत्या. समारंभाविरुद्ध मोहीम ही पहिली चूक आणि असेंब्लीत तहकुबीद्वारे चर्चा घडवून आणली, ही दुसरी चूक. द्विभाषिकाला बळकटी आणण्यासाठी हा समारंभ घडवून आणलेला नव्हता. स्मारकाची कल्पना १९५४ मध्ये मांडण्यात आली होती. त्या वेळी द्विभाषिकाची कल्पना अस्तित्वात नव्हती. यशवंतराव उत्तराच्या भाषणात पुढे म्हणाले, "सुमारे ३०० वर्षे ज्यांची पूजा लोक बांधत आलेले आहेत त्या शिवाजी महाराजांसारख्या राष्ट्रपुरुषाला मानाचा मुजरा करायला देशाचे पंतप्रधान येतात, त्या वेळी निदर्शने कशासाठी ? टिळकांच्या जन्म शताब्दीला नेहरू आले तेव्हां कुठे निदर्शने झाली होती, मग आताच का? अशी शंका कुणाच्या मनात आली तर त्यात त्याची चूक काय? समितीच्या प्रचारात छावण्या, युद्ध हे शब्दप्रयोग कशासाठी? समितीला अहंकार नडला. महाराष्ट्राचा आत्मा राष्ट्रनिष्ठेच्याबाहेर गेला नाही हेच प्रतापगड समारंभाने दाखवून दिले. महाराष्ट्रातील जनता विचारी आहे, जागृत आहे हेही प्रतापगड समारंभाने दाखवून दिले. त्याबद्दल आम जनतेला आणि काँग्रेसच्या असंख्य कार्यकर्त्यांना माझे धन्यवाद !"

यशवंतरावांनी १९५७ च्या निवडणुकीनंतर राज्यकारभार हाती घेतल्यावर राज्याचे नवीन धोरण जाहीर केले. निःपक्षपाती व कार्यक्षम कारभाराची राज्याची थोर परंपरा आपण टिकवून धरू असे सांगून चव्हाण म्हणाले, "गोळीबारात बळी पडलेल्यांच्या कुटुंबियांना आर्थिक साहाय्य दिले जाईल. गोळीबाराचे प्रकार यापुढे टाळले जातील. गोळीबार झालाच तर त्याची मॅजिस्ट्रेटकडून चौकशी केली जाईल. मानवी जीविताची हानी टाळण्याचा अटोकाट प्रयत्न केला जाईल. लोकशाहीत मानवी जीविताला मोल आहे, मानवी प्रक्रियेला मोल आहे. त्याचबरोबर हेही लक्षात ठेवायला हवे, की पोलिसांनी गोळीबार करावा अशी परिस्थिती आपणाकडून उद्भवणार नाही याची दक्षता लोकांनी घ्यायला हवी. नेत्यांच्यावर याबद्दल अधिक

जबाबदारी येऊन पडते. अनुयायी गोळ्यांना बळी पडतात आणि पुढारी बाजूला राहतात असे दृष्य पाहायला मिळते. यातून काही धडा घेता येईल का?''

समितीच्या नेत्यांनी यशवंतरावांचा वेळोवेळी उपमर्द केलेला होता, तरी त्याबद्दल मनात राग न ठेवता यशवंतरावांनी समितीच्या सदस्यांना प्रेमाची वागणूक दिली. समिती हा पक्ष नव्हता, समितीजवळ कार्यक्रम नव्हता तरी यशवंतरावांनी समितीला विरोधी पक्षाचे स्थान दिले. गृहात विरोधी पक्ष म्हणून मान्यता दिली. 'प्रभात'चे संपादक वालचंद कोठारींवर हक्कभंगाबद्दल शिक्षेची शिफारस झाली असताना यशवंतरावांनी शिक्षेचे प्रमाण सौम्य करून माफी मागण्यावर ते प्रकरण मिटविले. विरोधकांना त्यांनी प्रेमाने जिंकले आणि विरोधकांनीही यशवंतरावांचे अभिनंदन केले. कल्याणकारी राज्याची कल्पना डोळ्यासमोर ठेऊन यशवंतराव धोरणे आंखीत होते आणि भूमिका पार पाडीत होते. लोकशाही समाजवादाचे ध्येय प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न कसोशीने करीत होते. कराड मतदार संघातील यशवंतरावांचे यश समितीवाल्यांना खूपच झोंबले होते. म्हणून 'प्रभात'चे वालचंद कोठारी यांचेपासून कम्युनिस्ट नेते भाई डांगे यांच्यापर्यंत कित्येकांनी खोट्या कंडया पिकविण्याचा, खोटारडे आरोप करण्याचा धंदा सुरू केला होता. तथापि जनतेवर त्याचा कसलाही परिणाम होऊ शकला नाही. 'लोकसत्ता' कारांनी आणि 'सकाळ' कारांनी यशवंतरावांचे निवडणुकीतल यश खुल्या दिलाने मान्य न करणाऱ्या समितीवाल्यांचे वृत्तपत्रातून वाभाडे काढण्यास मागेपुढे पाहिले नाही. यशवंतरावांचे निवडणुकीतील यश म्हणजे द्विभाषिक राज्याचे बाजूने मिळालेला कौल मानायला हवा असेही या वृत्तपत्रातून जाहीरपणे सांगायला मागेपुढे पाहिले नाही.

विशाल द्विभाषिकाचा कारभार यशवंतरावांनी उत्तम प्रकारे सांभाळला अणि गुजराथ, विदर्भ, मराठवाड्यासह सर्व भागांतील आमदारांची, मंत्र्यांची आणि जनतेची मने जिंकली. त्यांना प्रश्नांची जाण होती. कोणते प्रश्न अग्रक्रम देऊन सोडवायचे हे त्यांनी मनाशी ठरवून ठेवले होते. अधिकाऱ्यांना विश्वासात घेऊन त्यांचेकडून लोकांची कामे करून घ्यायची, कामचुकारांचे पदरात त्यांची चूक घालायची, पोलिसांसह इतर खात्यांतील भ्रष्टाचाराला आळा घालायचा, सरकारी सेवक जनतेचे सेवक आहेत ही जाण त्यांना करून द्यायची, या कामी यशवंतरावांनी

विशेष लक्ष घातले आणि त्यात चांगले यश मिळविले. मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांशीही ते मित्रत्वाने वागत, त्यांना जरूर ते सहकार्य, मदत करीत. त्यामुळे गुजराती आणि मराठी मंत्री असा फरक कधी जाणवला नाही की कुरबूर कधी झाली नाही. कलेक्टरांची परिषद बोलाविणे, कमिशनरांना एकत्र आणणे, पोलिस अधिकाऱ्यांशी संवाद करणे याबाबत यशवंतरावांनी कधीही कंटाळा केला नाही की अळंटळं केली नाही. ते अधिकाऱ्यांना आवर्जून सांगायचे की कलेक्टर, आमदार आणि संबंधित लोक यांनी एकत्र येऊन विचारांची देवाणघेवाण करायला हवी आणि एकमेकांच्या सहकार्याने लोकांचे प्रश्न सोडवायला हवेत. अन्नधान्य उत्पादनात वाढ, शिक्षण, शेती, सहकार यावर भर देण्याबाबत यशवंतरावांचा कटाक्ष असायचा.

द्विभाषिक यशस्वी केल्यावर दिल्लीचे नेतृत्व संयुक्त महाराष्ट्र निर्मितीला फारशी खळखळ करणार नाही, गुजराती बांधवही आपल्याला स्वतंत्र गुजरात राज्य मिळावे म्हणून द्विभाषिक तोडण्यास तयार होतील असा अंदाज वृत्तपत्रेही व्यक्त करू लागली होती. पंडित नेहरूंनी औरंगाबाद दौऱ्यात चव्हाणांच्या भूमिकेला अप्रत्यक्ष पाठिंबा दर्शविला होता. द्विभाषिकाचा फेरविचार दिल्लीत होत असल्याचे समजताच महाराष्ट्रात आनंदी वातावरण पसरले. गुजरातेत मात्र कांही हितसंबंधी अस्वस्थ बनले होते. मुंबईत स. का. पाटीलही विचाराने बदलले होते. त्यांच्यासमोर १९६२ च्या सार्वत्रिक निवडणुका काँग्रेसने जिंकण्याचा प्रश्न उभा होता. महाराष्ट्रातील काही विघ्नसंतोषी आणि चव्हाण विरोधी मंडळी वेगळ्याच कारवायांत मग्न होती. भाऊसाहेब हिरे यांनी गोविंदराव देशपांडे यांना पुढे करून द्विभाषिकाचे दोन तुकडे करून महाराष्ट्र आणि गुजरात अशी दोन वेगळी राज्ये निर्माण करावीत अशी मागणी करणारे पत्रक काढावयास लावले. त्याला प्रसिद्धीही भरपूर मिळवून दिली.

यशवंतराव चव्हाणांच्या नेतृत्वाला धक्का द्यायचा हा या पत्रकामागील उद्देश असावा असे कार्यकर्ते जेव्हा बोलून दाखवू लागले, तेव्हा देशपांडे पत्रकाबाबत चर्चा करण्याकरिता महाराष्ट्र काँग्रेसच्या कार्यकारिणीचीही बैठक बोलाविण्यात आली. हिरे बैठकीला हजर होते, पण ते कांहीही बोलले नाहीत. वि. स. पागे, देवकीनंदन नारायण, नाईक-निंबाळकर, यांनी चर्चेत भाग घेऊन यशवंतरावांच्या नेतृत्वाखाली

द्विभाषिक राज्य स्थिर होत आहे, यशस्वी होत आहे असा अभिप्राय व्यक्त केला. चव्हाणांचे हात बळकट करायला हवेत असेही मत व्यक्त करण्यात आले. तिकडे दिल्लीत गृहमंत्री पंत यांनी महाराष्ट्र आणि गुजरातच्या प्रतिनिधींच्या मनाचा कानोसा घेतल्यावर त्यांना हे जाणवले की संयुक्त महाराष्ट्र आणि गुजरात अशा दोन वेगळ्या राज्याबाबत लोकांची इच्छा फार प्रबळ असून ती फार काळ डावलून चालणार नाही. समितीच्या लोकांनी दिल्लीत संसदभवनासमोर निदर्शने केल्यानंतर आणि लोकसभेत तहकुबीद्वारे चर्चा घडवून आणल्यानंतर पं. पंतांच्या वेगळ्या विचारांना त्यामुळे गती प्राप्त झाली. त्यात भर पडली ती मुंबईचे राज्यपाल श्री. श्रीप्रकाश यांनी राज्यपालांचे परिषदेत केलेल्या भाषणाने. पंतांनी याबाबत नेहरूंशी चर्चा केली. नेहरूही बदलत चालले आहेत हे पंतांच्या लक्षात आले. काकासाहेब गाडगीळांनी या बदलाची जाणीव यशवंतरावांना आणि नाईक-निंबाळकरांना दिली आणि निर्माण झालेल्या नामी संधीचा उपयोग करून घ्यावा, असे सुचविले.

श्रीमती गांधी यांची काँग्रेसच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाल्यावर त्यांनी पंडित नेहरू आणि पंडित पंत यांचेशी द्विभाषिकाच्या भवितव्याबाबत चर्चा केली. मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचेशीही चर्चा केली. यशवंतरावांनी श्रीमती गांधी यांना महाराष्ट्र भेटीचे निमंत्रण दिले. इंदिराजींनी महाराष्ट्राचा दौरा करून जनतेचे मत जाणून घ्यावे अशी विनंतीही यशवंतरावांनी काँग्रेसच्या अध्यक्षांना केली. नेहरू आणि पंत यांनी इंदिराजींच्या दौऱ्याला संमती दर्शविली. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीबाबत इंदिराजी अनुकूल अभिप्राय देतील याची खात्री वाटल्यामुळेच दौऱ्याचे प्रयोजन करण्यात आले होते. इंदिराजी दिल्लीहून विमानाने मुंबईला आल्या आणि मोटारने त्यांनी आपला प्रवास सुरू केला. ठाणे, कुलाबा, रत्नागिरी, कोल्हापूर, सांगली, सोलापूर, नगर, नाशिक या जिल्ह्यांना इंदिराजींनी भेट द्यावी असाच दौऱ्याचा कार्यक्रम आंखण्यात आला होता. अखिल भारतीय काँग्रेसच्या अध्यक्षांबरोबर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या अध्यक्षांनी म्हणजे मालोजीराव नाईक-निंबाळकरांनी राहावे, कोकण दौऱ्यात मंत्री पी. के. सावंत यांनी त्यांच्या समवेत असावे अशा सूचना यशवंतरावांनी दिल्या होत्या. पत्रकार या नात्याने 'विशाल

सह्याद्रि'चे संपादक अनंतराव पाटील दौऱ्यात सहभागी होतील असेही नाईक-निंबाळकरांना सांगून ठेवले होते. इंदिराजी मुंबईहून निघून ठाणेमार्गे महाडला पोहोचतील आणि चिपळूणला मुक्काम करतील असे वृत्तपत्रांतून प्रसिद्ध करण्यात आले होते. अनंतराव पाटील ठाण्याला जाण्याऐवजी महाडला दौऱ्यात सामील झाले. नाशिकच्या शेवटच्या सभेपर्यंत ते इंदिराजींबरोबर होते. त्यांची जागजागची भाषणे ऐकणे एवढाच मर्यादित उद्देश न ठेवता अनंतरावांनी मुक्कामाचे ठिकाणी इंदिराजींशी चर्चा करण्याची संधी साधली आणि त्यांचे मन जाणून घेण्याचा प्रयत्न केला. मार्गात आणखीही दोन-चार पत्रकार दौऱ्यात सामील झाले. त्यात टाईम्सचे बाळ अभ्यंकर आणि पी. टी. आय. चे दिनू महाले पण होते. उन्हातान्हात प्रवास करताना इंदिराजी किती काटक आहेत, निग्रही आहेत याची कल्पना पत्रकारांना येऊन चुकली. त्याचबरोबर मराठी माणसाच्या चेहऱ्यावरील भाव ओळखून, महाराष्ट्र निर्मितीबद्दल त्या कशा अनुकूल आहेत हेही पत्रकारांच्या लक्षात आले.

श्रीमती गांधी दिल्लीला परतल्यावर त्यांनी नेहरूंना आणि पंतजींना आपला अहवाल सादर केला आणि शिफारसही सांगून टाकली. संयुक्त महाराष्ट्र निर्माण करणे न्यायाचे होईल याबद्दल त्यांनी आपल्या वडिलांचे मन वळविले. नेहरू आणि पंत दोघेही अनुकूल झाले. यशवंतरावांबरोबर स. का. पाटील यांनीही द्विभाषिक तोडण्याबाबत उत्सुकता दर्शविली. विरोध फक्त मोरारजींनी दाखविला. इंदिराजी आपल्या निर्णयावर खंबीर राहिल्या. काँग्रेसच्या चंदीगड अधिवेशनात इंदिरा गांधींनी पंडित पंत यांच्या अध्यक्षतेखाली नऊ जणांची एक समिती नेमली. महाराष्ट्र व गुजरात ही दोन राज्ये सलोख्याने, समजुतीने कशी स्थापन करता येतील याबद्दल समितीने शिफारशी करावयाच्या होत्या. समितीत यशवंतराव, डॉ. जीवराज मेहता होते, त्याखेरीज स. का. पाटील, के. के. शहा, ठाकूरभाई देसाई, डॉ. गोपाळराव खेडकर, बाबासाहेब सावनेरकर, मारोतराव कन्नमवार आदि नेतेमंडळी होती. पंडित पंतांनी आपला अहवाल काँग्रेसच्या कार्यकारिणीला डिसेंबर, १९५९ मध्ये दिला. काँग्रेस वर्किंग कमिटीने ४ डिसेंबर रोजी दोन वेगवेगळ्या राज्यांचा ठराव संमत केला. ही माहिती लोकांना जवळजवळ १५ दिवसांनी देण्यात आली. १९६० मध्ये महाराष्ट्र आणि गुजरात ही दोन वेगवेगळी राज्ये अस्तित्वात यायची हे सर्वांना

ज्ञात झाले. मुंबई हे पूर्वीचे नांव राहू द्यायचे की 'महाराष्ट्र राज्य' म्हणून नवे नांव ठेवायचे याबद्दल थोडा वाद झाला, नाराजी व्यक्त करण्यात आली. तथापि यशवंतराव चव्हाण यांनी जेव्हा 'महाराष्ट्र राज्य' अस्तित्वात येईल अशी घोषणा केली तेव्हा नाराजी नाहीशी झाली. संशयाचे निराकरण झाले. जनता महाराष्ट्र राज्याच्या स्थापना दिनाची आतुरतेने वाट पाहू लागली.

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्मिती करण्याच्या लढ्याची इतिश्री समाधानकारक झाली. यशाचे श्रेय घेण्याबाबत पक्षोपपक्षात आणि व्यक्तीत कांही दिवस चढाओढ सुरू झाली. चर्चा-वाटाघाटी या मार्गाने श्रेष्ठींचे मतपरिवर्तन करता आले म्हणूनच महाराष्ट्र पदरात पडला असे यशवंतरावांनी जाहीरपणे सांगितले. त्यांनी यशाचा वांटा एकट्याकडे घेतला नाही. 'महाराष्ट्रातील जनतेचा विजय झाला' असेच त्यांनी म्हटले. काँग्रेसविरुद्ध अकरा विरोधी पक्ष एकत्र येऊन त्यांनी संयुक्त महाराष्ट्र समिती नांवाची संघटना स्थापन केली होती, चालविली होती. कम्युनिस्ट, शे. का. पक्ष, प्रजा समाजवादी, मजदूर किसान, लाल निशाण, जनसंघ, हिंदूसभा आदि विविध विचासरणीचे पक्ष एकत्रित झाले होते. काँग्रेसला प्रभावी विरोध करण्यासाठी या साऱ्यांचा एक पक्ष करण्याचा मनसुबा रचण्यात आला होता. तथापि पक्षीय अभिनिवेशामुळे एकमत होऊ शकले नाही. जनसंघ प्रथम समितीतून बाहेर पडला. स्थानिक स्वराज्य संस्था ताब्यात घेण्याचा समितीचा प्रयत्नही यशस्वी होऊ शकला नाही. कम्युनिस्ट आणि प्रजासमाजवादी यांच्यात उभे दावे सुरू झाले. ज्या नगरपालिकेत, महानगरपालिकेत सत्ता हस्तगत करता आली होती ती पण भांडणांमुळे हातची घालवावी लागली. चीनच्या आक्रमणाच्या घटनेवरून प्रजासमाजवादी आणि कम्युनिस्ट यांच्यात चांगलीच जुंपली, खूप वादावादी झाली. समाजवाद्यांनी समितीबाहेर पडण्याचे जाहीर केले. संयुक्त महाराष्ट्र मागणीची पूर्तता झाल्यामुळे समितीची उपयुक्तता जवळ जवळ संपली होती. नंतर सीमा भागाकरिता तिचे रूपांतर "सीमा समितीत" करण्यात आले.

यशवंतरावांच्या राजकीय जीवनात सं. म. समितीचा कालखंड महत्त्वाचा ठरला. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला, त्यांच्या मुत्सद्देगिरीला समितीच्या पर्वात उजाळा मिळाला. "या काळात यशवंतराव मुख्यमंत्रिपदी नसते तर महाराष्ट्रात समितीने

काय गोंधळाची परिस्थिती निर्माण केली असती याची कल्पना करवत नाही'', असे उद्‌गार एका जबाबदार नेत्याने काढले होते ते अगदी खरे होते. यशवंतरावांचा धीरोदात्तपणा, दूरदर्शीपणा, त्यांचा निर्धार, संयम, त्यांना स्वतःला, काँग्रेसला आणि महाराष्ट्राला उपयोगी पडला. चव्हाणांनी योग्य ती पावले उचलली, द्विभाषिक राज्य यशस्वीपणे राबविले, अल्पसंख्य जमातीचा विश्वास संपादन केला, समितीच्या नेत्यांना सांभाळून घेतले म्हणूनच महाराष्ट्राचे नांव देशात राखले गेले. १९५६ ते ६० पर्यंतच्या पांच वर्षांच्या कालखंडात यशवंतराव ज्या पद्धतीने वागले, बोलले. त्यामुळे त्यांचे नेतृत्व व कर्तृत्व फुलले, त्याचबरोबर संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न सामोपचाराने, खेळीमेळीने सुटू शकला. १९५७ ची असेंब्लीची निवडणूक यशवंतरावांनी जिंकून दाखविलीच पण त्याचबरोबर लोकसभेची १९५८ मधील पोटनिवडणूकही जिंकून दिल्लीच्या निदर्शनास आणून दिले की जनतेत यशवंतरावांना स्थान आहे, ते लोकप्रिय आहेत, विश्वासार्ह देखील आहेत.

१९५८ मध्ये केशवराव जेधे यांचे निधन झाल्यामुळे लोकसभेच्या बारामती मतदार संघाची पोटनिवडणूक जाहीर झाली. तात्यांचे चिरंजीव गुलाबराव जेधे यांना उमेदवारी देण्याचा निर्णय यशवंतरावांच्या सल्ल्यानुसार महाराष्ट्र काँग्रेसने घेतला. या मतदार संघाचे क्षेत्र मोठे होते. जुन्नर, आंबेगाव. खेड, दौंड, बारामती असा लांबच्या लांब पट्टा होता. गुलाबराव अगदी नवीन, लोकांशी अपरिचित. तथापि तात्यांची उरलेली टर्म त्यांच्या चिरंजीवांना देण्याचा निर्णय भावनात्मक होता, आाणि कार्यकर्त्यांना तो मनोमनी पटलेला होता. यशवंतराव, बाळासाहेब देसाई, बॅ. जी. डी. पाटील आदि मंत्र्यांनी, नेत्यांनी प्रचारासाठी तालुके वाटून घेतले. यशवंतरावांनी अनंतराव पाटलांना बोलावून घेतले आणि एकूण प्रतिक्रिया काय आहे, निवडणूक किती जड जाईल याबद्दल विचारले. संयुक्त महाराष्ट्र समितीतर्फे शेकापचे ॲडव्होकेट वसंतराव पवार यांना उमेदवारी देण्यात आली होती. उमेदवार स्थानिक आणि बारामती, दौंड भागाशी विशेष संबंधित. सौ. शारदाबाई पवार यांचे सुपुत्र आणि एन. डी. पाटलांचे मेहुणे. त्यामुळे पारडे जडच होते. यशवंतरावांनी विचारले, ''काय होईल या निवडणुकीत'' अनंतरावांनी सांगितले, ''केशवरावांच्या नांवाचा आणि कार्याचा आपण जास्तीत जास्त उपयोग करून घ्यायला हवाय. सर्व

कार्यकर्त्यांना एकजुटीने कामाला लावायला हवे. कारण समितीचे कार्यकर्ते निवडणूक जिद्दीने लढविणार असून काँग्रेसचा पराभव करण्याची त्यांची ईर्ष्या आहे."

निवडणुकीच्या प्रचारात सरकारी मोटारीचा वापर करावयाचा नाही, सरकारी यंत्रणेचा वापर वा उपयोग करून घ्यायचा नाही, सरकारी बंगल्यात उतरायचे नाही याची यशवंतरावांनी स्पष्टपणे कल्पना दिली. त्यांनी ही बंधने स्वतःवरही लादून घेतली होती. त्यामुळे यशवंतरावांसाठी अनंतरावांनी त्यांचे एक स्नेही अशोक डहाणूकर यांची खाजगी गाडी आठ-दहा दिवसांसाठी मिळविली. ड्रायव्हिंगला स्वतः अशोक डहाणूकर तयार झाले. चव्हाणसाहेब, त्यांचा अंगरक्षक इन्स्पेक्टर विचारे, अनंतराव पाटील आणि अशोक डहाणूकर असे चौघेजण या गाडीतून दहा दिवस प्रवास करीत होते. एका गांवाहून दुसऱ्या गांवाला आणि एक सभा संपवून दुसऱ्या सभेला असा सारखा क्रम चालू होता. यशवंतराव कंटाळायचे नाहीत की थकायचे नाहीत. गाडीत चर्चा आणि अंदाज. एकदा बोलता बोलता चव्हाणसाहेब सहज म्हणाले, "पवारांच्या घरातील एखादा तरुण मुलगा आपल्याला काँग्रेसमध्ये नाही कां आणता यायचा ?" अनंतरावांनी झटकन सांगितले की, "शरद पवार यांच्याबाबतीत प्रयत्न करता येईल. शरदराव पुण्यात कॉलेजमध्ये शिकत असून विद्यार्थ्यांत, तरुणांत प्रिय आहेत. त्यांचे संघटनकौशल्य दिसून आले आहे. तरुणांत कामाची त्यांना आवड आहे. युवक काँग्रेसच्या दृष्टीने त्यांचा विचार करता येईल." पोटनिवडणुकीचा प्रचार संपला. मतदान झाले. काँग्रेसचे गुलाबराव जेधे चांगल्या मताने निवडून आले. थोड्याच दिवसांनी शरद पवारांनी युवक काँग्रेसच्या कामाची सूत्रे सांभाळण्यास सुरुवात केली. चव्हाणसाहेबांचे प्रेम व विश्वास संपादन करून शरदराव एकेक पायरी वरती चढत गेले.

✦✦✦

: ७ :

संयुक्त महाराष्ट्र राज्याचे उद्घाटन ३० एप्रिल, १९६० ला रात्री १२ वाजून १ मिनिटांनी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते मुंबईत झाले. हा समारंभ राजभवनाच्या पटांगणात भव्य स्वरूपात झाला. संयुक्त महाराष्ट्राचा नवा नकाशा तयार करण्यात आलेला होता. विद्युत्‌दीपांनी चमचमणाऱ्या या नकाशावरील रेशमी आवरण पंडितजींनी बाजूला केले आणि टाळ्यांच्या गजराने भव्य शामियाना निनादून गेला. पंडितजींना आणि उपस्थितांना नव्या महाराष्ट्राचे दर्शन घडले. काँग्रेसच्या अध्यक्षा श्रीमती गांधी याही उपस्थित होत्या. त्यांनी आपल्या सदिच्छा यशवंतरावांजवळ व्यक्त केल्या. उपस्थित निमंत्रितांच्या आनंदाला उधाण आले आणि सारे वातावरण आनंदमय बनले. महाराष्ट्र गीत कानी पडावे अशी व्यवस्था करण्यात आली होती. लता मंगेशकरांनी भूपाळ्या म्हटल्या आणि कार्यक्रमाची सांगता ज्ञानदेवांच्या पसायदानाने झाली. यशवंतरावांनी 'पसायदान' व त्याचा अर्थ नेहरूंना समजावून दिला. लताजींच्या आवाजातील पसायदानाने पंडितजी देखील आनंदित झाले. 'दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो । जो जो वांच्छिल तो ते लाहो । प्राणिजात ॥ याचा अर्थ आणि मराठी संतांची समतेची शिकवण ऐकल्यावर पंडितजी सुखावले. संयुक्त महाराष्ट्र राज्याच्या उद्घाटनाचा राजभवनातील हा समारंभ निमंत्रितांसाठी होता. आम जनतेसाठी शिवाजी पार्क मैदानावर १ मे रोजी दुपारी समारंभ ठेवण्यात आला होता. लक्षावधी लोक या समारंभासाठी उपस्थित होते. त्यांच्या चेहऱ्यावर आनंद व समाधान ओसंडून चालल्याचे दिसत होते. राष्ट्रीय ध्वज, मंगलवाद्ये, लोकांचा उत्साह यामुळे वातावरण भारून गेले होते. पंडितजींचे भाषण, यशवंतरावांचे आभार प्रदर्शन सारे काही

आगळे-वेगळे वाटण्यासारखे झाले. त्याच दिवशी म्हणजे १ मे, १९६० रोजी दुपारी यशवंतराव चव्हाण यांचा मुख्यमंत्री म्हणून शपथविधी आणि नंतर नव्या मंत्रिमंडळाचा शपथविधी पार पडला. यशवंतराव द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री होते ते आता नव्या संयुक्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बनले. गेल्या चार वर्षांतील धोरणे पुढे चालविण्याची तसेच हाती घेतलेल्या कार्यक्रमांची पूर्तता करण्याची संधी त्यांना पुन्हा लाभली.

नव्या सरकारचे धोरण म्हणून ज्या गोष्टी यशवंतरावांनी घोषित केल्या, जी आश्वासने दिली त्यातून त्यांचा राज्याविषयीचा दृष्टिकोन स्पष्ट झाला. शेती, उद्योग व शिक्षण यावर भर देण्याचे त्यांनी स्पष्ट केलेच पण त्याचबरोबर हेही सांगून टाकले की, ज्ञानेश्वर, तुकाराम, शिवाजी महाराज, महात्मा फुले यांनी महाराष्ट्राच्या संस्कृतीचा जो वारसा आपल्या हाती दिला आहे तो अमोल ठेवा समजून महाराष्ट्राची व देशाची सेवा करण्याचे व्रत आपण सर्वजण घेऊ या. राज्य हे साध्य नसून साधन आहे असे मानूनच शेती-उद्योगावर आधारित समाजव्यवस्था स्थापन करण्याचा प्रयत्न करू या. महाराष्ट्राचा जगन्नाथाचा रथ चालविण्यासाठी सर्वांचा हातभार लागावा अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली आणि विकासाकडे लक्ष केंद्रित करण्याकरिता राज्यभर संचार सुरू केला. या संचारात त्यांनी शेती-उद्योग-शिक्षण यावर भर दिला. उद्योगात, कारखानदारीत मराठी तरुणांनी दुसऱ्याकडे नोकरी करण्यापेक्षा स्वतःच उद्योगधंद्यात पडावे, स्वतःचे कारखाने चालवावेत असे आवाहन केले. शेती हा ग्रामीण विकासाचा गाभा आहे हे पटवून देऊन शेतीला उद्योगधंद्याची जोड देण्याबाबत सर्वतोपरी उत्तेजन दिले. त्यासाठी ग्रामीण भागातील विद्युतीकरणाला प्राधान्य दिले. शेती, सहकार, उद्योग, शिक्षण या विषयावर परिसंवाद घडवून आणले. साहित्य-नाट्यसंमेलनांना प्रोत्साहन दिले. पत्रकारांच्या शिक्षणास जरूर ते सहकार्य दिले. काँग्रेसची शिबिरे भरविली, कार्यकर्त्यांना त्यांतून शिक्षण दिले.

तरुण, सुशिक्षित, सुविद्य कार्यकर्ते यांचा संग्रह करण्याची, त्यांना संधी देऊन, शिकवून मोठे करण्याची यशवंतरावांची हातोटी विलक्षण होती. १९५२ ते १९६२ या दहा वर्षांच्या काळात त्यांनी कितीतरी तरुणांना राजकारणात आणि शासनात

बोटाला धरून चालायला शिकविले, गतिमान बनविले. यासंबंधात बॅरिस्टर जी. डी. पाटील, राजारामबापू पाटील, विनायकराव पाटील. भाऊसाहेब वर्तक, मधुसूदन वैराळे, शंकरराव चव्हाण, दादासाहेब जगताप, सुशिलकुमार शिंदे, बॅरिस्टर अंतुले अशी कितीतरी नांवे सांगता येतील. महाराष्ट्रात दुय्यम फळीचा फार मोठा संच त्यांनी उभा केला. संघटना चालवायची असेल, प्रशासन योग्य मार्गावरून गतिमान करावयाचे असेल तर पहिल्या फळीबरोबर दुसरी, तिसरी फळीही तयार पाहिजे असे यशवंतराव आग्रहाने सांगत. व्यक्तिपेक्षा पक्ष मोठा, आणि पक्षापेक्षा देश मोठा ही त्यांची धारणा कायम होती.

यशवंतराव सत्य – मृदु बोलत म्हणूनच लोकांना या नेत्याबद्दल आपुलकी वाटायची, त्यांचे विचार आपले वाटायचे. व्यक्तिपूजेला यशवंतरावांनी कधीही महत्त्व दिले नाही सामुदायिक नेतृत्वावर त्यांचा विश्वास होता. सहकार, उद्योग क्षेत्रात त्यांनी सामुदायिक नेतृत्वाचा आग्रह धरला. जिल्ह्याजिल्ह्यांतून चांगल्या कार्यकर्त्यांना त्यांनी संधी दिली आणि राज्यात कार्यकर्त्यांची आणि नेत्यांची फळी उभी केली. द्विभाषिकाचे मुख्यमंत्रिपद स्वीकारल्यानंतरच्या २॥ वर्षांच्या आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपद स्वीकारल्यानंतर दिल्लीत संरक्षणमंत्री म्हणून जाईपर्यंतच्या दोन-सव्वादोन वर्षात महाराष्ट्र राज्याचा कारभार सांभाळताना यशवंतरावांनी विकासाच्या कामात कार्यकर्त्यांचे सहकार्य घेतलेच पण त्याचबरोबर अधिकाऱ्यांमध्येही 'सेवेची' भावना निर्माण केली. त्यांच्याकडून विधायक कामे करून घेतली. आपण सगळेजण जनतेचे सेवक आहोत असे ते अधिकाऱ्यांच्या मनावर बिंबवायचे. अधिकारी आणि कार्यकर्ते यांनी सहकार्याने काम करायचे ठरविले तर राज्याचे विविध क्षेत्रांतील पुरोगामी धोरण यशस्वी झाल्याशिवाय राहणार नाही अशी ग्वाही ते द्यायचे. दफ्तर दिरंगाई टाळा, भ्रष्टाचारापासून दूर रहा असे ते कलेक्टर, कमिशनर, खात्याचे सचिव यांना सांगत. कूळ कायदा राबविण्याबाबत, तुकडेबंदी, तुकडेजोड या पूर्वीच्या कायद्याच्या अंमलबजावणीबाबत, शेतजमिनीवरील मर्यादेचा (सिलिंग) कायदा राबविण्याबाबत यशवंतराव आग्रही राहिले. शेतीच्या क्षेत्रातील महाराष्ट्राचे पुरोगामी धोरण सर्व देशाला मार्गदर्शक ठरले असे उद्‌गार दिल्लीतील एका केंद्रीय मंत्र्याने काढून यशवंतरावांचा गौरव केला.

सिलिंगला बड्या बागायतदारांनी विरोध दर्शवून पाहिला, पळवाटा शोधण्याचा प्रयत्न केला. पण तो फारसा सफल होऊ शकला नाही. जिरायती जमीन, बारमाही पाणीपुरवठा असलेली जमीन, दुबार हंगामी पाणीपुरवठा असलेली जमीन अशी वर्गवारी करून पांच माणसांचे एक कुटुंब गृहीत धरून एकरांवर मर्यादा घालण्यात आली होती. जिरायती ८० ते १५० एकर, बारमाही बागायतीला १६ एकर आणि हंगामी पाणीपुरवठा असलेल्या जमिनीला २४ एकर अशी मर्यादा घालून देण्यात आल्यावर उत्पादनात घट होऊ नये म्हणूनही काळजी घेण्यात आली. नद्यांचे-ओढ्यांचे पाणी अडविणे, पाट काढणे, वीजनिर्मिती अधिक करून ती शेतीपर्यंत पोहोचविणे यावर भर देऊन इरिगेशन बोर्ड, इरिगेशन सर्कल स्थापन केले. भारताचा कणा शेती आहे, महाराष्ट्र प्रायः शेतीवर अवलंबून आहे याची जाणीव ठेवून शेतीला पाणीपुरवठ्यावर भर दिला. स. गो. बर्वे कमिशन नेमले. त्याच्याकडे उपलब्ध जलसंपत्तीचा आढावा घेण्याचे काम देऊन कमिशनवर तज्ज्ञांची नेमणूक केली. राज्यात पाटबंधाऱ्यांची सोय करून शेतीला पाणी द्यायचे म्हटले तरी अवघी २० ते २२ टक्के जमीनच पाण्याखाली येऊ शकेल असा निष्कर्ष बर्वे कमिशनने काढला आणि खर्चाचा अंदाज पण दिला. विहिरीवर, नदीवर, तळ्यावर विजेचे, ऑईलचे पंप बसवून पाणी उपसण्याची, ते शेतीला देण्याची परवानगी यशवंतरावांनी दिली. पश्चिम महाराष्ट्राप्रमाणे विदर्भ व मराठवाड्याकडेही शेतीबाबत लक्ष दिले. "संयुक्त महाराष्ट्र म्हणजे विखुरलेला मराठी भाषिक प्रदेश भौगोलिकदृष्ट्या एक झाला एवढाच मर्यादित अर्थ नसून तिन्ही भागांचे भावनिक ऐक्य झाले अशी परिस्थिती निर्माण करायला हवी" असा आग्रह यशवंतरावांनी धरला आणि त्यादृष्टीने पावले उचलली. कोणत्याही भागावर अन्याय होऊ नये याची दक्षता घेतली. यशवंतराव म्हणजे आमचे दैवत असे मराठवाड्यातील लोक बोलून दाखवीत. यशवंतरावांना महाराष्ट्र सोडून अचानक दिल्लीला जावे लागले तेव्हा अनेकांनी उद्गार काढले की देशासाठी यशवंतराव गेले हे ठीक; पण त्यामुळे महाराष्ट्राचे नुकसान झाले त्याचे काय'? त्यांची लोकहिताची पुरोगामी धोरणे कोण राबविणार ?

खेड्यांपाड्यांतील गरिबांना जिल्ह्याचे ठिकाणी, मुंबईच्या सचिवालयात हेलपाटे घालायला लागू नयेत, त्यांची कामे नजिकच्या ठिकाणी लवकर व्हावीत

म्हणून सत्तेचे विकेंद्रीकरण करण्याची गरज यशवंतराव बोलून दाखवीत. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बनल्यावर त्यांनी वसंतराव नाईक समिती नेमून तिच्याकडे सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा प्रश्न सोपविला. बलवंतराय मेहता समितीने लोकशाहीच्या विकेंद्रीकरणाच्या संबंधात सूचना केलेल्या होत्या. त्यांचा अभ्यास करून नाईक समितीने आपल्या शिफारशी सादर केल्या. त्या शिफारशींच्या आधारे सरकारने एक बिल तयार केले. विधीमंडळात या बिलावर चर्चा झाली आणि डिसेंबर १९६१ मध्ये हे बिल संमत करण्यात आले. यानंतर १९६२ मध्ये जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अस्तित्वात आल्या. त्यापूर्वी असलेली लोकलबोर्डस् संपुष्टात आली. पंचायत राज्य सुरू करण्याचा मान महाराष्ट्राने मिळविला. या स्थानिक स्वराज्य संस्थांची रचना, निवडणुका, कारभार याबाबत महाराष्ट्राने जी पद्धत स्वीकारलेली होती तिचे कित्येक राज्यांनी कौतुक करून आपल्या राज्यात त्या पद्धतीचा उपयोग केला.

कला-साहित्याच्या क्षेत्रातील त्याचप्रमाणे क्रीडा-करमणुकीच्या क्षेत्रातील उणिवा व अडचणी याकडे यशवंतरावांनी जातीने लक्ष दिले. करमणूक करात सूट दिली, नाट्यकलेला उत्तेजन-सहाय्य दिले. कलावंतांना आर्थिक सहाय्य सरकारतर्फे देण्याची तरतूद केली. चांगल्या साहित्याला पारितोषिके आणि लेखकाला उत्तेजनार्थ सहाय्य देऊ केले. साहित्य-संस्कृती मंडळाची स्थापना केली. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्याकडे त्या मंडळाचे अध्यक्षपद सोपविले. त्यानंतर वाईला या मंडळाने स्थापन केलेल्या विश्वकोश कार्यालयाचे उद्‌घाटन स्वतः यशवंतरावांनी केले. मराठी भाषेच्या विकासासाठी डायरेक्टोरेट ऑफ लँग्वेजेस (भाषा विभाग) सुरू केले. लोकसाहित्याला उत्तेजन दिले. या साऱ्या निर्णयाबरोबरच त्यांनी आणखी एक महत्त्वाचा निर्णय घेतला तो नवबौद्धांबाबत. खेड्यापाड्यांतील हरिजन बांधवांनी, पददलितांनी बौद्ध धर्माचा स्वीकार करून ते स्वतःला नवबौद्ध समजू/संबोधू लागले होते. तरी त्यांची आर्थिक-सामाजिक-शैक्षणिक स्थिती कांही सुधारली नव्हती. या दृष्टीने ते मागासच राहिले होते. त्यांनी आपल्या कांही मागण्या मांडल्यावर यशवंतरावांनी त्यांना 'सवलती' जाहीर केल्या. नागपुरात जेथे या मंडळींनी बौद्ध धर्माची दीक्षा घेतली त्या भूमीला 'दीक्षाभूमि' संबोधून तेथे स्मारक उभे करण्यास सहाय्य केले. डॉ. आंबेडकरांच्या जयंती-दिनी (१४ एप्रिल) सुट्टी जाहीर केली.

महार-वतनाची पद्धत बंद करणारा कायदा करून अस्पृश्यांची शेकडो वर्षांची गुलामगिरी नष्ट केली. सुमारे ३० वर्षांपूर्वी डॉ. आंबेडकरांनी केलेल्या मागणीची यशवंतरावांनी पूर्तता करून हरिजनांना हक्काने जगण्याचा अधिकार प्राप्त करून दिला. अस्पृश्यता नष्ट करण्याचे, हरिजनांना इतर माणसांच्या बरोबरीने आणण्याचे फार मोलाचे काम यशवंतरावांनी केले.

११ जुलै १९६१ ला रात्री पानशेत धरण फुटले आणि पुणे शहराला पुराचा जबर तडाखा बसला. पानशेत फुटल्यामुळे खडकवासला धरणही फुटले आणि पुराचे पाणी शहरात शिरून शेकडो घरे कोसळली, मालमत्तेचे प्रचंड नुकसान झाले. संपूर्ण राज्यावर एक प्रकारे संकट कोसळले. ही वार्ता मुंबईत पोहोचताच यशवंतराव तांतडीने विमानाने पुण्याला निघाले. विमान पुण्याला पोहोचले. तथापि शहरावर घिरट्या घालण्याखेरीज दुसरा मार्ग सांपडणेच कठीण झाले. कारण शहरातील रस्ते पाण्याखाली बुडालेले, पूल पडलेले, वीजेचे खांब पडून तारा इतस्ततः पसरलेल्या. खाली जमिनीवर उतरायचे कसे आणि लोकांचे सांत्वन करून त्यांना धीर द्यायचा कसा असा प्रश्न यशवंतरावांपुढे उभा राहिला. पुराचे पाणी ओसरल्यावर यशवंतराव अधिकाऱ्यांसह शहरात पोहोचले. लोकांना निवारा, औषधे, पिण्याचे पाणी, कपडे यांची तांतडीने आवश्यकता आहे हे पाहून जिल्हा कलेक्टरांकडे २० लक्ष रुपये तांतडीने देण्याची व्यवस्था यशवंतरावांनी केली. पूर निवारणाचे कार्य तांतडीने सुरू करण्याचा आदेश दिला. पुराच्या दुसऱ्या दिवशी पूरग्रस्त भागात हिंडून हानीची पाहणी करून मातीचे ढीग, घाण काढण्यासाठी लष्कराची मदत बोलावली. कॉलरा प्रतिबंधक लस टोचण्याचे काम सुरू केले. मदत केंद्रे उभारण्याचे प्रयत्न केले. पूरग्रस्तांच्या मदतीसाठी निधीचे आवाहन केले. मदतीचा ओघ सुरू झाला. धान्य, साखरेच्या पोत्यांच्या राशी उभ्या राहिल्या. रोज ४०-५० हजार भाकरी तयार करून पूरग्रस्तांची जेवणाची व्यवस्था करण्यात आली. कॉन्टिजन्सी फंडामध्ये पांच कोटी रुपये जमले. पंतप्रधान पंडित नेहरूंनी एक लक्ष रुपये पाठवून दिले आणि ते हानी पाहण्यासाठी स्वतः पुण्यात आले. यशवंतरावांच्या बरोबर त्यांनी पूरग्रस्त भागाची पाहणी केली. राज्य सरकारने तांतडीने केलेल्या निवारण व्यवस्थेची वाखाणणी केली. केंद्र सरकार तीन कोटींची मदत पाठवेल असा दिलासा पण दिला. 'सकाळ' आणि 'विशाल सह्याद्रि' या दोन दैनिकांची पुराने जी हानी झाली होती ती

पंडितजींनी स्वतः पाहिली आणि संपादकांना, व्यवस्थापकांना धीर दिला. यशवंतरावांच्या या साऱ्या धांवपळीचे लोकांनी कौतुक केले. तथापि विरोधक धरण फुटीबद्दल सरकारवर हलगर्जीपणाचा आरोप करण्यात मशगुल राहिले. सरकारने त्वरित न्यायमूर्ती बावडेकर यांचे चौकशीमंडळ नियुक्त केले. रीतसर चौकशी करून सरकारकडे अहवाल सादर करण्यासाठी त्यांनी पानशेत चौकशीचे काम सुरू केले. तथापि एके दिवशी डॉ. बावडेकरांनी आपल्या निवासस्थानाच्या चौथ्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केली. विरोधी पक्षांनी याचे भांडवल करण्याचा प्रयत्न केला. सरकारने न्यायमूर्ती व्ही. एन. नाईक यांचे नवे कमिशन त्वरित नियुक्त केले. नाईकांनी रीतसर चौकशी करून सरकारकडे अहवाल सादर केला. यशवंतरावांनी ज्या पद्धतीने पानशेत धरणफुटीची आणि न्या. बावडेकर आत्महत्येची आपत्ती हाताळली त्याबद्दल चिंतामणराव देशमुखांसह मोठमोठ्या मंडळींनी त्यांचे कौतुक केले.

पानशेत पुराच्या संकटाशी मुकाबला केल्यानंतर थोडी उसंत मिळते न मिळते तोच १९६२ च्या निवडणुकी येऊन ठेपल्या आणि उमेदवार निवडीच्या तयारीला लागावे लागले. ही धामधूम सुरू असतानाच भाऊसाहेब हिरे यांचे दुखःद निधन झाले. (६ ऑक्टोबर १९६१). एक जुना स्नेही व सहकारी गमावण्याचा धक्का यशवंतरावांना सहन करावा लागला. १९५२ व १९५७ च्या निवडणुकीत चव्हाण-हिरे या जोडीने सारा महाराष्ट्र ढवळून काढून काँग्रेसला सत्ता प्राप्त करून दिली होती. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाचे वेळी दोघांत मतभेद झाले होते, तथापि तेढ निर्माण झालेली नव्हती. यशवंतरावांनी भाऊसाहेबांना शेवटपर्यंत आपला नेता मानले होते. स्वतःचा उत्तर कराड मतदार संघ सांभाळून काँग्रेसला मोठा विजय मिळवून देण्याची जबाबदारी यशवंतरावांनी आपल्या अंगावर घेतली आणि ती यशस्वी करून दाखविली. विधिमंडळाच्या एकूण २६५ जागांपैकी २१४ जागा काँग्रेस पक्षाने जिंकून प्रचंड विजय मिळविला. १९५७ मध्ये पश्चिम महाराष्ट्रात जे अपयश पदरी पडले होते ते धुवून काढले. विधिमंडळ काँग्रेस पक्षाने नेते म्हणून यशवंतरावांची एकमताने निवड केली. मंत्रिमंडळाचा शपथविधी ९ मार्च, १९६२ रोजी झाला. मंत्रिमंडळात एकूण ४० जणांना स्थान दिले गेले. मंत्रिमंडळ अस्तित्वात येताच यशवंतरावांनी पहिली गोष्ट कोणती केली असेल तर ती पंचायत राज्याचा

कारभार सुरू करण्याची. राजस्थान व आंध्रने आपल्या राज्यात यासंबंधीचा प्रयोग सुरु केला होता. यशवंतरावांनी लोकशाही सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे निश्चित धोरण राबविण्याच्या दृष्टीने पाऊल उचलले. जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या आपापला कारभार पाहू लागल्या. आपल्या हातातील सत्ता कमी होते या कारणास्तव मंत्रिमंडळातील काही सहकाऱ्यांनी कुरकूर करण्याचा प्रयत्न करून पाहिला. तथापि यशवंतरावांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की विकेंद्रीकरणाचे धोरण ज्यांना मान्य नसेल त्यांना मंत्रिमंडळातून बाहेर पडण्याचे मार्ग, दरवाजे खुले आहेत. कुणीही बाहेर पडले नाही. पंचायत राज्यामुळे नवा पुढारी वर्ग निर्माण झाला, महाराष्ट्राचा राजकीय चेहरा-मोहरा बदलून गेला. शिक्षण, सहकार, शेती, आरोग्य यावर सत्तेच्या विकेंद्रीकरणात भर दिला गेल्याने राज्याचा लौकिक वाढला, विकासाला गती मिळाली. यशवंतरावांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राने सर्व क्षेत्रांत घोडदौड सुरू केली असतानाच यशवंतरावांना महाराष्ट्र सोडून एकाएकी दिल्लीस जावे लागले. त्यांनी योजिलेल्या कांही गोष्टी अपूर्ण अवस्थेत राहिल्या.

१९६२ साली सत्तारूढ झाल्यानंतर अवघा सहा-सात महिन्यांचा काळ गेला होता. एके दिवशी (६ नोव्हेंबर, १९६२) यशवंतराव सचिवालयात काम करीत असताना दिल्लीहून पंडित नेहरूंचा फोन आला. फोनवर बोलणे सुरू झाले. नेहरूंनी यशवंतरावांना सांगितले की महत्त्वाचे, गुप्त बोलायचे असल्याने कोणी समोर असतील तर त्यांना थोडा वेळ बाहेर पाठवा. खोली निवांत झाल्यावर नेहरूंनी सांगितले की चव्हाणजी मला तुमच्याकडून 'हो' किंवा 'नाही' एवढेच उत्तर हवय. देशाचे संरक्षणमंत्री म्हणून तुम्हाला महाराष्ट्र सोडून दिल्लीला यावे लागेल. तुमचे मत त्वरित हवे. यासंबंधी कुणालाही इतक्यात माहिती होता कामा नये. यशवंतराव चव्हाणांनी नेहरूंना अदबीने सांगितले की एका व्यक्तीशी बोलावे लागेल, संमती घ्यावी लागेल. "कुणाची" ? नेहरूंनी विचारले ? "माझ्या पत्नीची" यशवंतरावांनी उत्तर दिले. "ओ. के." म्हणत नेहरूंनी पुन्हा आठवण दिली की तुम्ही मला दिल्लीला हवे आहात. सगळे कसे अनपेक्षित आणि अचानक घडले. देशाच्या संकटकाळी पंतप्रधानांनी पाचारण केल्यावर नाही म्हणण्याचा प्रश्नच उद्‌भवत नव्हता. यशवंतरावांनी होकार दर्शवून संरक्षण मंत्र्याची जबाबदारी स्वीकारली. हिमालयाच्या रक्षणासाठी सह्याद्रि धांवून गेला.

चीनने भारतावर अचानक लष्करी आक्रमण केले होते आणि भारतीय सेनेला पिछेहाटीची नामुष्की पत्करावी लागली होती. व्ही. के. कृष्ण मेनन यांच्याकडे संरक्षण खाते होते. जनरल थापर सरसेनापती होते. चीन-भारत सीमा रक्षणाची जबाबदारी ले. ज. बी. एम. कौल यांच्याकडे होती. नेफामध्ये चीनने लष्करी तळ उभारताच मॅकमोहन रेषेवर भारताने आपले लष्करी तळ उभारण्यास सुरुवात केली. १९६१ आणि १९६२ मध्ये दोन्ही बाजूंनी तळ उभारण्याचे काम चालू होते. भारताने लडाखमध्येही लष्करी तळ उभारले. या तळाबद्दल चीनने भारताकडे तीव्र निषेध नोंदविला. नेहरूंनी सुचविले की, दोन्ही बाजूंनी आपापले सैन्य मागे घ्यावे. चीनने नकार दर्शविला. जुलैत दोन्ही देशांच्या सैनिकांत चकमकी उडाल्या. चीनने बळकावलेल्या प्रदेशाबद्दल नभोवाणीवर भाषण करताना नेहरूंनी देशाला एकूण परिस्थितीची कल्पना करून दिली. संरक्षणमंत्री कृष्ण मेनन यांच्याबद्दल पार्लमेंटमध्ये आणि देशामध्ये नाराजीचे वातावरण पसरले. त्यात ले. ज. कौल यांनी अति उत्साहात काही चुकीचे निर्णय घेऊन आपल्या सैन्याची चोहो बाजूने कोंडी करून घेतली. कौल यांना दिल्लीला बोलावून घेण्यात आले. त्यांनी दिलेला अहवाल निराशाजनक वाटल्याने पंडितजींनी आपल्या सहकाऱ्यांशी चर्चा केली. २५ ऑक्टोबरपर्यंत भारतीय लष्कराची स्थिती शोचनीय बनली होती. कृष्ण मेनन यांच्या राजीनाम्याची मागणी होऊ लागली. कृष्ण मेनन हे पंडितजींचे स्नेही असल्याने पंडितजींनी त्यांच्या बचावाचा बराच प्रयत्न केला. कृष्ण मेनन यांना एकट्यानाच जबाबदार धरणे योग्य होणार नाही असे सांगण्याचा प्रयत्न करून पाहिला. राष्ट्रीय विकास मंडळाची बैठक दिल्लीत बोलावून राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली. मुख्यमंत्र्यांनी आम जनतेची भावना लक्षात घेणे जरुरीचे आहे हे पंडितजींना आवर्जून सांगितले. पंडितजींनी लालबहादूर शास्त्री यांच्याशी चर्चा केली. उभयतांनी केंद्रीय मंत्रिमंडळातील मंत्री आणि राज्यांचे मुख्यमंत्री यांच्या नावांची छाननी केली. यशवंतरावांच्या नांवावर दोघांचे एकमत झाले. पंडित नेहरूंनी चव्हाणांना मुंबईला फोन लावला, ''ताबडतोब दिल्लीला या'' हा निरोप आदेश मानून यशवंतरावांनी १० नोव्हेंबरला दिल्ली गांठली. विमानतळावरून ते थेट नेहरूंच्या निवासस्थानी गेले.

पंडितजींनी आपल्यावर जो विश्वास दर्शविला त्याबद्दल त्यांचे आभार मानले. त्याचबरोबर आपल्या घरगुती अडचणीही निवेदन केल्या. मातोश्री विठाबाई आजारी होत्या. त्यांना त्या स्थितीत मुंबईत सोडून दिल्लीला जाणे कितपत योग्य होईल असे सौ. वेणूताईंनी यशवंतरावांजवळ बोलून दाखविले होते. तथापि देशाची हांक, नेहरूंवरील निष्ठा नजरेसमोर ठेऊन निर्णय घेण्याची गरज असल्याचे त्यांनी वेणूताईंना पटवून दिले. संरक्षणाच्या प्रश्नाबाबत आपण आज अनभिज्ञ आहोत, ज्ञान मिळविण्याकरिता थोडे दिवस लागण्याची शक्यता आहे असेही नेहरूंजवळ श्री. यशवंतरावांनी प्रांजळपणे सांगून टाकले. नेहरूंनी चव्हाणांना सांगून टाकले, "मला तुम्ही दिल्लीत हवे आहात. कसला विचार करताय ? मी तुमची वाट पहात होतो."

संरक्षण खाते यशवंतराव चव्हाण यांच्याकडे सोपविण्यात आल्याचे पंडित नेहरूंनी १४ नोव्हेंबर, १९६२ ला जाहीर करून टाकले. यशवंतराव मुंबईत होते. चीनने १७ नोव्हेंबरला प्रचंड सैन्यबळानिशी नेफा भागात जोराची मुसंडी मारली. आसामच्या टेकड्यांचे पायथ्यापर्यंत ब्रह्मपुत्रा नदीच्या कांठावरील तेजपूर शहर जिंकण्याच्या पवित्र्यात चिनी सैन्य उभे ठाकले. ब्रह्मदेशच्या बाजूनेही चिनी फौजा मुसंडी मारण्याचा प्रयत्न करू लागल्या. भारताच्या हद्दीत २० मैल आत चीन्यांनी प्रवेश केला. वॉलाँग शहर पडल्याची बातमी दिल्लीत येऊन थडकताच सर्वत्र गडबड उडाली. अफवांचे पीक पसरले. सरसेनापती थापर यांनी तेजपूर सोडून दिल्ली गांठली आणि आपला राजीनामा सादर केला. नेहरूंनी डॉ. राधाकृष्णन यांच्याशी चर्चा केली. त्यांनी जनरल जे. एन. चौधरी यांचे नांव सुचविले. नेहरूंनी लोकसभेत नवे सरसेनापती म्हणून चौधरींच्या नांवाची घोषणा केली. विधिमंडळ पक्षाचा नवा नेता निवडणे, त्याचे हाती मुख्यमंत्रिपदाची सूत्रे देणे आदि लोकशाहीतील सोपस्कार पार पाडून दिनांक २० नोव्हेंबरला यशवंतरावांनी दिल्ली गांठली. विमानतळावरून ते थेट नेहरूंच्या निवासस्थानी गेले. दोन-तीन दिवसांत घडलेल्या घटना त्यांनी समजावून घेतल्या.

पंडित नेहरू एकूण घडामोडीमुळे खूपच सचिंत बनले होते. जरनल थापर यांनी कोणत्या परिस्थितीत राजीनामा दिला, नेफामध्ये परिस्थिती काय आहे, अमेरिकेकडे हवाई मदत मागितली असताना प्रे. केनडींनी थंड प्रतिसाद कसा दिला

याची माहिती नेहरूंनी यशवंतरावांना दिली. नेहरूंच्या भेटीनंतर यशवंतरावांनी श्रीमती इंदिरा गांधींची भेट घेऊन त्यांचेशी चर्चा केली. नंतर ते आपल्या मुक्कामी म्हणजे मोरारजीभाई देसाई यांच्या निवासस्थानी गेले. मध्यरात्रीच्या सुमारास फोन आला म्हणून उचलला तर दुसऱ्या बाजूला बिजू पटनाईक होते आणि त्यांना चव्हाणांशी बोलायचे होते. श्री. पटनाईक तेवढ्या रात्री आले आणि त्यांनी संरक्षणविषयक समस्या, लष्करी डावपेच याबद्दल यशवंतरावांचे शिक्षण करण्यास सुरुवात केली. पटनाईकांचे बोलणे यशवंतरावांनी शांतपणे ऐकून घेतले. "तुम्ही मुंबई सोडायला नको होती. मुंबईला धोका असून ते शहर युद्धभूमी बनण्याची शक्यता आहे" असेही बिजूंनी ऐकविले. संरक्षणमंत्रिपदाची सूत्रे स्वीकारण्यासाठी श्री. चव्हाण दिल्लीत दाखल झाले होते, तथापि त्यांचा मंत्री म्हणून शपथविधी व्हायचा होता. चव्हाणांनी संरक्षण मंत्रिपद स्वीकारू नये अशी पटनाईकांची इच्छा होती. संरक्षणविषयक सल्लागार म्हणून संरक्षणखात्यात त्यांनी या अगोदरच लुडबूड सुरू केलेली होती. यशवंतरावांनी त्यांना उत्तर दिले, "संरक्षणमंत्रिपदाची जबाबदारी पार पाडण्याचा निर्धार करूनच आपण मुंबई सोडून दिल्लीला आलेलो आहोत. देशाकरिता जास्तीत जास्त श्रम करण्याचा माझा निश्चय आहे." हे उत्तर ऐकल्यावर पटनाईक मुकाट्याने उठले आणि निघून गेले. यशवंतरावांनी झोपायची तयारी केली. तथापि फोन परत खणखणला. पी. टी. आय. च्या कचेरीतून फोन आलेला होता. "चीनने एकतर्फी युद्धसमाप्ती जाहीर केली आहे." बातमीदाराने बातमी सांगितली. ही वार्ता नेहरूंना आणि शास्त्रीजींना सकाळी समजली. योगायोग असा की ज्या दिवशी चव्हाण संरक्षणमंत्रिपदाची शपथ घेणार, त्याच दिवशी चीनकडून युद्धसमाप्तीची एकतर्फी घोषणा ! "यशवंतरावांचा पायगुण" असे उद्‌गार अनेकांचे तोंडून बाहेर पडले. खासदारांनी त्यांचे अभिनंदन केले. बिजू पटनाईक आणि टी. टी. कृष्णम्माचारी या दोन व्यक्ती मात्र मनात अढी ठेवून होत्या. या दोघांनाही संरक्षणमंत्री व्हायचे होते. तथापि ते जमले नव्हते.

युद्ध थांबले म्हणून यशवंतराव स्वस्थ बसले नाहीत. त्यांनी लडाख, नेफा युद्धभूमीला भेट देऊन युद्धोत्तर परिस्थितीची माहिती घेतली. काश्मीर व राजस्थानच्या सरहद्दीचा दौरा केला. आघाडीवर लढणाऱ्या आणि सीमाहद्दीवर

बंदोबस्तासाठी असलेल्या जवानांची - अधिकाऱ्यांची विचारपूस करून त्यांचेशी जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित केले. प्रशिक्षण केंद्रांना भेट देऊन जवानांशी गप्पागोष्टी केल्या, त्यांचेबरोबर जेवण पण घेतले. हेतू हा की जवानांचा आत्मविश्वास वाढावा. कृष्ण मेनन यांचे कारकिर्दीत वातावरण वेगळे होते. चव्हाण यांनी आपल्या धोरणाने त्याला कलाटणी देऊन मंत्रालय आणि सैन्य, अधिकारी आणि जवान यांच्यांत चैतन्य निर्माण केले, विश्वासाचे वातावरण निर्माण केले. यशवंतरावांच्या प्रशासनाची हातोटी संबंधितांना अनुभवायला मिळाली. इतर मंत्रालयांपेक्षा संरक्षण मंत्रालयाच्या कामाची पद्धत अगदी वेगळी होती. यशवंतरावांच्या ध्यानात हे यायला वेळ लागला नाही. चव्हाण मंत्रालयात सकाळी ९-३० ला जाऊ लागले. तिन्ही दलांच्या प्रमुखांची बैठक घ्यायची, या बैठकीला संरक्षण खात्याचे सचिव आणि सहसचिव यांना पण बोलवायचे आणि संरक्षणविषयक प्रश्नावर चर्चा करायची असा पायंडा त्यांनी पाडला. रोज सकाळी एक तास होणाऱ्या चर्चेमुळे सैन्याच्या दैनंदिन गरजा, त्यांना लागणारी शस्त्रे व दारूगोळा, इतर पुरवठा यांत कांही कमतरता आहे कां, उणिवा आहेत कां, गुंतागुंत आहे कां याची माहिती घेऊन चव्हाण आवश्यक त्या सूचना जागच्या जागी देऊ लागले. माजी मंत्री श्रीकृष्ण मेनन यांची पद्धत आणि यशवंतराव चव्हाण यांची कामाची पद्धत यांतील फरक जाणून अधिकारी व जवान जिद्दीने आपापली जबाबदारी पार पाडू लागले. त्यांच्यांतील चुरस, हेवेदावे कमी होऊन संरक्षणदल एकजीवाने काम करू लागले व त्याचे प्रत्यंतर प्रत्यक्षात येऊ लागले.

बिजू पटनाईक हे ओरिसाचे मुख्यमंत्री होते तरी त्यांचा मुक्काम दिल्लीत बराच असायचा. संरक्षण खाते कांही काळ नेहरूंच्याकडे होते. तेव्हा त्यांनी मदतनीस म्हणून पटनाईकांना जवळ केले होते. त्यांचेवर नेहरूंचा विशेष लोभ होता. त्यामुळे आपणच संरक्षण खात्याचे मंत्री आहोत अशा आविर्भावात पटनाईक वागायचे. पटनाईक यांनी चव्हाणांना पण सल्ला द्यावा असे नेहरूंनी सांगितले होते. तथापि बिजू हे आपणच संरक्षणमंत्री आहोत अशा थाटात वागू लागले. यशवंतरावांनी पंडितजींच्या कानावर हे घातले, पण फारसा उपयोग झाला नाही. मग संरक्षणमंत्री म्हणून पंतप्रधानांना एक पत्र लिहिले आणि त्यात विचारले की, "आपण संपूर्ण

रशियाकडून मदत घेण्याबाबत लालबहाद्दूर शास्त्री यांचा निर्णय होत नाही हे पाहिल्यावर यशवंतरावांनी ब्रिटनला भेट देण्याचे ठरविले. १९६४ च्या नोव्हेंबर महिन्यात ते ब्रिटनला गेले. भारताला संरक्षणाबाबत सहाय्य मिळविण्याचे दृष्टीने त्यांनी तेथे संबंधितांशी बोलणी केली. तथापि चर्चेतून निश्चित स्वरूपाचे कसलेही आश्वासन मिळू शकले नाही. विल्सन हे पंतप्रधानपदी होते. विल्सन आणि माऊंटबॅटन यांना जाणीव करून दिली की ब्रिटनने भारताला मदत देण्यास अनुकूलता दर्शविली नाही तर शस्त्रास्त्रांच्या खुल्या बाजारातून भारत शस्त्रे विकत घेईल. माऊंटबॅटन यांनी कोरड्या आश्वासनापलीकडे कांहीही केले नाही. जुन्या पाणबुड्या व युद्धनौका देण्याची तयारी दर्शविली. भारताला अशा प्रकारची मदत नको होती म्हणून चव्हाण ब्रिटनहून भारताला परत आले. अमेरिका व ब्रिटन यांच्या नकारात्मक भूमिकेमुळे रशियाशी मैत्रीसंबंध वाढवून जास्तीत जास्त लष्करी मदत मिळवायची असे ठरविण्यात आले. रशियाकडून शस्त्रास्त्रांची मदत मिळविल्यामुळेच १९६५ च्या भारत-पाक युद्धात भारत वरचढ ठरला. दोन-तीन वर्षाच्या कारकिर्दीत चव्हाणांनी संरक्षणखात्याचा चेहरामोहरा बदलून टाकल्याने, लष्करी अधिकाऱ्यांना उत्तेजन दिल्याने, जवानांशी संवाद वाढविल्याने संरक्षण दलामध्ये एक वेगळे चैतन्य निर्माण झाले आणि त्याचा प्रत्यय १९६५ च्या लढाईत आला. सरसेनापती जनरल चौधरी असोत वा अन्य सेनापती असोत, त्यांना संरक्षणमंत्र्यांचा दरवाजा चर्चेसाठी, विचारविनिमयासाठी यशवंतरावांनी खुला ठेवला होता. चव्हाणांनी आपल्या लष्करी अधिकाऱ्यांना कधीही कमी लेखले नाही की त्यांचा पाणउतारा केला नाही. १९६२ पूर्वी असे प्रसंग घडत, म्हणूनच चव्हाणांच्याबद्दल लष्करात वरपासून खालपर्यंत आपुलकीची व आदराची भावना निर्माण होऊन यशवंतराव सांगतील ते ऐकायला सर्वजण एका पायावर तयार होत असत.

१९६५ च्या सुरुवातीला पाकिस्तानने कच्छच्या रणात भारताच्या हद्दीत आक्रमण केले. उभय सेनेत चकमकी उडाल्या. तथापि दोन्ही देशांनी त्याचे युद्धात रूपांतर होऊ नये याची दक्षता घेतली. नंतर एप्रिल महिन्यात पाकने युद्धबंदी रेषा ओलांडून भारताच्या पोलिस ठाण्यावर हल्ला केला. हा हल्ला परतवून लावल्यावर कच्छच्या भागात पाकने मोठ्या शक्तिनिशी लष्करी हल्ले चढविण्यास सुरुवात केली. भारताच्या हद्दीत खोलवर मुसंडी मारली. भारताला आपली कांही ठाणी सोडून मागे

सरकावे लागले. पाकने एकप्रकारचे अघोषित युद्धच सुरू केले. दिल्लीत खळबळ उडाली. पंतप्रधानांना लोकसभेत निवेदन करावे लागले. शास्त्रीजींनी घोषित केले की पाकने आक्रमक भूमिका चालू ठेवली तर भारताला लष्करी शक्तीचा वापर करावा लागेल. पंजाबच्या शेकडो मैल लांब सरहद्दीवरील ठिकाण हल्ल्यासाठी निवडावे लागेल. पंतप्रधानांची ही घोषणा आणि संरक्षणमंत्र्यांचा आदेश मिळताच लष्करी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आपल्या हालचाली वेगाने सुरू केल्या. भारताने दुसरी आघाडी उघडून युद्धाचे क्षेत्र वाढवू नये यासाठी ब्रिटन-अमेरिकेने भारतावर दबाव आणण्यास सुरुवात केली. कॉमनवेल्थ परिषदेत विल्सन यांनी तडजोडीचा प्रस्ताव मांडला. जूनमध्ये युद्धसमाप्तीचा करार करण्यात आला आणि १ जुलैपासून त्याची अंमलबजावणी सुरू झाली. कच्छ भागाबाबत या वाटाघाटी सुरू असताना पाकने काश्मिरमध्ये युद्धबंदी रेषेचा भंग करण्याचे दृष्टीने हालचाली केल्या. सीमारेषा भंगाचे प्रकार वरचेवर घडू लागले. भारतातले लोकमत प्रक्षुब्ध बनू लागले. पाकिस्तानचे घुसखोर भारताच्या हद्दीत पूंचपर्यंत शिरले. श्रीनगरपर्यंत व जमल्यास त्यापुढेही सरकण्याचा त्यांचा इरादा दिसला. गनिमांच्या नांवाखाली हजारो घूसखोरांनी काश्मिरमध्ये प्रवेश केलेला होता. त्यांचा हेतू स्पष्ट झाल्याने पंजाबची हद्द डोळ्यापुढे ठेवून लाहोरच्या दिशेने मुसंडी मारण्याचा आराखडा भारतीय लष्कराने तयार केला. जम्मू क्षेत्रात पाकच्या लष्कराने प्रवेश करून पुढे सरकायचा प्रयत्न करताच भारतीय सैन्याने टिटवाल भागात धडक देऊन दोन महत्त्वाची ठाणी ताब्यात घेतली आणि घुसखोरांची नाकेबंदी केली. पाकहद्दीतील हाजीपीर खिंडही हस्तगत केली. पाकला हा जबरदस्त धक्का होता. त्यांनी रणगाडे, एक ब्रिगेड लष्कर यांच्या साहाय्याने काश्मिरच्या दक्षिण भागात हल्ले चढविण्यास सुरुवात केली. त्यांचे पॅटन रणगाडे अमेरिकन बनावटीचे होते. छांब भागात भारतीय लष्कराची त्यांनी मोठी हानी केली. कारण हा भाग भारताचे दृष्टीने सोयीचा नव्हता. रणगाड्यांचे आक्रमण थोपविण्यास हवाईदलाच्या मदतीची गरज होती. कमांडर हरबक्षसिंग यांनी जनरल चौधरींशी संपर्क साधला. हवाई दलाच्या धडकेची गरज त्यांना प्रतिपादन केली. सूर्यास्तापूर्वी हवाई दलाने हल्ले करायला हवे होते. सरकारची त्यासाठी मुभा हवी होती. यशवंतरावांना हवाई दलाच्या कारवाईची गरज आणि तांतडी पटली. शास्त्रीजींकडून होकार मिळविण्याकरिता शास्त्रीजी त्वरित उपलब्ध होऊ शकले नाहीत. वेळ न घालविता चव्हाणांनी आज्ञा केली, 'हवाई दलाकडून

आला. सारा देश शोकसागरात बुडून गेला. ज्या शास्त्रींनी युद्धात विजयाचा आनंद मिळवून दिला होता त्यांचे देहावसान त्वरित व्हावे याचे दुःख सर्वांना अधिक जाणवले.

कर्तृत्ववान संरक्षणमंत्री म्हणून यशवंतरावांचा लौकिक देशभर पसरला. पंडित नेहरूंनी १९६२ मध्ये (नोव्हेंबर) यशवंतरावांना दिल्लीला बोलावून घेऊन संरक्षण खाते त्यांचेकडे दिले. तीन-साडेतीन वर्षांच्या अवधीत यशवंतरावांनी देशाला संरक्षणाचे दृष्टीने शक्तिमान बनवून भारतीय लष्कराकडून पाकचा पाडाव केला. आपल्या खात्याचा अभ्यास त्यांनी बारकाईने केला. उणिवांची माहिती घेतली आणि एकेक पाऊल योजनाबद्ध उचलून सैनिकांत चैतन्य, विश्वास, जोष निर्माण केला. लष्कर आणि जनता यांच्यांत दुवा निर्माण केला. संकटाचे काळी जवानांना मदत करण्यास जनता पुढे सरसावली. राष्ट्राला अभिमान वाटेल अशी कामगिरी लष्कराकडून करवून घेतली. चव्हाणांच्या या नेतृत्वाचा आणि कर्तृत्वाचा सर्वत्र बोलबाला झाला. १९६६ मध्ये यशवंतरावांवर गृहमंत्रिपदाची महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात येऊन त्यांच्या राजकीय मुत्सद्दीपणाची, अंतर्गत सुरक्षेसंबंधीच्या कौशल्याची कसोटी घेण्यात आली.

यशवंतराव संरक्षणमंत्री म्हणून दिल्लीला जात आहेत याचा सार्थ अभिमान महाराष्ट्राला वाटला होता. यशवंतरावांनी तो खरा करून दाखविला. त्यांना निरोप देण्यासाठी पुण्यात शनिवारवाड्यापुढे प्रचंड सभा झाली. सभेचे आणि जी भाषणे झाली ते दृश्य आजही दिसत आहे आणि ते शब्द आजही कानात घुमत आहेत. देशाच्या मदतीला महाराष्ट्र धांवून जात आहे, "सह्याद्रि" हिमालयाच्या मदतीला धांवून जात आहे असे उद्‌गार त्यावेळी ऐकायला मिळाले. हे उद्‌गार यशवंतरावांनी खरे करून दाखविले. दिल्लीवर आणि देशावर त्यांनी आपली छाप पाडली आणि देश त्यांच्याकडे मोठ्या आशेने बघू लागला. चीनच्या आक्रमणाचे वेळी १९६२ मध्ये तसेच पाकिस्तानच्या आक्रमणाचे वेळी १९६५ मध्ये जनतेने देशाच्या साहाय्यासाठी जी जी मदत देणे शक्य होते ती ती दिली. यशवंतरावांच्या आणि अन्य नेत्यांच्या आवाहनाला अनुकूल प्रतिसाद दिला. पुरुषांनी पैसे दिले, स्त्रियांनी अंगावरील दागिने दिले. देशातील एकजूट पाहून, देशप्रेम पाहून ऊर भरून आल्याशिवाय राहिला नाही.

✦ ✦ ✦

# : ८ :

शास्त्रीजींच्या निधनानंतर गृहमंत्री गुलझारीलाल नंदा यांच्याकडे हंगामी पंतप्रधानपद देण्यात आले. नंदांचा असा समज झाला की पुढेही आपणाकडेच पंतप्रधानपद दिले जाईल. मोरारजी देसाई त्या पदासाठी उत्सुक आहेत, त्यांचे त्यादृष्टीने प्रयत्न चालू आहेत याची कल्पना नंदांना नसावी. नेहरूंच्यानंतर मोरारजींनी प्रयत्न करून पाहिले होते. तथापि त्यांची संधी हुकली होती. म्हणूनच त्यांनी या खेपेला नेट धरला होता. अखिल भारतीय काँग्रेसच्या अध्यक्षपदी के. कामराज होते. त्यांनी सहकाऱ्यांशी चर्चा सुरू केली. इंदिरा गांधी, यशवंतराव चव्हाण आणि मोरारजी देसाई अशी तीन नांवे चर्चेत पुढे आली. इतर दोघांच्या मानाने चव्हाणांना पाठिंबा अधिक दिसून आला. तथापि चव्हाण आपल्याला डोईजड होतील, इंदिरा गांधी आपले ऐकतील असे गणित मांडून कामराज यांनी इंदिराजींचे नांव उचलून धरले. मोरारजी खूपच मागे पडले. इंदिराजी या पंडित नेहरूंच्या कन्या आहेत, पंतप्रधानपद हे निवडणूक करून ठरवू नये, एकमताने निवड झाली तरच आपण होकार द्यावयाचा असे मनाशी ठरवून चव्हाण घटनांचे निरीक्षण करीत असतानाच इंदिराजींच्या भेटीचा निरोप आला. यशवंतराव निरोपानुसार इंदिरा गांधींना भेटले, दोघात चर्चा झाली. चर्चेच्या शेवटी उभयतांत दिलजमाई पण झाली. यशवंतराव चव्हाणांचा पाठिंबा मिळताच इंदिरा गांधींचा मार्ग सुकर झाला. मोरारजींनी निवडणुकीचा आग्रह धरला. तथापि त्यांना बऱ्याच मुख्यमंत्र्यांचा पाठिंबा नसल्याने इंदिराजींचे पारडे खूपच जड झाले. मतदानात मोरारजींपेक्षा इंदिरा गांधींनाच खूप अधिक मतदान झाले. त्या पंतप्रधानपदी आरूढ झाल्या. त्यांनी आपले मंत्रिमंडळ बनविताना अध्यक्षांच्या किंवा इतर ज्येष्ठ

टोकाची भूमिका घेतल्याने राष्ट्रप्रेम, राष्ट्राभिमान, राष्ट्राची एकात्मता यांना हादरा बसला होता. गोवधबंदीचा कायदा केला जावा यासाठी पुरीच्या शंकराचार्यांनी उपोषणास सुरुवात केली होती. त्यासाठी त्यांनी यमुनेच्या कांठावरील जागा निवडली होती. पंजाबच्या प्रश्नासाठी संत फत्तेसिंग आणि त्यांच्या काही अनुयायांनी उपोषणाची आणि अग्निप्रवेशाची धमकी दिलेली होती. डॉ. लोहिया यांच्या नेतृत्वाखालील संयुक्त समाजवादी पक्षाने विद्यार्थ्यांना हाताशी धरून जागजागी धुमाकूळ सुरू केला होता. उत्तर प्रदेश, बिहार आणि मध्यप्रदेश ही तीन राज्ये विद्यार्थी चळवळीची प्रमुख केंद्रे बनली होती. या चळवळीला राष्ट्रीय स्वरूप प्राप्त व्हावे म्हणून १८ नोव्हेंबरला दिल्लीत लोकसभेसमोर निदर्शने करण्यात येतील असे जाहीर करण्यात आल्यावर सरकारने कडक धोरण स्वीकारले. दिल्लीत १४४ कलम पुकारून सभा-मिरवणुकांवर बंदी घातली. डॉ. लोहियांना तारीख १७ लाच अटक करून तुरुंगात टाकले. मोक्याच्या ठिकाणी कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येऊन फिरती गस्तही सुरू ठेवली. विद्यार्थ्यांना दिल्लीत प्रवेश करता येऊ नये म्हणून दिल्लीबाहेर जागजागी नाकेबंदीची व्यवस्था करण्यात आली. दिल्ली शहरातील शाळा, कॉलेजे बंद ठेवण्यात आली आणि दिल्ली विद्यापीठाच्या आवाराचा ताबा पोलिसांनी आपल्याकडे घेतला. सरकारच्या या कडक तयारीमुळे विद्यार्थ्यांची निदर्शने बारगळली. या मागोमाग शंकराचार्यांच्या उपोषणाचा प्रश्न धसास लावण्याचा प्रयत्न जनसंघाने करून पाहिला. लोकसभेत बरीच आरडाओरड केली. तथापि सार्वत्रिक निवडणुक डोळ्यापुढे ठेवून जनसंघ धार्मिक भावना चेतवीत आहे, जातीय तणाव निर्माण करण्याचा त्यांचा डाव आहे हे यशवंतरावांनी ओळखले आणि सावधगिरीने पावले उचलण्यास सुरुवात केली. लोकमत प्रक्षुब्ध होऊ नये, जातीय दंगली होऊ नयेत म्हणून एके दिवशी श्री. शंकराचार्यांना गुप्तपणे विमानाने दिल्लीहून हलविले आणि पॉण्डेचेरीला नेण्यात आले. तेथे थोडे दिवस ठेवल्यावर पुरीला पोहोचविण्यात येऊन तेथे त्यांची मुक्तता करण्यात आली. या गुप्त हालचालींमुळे जनसंघाला चांगलाच धडा मिळाला. त्यांना वाटले होते की, हिंदू समाजाच्या धार्मिक श्रद्धेस धक्का बसल्यावर सरकारविरोधी म्हणजे काँग्रेसविरोधी वातावरण निर्माण होऊन आपल्याला त्याचा फायदा होईल. पण तसे काही घडले नाही. गृहमंत्री चव्हाण यांनी त्यांचा चांगलाच भ्रमनिरास केला.

अकाली दलाचे नेते संत फत्तेसिंग यांच्या आत्मसमर्पणाच्या घोषणेमुळे पंजाबमध्ये वातावरण तंग झाले होते. गृहमंत्रिपदाचा कारभार पहायला सुरुवात केल्यापासून पहिल्याच महिन्यात यशवंतरावांना एकामागून एक समस्यांना तोंड देण्यासाठी सज्ज व्हावे लागले. चंदीगड शहरावर पंजाबचा हक्क आहे, हरियानातील पंजाबी भाषिक भाग पंजाबमध्ये सामील केला पाहिजे अशा दोन प्रमुख मागण्यांसाठी अकाली दलाने अट्टाहास धरला होता. या मागण्या मान्य करून घेण्यासाठी अकाली दलाचे लोक संत फत्तेसिंग यांचा उपयोग करून घेत होते. १९६० मध्ये संत फत्तेसिंगांनी आत्मसमर्पणाची धमकी दोनदा दिलेली होती. १९६५ मध्ये त्यांनी उपोषण सुरू केले होते. लोकसभेचे सभापती सरदार हुकूमसिंग यांच्या पुढाकाराने एक संसदीय समिती नेमण्यात आली आणि तिने आपला अहवाल सादर केला. पंजाबी सुभ्याच्या मागणीला समितीने अनुकूलता दर्शविली होती. यानंतर संत फत्तेसिंग राजकारणातून निवृत्त झाले. धार्मिक प्रचाराला आपण वाहून घेतले आहे असे त्यांनी जाहीर केले. अकाली दलाच्या धूर्त नेत्यांनी आपल्या स्वार्थासाठी त्यांना पुन्हा राजकारणात ओढून उपोषणाला प्रवृत्त केले. १९६६ च्या १७ डिसेंबर रोजी त्यांनी उपोषण सुरू केले आणि २७ डिसेंबरला आपण आत्मसमर्पण करणार आहोत असे जाहीर केले. डिसेंबर २६ ला संत फत्तेसिंग आणि त्यांच्या सात सहकाऱ्यांनी दुपारी ४-०० वाजता अमृतसरच्या सुवर्ण मंदिरातील तलावात स्नान केले. प्रार्थना करायची आणि धगधगत्या अग्निकुंडात उडी घ्यायची एवढेच बाकी राहिले होते. सुवर्ण मंदिरातील वातावरण अतिशय गंभीर बनले होते. सरदार हुकूमसिंग ३॥ च्या सुमारास अकाली दलाच्या नेत्यांच्या समवेत मंदिरात आले आणि त्यांनी फत्तेसिंग यांच्याशी बोलणी केली. काय होणार याबद्दल उपस्थित मंडळी चिंताग्रस्त बनली. फत्तेसिंग आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी आत्मसमर्पण होणार नाही असे जाहीर केले. सर्वांना आश्चर्य वाटले. हे कसे घडले याबद्दलचा तर्क प्रत्येक जण करू लागला.

सरदार हुकूमसिंग यांनी दिल्ली सोडण्यापूर्वी गृहमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्याशी चर्चा केली होती. मग दिल्ली सोडून त्यांनी अमृतसर गांठले होते. फत्तेसिंग यांचे आत्मसमर्पण टाळा असे चव्हाणांनी हुकूमसिंगांना सुचविले होते. त्याचबरोबर मागण्यांबाबत वचन देऊ नये असेही सुचविले होते. हुकूमसिंगांनी प्रथम फत्तेसिंग

सुरक्षा दल, भारत व तिबेट सुरक्षा पोलीस दल ही गृहखात्याच्या अखत्यारीतच असतात. उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्तींची नियुक्ती, त्यांच्या बदल्या, बढती याची जबाबदारी गृहमंत्र्यांना उचलावी लागते. सरकारी सेवकांना, पोलिसांना, जवान व लष्करातील अधिकाऱ्यांना सोयी-सवलती, बढती देण्याची कामेही गृहखात्यालाच सांभाळावी लागतात. अल्पसंख्याकांचे रक्षण, जनजाती आणि जन-जमाती यांच्या कल्याणाची जबाबदारी गृहखात्याकडेच असते. पाक घुसखोर आणि चोरटी वाहतूक करणारे परदेशी यांच्यावर लक्ष ठेवण्याबरोबर काश्मिर संबंधातील प्रश्न, केंद्रशासित प्रदेशांचे प्रश्न गृहखात्यालाच सोडवावे लागतात. याखेरीज प्रशासकीय सुधारणा, सनदी नोकर, अखिल भारतीय सेवेतील नोकर, पोलीस सेवेतील अधिकारी, त्यांच्या नेमणुका, बदल्या, बढत्या आदि कामे गृहखात्यालाच पार पाडावी लागतात. युनियन पब्लिक सर्व्हिस कमिशन हे गृहखात्याच्या अंतर्गत असल्याने त्याच्या कामकाजावरही लक्ष ठेवावे लागते. केंद्र-राज्य संबंध, राज्यपाल नेमणुका आदि जबाबदारीही गृहखात्यालाच पार पाडावी लागते. यशवंतरावांनी या सगळ्या जबाबदाऱ्यांची, सगळ्या कामांची माहिती घेऊन प्रशासनाच्या घोड्यावर आपली मांड घट्ट कशी राहील यावर लक्ष केंद्रित केले. प्रशासनात कमी पडायचे नाही, निर्णय वेळच्या वेळी घेऊन त्यांची अंमलबजावणी करायची याबाबत यशवंतराव सतर्क राहिले. मुंबई व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना त्यांनी गृहखातेही सांभाळले असल्याने दिल्लीत केंद्रीय गृहखाते सांभाळणे त्यांना अवघड गेले नाही. गृहखात्याचा त्यांना कधी बाऊ वाटला नाही.

१९६७ च्या निवडणुकीत ज्या नऊ राज्यांत विरोधी पक्षांची सरकारे स्थापन झाली आणि राज्यकारभार करू लागली, त्यांची कारभाराची तऱ्हा वेगळीच असल्याचे गृहमंत्र्यांना अनुभवास आले. केंद्र आणि राज्यातील संबंधाबाबत कांही मुख्यमंत्र्यांनी तक्रारी सुरू केल्या. केरळमध्ये कम्युनिस्ट तर ओरिसामध्ये स्वतंत्र पक्ष, पंजाबमध्ये अकाली दल तर मद्रासमध्ये डी. एम. के. पक्ष सत्तारूढ झाल्याने देशाच्या स्थैर्याच्या दृष्टीने या राज्य सरकारांशी जुळवून घेणे क्रमप्राप्त झाले होते. केंद्र व राज्य सरकारात सहकार्याची भावना निर्माण करण्याची गरज निर्माण झाली होती. यशवंतरावांनी हीच भूमिका स्वीकारली आणि पंतप्रधानांनीही त्यांना पाठिंबा दर्शविला. सत्तेसाठी आतूर बनलेल्या आमदारांनी पक्ष बदल करण्यास सुरुवात

केल्याने राज्यात स्थिर सरकारची अवस्था राहणे अवघड होऊन बसले. आयाराम-गयारामांची लागण वाढतच गेली. शेवटी नाईलाजाने उत्तरेकडील कित्येक राज्यांत राष्ट्रपतींची राजवट सुरू करणे अपरिहार्य होऊन बसले. यशवंतराव चव्हाणांनी गृहमंत्री या नात्याने खंबीरपणे पावले उचलली. निवडणुकीनंतर वर्ष सव्वा-वर्षात सुमारे ४००-५०० आमदारांनी पक्ष बदल करण्याचा उच्चांकच प्रस्थापित केला होता. सुदैवाने लोकसभेपर्यंत हे लोण पोहोचलेले नव्हते. राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करणे आणि राज्यपालांच्या नियुक्त्या करणे हे दोन्ही प्रश्न एकामागून एक उद्‌भवले. दहा राज्यपालांच्या नियुक्तीसाठी योग्य, लायक व्यक्ती शोधणे अवघड बनले. राजकारण सोडून राज्यपालपद स्वीकारण्यास कांही नेते तयार नव्हते. राज्यपाल नेमताना त्या त्या राज्याच्या मुख्यमंत्र्यांशी विचारविनिमय करून नेमणूक करावी असा संकेत होता, पायंडा पडलेला होता. नित्यानंद कानुंगो यांची बिहारमधील नियुक्ती बरीच गाजली. ती वादग्रस्त करण्याबाबतचे प्रयत्न झाले. तथापि चव्हाणांनी चाणाक्षपणे हे प्रकरण हाताळले. लोकसभेत विरोधकांनी हा प्रश्न उपस्थित करण्याचा प्रयत्न केला तेव्हा चव्हाणांनी स्पष्ट शब्दात सांगितले की विरोधी पक्षांची सरकारे असलेल्या अन्य सात राज्यांत राज्यपालांच्या नियुक्तीबद्दल तक्रार झाली नाही मग बिहारमध्येच का व्हावी हे समजून घ्यायला हवे. बिहारचे मुख्यमंत्री हे आपल्या सहकाऱ्यांना विश्वासात घेत नाहीत. कानुंगो यांच्याबाबत मुख्यमंत्र्यांशी चर्चा केलेली आहे आणि त्यांच्या अनुमतीनेच ही नियुक्ती केली गेली आहे. मुख्यमंत्री आणि विरोधी खासदार या स्पष्टीकरणानंतर चुपचाप झाले.

राज्याचे मंत्रिमंडळ बनविणे, असेंब्लीचे अधिवेशन बोलावणे, अधिवेशन समाप्त करणे आदि बाबतीत राज्यपालांची भूमिका महत्त्वाची असते. विरोधकांचा आरोप असा की केंद्रीय गृहखाते राज्यपालांना आपल्या हातचे खेळणे बनवितात. राजस्थानमध्ये राष्ट्रपती राजवट आणल्याबद्दल टीकेचे मोठे मोहोळ उठले. लोकसभेत निवेदन करताना चव्हाणांनी केंद्राच्या भूमिकेचे जोरदार समर्थन केले. ते म्हणाले, ''घटनेने कांही नियम घालून दिलेले आहेत. केंद्राने ३५६ व्या कलमाचा वापर केला त्यात गैर कांहीच नाही. राज्यपालांनी मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार निर्णय घेणे गृहीत धरले आहे. राज्यपालाने एकट्यानेच निर्णय घेण्याची पद्धत सुरू केली तर मग फेडरल पद्धत संपुष्टात येईल. पक्षबदलूंची संख्या फार झपाट्याने वाढत

आहे. सव्वा वर्षात म्हणजे मार्च १९६७ ते जून १९६८ च्या दरम्यान पक्षबदलामुळे एकूण १६ राज्य सरकारे गडगडली आहेत. लोकशाहीशी हे सुसंगत दिसणारे नाही. राजकीय चित्र बदलणे म्हणजे राजकीय पक्ष बदलून चित्र बदलणे नव्हे." १९६७ ते १९६९ या दोन वर्षांत विरोधी पक्षीय खासदारांनी गृहमंत्री यशवंतराव यांना खिळून ठेवले होते. तथापि गृहमंत्री हा कांही लेचापेचा नसून कणखर, दमदार, आत्मविश्वाससंपन्न असल्याचा अनुभव विरोधकांना आला आणि त्यांनी हळूहळू आपला पवित्रा बदलला. चव्हाण हे एक उत्तम संसदपटू आहेत, कर्तृत्ववान आहेत हे विरोधकांनी मान्य केले.

उत्तर भारतात जनसंघाचा प्रभाव वाढून काँग्रेस पक्ष लोकांमध्ये अप्रिय होऊ लागला होता. त्याचे मुख्य कारण काँग्रेसचे कार्यकर्ते आणि नेते यांची प्रतिमा स्वच्छ राहण्याऐवजी मलीन होत चालली होती. पक्षाचे कार्यक्रम राबविण्याकडे कार्यकर्त्यांनी दुर्लक्ष केले होते. १९६७ नंतर १९६९ पर्यंत ठिकठिकाणी जातीय दंगली उसळून कायदा आणि सुव्यवस्थेची अवघड समस्या गृहमंत्रालयासमोर उभी ठाकली. रांची येथे ऑगस्ट १९६७ मध्ये जातीय दंगल उसळली व तिचे लोण देशात ठिकठिकाणी पोहोचले. एकट्या रांचीमध्ये दंगलीत १५५ लोक प्राणास मुकले होते. गृहमंत्री चव्हाण यांनी त्वरित रांचीकडे धांव घेऊन बिहार सरकारशी चर्चा केली. जरूर ती पोलीस मदत त्यांना दिली आणि दंगल शमविली. रांची मागोमाग श्रीनगर येथील वातावरण प्रक्षुब्ध झाले. यशवंतरावांनी काश्मिरकडे त्वरित धांव घेतली. मंत्री, निरनिराळ्या धर्मांचे नेते यांना एकत्र आणून, विचारविनिमय करून तेथे शांतता प्रस्थापित केली. तेथून परत येतात नाही तोच उत्तर प्रदेशात कांही ठिकाणी आणि पाठोपाठ महाराष्ट्रात दोन-तीन ठिकाणी जातीय दंगली उसळल्या. यामागे कांही राजकीय शक्तींचा हात असून जातीय पक्षांच्या नेत्यांशी, काही सरकारी अधिकाऱ्यांनी हातमिळवणी केली असल्याची माहिती सरकारच्या हातात पडली. १९६८ मध्ये उत्तर प्रदेश, केरळ, म्हैसूर राज्यांत दंगली घडून आल्या. आसाम, पश्चिम बंगालपर्यंत त्या पसरल्या. १९६९ मध्ये गुजरातेत अहमदाबादला जवळ जवळ आठ-दहा दिवस दंगल घडवून आणण्यात आली. कोट्यवधी रुपयांची मालमत्ता जाळपोळीत-लुटालुटीत नष्ट झाली. शेकडो कार्यकर्ते मारले गेले. जनसंघ आणि मुस्लीम लीगचे कार्यकर्ते यांचा या दंगलीशी संबंध असल्याचे बोलले जाऊ

लागले, वृत्तपत्रांतून लिहिले जाऊ लागले. जनसंघाने मुस्लिमांविरुद्ध प्रचाराची धमाल उडवून दिली होती. यशवंतरावांनी लोकसभेतील चर्चेत जनसंघाच्या या भूमिकेबद्दल तीव्र नापसंती व्यक्त करून इतिहासाचे विकृत चित्र निर्माण करण्याचे उद्योग सोडून द्या असे आवाहन केले. महाराष्ट्रात आपण मागे नाही हे दाखवून देण्यासाठी भिवंडी, जळगांव येथे दंगली माजविण्यात आल्या. यशवंतरावांनी तिकडे धांव घेऊन परिस्थितीची पाहणी केली. केंद्रीय गृहमंत्री राज्या-राज्यातील दंगलीची पाहणी करण्याकरिता स्वतः तिकडे धांव घेतो, दंगली थांबविण्यासाठी कडक उपाययोजना करतो हे प्रथमच घडल्याने दिल्लीकरांना गृहमंत्र्यांचे कौतुक वाटले. वृत्तपत्रांनीही वाखाणणी केली.

जातीयवादाच्या प्रसाराबरोबर प्रांतवाद, भाषिकवादानेही डोके वर काढले. आसाम, पश्चिम बंगाल, ओरिसा, महाराष्ट्रात प्रांतवादातून दंगलीचे प्रकार घडू लागले. "भुमिपूत्र" या नांवाखाली महाराष्ट्रीयांनाच नोकऱ्यात आणि अन्य उद्योग-व्यवसायात सवलती मिळायला हव्यात, महाराष्ट्र हा फक्त महाराष्ट्रीयांकरिता आहे अशा घोषणा देऊन शिवसेनेने मुंबईत लुटालूट, दमदाटी सुरू केली, प्रादेशिक भावना चेतविल्या. यशवंतरावांनी शिवसेनेच्या प्रांतीय चळवळीला "हुकूमशाही" संबोधून कडाडून हल्ला चढविला. शिवसेनेवर उघडपणे टीका करणारे यशवंतराव हे महाराष्ट्रातील पहिलेच काँग्रेसचे नेते होते. त्यांनी मुंबईतही टीका केली आणि लोकसभेतही. भिवंडीच्या दंगलीला शिवसेना जबाबदार असल्याचे निक्षून सांगितले. महाराष्ट्र काँग्रेसचा किंवा महाराष्ट्र सरकारचा शिवसेनेला आधार नाही हे स्पष्ट शब्दांत त्यांनी सांगितले. यामुळे यशवंतरावां-संबंधी दिल्लीत "शिवसेनेचे पाठीराखे" अशी जी कुजबूज चालू होती ती बंद पडली.

✦✦✦

## : ९ :

नक्षलवाद्यांचा उठाव आणि संस्थानिकांचा तनखा–खास सवलती या दोन जटिल प्रश्नांना तोंड देण्यात यशवंतरावांनी जो कणखरपणा दाखविला त्यामुळे त्यांची प्रतिमा अधिक उंचावली. एखाद्या प्रश्नाच्या मुळाशी जाऊन कारणपरंपरा शोधायची, सामाजिक-आर्थिक परिस्थितीशी हे प्रश्न निगडित आहेत कां याची तपासणी करायची आणि मग धोरण आंखायचे हा त्यांचा पिंड बनून गेला होता. प्रत्येक बाबतीत कायदा, बडगा, दडपादडपी यांचा अवलंब करण्यास ते नाखूष असत. प. बंगालमधील सिलिगुडी भागात १९६७ मध्ये कम्युनिस्टांनी उचल खाल्ली.शेतकऱ्यांच्या पाठीशी आपण उभे आहोत हे दाखविण्याकरिता आंदोलन सुरू केले. विधिमंडळाच्या निवडणुकीत काँग्रेसला बहुमत मिळू न शकल्याने कम्युनिस्टांबरोबर संमिश्र सरकार राज्यात बनवावे लागले होते. या घटनेमुळे डाव्या कम्युनिस्टांनी जोर धरला. त्यातल्या जहालांनी स्वतःला "नक्षलवादी" म्हणवून घेऊन सशत्र उठावाचा प्रयत्न केला. त्यांनी चीनशी संपर्क साधला आणि शस्त्रे मिळविली. भारत-चीन सीमेलगतच्या दार्जिलिंग जिल्ह्यात भूमिहीन शेतकरी, आदिवासी यांची जमिनदार पिळवणूक करीत. आदिवासींनी मेहनत करून पिकविलेले अन्नधान्य जमिनदारच लाटीत. याला प्रतिबंध म्हणून नक्षलवाद्यांनी, भूमिहीन शेतकऱ्यांचा प्रश्न हाती घेतला आणि जमिनदारांकडील जमीन काढून घेऊन शेतकऱ्यांना वाटायला सुरुवात केली. कनु संन्याल नांवाचा जहाल नक्षलवादी या चळवळीचा नेता बनला. पोलिस आणि शेतमजुरांच्यात चकमकी झडू लागल्या. दोन्ही बाजूंनी मनुष्यहानी होऊ लागली. नक्षलवादी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भागात कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनला. नक्षलवाद्यांचा उपद्रव सुरू

झाल्यावर लोकसभेच्या माध्यमातून देशातील जनतेला यशवंतरावांनी स्पष्टपणे कल्पना दिली की चीनच्या माओच्या चिथावणीने भारतात क्रांती घडवून आणण्याचा नक्षलवाद्यांचा प्रयत्न सुरू झाला आहे. 'सशत्र उठाव करून क्रांती करण्याचे स्वप्न कोणी पाहत असतील तर सरकार ते प्रयत्न धुळीस मिळविल्याशिवाय राहणार नाही' असा इशाराही त्यांनी दिला. या इशाऱ्यानंतर निव्वळ पोलीस शक्तीचा वापर न करता चव्हाणांनी भूमिहीनांच्या -- आदिवासींच्या दुरावस्थेचे सामाजिक-आर्थिक विषमतेचे कारण दूर करण्यावर भर दिला. नेमके याचवेळी कम्युनिस्टात फुटीला सुरुवात झाली. कनु संन्याल यांनी आपला सवतासुभा उभा केला. तथापि चीनने नक्षलवाद्यांचे अपेक्षेप्रमाणे मदत पाठविण्याबाबतचा हात आंखडता घेतला. मग गुंडगिरी, दडपशाही आदि मार्गाचा अवलंब करण्याचा, विद्यार्थ्यांना, कामगारांना भडकविण्याचा नक्षलवाद्यांनी प्रयत्न करून पाहिला. तथापि त्यात यश न येता शेकडो नक्षलवादी पोलिसांच्या हाती लागून कोठडीत डांबले गेले. नक्षलवाद्यांकडून डावे कम्युनिस्ट मारले गेले. उजव्या कम्युनिस्टांना मात्र त्यांनी आपले लक्ष्य बनविले नाही. नक्षलवादी चळवळीचा ढाचा माओच्या तंत्रासारखा होता. ग्रामीण भागावर त्यांनी लक्ष केंद्रित केले होते. एका बाजूला नेपाळ, दुसऱ्या बाजूला पाकिस्तान आणि लगत चीनची हद्द अशा मोक्याचे ठिकाणी नक्षलवादी जोर पकडून होते. काँग्रेसने पुरोगामी धोरण स्वीकारून असंतोषाची कारणे दूर केली तर नक्षलवादी चळवळ आपोआप बारगळेल हा गृहमंत्री चव्हाणांचा होरा खरा ठरला.

काँग्रेसचे नेते १९६७ निवडणुकीतील पराभवामुळे चिंताग्रस्त बनले होते. वचनपूर्तीच्या राजकारणाची भाषा त्यांचेकडून ऐकू येऊ लागली. पक्ष आणि जनता यांना जवळ आणावे, पुरोगामी कार्यक्रमात लोकांना सहभागी करून घ्यावे, असे नेते बोलू लागले. दिल्लीतील अधिवेशनात एका गटाने जोर धरून वचनपूर्तीच्या धोरणाची मागणी केली आणि त्यातून दहा कलमी आर्थिक कार्यक्रम पुढे आला. बहुसंख्य काँग्रेसजनांनी त्याला पाठिंबा दर्शविला. दहा कलमी कार्यक्रमात संस्थानिकांच्या खास सवलती रद्द करण्यात याव्यात याचा अंतर्भाव करण्यात आलेला होता. काँग्रेस कार्यकारिणीची याला सहमती होती. खासदार मोहन धारिया यांनी संस्थानिकांचे तनखे रद्द करावेत अशी दुरुस्ती सुचविली. मतदानात

१७ विरुद्ध ४ मतानी दुरुस्ती संमत झाली. यानंतर सरकार जरूर ती पावले उचलेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात असतानाच मोरारजी देसाई आणि स. का. पाटील यांनी दुरुस्तीबाबत आपली नापसंती व्यक्त केली. धारियांच्या दुरुस्तीला विरोध दर्शवून काहींनी "वेडेपणा," "विश्वासघात" अशी विशेषणे लावली. होय, नाही अशी उलटसुलट चर्चा काँग्रेसजनातच सुरू झाली. ठराव आपल्यावर लादला जात आहे असे कांही नेत्यांनी बोलून दाखविले. तनखे बंद करण्याचा स्वतंत्र ठराव हा काँग्रेस अधिवेशनात लोकशाही पद्धतीने संमत व्हायला हवा असे मत पंतप्रधान इंदिरा गांधींनी व्यक्त केल्यामुळे जबलपूर काँग्रेस अधिवेशनात ठराव मांडण्यात आला. त्यावर चर्चा होऊन तो संमत झाला. दहा कलमी कार्यक्रमापैकी एक कलम असे जबलपूर काँग्रेस अधिवेशनात त्याच्यावर शिक्कामोर्तब केले गेले. त्यानंतर यशवंतरावांनी संसदेत निवेदन केले. "सरकार दहा कलमी कार्यक्रमाला बांधील असल्याने तनखे रद्द करण्याच्या निर्णयालाही बांधलेले आहे." या निवेदनावर गृहात चर्चा झाली. विरोधकातील डाव्यांनी आणि कांही काँग्रेस सदस्यांनी या कार्यक्रमाला पाठिंबा दर्शविला. चव्हाणांनी आपल्या भाषणात जनसंघ, स्वतंत्र पक्ष यांच्या प्रतिगामीत्वावर कडाकडून हल्ला चढविला. जनसंघाचे बलराज मधोक हे इंदिरा गांधींच्याबद्दल टीका-टिपणी करू लागताच चव्हाणांनी त्यांना खडसावून सांगितले, "इंदिराजी या गृहाच्या नेत्या असून लोकांनी त्यांना निवडून दिल्यामुळे त्या पंतप्रधानपदी आहेत. नेहरूंच्या कन्या म्हणून नव्हे. राजे लोकांचे तसे नाही. राजाचा मुलगा राजा बनतो आणि त्याला तनखा मिळू लागतो. सर्व नागरिकांना समान हक्क याबद्दल आपण बोलत असतो. पण महिना दीडशे रुपये मिळविणारा कारकून आणि वारसा हक्काने लक्षावधी रुपये मिळविणारे राजे-महाराजे यांना बरोबरच मानायचे कां ? सामान्य नागरिकाला प्राप्तीकर भरावा लागतो मग संस्थानिकांना हा कर माफ कशासाठी ? प्रजासत्ताक देशात दोन प्रकारचे नागरिकत्व चालू द्यायचे कां ? म्हणे घटनेने दिलेले हक्क व संरक्षण सरकारला कसे काढून घेता येतील ? आम्ही भारतीय जनतेला शिक्षण, नोकऱ्या, चांगले राहणीमान देण्यास बांधलेले आहोत. संस्थानिकांच्या चैनीला आणि ऐषाआरामाला नाही. आमचा निर्णय पक्का असून त्याची अंमलबजावणी होणारच."

राष्ट्रपतींच्या वटहुकूमाने संस्थानिकांचे तनखे व खास सवलती त्वरित रद्द करून टाकाव्यात याकडे चव्हाणांचा कल होता. घटना दुरुस्तीसाठी ते अनुकूल होते. कायदामंत्री ना. गोविंद मेनन यांचे मत विचारता त्यांनी सांगितले की राष्ट्रपतींच्या वटहुकूमाने तनखे रद्द करणे कायद्याच्या विरुद्ध नाही. तथापि मंत्रिमंडळाचे मत पडले की संस्थानिकांशी वाटाघाटी कराव्यात. खास सवलती त्वरित रद्द कराव्यात पण तनखे टप्प्याटप्प्याने रद्द करावेत. त्याचबरोबर वटहुकूमाऐवजी घटना दुरुस्ती करून या गोष्टी करण्यात याव्यात असेही सर्वसाधारण मत दिसून आले. घटनेतील कलमांनी संस्थानिकांचे तनखे आणि खास सवलती यांना संरक्षण देण्यात आलेले होते हे खरे. म्हणून घटना दुरुस्ती करावी याकडे बऱ्याच मंत्र्यांचा कल दिसून येत होता. चव्हाणांच्या भूमिकेबद्दल काँग्रेसच्या कांही नेत्यांनी गैरसमज पसरविण्याचा प्रयत्न करून पाहिला. इंदिरा गांधींच्या समजल्या जाणाऱ्या गटाविरुद्ध भूमिका घेवून चव्हाण पक्षात फूट पाडत आहेत असे म्हणण्यापर्यंत काहींची मजल गेली. सप्टेंबर-ऑक्टोबर १९६७ असे दोन महिने हा गोंधळ चालल्यावर संस्थानिकांशी प्रत्यक्ष वाटाघाटी करण्याचे ठरले. त्याप्रमाणे नोव्हेंबरात यशवंतरावांनी संस्थानिकांच्या कन्कॉर्ड बरोबर बोलणी सुरू केली. बडोदा नरेश फत्तेसिंह गायकवाड हे वरील संघटनेच्या सुकाणू समितीचे अध्यक्ष होते. यशवंतरावांनी बडोदा महाराजांना कल्पना दिली की खास सवलती आणि तनखे रद्द करण्याचा सरकारचा इरादा पक्का आहे. दरम्यानच्या काळात कांही वेगळी व्यवस्था करता येईल कां हे पाहण्यास माणुसकीच्या दृष्टिकोनातून सरकार तयार आहे. फत्तेसिंह गायकवाडांना वाटाघाटातील प्रगतीविषयी विचारले असता त्यांनी सांगितले, "तुमच्या अंगावरील कपडे उतरून घेत आहोत असे सांगितले तर काय वाटेल ! सरदार पटेल आणि यशवंतराव चव्हाण यांच्या भूमिकेत फारसा बदल आहे असे मला वाटत नाही."

संस्थानांच्या विलिनीकरणाचे वेळी सरदार पटेलांनी विलीनीकरणाबाबत जो करार करून घेतला त्यात संस्थानिकांच्या इतर हक्कांबरोबर महसूल वसुलीचाही हक्क काढून घेतला. त्या बदलात त्यांनी कांही सवलती व तनखा देण्याचे मान्य केले. स्वातंत्र्यप्राप्तीचे वेळी एकूण लहान-मोठी ५५२ संस्थाने अस्तित्वात होती आणि त्यांनी भारताचा दोन पंचमांश भाग व्यापलेला होता. सरदारांनी २८४

संस्थानिकांना तनखा देऊ केला आणि बाकींच्याकडे जमिनदारी हक्क ठेवले. तनख्यापोटी वर्षाला एकूण साडेपाच कोटी रुपये द्यावे लागत असत. ही रक्कम पुढे कमी होत जाऊन वर्षाला साडेचार कोटीवर आली. १७५ संस्थाने अशी होती की त्यांना वर्षाला फक्त एक लक्ष रुपये तनखा मिळत होता. ७७ जणांना १ ते ५ लक्ष रुपये, १९ जणांना ५ ते १० लक्ष रुपये आणि म्हैसूर, हैदराबाद, त्रावणकोर, बडोदा आदि संस्थानिकांना मात्र दरसाल १० ते ३० लक्ष रुपये तनखा मिळत असे. ज्या खास सवलती देण्यात आलेल्या होत्या त्यात मोफत वैद्यकीय मदत (कुटुंबियांसह), सशस्त्र सुरक्षा व्यवस्था, निवासावर, मोटारवर, विमानावर संस्थानचा ध्वज, तनख्यावर प्राप्तीकराची माफी, शस्त्रे बाळगण्यासंबंधीच्या कायद्यातून सूट, मोटारीवर तांबडी नंबर प्लेट, कोर्टात खटला भरण्यासाठी सरकारी परवानगी इत्यादींचा या खास सवलतीत समावेश होता. सरदार पटेलांना संस्थानिकांबद्दल जरा सहानुभूती वाटायची. ज्यांनी आपले राज्य आणि राजेपण सोडायची तयारी दर्शविली, त्यांना तनखे देणे म्हणजे फार मोठी मेहरबानी नव्हे, असे सांगून सरदार पटेल म्हणत, "देशात स्थैर्य निर्माण करण्याचे दृष्टीने राजे-महाराजांना नाराज करणे, कष्टी करणे बरोबर होणार नाही."

१९४८ नंतर बरोबर वीस वर्षांनी गृहमंत्री चव्हाण यांनी संस्थानिकांचे तनखे चालू ठेवण्याबाबत नव्याने भूमिका घेतली. चव्हाण म्हणाले, "वीस वर्षांत पुष्कळ घडामोडी घडलेल्या आहेत. पुष्कळांचे वारसा हक्क, खास सवलती नामशेष झालेल्या आहेत. काळ बदलला आहे, रोज बदलत आहे. सामान्य माणसाचा विचार केला जाणे गरजेचे आहे. कन्कॉर्डचे प्रतिनिधी आणि यशवंतराव यांच्यात पुन्हा दुसऱ्यांदा बोलणी झाली तेव्हा चव्हाणांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की तनखे आणि खास सवलती पुढे चालू ठेवणे सरकारला शक्य होणार नाही. बडोदा नरेश फत्तेसिंह गायकवाड यांनी अशी भूमिका घेतली की पूर्वीचा निर्णय बदलण्यासारखे नव्याने कांहीही घडलेले नसताना संस्थानिकांवर आपत्ती कशासाठी ? दुसऱ्या नरेशांनी सांगितले की, देशात कम्युनिस्ट राजवट असती तर आम्ही समजू शकलो असतो. तथापि काँग्रेसने हे नवे धोरण स्वीकारण्याचे काय कारण ? चव्हाणांनी त्यांना उत्तर दिले, "कष्ट न करता संपत्ती मिळविणे, वारसा हक्काने खास सवलती उपभोगणे

हे समाजवादाशी विसंगत असल्याने तनखे व खास सवलती रद्द करण्याचे सरकारने ठरविले आहे.'' संस्थानिक आणि गृहमंत्री यांच्यात दोन वेळा बोलणी फिसकटल्याने प्रश्न गुंतागुंतीचा होतो की काय असे बोलले जाऊ लागले. मोरारजी देसाईंची इच्छा होती की तनख्याबद्दल एवढी घाई करू नये. पंतप्रधान इंदिराजी यादेखील टप्प्याटप्प्याने तनखे कमी करीत संपवावेत या मताच्या होत्या. गृहमंत्र्यांचे मत मात्र असे होते की जर काँग्रेसने दहा कलमी कार्यक्रमाचा स्वीकार केला असेल, लोकशाहीवर काँग्रेसची निष्ठा असेल तर संस्थानिकांच्या बाबतीत ममत्व दाखविणे योग्य ठरणार नाही. संपत्तीचा आणि सवलतीचा वीस वर्षे उपभोग घेतल्यानंतर राजेमहाराजांचे कोडकौतुक करण्याचे कारण काय ? संस्थानिकांशी पुन्हा तिसरी बैठक दिनांक २ मे, १९६२ रोजी झाली. बडोदा नरेशांनी गृहमंत्र्यांना सांगितले की, तनखे रद्द करण्यास आणि खास सवलती काढून घेण्यास संस्थानिकांची संमती नाही. धांगध्राचे महाराजांनी स्पष्ट शब्दात सांगितले की वाजवी तडजोड करण्यास संस्थानिक तयार आहेत, तथापि स्वाभिमानाला धक्का लावून देणयास तयार नाहीत. मोरारजी देसाई यांचा हवाला देऊन सांगण्यात आले की संस्थानिकांचे बाबतीत सरकारने ज्या बाबी पूर्वी मान्य कलेल्या आहेत त्यांना सरकार धक्का लावणार नाही. त्यावर यशवंतरावांनी नरेशांना सांगितले की सरकारचा निर्णय कोणा व्यक्तीविरुद्ध नाही की नरेशांच्या स्वाभिमानाला धक्का लावण्याचे दृष्टीने घेतलेला नाही. ऐतिहासिक बदल डोळ्यापुढे ठेऊन निर्णय घेण्यात आलेला आहे, तो मान्य करण्यात यावा. नरेशांचा निर्णय लवकर झाला नाही तर सरकारला पुढचे पाऊल उचलणे भाग पडेल.

बडोदा नरेश फत्तेसिंह गायकवाड हे सुविद्य, सरळ, सालस होते. काँग्रेस पक्षात होते आणि कांही काळ मंत्रिमंडळातही होते. चव्हाणांचा आणि त्यांचा दृढ परिचय होता, स्नेह होता. एकमेकांत आदराची, आपुलकीची भावना होती. चव्हाणसाहेब 'विशाल सह्याद्रि' ट्रस्टचे संस्थापक, फत्तेसिंह महाराज अध्यक्ष आणि अनंतराव पाटील सचिव होते. पाटील हे १९६७ ते १९७७ लोकसभेचे सदस्य पण होते. एकदा श्री. पाटील ट्रस्टचे अध्यक्ष फत्तेसिंह महाराजांना भेटण्यासाठी त्यांच्या दिल्लीतील डुप्लेक्स लेनमधील निवासस्थानी गेले असता महाराज म्हणाले,

"तनख्याबद्दल यशवंतरावजी एवढे लावून कां बरे धरीत आहेत ! मोरारजीभाई आणि इंदिराजी यांना चव्हाणसाहेबांची जल्दबाजी -- घाई मान्य नाही. एवढेच नव्हे तर चव्हाणांनी यापुढे संस्थानिकांशी बोलणी बंद करावीत अशी त्यांची इच्छा आहे. संस्थानिकांत यशवंतराव अकारण अप्रिय होत आहेत. आम्हा सर्वांना त्यांचेबद्दल आदर आणि आस्था वाटते म्हणूनच मी तुमच्याजवळ हा विषय काढला. त्यांच्या पाठीमागे कांय चालले आहे हे तुम्ही त्यांच्या कानावर घालावे." मंत्रिमंडळाच्या पातळीवर चाललेल्या चर्चेबाबत खासदाराने मध्ये तोंड खुपसून गृहमंत्र्यांना कांही सांगावे याला अनंतरावांचे मन तयार होईना. तथापि मोरारजीभाईंचा उतावळेपणा लक्षात घेऊन चव्हाणसाहेबांना सावध करण्यासाठी श्री. पाटील यांनी फत्तेसिंह गायकवाड यांचेशी झालेल्या भेटीचा गोषवारा गृहमंत्र्यांना सांगितला. मंत्रिमंडळाचे बैठकीत तनखा रद्द करण्याचे प्रश्नावर चालढकल कां केली जाते हे यशवंतरावांच्या लक्षात आले आणि त्यांनी पंतप्रधानांना स्वच्छ शब्दांत सांगितले की, मोरारजीभाईंना संस्थानिकांशी चर्चा करायची असेल तर खुशाल करू द्या, माझी ना नाही. इंदिराजींनी मोरारजींना विचारले आणि त्यांनी आपला होकार दर्शविला. देसाईंनी नरेशांशी बोलून पाहिले पण त्यात यश येण्याऐवजी अपयशच पदरी पडले. त्यानंतर घटना दुरुस्ती करण्याचे दृष्टीने बिलाचा मसुदा तयार करण्यात आला. अंदाजपत्रकी अधिवेशनात बिल मांडण्याची तयारी झाली. पंतप्रधान इंदिरा गांधी द्विधा मनःस्थितीत असल्याचे अनुभवास आले. त्या चव्हाणांना म्हणाल्या, 'थोडे थांबू या. अंदाजपत्रकी अधिवेशनात बिल मांडण्याऐवजी नंतर मांडू या.' चव्हाणांना यामागील भूमिकेचा आशय समजला. मंत्रिमंडळाच्या कित्येक बैठकीत त्यांना असाच अनुभव आलेला होता. या खेपेला चव्हाणांचा निश्चय पक्का होता. त्यांनी दि. १८ मे, १९७० रोजी लोकसभेपुढे बिल सादर केले.

बिलात फक्त तीन कलमे होती. उद्देश आणि कारणे देणाऱ्या निवेदनात सरकारने आपली बाजू स्पष्ट केलेली होती. बदलत्या जमान्यात, लोकशाही-समाजवादाचा स्वीकार केलेल्या जमान्यात राजे-महाराजे आणि त्यांचे तनखे व खास सवलती बसत नाहीत. बिलाच्या तरतुदीत घटनेतील कलमे २९१व ३६२ वगळावीत, तसेच कलम ३६६ मधील उपकलम २२ वगळावे असा समावेश केलेला

होता. गंमत अशी होती की गृहमंत्री जेव्हा नरेशांशी बोलणी करीत होते तेव्हां पंतप्रधानही स्वतंत्रपणे बोलणी करीत होत्या. त्यांना अपेक्षा वाटत होती की संस्थानिक कांहीतरी तडजोडीला तयार होतील. पंतप्रधानांचे वतीने कांही मध्यस्थही संस्थानिकांना भेटून येत होते, बोलणी करीत होते. पंतप्रधान या नात्याने इंदिराजींना बोलण्याचा अधिकार होता हे खरे. पण गृहमंत्र्यांच्या पाठीमागे परस्पर चर्चा कां असा प्रश्न कित्येक खासदार आपापसात विचारायचे. संस्थानिकांचा हटवादीपणा इंदिराजींच्या उशीरा लक्षात आला. मग मात्र त्यांनी बिलाबाबत आग्रह धरण्यास सुरुवात केली. १९७० च्या सप्टेंबर महिन्यात पावसाळी अधिवेशनात बिलावर चर्चा सुरू करण्यात आली. त्यावेळी चव्हाणांच्याकडे गृहखाते नव्हते तर अर्थखाते होते. मध्यंतरी काँग्रेस पक्षात बऱ्याच घडमोडी घडलेल्या होत्या. गृहखाते स्वतः इंदिराजींनी आपल्याकडे घेतले होते. बिल मांडताना भाषणात इंदिराजी म्हणाल्या, "समानता, सामाजिक न्याय या संकल्पना अंमलात आणायच्या असतील तर संस्थानिकांचे तनखे आणि खास सवलती रद्द करायलाच हव्यात. सरकार नरेशांविरुद्ध नाही. तथापि त्यांनी बदल लक्षात घ्यायला हवा. हा बदल शांततेने व्हावा अशी इच्छा आहे."

बिलावर बोलण्यास यशवंतराव राजी नव्हते. पंतप्रधान श्रीमती गांधी, काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद श्री. रघुरामय्या यांनी आग्रह धरल्यावर यशवंतराव बोलावयास राजी झाले. चव्हाण म्हणाले, "तनखा आणि खास सवलतींचा प्रश्न गेली दोन-अडीच वर्षे आपण हाताळीत आहोत. संस्थानिकांशी सरकारने जी बोलणी केली त्या मागील उद्देश हा की कामचलाऊ मार्ग काढता येतो कां हे पहावे. आपण संस्थांनिकांशी बोललो, मोरारजीभाई बोलले, पंतप्रधान बोलल्या, पण संस्थानिकांना सरकारशी खऱ्या अर्थाने वाटाघाटी करायच्याच नव्हत्या. ते काळकाढूपणा करीत होते. संस्थानिकांशी पूर्वी जो करार करण्यात आला आहे तो राजकीय आहे. तो रद्द करण्याचा सरकारला अधिकार आहे. सरदार पटेलांपेक्षा आम्ही कांहीही वेगळे करीत नाही. ऐतिहासिक गरज म्हणून सरदारांनी जे पाऊल उचलेले तेच पाऊल हे सरकार उचलीत आहे. इतिहासाला आपण मागे नेऊ शकत नाही. विरोधकांना उलट पोहून जायचे असेल तर त्यांनी तसा प्रयत्न करावा. मी त्यांना 'अमीन' म्हणेन, बस्स !

२ सप्टेंबर, १९७० रोजी लोकसभेने ३३९ विरुद्ध १५४ मतांनी बिल मंजूर केले. पंतप्रधानांनी ४ सप्टेंबरला ते राज्यसभेपुढे सादर कले. बिलावर चर्चा झाली. जुने कॉंग्रेसवाले, स्वतंत्र व जनसंघाचे सदस्य यांचा सूर वेगळा वाटला. घटना दुरुस्ती बिल असल्याने ते दोनतृतीयांश बहुमताने संमत व्हायला हवे होते. तथापि मतदानात बिलाचे बाजूने १४९ आणि विरुद्ध ७५ मते पडली. अल्पमताने बिल मंजूर झाले. त्यानंतर मंत्रिमंडळाची तांतडीची बैठक बोलविण्यात आली. खूप चर्चा झाली. अखेरीस राष्ट्रपतींच्या वटहुमूकाने तनखे रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. ६ सप्टेंबर, १९७० रोजी राष्ट्रपतींनी वटहुकूम काढून संस्थानिकांचे तनखे रद्द केले. राज्यसभेतील मतदानात प्रतिगामी उजव्या पक्षांनी आणि हितसंबंधींनी हातमिळवणी करून बिल पराभूत केले होते. राष्ट्रपतींच्या वटहुकूमाला आव्हान देणारा अर्ज कांही संस्थानिकांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केला. अकरा न्यायमूर्तींच्या पीठासमोर सुनावणी सुरू झाली. सप्टेंबर १५ ला न्यायालयाने ९ विरुद्ध २ अशा मतांनी राष्ट्रपतींचा वटहुकूम घटनाबाह्य असा निर्णय दिला. संस्थानिकांचे तनखे-सवलती पुन्हा सुरू झाल्या. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाने सरकारला धक्का बसला. तथापि ज्या बिलाचे, ज्या धोरणाचे देशाने स्वागत केले त्याला न्यायालयाने दिलेला नकार लोकांना पसंत पडला नाही. तथापि तो मान्य करावा लागला. पुरोगामी धोरणाला कांही काळ मुरड घालावी लागली. गृहखाते तीन वर्षे आठ महिने सांभाळण्याची जबाबदारी यशवंतरावांनी पार पाडली. 'अशांत दशकातील' हा कालखंड म्हणजे वेगवेगळी आव्हाने, धमक्या, अडचणी, प्रश्न यांनी भरलेला होता. यशवंतरावांनी मोठ्या धैर्याने, कणखरपणाने समस्यांना तोंड दिले. ह्या देशाची घटना टिकावी, लोकशाही मजबूत व्हावी म्हणून सर्व प्रकारचे धक्के सहन केले. गृहखात्याच्या त्यांच्या कारकिर्दीचे सर्वत्र कौतुक झाले. कारकीर्द संस्मरणीय गणली गेली.

कॉंग्रेसचे अध्यक्ष आणि पंतप्रधानपद वेगवेगळे असावे की एकाच व्यक्तीकडे ही दोन्ही पदे असावीत यासंबंधीचे मतभेद कॉंग्रेसमध्ये फार जुने होते. त्याचप्रमाणे कॉंग्रेसचा संघटनात्मक विभाग आणि संसदीय विभाग यांचे संबंध, स्थान, जबाबदाऱ्या याबद्दलचे मतभेद आणि ताण-तणावही जुने होते. १९६९ मध्ये कॉंग्रेस

पक्षात जी दुफळी निर्माण झाली ती वरील ताण-तणावांची परिणती होती. नेहरूंचे व्यक्तिमत्त्व, त्यांचे नेतृव, त्यांचे संघटनेतील स्थान, त्यांची विचारसरणी, कामाचा झपाटा हा आगळा आणि वैशिष्ट्यपूर्ण होता. १९४६ मध्ये पंतप्रधानपद स्वीकारल्यावर नेहरूंनी काँग्रेसचे अध्यक्षपद सोडले. काँग्रेस संघटनेचे नंतरचे अध्यक्ष नेहरूंच्या पुढे खुजे दिसू लागले. आचार्य कृपलानी काँग्रेसचे अध्यक्ष बनले. दोघांत सामंजस्य निर्माण होण्याऐवजी तणावच निर्माण झाला. संघटनेतील घडामोडींवर नेहरूंचे बारीक लक्ष असायचे. कित्येकदा ते कृपालनींना सूचना करायचे. त्यामुळे पंतप्रधानांचा हा हस्तक्षेप आपल्याला मान्य नाही असे सांगून कृपलानींनी राजीनामा दिला. त्यानंतर १९५१ मध्ये पुरुषोत्तमदास टंडन अध्यक्ष झाले. त्यांचे आणि नेहरूंचे पटले नाही. पंतप्रधान आणि त्यांचे मंत्रिमंडळ हे पक्षसंघटनेला जबाबदार असल्याने पक्षाने ठरविलेली धोरणे त्यांनी राबवायला हवीत असा टंडन यांचा आग्रह असायचा. नेहरूंना हे मान्य नव्हते. त्यांनी एके दिवशी कार्यकारिणीचा राजीनामा पाठवून दिला. त्यासरशी काँग्रेसच्या बहुसंख्य खासदारांनी नेहरूंच्या नेतृत्वावर आपला विश्वास असल्याचा ठराव केला. त्यावर टंडन यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. पक्षाचे अध्यक्षपद नेहरूंनी स्वतःकडे घेतले. त्यामुळे पक्ष आणि सरकारात मतभेद राहण्याचे फारसे कारण उरले नाही. नेहरूंची तब्येत ढासळू लागल्यावर पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांत चिंता निर्माण झाली. त्यातच लोकसभेच्या तीन पोटनिवडणुकांत काँग्रेसचा पराभव झाला. कृपलानी, मसानी, डॉ. लोहिया हे काँग्रेस उमेदवारांचा पराभव करून लोकसभेवर निवडून आले. काँग्रेसच्या नेत्यांना धक्का बसला. अखिल भारतीय काँग्रेसच्या खास अधिवेशनाची मागणी करण्यात आली. त्यानुसार अधिवेशन भरले. पराभवाची मीमांसा झाली. या मीमांसेनुसार एका नव्याच योजनेला जन्म देण्यात आला. ती योजना म्हणजे 'कामराज प्लॅन'. हा प्लॅन खूपच गाजला. त्याच्या अंमलबजावणीने काँग्रेस पक्षात फूट पडण्यास सुरुवात केली.

कामराज म्रदास राज्याचे मुख्यमंत्री होते. काँग्रेस पक्षात जे आघाडीचे नेते आहेत त्यांनी मंत्रीपदाचा राजीनामा देऊन संघटनेच्या कामाला वाहून घ्यावे, संघटना मजबूत करावी असा त्यांच्या प्लॅनचा मतितार्थ होता. त्यानुसार मोरारजी

देसाई, लालबहादूर शास्त्री, स. का. पाटील, जगजीवनराम या केंद्रीय मंत्र्यांनी आणि ओरिसाचे मुख्यमंत्री बिजू पटनाईक आणि काश्मिरचे मुख्यमंत्री बक्षी गुलाम महंमद यांनी मंत्रिपदाचे राजीनामे सादर केले. काँग्रेस पक्षात थोडी खळबळ माजली. आपल्याला हटविण्यासाठी 'कामराज प्लॅन'ची आंखणी केली गेली आहे असे स. का. पाटील आणि मोरारजीभाई देसाई यांनी उघडपणे बोलून दाखविले. त्यानंतर या दोघांनी पुढाकार घेऊन 'सिंडिकेट' या नांवाने काँग्रेसमध्ये आपला गट स्थापन केला. कामराज, एस. निजलिंगप्पा, नीलम संजीव रेड्डी. अतुल्य घोष, मल्या यांनी तिरूपतीला एक बैठक घेऊन तीत काँग्रेसच्या भावी अध्यक्षाबाबत खल केला. या बैठकीला पाटील हजर नव्हते. लालबहादूर शास्त्रींचे नाव निश्चित करण्यात आले. पण त्यांनी स्पष्ट नकार दर्शविला. मोरारजींची इच्छा होती पण ती फलद्रुप होऊ शकली नाही. सिंडिकेटच्या पाठिंब्याने आणि नेहरूंच्या अनुकूलतेने कामराज हे काँग्रेसच्या अध्यक्षपदी विराजमान झाले. जयपूरच्या काँग्रेसच्या अधिवेशनात सिंडिकेटचे नेते जोरात होते. त्यांनी असा ठराव मंजूर करून घेतला की पंतप्रधानांनी वेळोवेळी काँग्रेस अध्यक्षांशी सल्लामसलत करून निर्णय घ्यावेत. नेहरूंच्यावर एक प्रकारे अंकुश ठेवण्याचा हा प्रयत्न होता. भुवनेश्वर काँग्रेसनंतर नेहरूंना अर्धांगवायूचा झटका आला आणि काही दिवसांनी त्यांचे निधन झाले. नेहरूंच्या नंतर कोण, त्यांचा वारस कोण, यावर खलबते सुरू झाली. मोरारजींनी स्वतःसाठी प्रयत्न सुरू केले. तथापि कामराज यांनी यशवंतराव चव्हाणांना आपल्या बाजूला वळवून मुत्सद्दीपणे पावले टाकून मोरारजींना बाजूला टाकले आणि लालबहाद्दूर शास्त्री यांच्याकडे पंतप्रधानपदाची जबाबदारी सोपविली. इंदिरा गांधी, गुलझारीलाल नंदा हे पण पंतप्रधानपदाच्या शर्यतीत होते. तथापि त्यांना सिंडिकेटचा पाठिंबा नव्हता. २ जून १९६४ रोजी संसदीय काँग्रेस पक्षाच्या नेतेपदी शास्त्रीजींची एकमताने निवड करण्यात आली. या साऱ्या घडामोडीत यशवंतरावांचा पाठिंबा मोलाचा ठरला.

✦ ✦ ✦

# : १० :

१९६७ च्या निवडणुकीत कामराज, स. का. पाटील, अतुल्य घोष आदि ज्येष्ठ नेत्यांचा पराभव झाल्यावर 'सिंडिकेट' म्हणून संबोधले जाणाऱ्या काँग्रेसश्रेष्ठींचे बळ कमी झाले. त्याचबरोबर काँग्रेसच्या अध्यक्षांचेही महत्त्व कमी झाले. इंदिरा गांधींची शक्ती दिवसेंदिवस वाढत असल्याचे पाहून कामराज यांनी अध्यक्षपद स्वतःकडे कसे राहील यादृष्टीने हालचाली सुरू केल्या. इंदिराजींनी त्यांचा डाव ओळखून एस. निजलिंगप्पा यांना अध्यक्षपदासाठी पाठिंबा देण्याचा मनाशी निर्णय घेतला. इंदिराजींच्या पाठिंब्याने निजलिंगप्पा अध्यक्ष झाले. तथापि त्यांच्यात आणि इंदिराजींच्यात मतभेदाला सुरुवात झाली. पंतप्रधान आणि मंत्रिमंडळ हे काँग्रेस कार्यकारिणीला जबाबदार असल्याची भूमिका निजलिंगप्पांनी घेतली. इंदिराजींना ते मान्य नव्हते. दोघांतील बेबनाव दिवसेंदिवस वाढत जाऊन त्याचा स्फोट १९६९ च्या बंगलोर अधिवेशनात झाला. जुलै १९६९ मध्ये भरलेल्या या अधिवेशनात निजलिंगप्पा आणि सिंडिकेट अल्पमतात गेले. काँग्रेस पक्ष दोन गटात दुभंगला. इंदिराजी सिंडिकेटला भारी पडल्या. संसदीय काँग्रेस पक्षातही त्यांनी आपले बहुमत प्रस्थापित केले. बंगलोर अधिवेशनानंतर काँग्रेसचे अध्यक्षपद इंदिराजींनी आपल्याकडे घ्यावे असा आग्रह फक्रुद्दिन अली अहंमद आणि जगजीवनराम यांनी धरला. पंतप्रधानपद आणि काँग्रेसचे अध्यक्षपद एकाच व्यक्तीकडे असावे या कल्पनेला यशवंतरावांनी दुजोरा दिला नाही. इंदिरा गांधींना त्यांनी आपले मत स्पष्टपणे सांगितले. जगजीवनराम यांचेकडे अध्यक्षपद द्यावे, असे सुचविले. जगजीवनराम यांनी चव्हाणांची सूचना स्वीकारली, तथापि एक अट घालून. आपल्याकडील मंत्रिपद काढून घेऊ नये अशी ती अट होती. काँग्रेसला उजव्या

विचारसरणीकडे नेणारा एक गट आणि डाव्या विचारसरणीकडे नेणारा दुसरा गट असे दोन गट पडल्यानंतर काँग्रेस संघटनेत रस्सीखेच सुरू झाली. काँग्रेस अभंग राहावी, तुटू नये म्हणून यशवंतरावांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. त्यांनी दोन्ही गटांशी सख्य ठेऊन फरिदाबाद आणि बंगलोर या दोन्ही अधिवेशनात एकीकरणाचे कसोशीने प्रयत्न केले. उजव्या गटाने इंदिराजींना पक्षातून घालवून देण्याचा घाट घातल्यावर दुफळीपासून पक्ष वांचविण्यासाठी यशवंतरावांनी खूप धांवपळ केली. तथापि निजलिंगप्पा गटाने आपला हेका सोडला नाही आणि काँग्रेस पक्ष दुभंगला.

राष्ट्रपती डॉ. झाकीर हुसेन यांचे मे मध्ये निधन झाले. श्री. व्ही. व्ही. गिरी उपराष्ट्रपतिपदावर होते. त्यामुळे त्यांचा हंगामी राष्ट्रपती म्हणून शपथविधी पार पडला. राष्ट्रपतींच्या निधनानंतर उपराष्ट्रपतींना संधी देऊन राष्ट्रपतिपदी बसविले जाते अशी प्रथा पडलेली होती. डॉ. राजेंद्रप्रसाद, डॉ. राधाकृष्णन, डॉ. झाकीर हुसेन ही उदाहरणे होती. त्यामुळे गिरींना वाटले की आपली राष्ट्रपतिपदाचे उमेदवार म्हणून निवड करण्यात येईल. काँग्रेसच्या अध्यक्षपदी असताना व्ही. व्ही. गिरी यांची निजलिंगप्पांनी भेट घेऊन आपला पाठिंबा त्यांना दर्शविला होता. इंदिराजींनी यशवंतरावांना त्यांचे मत विचारले. यशवंतरावांनी या प्रश्नावर विचारच केलेला नव्हता. पूर्वीच्या प्रथेचा उल्लेख त्यांनी केला. इंदिराजींच्याबरोबरील चर्चेत चव्हाणांना असा कल दिसून आला की गिरी यांचेबाबत इंदिराजी तेवढ्या उत्सुक नाहीत. दरम्यान मध्यप्रदेशचे नेते सेठ गोविंददास यांनी बाबू जगजीवनराम यांच्या नांवाची राष्ट्रपतिपदासाठी सूचना केली. बाबूजी हरिजन नेते होते, ज्येष्ठ काँग्रेस नेते होते. अन्न-शेती खात्याच्या मंत्रिपदावर होते. यशवंतरावांना हे नांव पसंत पडले. त्यांनी आपल्या जवळच्या सहकाऱ्यांजवळ आपली पसंती बोलून दाखविली. कामराज यांनी इंदिरा गांधी यांची भेट घेऊन एन. संजीव रेड्डी यांचे नांव राष्ट्रपतिपदासाठी सुचविले. स्वतः संजीव रेड्डी हे पंतप्रधान श्रीमती गांधी यांना भेटले व आपली इच्छा त्यांनी व्यक्त केली. नंतर यशवंतरावांचा पाठिंबा मिळविण्यासाठी त्यांचेशी रेड्डींनी संपर्क साधला. दोघांची भेट झाली. भेटीत रेड्डींनी यशवंतरावांना सांगितले की, निवडणुकीसाठी आपण उत्सुक असल्यास निवडणूक जरूर लढवावी असे इंदिराजींचे म्हणणे पडले. इंदिराजी, निजलिंगप्पा तसेच काही मंत्री परदेशच्या

दौऱ्यावर जाणार असल्याने इंदिराजींनी मोरारजीभाई, कामराज, यशवंतराव, जगजीवनराम आदि काँग्रेसच्या नेत्यांशी याबाबत चर्चा केली. तथापि निर्णय होऊ शकला नाही. जूनच्या मध्यापर्यंत उमेदवाराची निश्चिती करावी असे ठरले. निजलिंगप्पा परदेशच्या दौऱ्यावर रवाना झाले. युरोपच्या दौऱ्यावरून परतल्यावर त्यांनी काँग्रेस कार्यकारिणीची बैठक दिनांक १९ जून रोजी बोलाविली. राष्ट्रपतिपदासाठी सिंडिकेटच्या उमेदवाराला पाठिंबा मिळविण्यासाठी स. का. पाटील, कामराज यांनी वातावरण निर्मितीचा प्रयत्न केला होता. कामराज यांनी या संदर्भात यशवंतरावांचीही भेट घेतली होती. गिरी नकोत हे त्यांनी सांगितले. त्याचबरोबर श्री. रेड्डी योग्य आहेत हे पण सांगितले. तथापि निश्चित स्वरूपाचा निर्णय अद्याप झालेला नाही हेही सांगून टाकले. गिरी यांनी इंदिराजींची भेट घेऊन आपली इच्छा सांगितली आणि निजलिंगप्पांच्या शब्दाचा हवाला दिला. नंतर इंदिराजींनी सिंडिकेटमधील नेत्यांशी, मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांशी, राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली. जूनअखेर त्या जपानला गेल्या आणि ३ जुलै रोजी मायदेशी परतल्या.

राष्ट्रपतिपदाच्या उमेदवारीबद्दल सिंडिकेटमधील नेत्यांमध्ये एकमत दिसून येऊ लागण्याऐवजी मतभेद दिसून येऊ लागले. संजीव रेड्डी यांच्यापेक्षा आपण काय कमी आहोत असे मोरारजी देसाई, कामराज, निजलिंगप्पा यांना वाटू लागले. निजलिंगप्पांचे विशिष्ट नांवाबद्दल ठाम मत होत नव्हते आणि पंतप्रधान इंदिरा गांधी याही आपल्या मनात नेमके काय आहे हे ठामपणे सांगत नव्हत्या. काँग्रेसश्रेष्ठींत संशयाचे वातावरण निर्माण होऊन वेगवेगळ्या हालचाली सुरू झाल्या. त्यात निजलिंगप्पा यांनी १६ जूनला जाहीर करून टाकले की उमेदवाराचे नांव निश्चित करण्यासाठी काँग्रेस पार्लमेंटरी बोर्डाची बैठक एक आठवड्यात बोलाविण्यात येईल. कामराज यांनी सहमतीचे (कन्सेन्सस) चे तुणतुणे सुरू करून गांठीभेटींना सुरुवात केली. चव्हाणसाहेबांना त्यांनी पुन्हा एकदा सांगितले की, गिरी नकोत, रेड्डींना उमेदवारी दिली जावी. यानंतर निजलिंगप्पा यांना बरोबर घेऊन ते इंदिरा गांधींना भेटले. त्यानंतर इंदिराजी हंगामी राष्ट्रपती गिरींना भेटल्या. गिरींनी आपली इच्छा त्यांचेजवळ बोलून दाखविली. इंदिराजींनी त्यांना कसलेही आश्वासन न देता

सांगितले की, इतर पक्षांशी बोलून उमेदवार ठरविणे उपयुक्त ठरेल. इंदिराजींनी नंतर यशवंतरावांना बोलावून घेऊन त्यांचेशी चर्चा केली. पंतप्रधानांचे गैरहजेरीत कोणी कोणी काय काय हालचाली केल्या याची माहिती चव्हाणांनी दिली. सिंडिकेट जोरात असल्याचेही सांगितले. एवढेच नव्हे तर इंदिराजींना पंतप्रधानपदावरून हटविण्याच्या हालचाली सुरू केल्या गेल्या आहेत याची कल्पना पण दिली.

सत्तासंघर्षाच्या या नाटकाचा प्रयोग दिल्लीहून बंगलोरला हलविण्यात आल्यावर निजलिंगप्पांनी कार्यकारिणीच्या सदस्यांना स्पष्ट शब्दांत कल्पना दिली की रेड्डी यांनाच उमेदवारी देण्यात येईल. काँग्रेस अधिवेशनाला जुलै १० रोजी सुरुवात झाली. तब्येत बरी नाही असे सांगून इंदिराजी पहिल्या दिवशी चर्चेला गैरहजर राहिल्या. नंतर त्यांनी आथिंक धोरणासंबंधीचे एक टिपण तयार करून कार्यकारिणीकडे विचारासाठी पाठवून दिले. 'तरुण तुर्क' नांवाचा तरुण सदस्यांचा गट अधिवेशनाला हजर होता. त्यात चंद्रशेखर, कृष्णकांत, मोहन धारिया, आर. के. सिन्हा, चंद्रजित यादव आदि प्रामुख्याने दिसत होते. सी. सुब्रह्मण्यम यांचा आर्थिक धोरणाविषयीचा ठराव चर्चेला घेतल्यावर इंदिराजींचे १५०० शब्दांचे टिपण फक्रुद्दिनअली अहंमद यांनी चिटणीस सादिक अली यांचेकडे दिले. या टिपणाची दखल घेण्याची गरज नाही असे निजलिंगप्पांनी मत व्यक्त केले. तथापि सुब्रह्मण्यम यांच्या ठरावाला ते टिपण जोडले जावे असा एकूण सूर दिसून आला. सहा प्रमुख बँकांचे राष्ट्रीयकरण करावे, औद्योगिक परवान्याचे पद्धतीत आमुलाग्र बदल करावा, मक्तेदारीला आळा घालावा, कामगारांना नफ्यात वांटा दिला जावा, जमीन सुधारणा कायद्यांची कसून अंमलबजावणी करावी आदि मुद्यांवर इंदिराजींनी आपल्या टिपणात भर दिला होता. या टिपणाला स. का. पाटील यांनी विरोध केला. इंदिराजी हजर नव्हत्या. चव्हाणांनी टिपणावरील चर्चेची जबाबदारी आपल्या अंगावर घेतली. इंदिराजींचे मुद्दे स्वीकारावेत आणि नाकारावेत असे दोन गट पडले. चव्हाणांनी मध्यस्थी करून, उभय बाजूंचे योग्य म्हणणे अंतर्भूत करून तारीख ११ जुलै रोजी तडजोडीचा मसुदा तयार केला आणि तो सादर केला. यशवंतरावांचा मसुदा कार्यकारिणीने मान्य केला. राज्य आणि केंद्र सरकारने नव्या आर्थिक कार्यक्रमाची बजावणी त्वरित सुरू करावी असाही आदेश देण्यात आला. बैठक

संपवताना निजलिंगप्पांनी जाहीर केले की राष्ट्रपतिपदाचा उमेदवार निश्चित करण्यासाठी दुसऱ्या दिवशी काँग्रेस संसदीय मंडळाची बैठक भरेल. इंदिराजींनी चव्हाणांशी चर्चा करण्याची इच्छा व्यक्त केली. त्याप्रमाणे यशवंतराव इंदिराजींना भेटण्यास गेले. फक्रुद्दिनअली अहंमद तेथे हजर होते. गिरी आणि जगजीवनराम ही दोन्ही नांवे आपल्यापुढे आहेत, काय करायचे ? त्यावर चव्हाणांनी इंदिराजींना सल्ला दिला की याबाबत श्री. कामराज आणि मोरारजीभाईंशी बोलणे इष्ट ठरेल.

दुसरे दिवशी अखिल भारतीय काँग्रेसच्या अधिवेशनात आर्थिक ठराव यशवंतराव चव्हाण यांचेऐवजी मोरारजीभाईंनी मांडला. कार्यकारिणीत असे ठरले होते की चव्हाणांनी ठराव मांडावा. कारण त्यांनीच ठरावाचा मसुदा तयार करण्यासाठी कष्ट घेतले होते. तथापि स. का. पाटील आडवे पडले. पाटील म्हणाले की, आथिंक धोरणासंबंधीचा ठराव अर्थमंत्र्याने मांडणे योग्य होईल. मोरारजी ठराव मांडण्यासाठी उभे राहिले असताना यशवंतरावांच्या मनात भीती निर्माण झाली की, मोरारजीभाई आपल्या भाषणात आर्थिक कार्यक्रमाच्या ठरावाचे वांगे करतात की काय ! अगदी तसेच झाले. राष्ट्रीय बँकांवरील नियंत्रण, दहा कलमी कार्यक्रमामागील उद्दिष्टांच्या अनुकूल बाजूवर भर देण्याऐवजी मोरारजींनी आपल्या प्रतिगामीत्वाची चुणूक दाखविली. मोरारजींनंतर आर्थिक ठरावाचे समर्थन करण्यासाठी यशवंतराव उठले आणि त्यांनी आपल्या भाषणात समाजवादाच्या दिशेने पुढे जाण्यासाठी नव्या आर्थिक कार्यक्रमाची आवश्यकता स्पष्ट करून सांगितली. बँकांचे राष्ट्रीयकरण अपरिहार्य आहे यावर जोर दिला. देशाने या धोरणाचे स्वागत केले असल्याचेही निक्षून सांगितले.

काँग्रेस संसदीय मंडळाची बैठक त्याच दिवशी दुपारी १-०० वाजता भरणार होती. यशवंतरावांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्याशी शमियान्यातच चर्चा केली आणि त्यांना सांगितले की इंदिराजी या जगजीवनराम यांचे नाव सुचविण्याची शक्यता आहे. नाईकांना याची कल्पना होती. त्यांनी यशवंतरावांना सांगितले की, जगजीवनराम यांनीच आपल्याजवळ त्यांची इच्छा बोलून दाखविली असून आपल्याशी बोलण्याची विनंती केली आहे. त्यावर यशवंतराव चव्हाण नाईकांना म्हणाले, "आता वेळ निघून गेली आहे. एक वेळ

माझ्याही मनात जगजीवनराम यांचे नांव होते. तथापि पंतप्रधान इंदिराजींना ते मान्य नव्हते आता आपला नाईलाज आहे." फक्रुद्दिन अली अहमंद चव्हाणांना शामियान्यातच भेटले. त्यांनी जगजीवनराम यांच्या नावाला पाठिंबा द्यावा असे सुचविले. त्यावर चव्हाणांनी सांगितले की, रेड्डींना पाठिंबा देण्याबाबत आपण शब्द दिलेला असून तो बदलता येणार नाही. काँग्रेस संसदीय मंडळाची बैठक तहकूब करून पुन्हा एकत्र बसता येईल कां आणि नांवाचा विचार करणे शक्य होईल कां ते पहावे. त्यावर फक्रुद्दिन अली म्हणाले, "पंतप्रधानांना जगजीवनरामच हवेत." यशवंतरावांनी बैठक तहकुबीबाबत पंतप्रधानांनी प्रयत्न करावा असे सुचविले. एकला पांच मिनिटे कमी असताना भेटीसाठी इंदिराजींचा यशवंतरावांना निरोप आला. यशवंतराव पंतप्रधानांच्या खोलीत गेले. तेथे फक्रुद्दिनअली बसलेले दिसले. बंगलोरमध्ये असे दुसऱ्यांदा घडले. यशवंतरावांनी संसदीय मंडळाची बैठक पुढे ढकलण्याबाबत सुचविले. दिल्लीत एकत्र बसून विचार करता येईल, मतभेद दूर करता येतील, असे त्यांनी इंदिराजींना सांगितले. त्यावर इंदिराजी म्हणाल्या, "बैठक पुढे ढकलण्याबाबत आपण सांगणार नाही." त्यावर चव्हाणांनी सांगितले की, संजीव रेड्डींना आपण वचनबद्ध आहोत. दहा मिनिटांनी संसदीय मंडळाची बैठक सुरू झाली. मोरारजी देसाई यांनी राष्ट्रपतिपदाचे उमेदवार म्हणून संजीव रेड्डी यांचे नांव सुचविले आणि स. का. पाटील यांनी अनुमोदन दिले. इंदिराजींनी सांगितले की, राष्ट्रपतिपदाच्या उमेदवारीबाबत इतर पक्षांचे काय मत आहे हे अजमावण्याकरिता आपणास वेळ हवाय. फक्रुद्दिनअली अहंमद उठले आणि त्यांनी जगजीवनराम यांचे नांव सुचविले. मतदानावर पाळी आली. कामराज, स. का. पाटील, मोरारजी देसाई आणि यशवंतराव चव्हाण यांनी रेड्डींच्या नांवाला अनुकूलता दर्शविली. जगजीवनराम व निजलिंगप्पा तटस्थ राहिले. इंदिराजी आणि फक्रुद्दिनअली अहंमद हे दोघेच जगजीवनराम यांच्या बाजूला राहिले. चार विरुद्ध दोन अशा मतदानाने काँग्रेस संसदीय मंडळाने रेड्डी यांचे नांव संमत केले. अध्यक्ष निजलिंगप्पांनी रेड्डी यांचे नांव जाहीर करण्यापूर्वी इंदिरा गांधींशी बोलावे असे ठरले. इंदिराजींनी एकूण प्रकाराबद्दल नाराजी व्यक्त करून याचे परिणाम चांगले होणार नाहीत असे बजावले. निजलिंगप्पांनी पंतप्रधानांची भेट न घेता रेड्डी यांचे नांव जाहीर

करून टाकले. यानंतर काही तासांतच श्री. व्ही. व्ही. गिरी यांनी दिल्लीत जाहीर करून टाकले की आपण स्वतंत्र म्हणून राष्ट्रपतिपदाची निवडणूक लढविणार आहोत. राष्ट्रपतिपदाची निवडणूक हा राजकीय आखाडा बनविला जाऊ नये असेही त्यांनी सांगितले. अखिल भारतीय कॉंग्रेसच्या सभासदांत खळबळ उडाली. काहींना संसदीय मंडळाचा निर्णय पसंत होता, तर काहींना नापसंत. या निर्णयावर अे. आय. सी. सी. त चर्चा केली जावी अशी काहींनी मागणी केली. तथापि संसदीय मंडळाचा निर्णय हा अखेरचा असतो, त्यावर चर्चा करता येत नाही असे सांगण्यात येऊन चर्चेची मागणी फेटाळण्यात आली.

रेड्डी यांच्या उमेदवारीमुळे श्रीमती गांधी खूपच अस्वस्थ झाल्या. आपल्या अधिकाराला, पंतप्रधानपदाला, कॉंग्रेस श्रेष्ठींनी हे आव्हान दिले असून आपण त्याचा मुकाबला करायचा असे त्यांनी मनाशी पक्के केले. पत्रकार परिषदेत पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तर देताना त्यांचा राग स्पष्टपणे दिसून आला. यशवंतराव चव्हाण यांच्यासंबंधीही त्या कटुतेने बोलल्या. उमेदवार ठरविण्याबाबत कॉंग्रेस श्रेष्ठींना आपण विश्वासात घेतले नाही असे म्हटले जाते हे खरे का ? या प्रश्नाला उत्तर देताना इंदिराजी म्हणाल्या, ''मी, श्रेष्ठींचे मत वेळोवेळी विचारले होते. त्यांच्या मर्जीविरुद्ध मला माझा उमेदवार लादावयाचा नव्हता. माझा जनतेवर विश्वास आहे.'' बंगलोरहून दिल्लीला परतल्यावर इंदिराजी या प्रे. गिरींना भेटल्या. त्यांनी आपल्या भावी योजनांची कल्पना त्यांना दिली. गिरी रागातच होते. कॉंग्रेस श्रेष्ठींनी आपल्यासारख्याला बंगलोरमध्ये अशी वागणूक द्यावी याबद्दलची नापसंती व्यक्त करून त्यांनी राष्ट्रपतिपदाचा राजीनामा देण्याची तयारी दर्शविली. इंदिराजींनी त्यांची समजूत काढून थोडे दिवस थांबण्याची विनंती केली. चव्हाण बंगलोरहून मुंबईला गेले. त्यांनी महाराष्ट्रातील कॉंग्रेस नेत्यांशी चर्चा करून त्यांना आपली भूमिका समजावून दिली. संजीव रेड्डींजवळ राष्ट्रीय प्रतिमा असून अनुभवही भरपूर आहे. आपण गट वगैरे काही केलेला नव्हता, त्यामुळे मोरारजी, स. का. पाटलांच्या गटात आपण सामील झालो होतो हे खरे नाही असे यशवंतरावांनी स्पष्ट केले. आर्थिक ठरावाबाबत आपण जशी तडजोड घडवून आणली तशीच राष्ट्रपतिपदाच्या उमेदवाराबाबतही तडजोड घडवून आणणे शक्य होते असेही सांगून टाकले.

पंतप्रधान इंदिरा गांधींनी आपले संबंध विशिष्ट गटाशी (सिंडिकेटशी) जोडले याचा आपल्याला विषाद वाटतो असेही बोलून दाखविले. इंदिरा गांधी कोणती पावले उचलतात याकडे सर्वांचे लक्ष लागू राहिले. १६ जुलैला इंदिराजींनी अर्थखाते मोरारजी देसाई यांच्याकडून काढून स्वतःकडे घेतले. स्वाभिमानी मोरारजींनी त्वरित राजीनामा देऊन टाकला. उपपंतप्रधानपदी राहून आपण दुसरे कोणतेही खाते स्वीकारू शकत नाही असा निरोप धाडला. मंत्रिमंडळात आणि काँग्रेसच्या नेत्यांत खळबळ उडाली. यशवंतरावांनी राजीनामा देऊन बाहेर पडावे असा सिंडिकेटमधील कांही काँग्रेस नेत्यांनी आग्रह धरला. चव्हाणांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिल्यावर संसदीय मंडळात श्रीमती गांधी यांच्याविरुद्ध अविश्वासाचा ठराव मंजूर करण्याच्या दृष्टीने हालचाली सुरू झाल्या. यशवंतरावांच्यावर खूपच दडपण आले. तथापि त्यांनी सिंडिकेटला स्पष्ट कल्पना दिली की आपण त्यांचेबरोबर जाऊ शकत नाही.

मोरारजींच्या राजीनाम्याचे दुसरे दिवशी यशवंतरावांनी पंतप्रधान इंदिरा गांधींची भेट घेतली आणि मोरारजीभाईंशी मोकळेपणाने चर्चा करण्याची विनंती केली. त्या म्हणाल्या, "मी चर्चा करायला जरूर तयार आहे. तथापि मोरारजींचे अर्थखाते त्यांचेकडे पुन्हा सुपूर्द करण्यास आपण तयार नाही." इंदिराजी-मोरारजी भेट होऊन दोघांत चर्चा झाली. इंदिराजींनी मोरारजींना सांगितले की, अर्थविषयक जो ठराव अे. आय. सी. सी. ने मंजूर केला आहे त्याची अंमलबजावणी करण्यासाठी आपण स्वतःकडे अर्थखाते घेतले आहे. मोरारजींनी राजीनामा देण्याचा आग्रह धरला, इंदिराजी राजीनामा स्वीकारण्यास मोकळ्या झाल्या. काँग्रेसमधील सत्तेच्या राजकारणाने आपला बळी घेतला असे मोरारजीभाईंनी बोलून दाखविले. मोरारजीभाई आपल्या निवासस्थानी परत आल्यावर महाराष्ट्रातील काही खासदारांनी अनंतराव पाटील यांच्यासमवेत यशवंतराव चव्हाणांची भेट घेतली. मोरारजींसारख्या ज्येष्ठ नेत्याला व मंत्र्याला पंतप्रधानांनी ज्या पद्धतीने वागविले त्याबद्दल तीव्र नापसंती व्यक्त केली. यशवंतरावांनीही आपली नापसंती व्यक्त करून राजीनामा देण्याची तयारी करावी असे भेटीला गेलेल्या खासदारांनी सुचविले. यशवंतरावांपुढे पेच पडला. इंदिराजींची पद्धत आक्षेपार्ह असल्याचे त्यांनी मान्य केले. तथापि राजीनाम्यासंबंधी विचार करण्याकरिता अवधी हवाय असे सांगितले.

याच बैठकीत मराठी खासदारांना समजले की स. का. पाटील आदि सिंडिकेटच्या नेत्यांनी पंतप्रधानपद यशवंतरावांकडे देण्याची तयारी दर्शवून त्यांना आपल्या बाजूला ओढण्याचा प्रयत्न केला होता. तथापि चव्हाणांनी त्यांना नम्र नकार दर्शविला. यशवंतरावांबद्दल परिस्थिती अशी निर्माण झाली की ना इंदिराजींचा विश्वास ना सिंडिकेटची खात्री. निजलिंगप्पांनी बोलाविलेल्या काँग्रेस नेत्यांच्या बैठकीला चव्हाण हजर राहिले. त्यांनी या नेत्यांना स्पष्ट शब्दांत सांगितले की मोरारजीभाईंना मंत्रिमंडळातून ज्या पद्धतीने वगळले ते आपल्याला मान्य नाही. तथापि त्यासाठी आपण मंत्रिपदाचा राजीनामा कांही देणार नाही. मंत्रिमंडळाने चौदा बँकांच्या राष्ट्रीयकरणाच्या दृष्टीने त्वरित पावले उचलण्याचे ठरविले आहे. एक-दोन दिवसात वटहुकूम निघण्याची शक्यता आहे. त्याच रात्री वटहुकूम जारी करण्यात आला. चव्हाणांनी पंतप्रधानांचे अभिनंदन केले. यशवंतराव इंदिराजींना म्हणाले, "आर्थिक कार्यक्रमाचे अंमलबजावणीला आतां चालना मिळेल आणि सरकारचे हात पण बळकट होतील." सिंडिकेटमधील काही जणांनी सरकारच्या पावलांचे स्वागत केले तर काहींनी नाके मुरडली. इंदिराजींनी आपल्या रोखाने सोडलेला हा बाण आहे असे त्यांनी बोलून दाखविले. निजलिंगप्पा, स. का. पाटील, कामराज, अतुल्य घोष, वीरेंद्र पाटील, डॉ. रामसुभगसिंग आदि नेते एकत्र जमून त्यांनी कडक भूमिका स्वीकारण्याचा निर्णय घेतला. तथापि पंतप्रधान इंदिरा गांधींनी अशी काही पावले उचलली की त्यामुळे या मंडळींचा त्यांच्यापुढे निभाव लागणे कठीण होऊन बसले.

बँकांच्या राष्ट्रीयकरणाचा अध्यादेश जारी झाल्यावर पंतप्रधानांनी संसदीय काँग्रेस पक्षाची बैठक बोलावली. खासदारांना स्पष्ट शब्दांत सांगितले की, धोरणासंबंधीची दिशा आंखण्याचे अधिकार पंतप्रधानांकडे राहतील. त्यात कुणालाही आडकांठी आणता येणार नाही. काँग्रेस श्रेष्ठींना हा एक प्रकारचा इषाराच होता. त्याचबरोबर इंदिराजींनी हेहि सांगून टाकले की पक्षाला माझी धोरणे मान्य नसतील अथवा मी नको असेन तर हंसतमुखाने आपण आपले पद सोडू. जुलै २१ ला काँग्रेस कार्यकारिणीची बैठक भरली. त्यापूर्वी पंतप्रधानांनी मंत्रिमंडळातील आपल्या सहकाऱ्यांना बोलावून घेऊन सांगितले की काँग्रेस श्रेष्ठींच्या

विरोधात मंत्र्यांनी एकजुटीने उभे राहावयास हवे. यशवंतराव चव्हाण हे मंत्र्यांच्या बैठकीला हजर होते. बैठकीत कोणी ना उखाळ्या पाखळ्या काढल्या, ना मतभेदाचे प्रदर्शन केले. पंतप्रधानांनी आणि काँग्रेसच्या अध्यक्षांनी एकमेकांना भेटून मोरारजीभाईंच्या राजीनाम्याने निर्माण झालेल्या परिस्थितीचा विचार करावा असे ठरले. सिंडिकेटबरोबर त्वरित बखेडा निर्माण करण्याची इंदिराजींची इच्छा नव्हती. पंतप्रधानांशी दोन हात त्वरित करावेत असे सिंडिकेटला पण वाटत नव्हते. कारण राष्ट्रपतिपदाची निवडणूक जिंकावयाची होती. यशवंतराव हे दोन्ही बाजूंना सांभाळण्याचा, सांवरून घेण्याचा प्रयत्न करीत होते. इंदिरा गांधींना त्यांचा संपूर्ण पाठिंबा होता. त्याचबरोबर संजीव रेड्डींच्या उमेदवारीला पण पाठिंबा होता. रेड्डींच्या उमेदवारी अर्जावर ता. २२ जुलैला इंदिराजींनी सूचक म्हणून स्वाक्षरी केली. त्यावेळी काँग्रेस संसदीय मंडळाचे सदस्यही उपस्थित होते. त्यांनी गोपाळस्वरूप पाठक यांची उपराष्ट्रपतिपदासाठी उमेदवार म्हणून निवड केलेली होती. यानंतर निजलिंगप्पा यांनी संसदीय काँग्रेस पक्षाच्या बैठकीला उपस्थित रहावे आणि काँग्रेसचे अध्यक्ष व पंतप्रधान या दोघांनी खासदारांपुढे बोलावे असे ठरले. यशवंतरावांना वाटले की वातावरण निवळत आहे. तथापि आंतून ते खदखदत होते. पक्षश्रेष्ठींना धडा शिकविण्याकरिता इंदिराजी आंतून वेगळीच व्यूहरचना करीत होत्या. संसदीय काँग्रेस पक्षाच्या बैठकीत खासदार तारकेश्वरी सिन्हा यांनी लिहिलेल्या एका लेखाबद्दल कांही खासदारांनी निजलिंगप्पांना प्रश्न विचारला. "कुणाची लेखी तक्रार आली तर आपण त्यात लक्ष घालू." या निजलिंगप्पांचे उत्तरामुळे गोंधळ झाला. आपल्याविरुद्ध कोंडाळे केले जात असल्याची पंतप्रधानांची समजूत झाली. रेड्डींना द्यावयाच्या पाठिंब्याचा प्रश्न बाजूला पडला. काँग्रेसमधील संघर्ष उघड्यावर आला. दुसऱ्या दिवशी इंदिराजींनी जाहीर करून टाकले की आपण संजीव रेड्डींना विरोध करणार आहोत.

खासदारांच्या बैठकीनंतर सिंडिकेटच्या लक्षात आले की सर्व खासदारांचा संजीव रेड्डींना पाठिंबा मिळणार नाही. पंतप्रधानांनी पाठिंब्यासाठी पत्रक काढावे या सूचनेला इंदिराजींना नकार दर्शविला. काँग्रेसश्रेष्ठींना समजून चुकले की इंदिराजींनी विरोधी पवित्रा उचलला आहे. मग त्यांनी जनसंघ, स्वतंत्र पक्ष आदि पक्षनेत्यांशी बोलणी सुरू केली. निजलिंगप्पा हे बाजपेयी, प्रो. एन. जी. रंगा, मिनू

मसानी, एन. दांडेकर, प्रकाशवीर शास्त्री, बलराज मधोक यांना भेटले. चर्चेत त्यांची अनुकूलता दिसून आली. कम्युनिस्ट पक्षाच्या उजवे आणि डावे या दोघांनीही इंदिरा गांधींच्या बाजूने मतदान करण्याचा कल प्रदर्शित केला. काँग्रेस खासदारांत चलबिचल दिसून येऊ लागली. 'तरुण तुर्क' गटातील अर्जुन अरोरा यांनी जाहीर केले की आपला श्री. व्ही. व्ही. गिरी यांना पाठिंबा असून आपण त्यांना मतदान करणार. निजलिंगप्पांनी जनसंघ आणि स्वतंत्र पक्षाच्या नेत्यांशी चर्चा केली या कारणावरून इतर कांही खासदारांनी जाहीर केले की प्रतिगाम्यांशी हातमिळवणी करणाऱ्या अध्यक्षांचे आपण ऐकणार नाही. काँग्रेस पक्ष फुटणार हे निश्चित झाले. पक्ष वाचविण्यासाठी यशवंतरावांनी प्रयत्न सुरू केले. पंतप्रधानांना भेटून त्यांनी एकूण हालचालींची कल्पना दिली. त्यावर पंतप्रधान म्हणाल्या, "रेड्डी निवडून आल्यावर पंतप्रधानपदावरून मला हांकलून लावण्याचा कट करण्यात आल्यामुळे मी माझी शक्ती पणाला लावण्याचे ठरविले आहे." जगजीवनराम, फक्रुद्दिनअली, अहंमद, सिद्धार्थ शंकर रे आदींनी श्रीमती गांधी यांच्यासाठी रेड्डींना पाडण्याचे प्रयत्न सुरू केले. कांही राज्याचे मुख्यमंत्री व आमदार इंदिराजींना पाठिंबा दर्शवू लागले. निजलिंगप्पांची स्थिती केविलवाणी झाली. इंदिराजींच्या आव्हानाला तोंड देणे त्यांना मुष्कील होऊ लागले. संसदीय काँग्रेस पक्षाची बैठक १४ ऑगस्टला भरली असता कित्येक काँग्रेस खासदारांनी पंतप्रधानांना विनंती केली की पक्षाला फुटीपासून वाचवा. तारकेश्वरींनीही हात जोडून विनंती केली की आपल्याला कोणतीही शिक्षा करावी पण पक्ष वांचवावा. त्यावर इंदिराजींनी उत्तर दिले, "आता फार उशीर झालाय. माझ्या मार्गाने मी पुढे निघालेली आहे." यातून असा अर्थ काढण्यात आला की गिरी यांचे यशासाठी इंदिराजी शिकस्तीचे प्रयत्न करणार. म्हणजे काँग्रेसचे उमेदवार संजीव रेड्डी पराभूत होणार. आपल्या इच्छेप्रमाणे मत देण्याबाबत मोकळीक द्यावी अशी मागणी सुरू करण्यात आली. ऑगस्ट १६ ला राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीचे मतदान पार पडले. दिल्लीत आणि सतरा राज्यांचे राजधानीत सदर मतदान झाले. सिंडिकेटने खात्री व्यक्त केली की रेड्डीच निवडून येणार. जगजीवनराम-फक्रुद्दिनअली यांचेवर शिस्तभंग इलाज काय करायचा ते ठरले. तथापि मतदानात वेगळेच घडले आहे, याची श्रेष्ठींना कल्पना आलेली नव्हती.

✦ ✦ ✦

# : ११ :

२० ऑगस्टला राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीचा निकाल जाहीर झाला. गिरींचा विजय आणि रेड्डींचा पराजय यामुळे सिंडिकेटचे नेते अवाक झाले. दुसऱ्या दिवशी काँग्रेसच्या ७० खासदारांनी निजलिंगप्पांची भेट घेऊन काँग्रेसच्या उमेदवाराचा पराभव करण्यास कारणीभूत ठरलेल्या पंतप्रधान इंदिरा गांधी, जगजीवनराम, फक्रुद्दिनअली अहंमद यांना काँग्रेसमधून निलंबित करावे अशी मागणी केली. कामराज आणि मोरारजीभाईंचे तेच मत पडले. निजलिंगप्पांनाही हेच हवे होते. पंतप्रधानांच्या पाठीराख्यांना ही कुणकुण लागताच दुसऱ्या दिवशी काँग्रेसचे माजी अध्यक्ष श्री. डी. संजीवय्या यांच्या निवासस्थानी काँग्रेसचे २४८ खासदार एकत्र जमले आणि त्यांनी इंदिरा गांधीच्या पाठीशी उभे राहण्याचा निर्णय घेतला. आर्थिक व सामाजिक कार्यक्रमाच्याद्वारे पंतप्रधानांनी काँग्रेसला जनतेच्या जवळ आणून पक्षाला शक्ती प्राप्त करून दिली असा ठरावही संमत केला. दोन्ही गट अटी-तटीला लागले. संघर्ष अटळ होऊन बसला. काँग्रेसमध्ये ऐक्य राखावे यापेक्षा शिस्तभंग इलाजाबाबत 'सिंडिकेट'वाले आग्रह धरू लागले. निजलिंगप्पांनी २५ ऑगस्टला काँग्रेस कार्यकारिणीची बैठक बोलाविली. बरेच खासदार यशवंतराव चव्हाणांकडे गेले आणि दोन्ही गटांत समझोता घडवून आणण्याबाबत त्यांना विनंती केली. चव्हाणांनी त्यांना सांगितले की काँग्रेसमधील ज्येष्ठ नेत्यांनी एकत्र बसून मतभेद मिटविण्याचे प्रयत्न करायला हवेत. यशवंतरावांनी त्यादृष्टीने प्रयत्न सुरू केले. तरुण तुर्कांपैकी काही जणांशी ते बोलले. चव्हाणांची भूमिका त्यांना पटली. रात्री तरुण तुर्कांची बैठक भरून संघर्ष टाळण्यासाठी प्रयत्न करण्याचे ठरले. सर्वसामान्य काँग्रेसजनाचेही मत पडले की पक्ष फुटून न देता तडजोड केली जावी.

तथापि पक्षश्रेष्ठी आणि पंतप्रधान इंदिराजी एकत्र बसून पेचप्रसंग मिटविण्याच्या मनःस्थितीत नव्हते. संशयाच्या वातावरणामुळे दोन्हीही बाजू एकमेकांवर कुरघोडी करण्याच्या तयारीत दिसू लागल्या. इंदिराजींचे म्हणणे पडले की त्यांचा अधिकार आणि श्रेष्ठत्व काँग्रेसश्रेष्ठींनी मान्य केले पाहिजे आणि श्रेष्ठींचे म्हणणे पडले की पंतप्रधानांनी काँग्रेस श्रेष्ठींच्या सल्ल्यानुसार वागावे. कामराज यांनी चव्हाणांची भेट घेऊन त्यांना सिंडिकेटच्या बाजूने वळविण्याचा प्रयत्न केला. आर्थिक-सामाजिक कार्यक्रमाबाबतची आपली भूमिका बदलणार नाही असे चव्हाणांनी स्पष्ट शब्दांत सांगितले. सिंडिकेटवर याबाबत आपला विश्वास नसल्याचेही बोलून दाखविले. यशवंतरावांनी निजलिंगप्पांना फोन करून सांगितले की कृपया संघर्षाची भूमिका सोडून द्या, काँग्रेस पक्षाची हानी टाळा. यशवंतरावांनी इंदिराजींचीही भेट घेतली. निजलिंगप्पांशी आणि इतर काँग्रेस श्रेष्ठींशी एकदा बोलणी करावीत असे त्यांनी सुचविले. निजलिंगप्पांना हटविण्यासाठी अखिल भारतीय काँग्रेसचे अधिवेशन बोलावू नये अशीही विनंती केली. पंतप्रधानांनी यशवंतरावांना अनुकूल प्रतिसाद दिला. निजलिंगप्पांच्या कानावर या घडामोडी घातल्या असता त्यांची भूमिका ताठर दिसून आली.

निजलिंगप्पांनी काँग्रेस कार्यकारिणीची बैठक २५ ऑगस्टला बोलावली. ही बैठक खळबळजनक ठरली. निजलिंगप्पांच्या प्रास्ताविक भाषणानंतर यशवंतराव चव्हाण त्वरित उठले आणि त्यांनी पेचप्रसंगातून मार्ग काढण्याचे आणि एकत्रपणे काम करण्याचे आवाहन केले. त्यावर कांही सभासदांनी 'हे कसे काय शक्य आहे' असे विचारताच यशवंतरावांनी स्वतः तयार केलेला ठरावाचा मसुदा वाचून दाखविला. त्यावर स. का. पाटील म्हणाले, "मसुदा ठीक आहे, तथापि जनसंघ आणि स्वतंत्र पक्षाबरोबर काँग्रेस अध्यक्षांनी जी बोलणी केली त्यासंबंधीचे जे आरोप केले गेले आहेत त्यावर चर्चा व्हावी." अध्यक्षांच्या हेतुबाबत शंका व्यक्त केली जाऊ नये असे ठरल्यावर यशवंतरावांचा ठराव एखादा दुसरा शब्द बदलून एकमताने मंजूर करण्यात आला. यशवंतरावांना वाटले की मोठा पेंच टळला. त्यांनी सुटकेचा निश्वास टाकला. तथापि नंतर भलतेच घडले. कार्यकारिणीच्या सदस्यांनी ठरावाबाबत यशवंतरावांचे अभिनंदन केले, वृत्तपत्रांनी व पत्रकारांनीही त्यांचे

कौतुक केले. "हा एकच असा नेता आहे की तो कुणाच्याही बाजूने नाही, स्पर्धेत नाही. काँग्रेस फुटू नये यासाठी चव्हाणांनी जे जे प्रयत्न केले ते वाखाणण्यासारखे आहेत" असा अभिप्राय महत्त्वाच्या वृत्तपत्रांनी व्यक्त केला. लंडनच्या 'इकॉनॉमिस्ट' पत्रानेही चव्हाणांच्या प्रयत्नांची स्तुती केली. निजलिंगप्पा विश्रांतीसाठी म्हैसूर राज्यातील आपल्या निवासस्थानी गेल्यावर दिल्लीत उभय बाजूंनी पुन्हा चिखलफेक सुरू केली. तिकडे निजलिंगप्पांनीही 'विभूतिपूजेचा' उल्लेख करून देशात हुकूमशाहीचे संकट येण्याबाबत इशारा दिला. स. का. पाटलांनी इंदिरा गांधी कम्युनिस्टांच्या मार्गाने जात असल्याचा आरोप केला. चव्हाणांची स्थिती चमत्कारिक झाली. दोन्ही बाजूंना एकत्रित आणण्याचे त्यांच्या प्रयत्नांना 'खो' बसला. चव्हाण हे 'कुंपणावर' बसले आहेत अशी टीका सहन करावी लागली. त्रिपुरा काँग्रेसच्या वेळी जवाहरलाल नेहरूंची जी स्थिती झाली होती तशीच ३० वर्षांनंतर चव्हाणांची झाली. १९३९ मध्ये नेहरूंनी सुभाषचंद्र बोस आणि काँग्रेसश्रेष्ठी यांच्यात मध्यस्थीचे कसोशीने प्रयत्न केले होते. १९६९ मध्ये चव्हाणांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली होती. त्यांचा 'ऐक्य' ठराव संमत केल्यानंतरही एकीऐवजी बेकीचे प्रयत्न दोन्ही बाजूंनी सुरू झाले होते. यशवंतरावांना मराठी खासदार भेटले आणि सांगितले की तुमच्या प्रामाणिक प्रयत्नानंतर 'कुंपणावरचे' अशी टीका होत असेल तर घ्या कोणती तरी एक बाजू आणि बघू काय होते ते ! यशवंतरावांच्या स्वभावात एकारलेपणा नव्हता आणि धाडसाने - बिनदिक्कतपणे उडी घेण्याची प्रवृत्ती नसल्याने आपल्यावरील टीका त्यांनी निमूटपणे सोसली.

पंतप्रधानांच्या मद्रास भेटीबद्दल बरेच वादंग माजले. सुब्रह्मण्यम यांनी पुढाकार घेऊन सप्टेंबरमध्ये इंदिराजी आणि कामराज यांची बैठक घडवून आणली. तथापि या बैठकीतून कांहीही निष्पन्न झाले नाही. उलट कामराज यांनी आरोप केला की सुब्रह्मण्यम हे आपल्याला काँग्रेसमध्ये एकाकी पाडत आहेत, काँग्रेस कार्यकर्त्यांना आपल्या विरुद्ध उठवीत आहेत. पंतप्रधानांच्या मद्रास भेटीवर त्यांनी बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर सुब्रह्मण्यम यांनी तामिळनाडू काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. श्री. यशवंतराव या घटनेमुळे अस्वस्थ झाले. त्यांनी बोलून दाखविले की मद्रास आणि उत्तर प्रदेशात जे घडले आहे ते संघर्ष

मिटविण्याऐवजी वाढविण्याचे लक्षण आहे. मुख्यमंत्री चंद्रभानू गुप्ता यांनी उत्तर प्रदेशात कमलापती त्रिपाठी आदिंना एकाकी पाडण्यास सुरुवात केली होती. यशवंतरावांनी अध्यक्ष निजलिंगप्पांची भेट घेऊन सुचविले की, त्यांनी अखिल भारतीय काँग्रेसची आणि कार्यकारिणीची बैठक बोलवावी. 'शीतयुद्ध' थांबविण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन मोकळेपणाने चर्चा करण्याची आवश्यकता आहे. निजलिंगप्पांनी यशवंतरावांची सूचना मान्य केली, तथापि कार्यवाही केली नाही. सिंडिकेटच्या मनात भीती होती की अखिल भारतीय काँग्रेसच्या बैठकीत निजलिंगप्पांना अध्यक्षपदावरून काढून टाकण्याचा निर्णय केला जाईल. निजलिंगप्पांनी कार्यकारिणीची बैठक ऑक्टोबरमध्ये बोलावण्याचे मान्य केले. तथापि ही तारीख दोनदा पुढे ढकलली. सी. सुब्रह्मण्यम यांचे कार्यकारिणीचे सदस्यत्व रद्द करण्याचा डाव सिंडिकेटने रचला. कारण काय तर त्यांनी तामिळनाडू काँग्रेस अध्यक्षपदाचा राजीनामा दिला असल्याने ते भारतीय काँग्रेसचे आणि कार्यकारिणीचे सदस्य राहू शकत नाहीत. इंदिराजींच्या आंतल्या गोटाची बैठक भरून सिंडिकेटशी या मुद्यावर लढा करण्याचा निर्णय घेण्यात आला. इंदिरा गांधी, यशवंतराव चव्हाण, जगजीवनराम, फक्रुद्दिनअली अहंमद, स्वर्णसिंग यांच्या सहीने निजलिंगप्पांना एक पत्र पाठविण्यात आले. त्यात कार्यकारिणीवरून सुब्रह्मण्यम यांची हकालपट्टी करण्याच्या निर्णयाचा निषेध करण्यात आला होता. त्याचबरोबर परिस्थिती अधिक चिघळू नये म्हणून १५ ऑक्टोबरला कार्यकारिणीची बैठक बोलवावी आणि अखिल भारतीय काँग्रेसचे अधिवेशन १५ नोव्हेंबरपूर्वी बोलवावे अशीही मागणी करण्यात आली होती. निजलिंगप्पांनी या पत्राला उत्तर पाठविले. त्यात त्यांनी म्हटले होते की, सुब्रह्मण्यम यांना आपण पत्र पाठविलेले नाही. एकाधिकाराने निर्णय घेण्याचा आपला स्वभाव नाही, अध्यक्षांवर असे आरोप करणे शोभा देणारे नाही. कार्यकारिणीच्या बैठकीची गरज वाटत नाही. या उत्तरानंतर पंतप्रधानांच्या गोटातून सह्यांची मोहीम सुरू करण्यात आली. नवा अध्यक्ष निवडण्यासाठी बैठकीची मागणी करण्यात आली होती. विनंती पत्रावर सर्वश्री फक्रुद्दिनअली अहंमद, जगजीवनराम, चव्हाण आणि उमाशंकर दीक्षित यांच्या सह्या होत्या आणि त्यांनी सह्यांचे मोहिमेवर जोर दिला होता. अखिल भारतीय

काँग्रेसच्या एकूण ७०५ प्रतिनिधींपैकी ४०५ प्रतिनिधींच्या सह्या त्यांनी मिळविल्या. निजलिंगप्पा आणि इतर काँग्रेसश्रेष्ठी हादरून गेले. १ नोव्हेंबर १९६९ ला कार्यकारिणीची बैठक बोलाविण्यात आली. दोन्ही बाजूंनी आपापल्या भूमिका ठरवून टाकल्या.

ज्या राज्यात काँग्रेसचे मुख्यमंत्री होते त्यापैकी म्हैसूरचे वीरेंद्र पाटील, गुजरातचे हितेंद्र देसाई यांनी काँग्रेस पक्ष फुटीपासून वाचविण्याकरिता पुढाकार घेतला. हे दोघे पंतप्रधानांना भेटले आणि सिंडिकेटच्या नेत्यांना पण भेटले. त्यांना दोन्ही बाजूंकडून कडवट प्रतिक्रिया आणि एकमेकांवर आरोप ऐकावयास मिळाले. निजलिंगप्पा प्रतिगामी असून सिंडिकेटमधील सत्ताकांक्षी नेत्यांच्या हातातील बाहुले आहेत असा आरोप इंदिराजींनी केला. तर इंदिराजी या हुकूमशाही प्रवृत्तीच्या असून त्यांना आपल्या सहकाऱ्यांपेक्षा कम्युनिस्टांचे प्रेम अधिक आहे असा आरोप सिंडिकेटवाल्यांनी केला. १ नोव्हेंबरच्या कार्यकारिणीच्या बैठकीत कुणाकुणाला पक्षातून काढून टाकायचे याबद्दलची व्यूहरचना करण्यात आली. सुब्रह्मण्यम यांचे सभासदत्व संपवावे आणि इंदिरा गांधी, यशवंतराव चव्हाण, जगजीवनराम, फक्रुद्दिनअली अहंमद यांना निलंबित करावे अशी कामराज यांनी मागणी केली. ऑक्टोबर २८ ला निजलिंगप्पांनी पंतप्रधान इंदिराजींना सहा पानी पत्र पाठवून पक्षविरोधी कारवाया केल्याबद्दल आणि पक्षात फूट पाडण्याचे प्रयत्न केल्याबद्दल जाब विचारला. लगोलग सुब्रह्मण्यम, फक्रुद्दिनअली अहंमद आणि शंकर दयाळ शर्मा यांना निबलंबित करण्यात आल्याचे निजलिंगप्पा यांनी जाहीर केले. इंदिराजींनी आपल्या पाठीराख्यांसह कार्यकारिणीच्या बैठकीवर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला. १ नोव्हेंबरला सकाळी पंतप्रधानांच्या निवासस्थानी ही नेतेमंडळी जमली आणि नवा अध्यक्ष निवडण्यासाठी अखिल भारतीय काँग्रेसची बैठक बोलावण्याचे ठरविण्यात आले. निजलिंगप्पांच्या कार्यकारिणीची बैठक जंतरमंतर रोडवरील कचेरीत भरली. अशा प्रकारे दोन वेगवेगळ्या काँग्रेस कार्यकारिणी अस्तित्वात आल्या आणि काँग्रेसमधील फूट स्पष्ट झाली. इंदिराजींच्या बाजूला दहा आणि निजलिंगप्पांच्या बाजूला दहा अशी सदस्यांत विभागणी झाली. यशवंतराव चव्हाण या घडामोडीवर भाष्य करताना म्हणाले, "फक्रुद्दिनअली, सुब्रह्मण्यम आदींना काढून

टाकण्याचा निर्णय ऐकल्यावर मला संताप आला. इतक्या खालच्या पातळीवरचे राजकारण करण्याचे कांही कारण नव्हते. बहुमत प्राप्त करण्याचा त्यांचा डाव उघडकीस आला. बैठक पुढे ढकला अशी विनंती करूनही त्यांनी बैठक भरविली यावरून स्पष्ट दिसून आले की त्यांना काँग्रेसचे दोन तुकडे पाडावयाचे आहेत. इंदिरा गांधींना काँग्रेसमधून घालवून देण्याची सिंडिकेटमधील कट्टरांना घाई झालेली दिसले.''

काँग्रेसच्या दोन कार्यकारिणी झाल्यावर कांही मुख्यमंत्र्यांनी तडजोड घडवून आणण्याचे प्रयत्न करून पाहिले. ते यशवंतराव चव्हाणांना भेटले आणि विनंती केली की यशवंतरावांनी पेचप्रसंगातून मार्ग काढावा. या मुख्यमंत्र्यांत महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, आसाम, राजस्थानच्या मुख्यमंत्र्यांचा समावेश होता. त्यांनी पुढील योजना मांडली. (१) फक्रुद्दिनअली आणि शंकर दयाळ यांचे कार्यकारिणीचे सदस्यत्व त्यांना परत करावे. (२) सुब्रह्मण्यम यांचा प्रश्न कायदेतज्ज्ञाकडे सोपवावा, (३) पंतप्रधानांच्या गोटाने अखिल भारतीय काँग्रेसची रिक्विझिशन मिटिंग बोलावण्याबाबतचे पाऊल मागे घ्यावे, (४) दिल्लीमधील अखिल भारतीय काँग्रेसच्या खास अधिवेशनाची योजना वगळावी. सिंडिकेटने फक्रुद्दिनअली आणि सुब्रह्मण्यम यांच्याबाबत तयारी दर्शविली पण शंकरदयाळ शर्मांबाबत नकार दर्शविला. निजलिंगप्पांनी सांगितले की, पंतप्रधानांना तिघेही जण कार्यकारिणीवर परत हवे असतील तर त्यांनी मोरारजीभाई आणि इतर वगळलेल्या मंत्र्यांना पुन्हा मंत्रिमंडळात घ्यावे. निजलिंगप्पा यांच्या ताठर भूमिकेमुळे मुख्यमंत्र्यांच्या प्रयत्नांना यश येऊ शकले नाही. निजलिंगप्पांनी पंतप्रधानांना कडक भाषेत पत्र लिहून त्यांची भरपूर निर्भत्सना केली. हुकूमशहा, पाताळयंत्री, फसवी अशी विशेषणे लावून इंदिराजींचा भरपूर अपमान केला. पंतप्रधानांनी निजलिंगप्पांच्या अध्यक्षपदालाच आव्हान दिले. ज्यांच्यावर पन्नास टक्क्याहून अधिक सदस्यांचा विश्वास राहिलेला नाही त्यांना अध्यक्षपदी राहण्याचा नैतिक अधिकार रहात नाही. निजलिंगप्पा यांनी त्वरित राजीनामा द्यावा अशी मागणी त्यांनी केली. उभयतांत कटुता वाढतच गेली. चंद्रभानू गुप्ता, हितेंद्र देसाई आदिंनी पुन्हा तडजोडीचा प्रयत्न केला आणि तडजोडीची नवी योजना सादर केली. (१) अखिल भारतीय काँग्रेसचे अधिवेशन गुजरातेत भरवावे.

त्यात कार्यकारिणीच्या ठरावावर (संघटनेतील निवडणुका) चर्चा व्हावी. (२) अखिल भारतीय काँग्रेसची रिक्विझिशन मिटिंग रद्द करावी. पंतप्रधानांविरुद्ध करण्यात आलेले आरोप मागे घेतल्याशिवाय तडजोड शक्य नाही असा सिंडिकेटकडे निरोप पाठविण्यात आला. यशवंतराव चव्हाण आणि वसंतराव नाईक यांनी तडजोडीसाठी अखेरचा प्रयत्न करून पाहिला. नाईकांनी पंतप्रधानांच्या निवासस्थानातून स. का. पाटील यांना फोन केला. तडजोडीची विनंती केली. अनुकूल प्रतिसाद मिळू शकला नाही. नोव्हेंबर १२ रोजी एक वाजून पांच मिनिटांनी निजलिंगप्पांच्या काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीत इंदिरा गांधींची काँग्रेसमधून हकालपट्टी करण्यात आली. याच क्षणी नेहरू-गांधींच्या काँग्रेसचे दोन तुकडे झाले. परिणामतः दोन कार्यकारिणी, दोन आम सभा, दोन प्रदेश काँग्रेस कमिट्या, दोन जिल्हा काँग्रेस कमिट्या असे दृष्य दिसू लागले. दुसऱ्या दिवशी संसदीय काँग्रेस पक्षाच्या बैठकीत इंदिराजींचे अपूर्व स्वागत करण्यात आले. अभिनंदनाचा ठराव मांडताना यशवंतराव चव्हाणांनी, इंदिरा गांधींच्या नेतृत्वावर संपूर्ण विश्वास व्यक्त करून त्यांची काँग्रेसमधून हकालपट्टी ही नियमबाह्य आणि असमर्थनीय असल्याचे स्पष्ट केले. आम्ही इंदिराजींच्याच पाठीशी उभे राहू. कारण आमचीच काँग्रेस खरी आहे असा आमचा दावा आहे. सभासदांनी चव्हाणांच्या भाषणाला प्रचंड टाळ्या वाजवून दाद दिली. चव्हाणांनी तडजोडीचे सारे प्रयत्न व्यर्थ करणाऱ्या निजलिंगप्पांच्या माथी पक्ष फुटीच्या दोषाचे खापर फोडले. निजलिंगप्पांच्या समर्थक खासदारांनी आपली बैठक बोलावून डॉ. रामसुभगसिंग यांची नेतेपदी निवड केली.

दिल्लीत २२ नोव्हेंबरला भरलेल्या रिक्विझिशन बैठकीत पंतप्रधान इंदिरा गांधींना पाठिंबा दर्शविण्यासाठी अखिल भारतीय काँग्रेसचे ४०० च्या वर प्रतिनिधी उपस्थित होते. श्रीमती गांधी यांनी आपल्या भाषणात सांगितले की, दोन वेगवेगळे दृष्टिकोन, दोन वेगवेगळ्या प्रवृत्ती यामधील झगड्याचे पर्यवसान काँग्रेसचे दोन भाग होण्यात झाले. निजलिंगप्पा यांची अध्यक्षपदावरून उचलबांगडी करण्यात आली आणि सी. सुब्रह्मण्यम यांची हंगामी अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. अखिल भारतीय काँग्रेसमध्ये आणि संसदीय काँग्रेस पक्षात आपले बहुमत आहे हे श्रीमती गांधीनी सिद्ध करून दाखविले. काँग्रेस (एस.) आणि काँग्रेस (ओ) असे

दोन तट पडले. प्रदेश काँग्रेस कमिट्या, जिल्हा काँग्रेस कमिट्या आपापल्या ताब्यात ठेवण्याचे प्रयत्न सुरू झाले. निजलिंगप्पांच्या नेतृत्वाखालील काँग्रेसने अहमदाबादेत भरविलेल्या अधिवेशनाला चांगली उपस्थिती होती. तथापि तळागाळातील काँग्रेसजन इंदिराजींच्या मागे आहेत हे मुंबईतील काँग्रेस अधिवेशनानंतर दिसून आले. यशवंतरावांना मुंबईतील बैठकीत विचारता ते म्हणाले, "संघटना काँग्रेसचे नेते प्रतिगामी वृत्तीचे असून लोकांचा त्यांना फारसा पाठिंबा नाही. त्यांच्यातील कामराज हे एकटे पुरोगामी विचारांचे आहेत. सामाजिक-आर्थिक बदलास ते चर्चेच्या वेळी अनुकूलता दर्शवितात. तथापि सिंडिकेट नेत्यात मिसळले की बदलतात. निवडणुकीनंतर चित्र स्पष्ट होईल की लोक कुणाच्या पाठीशी आहेत.

काँग्रेसमधील फुटीनंतर पंतप्रधान इंदिरा गांधी मंत्रिमंडळात खातेपालट करणार अशी कुणकुण कानी पडू लागली. वृत्तपत्रांतून बातम्या येऊ लागल्या. संसद सभागृहाच्या लॉबीत पण अंदाज व्यक्त केले जाऊ लागले. अंदाजपत्रकी अधिवेशन संपल्यावर (मे १९७०) बदल करण्याचे इंदिराजींनी ठरविले. जून महिन्यात त्यांनी आपल्या ज्येष्ठ सहकाऱ्यांशी विचारविनिमय केला. पंतप्रधानांनी स्वतःकडे अर्थखाते घेतल्यानंतर वर्षभरात त्या विशेष कांही करू शकल्या नव्हत्या. कारण वेगवान राजकीय घडामोडीमुळे त्यांना उसंत मिळू शकली नव्हती. हे खाते चव्हाणच समर्थपणे सांभाळू शकतील, सामाजिक-आर्थिक बदलाची आपल्याला जी अपेक्षा आहे ते काम चव्हाणच करू शकतील अशी खात्री वाटल्याने इंदिराजींनी यशवंतरावांना अर्थखाते घेण्याची गळ घातली. तीन-चार वेळा त्या चव्हाणांना भेटल्या. यशवंतराव खाते बदलास नाखूष होते. गृहखाते ते उत्तम प्रकारे सांभाळत होते. त्यांचे म्हणणे पडले की सार्वत्रिक निवडणुका जवळ येऊन ठेपल्या असताना खात्यात बदल कशासाठी! पंतप्रधानांनी हट्टच धरला आणि यशवंतरावांना राजी केले. २६ जून १९७० मध्ये मंत्रिमंडळातील फेरबदल जाहीर करण्यात आले. चव्हाण अर्थमंत्री, जगजीवनराम संरक्षणमंत्री, स्वर्णसिंग परराष्ट्रमंत्री आणि फक्रुद्दिन अली अहंमद शिक्षणमंत्री अशी खांदेपालट करण्यात आली. अर्थखाते म्हणजे एक प्रकारचे आव्हानच होते. तथापि आपण पाठपुरावा केलेल्या आर्थिक कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची संधी मिळते यांत यशवंतरावांनी समाधान मानून

आपल्या नव्या कामाला सुरुवात केली. काँग्रेसच्या फरिदाबादच्या (१९६८) अधिवेशनापासून यशवंतराव आर्थिक बाबींबाबत पक्षाचे प्रवक्ते बनले होते. बंगलोर, दिल्ली, मुंबई, पाटणा येथील अधिवेशनात त्यांनी आर्थिक कार्यक्रमाची जोरदार शिफारस केलेली होती. शेती हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा मानून शेतीच्या उत्पादनावर भर द्यायचा, उद्योगव्यापार, निर्यात वाढेल याकडे लक्ष द्यायचे ठरवून यशवंतरावांनी एकेक पाऊल टाकण्यास सुरुवात केली. उत्तम बी-बियाणे, खते, पाणी याचा वेळेवर पुरवठा करून शेतीचे उत्पन्न वाढविण्यात चव्हाणांनी जशी चालना दिली तद्वतच औद्योगिक प्रगतीकडेही लक्ष दिले. या दोन्ही क्षेत्रांत प्रगती होत होती. तरीही १९७० सालात अर्थव्यवस्थेवर ताण जाणवतच होता. किंमती वाढत होत्या आणि त्याचा परिणाम उत्पादनावर आणि निर्यातीवर प्रतिकूल होत होता. यशवंतरावांनी संसदेत याबाबत बोलताना आश्वासन दिले की, किंमती वाढीवर सरकारचे बारकाईने लक्ष आहे. औद्योगिक कच्च्या मालाचा पुरवठा वेळेवर आणि पुरेसा होत नसल्याने अन्नधान्याचा तुटवडा आणि महागाई जाणवत आहे. किंमती स्थिर राखणे हा सरकारपुढील यक्ष प्रश्न असून सरकार या प्रश्नाला यशस्वीपणे तोंड देईल अशी खात्री वाटते. १९७०-७१ च्या किंमतीचा निर्देशांक ४ टक्क्यांनी वाढला होता. त्या आधीच्या वर्षात ही वाढ ७ टक्के होती. किंमतीबरोबरच बेकारी निवारण्याचा प्रश्नही भेडसावू लागला होता. शहरातील सुशिक्षितांची बेकारी आणि ग्रामीण भागातील अशिक्षितांची बेकारी असे दुहेरी संकट उभे ठाकले होते. तरुणांना काम मिळवून देण्याच्या योजनांना त्यांनी प्राधान्य दिले. शहरातील बेकारीला प्राधान्य आणि ग्रामीण भागातील तरुणांबाबत सबुरी हे त्यांना मान्य नव्हते. शहरातले बेकार संघटित असतात, बोलके असतात आणि उपद्रवक्षम असतात हे यशवंतरावांना मान्य होते. खेड्यातील बेकार तरुणांची संघटना नसते, ते कमी उपद्रवी असतात हेही ठाऊक होते. गुंतवणूक वाढवून उत्पादक कामे निर्माण करायची असे ठरवून यशवंतराव चव्हाणांनी पावले उचलली. आर्थिक तत्त्वज्ञान स्वीकारताना सामाजिक-राजकीय जाणीवांचा विसर पडू द्यायचा नाही हे त्यांनी आपल्या धोरणाचे सूत्र ठेवले. नव्या अर्थसंकल्पात याचे प्रतिबिंब दिसून आले.

✦✦✦

## : १२ :

बँकांच्या राष्ट्रीयीकरणानंतर थोड्या दिवसांतच या धोरणाच्या फायद्या-तोट्याबद्दल चर्चा होऊ लागली. त्यात प्रतिकूल टीकेचा भाग अधिक असायचा. यशवंतरावांनी या टीकेचा समाचार घेताना सांगितले, "राष्ट्रीयकरणाचे मूल्यमापन करण्यासाठी वर्ष-सहा महिने हा अवधी अगदीच अल्प आहे. कामाची नव्याने सुरुवात, त्यानंतर सुप्रीम कोर्टातील अर्ज, दावे यांत बराच अवधी खर्ची पडला. यशाचे मोजमाप लावायचे असेल तर दोन गोष्टींचा विचार करायला हवाय. राष्ट्रीयीकरणानंतर छोटा शेतकरी, छोटा कारखानदार, छोटे कारागीर, दुर्लक्षित समाज यांना या बँकांकडून कर्ज मिळण्याची सोय झाली, लोकांना बँकिंगची संवय लागली, ग्रामीण भागातील पैशाची बचत गोळा करता आली हा एक महत्त्वाचा भाग. तसेच परदेशी मदत आणि परदेशांचे कर्ज, पी. एल. ४८० चा निधी याचा विचार करून नवीन व्यवस्था करण्याचे दृष्टीने प्रयत्न हा दुसरा महत्त्वाचा भाग विचारात घ्यायला हवाय. यशवंतरावांनी २४ मार्च, १९७१ ला लोकसभेत जे अंदाजपत्रक मांडले त्यात त्यांनी आर्थिक वाटचालीच्या नव्या दिशेची कल्पना स्पष्ट करताना सामाजिक न्याय आणि आर्थिक वाटचालीच्या विकासावर भर दिलेला होता. श्रीमंत आणि गरीब यातील विषमतेची दरी कमी व्हावी, लोकांना कामधंदा मिळावा, किंमतीवर नियंत्रण रहावे याचाही अर्थसंकल्पात विचार केलेला होता. समाजातील दुर्लक्षित विभाग, त्यांच्या गरजा यांच्याकडे अधिक लक्ष दिले पाहिजे, राष्ट्रीय उत्पन्नातील वांटा त्यांना मिळाला पाहिजे याबद्दल यशवंतरावांनी खबरदारी घेतलेली होती. देशांतील दारिद्र्य नाहीसे व्हावे यावर त्यांनी भर दिलेला होता.

ऑगस्ट १९७० मध्ये यशवंतरावांनी आपल्या कांही सहकाऱ्यांचे जवळ

निवडणुकीचा विषय काढला. १९७२ ऐवजी १९७१ मध्ये निवडणुका घेता आल्या तर त्याचा फायदा काँग्रेस पक्षाला मिळेल हे त्यांना पटवून दिले. सप्टेंबरमध्ये त्यांनी पंतप्रधान इंदिरा गांधींची भेट घेऊन त्यांना सांगितले की निवडणुका लवकर घेता येतील तेवढ्या घ्याव्यात. तथापि काँग्रेसचे अध्यक्ष जगजीवनराम आणि पंतप्रधानांच्या कांही सल्लागारांनी मध्यावधी निवडणुकीला विरोध दर्शविला. चव्हाणांचा कांही तरी डावा असावा अशी शंका एक-दोघांनी बोलून दाखविली. पंतप्रधान चूप बसून राहिल्या. त्यांना विधीमंडळ आणि लोकसभेच्या पोटनिवडणुकांचा निकाल काय लागतो हे पहायचे होते. इंदिराजींच्या काँग्रेसला पोटनिवडणुकीत चांगले यश मिळाले. निजलिंगप्पांच्या काँग्रेसला एकही जागा मिळाली नाही. महाराष्ट्र, मध्यप्रदेश, केरळ, पंजाब अशा दूरदूरच्या ठिकाणचे यश पाहिल्यावर यशवंतरावांनी निष्कर्ष काढला की वारे इंदिराजींना अनुकूल आहे. बँकांचे राष्ट्रीयीकरण आणि संस्थानिकांचे तनखे, खास सवलती रद्द करण्याचे धोरण जनतेला पटले आहे. लोकसभेत इतर पक्षांवर पाठिंब्यासाठी अवलंबून राहू नये, जनतेकडून नव्याने कौल घ्यावा, उजव्या प्रतिगाम्यांना संघटित, बळकट होण्यासाठी अवधी दिला जाऊ नये, म्हणून मध्यावधी निवडणूक घेण्याचा यशवंतरावांचा आग्रह होता. काँग्रेसमध्ये फूट पडल्यावर लोकसभेतील संख्याबळावर परिणाम झालेला होता. आर्थिक कार्यक्रमाचे अंमलबजावणीसाठी डाव्या पक्षांची मदत लागत होती. यशवंतरावांना ही स्थिती फार दिवस चालू राहावी, असे वाटत नव्हते. उजव्या प्रतिगाम्यासंबंधीचा त्यांचा अंदाज बरोबर ठरला. राजकीय परिस्थिती चमत्कारिक होऊन बसली होती. काँग्रेस फुटल्यामुळे लोकसभेत काँग्रेसचे प्रतिनिधित्व बहुमतात नव्हते. म्हणूनच जनतेचा कौल नव्याने घ्यावा अशी चव्हाणांची कल्पना होती. उजवे कम्युनिस्ट सरकारवर टीका करीत होते आणि डावेही. १९६९ च्या अखेरीस डिसेंबरमध्ये मोरारजीभाई, निजलिंगप्पा, स. का. पाटील, संजीव रेड्डी आदिंनी स्वतंत्र पक्ष आणि जनसंघ यांचेशी बोलणी करून किमान समान कार्यक्रमाबाबत निवडणूक तडजोड करण्याचे पाऊल उचलले. जानेवारी, १९७० मध्ये त्यांनी जनसंघांचे बलराज मधोक आणि स्वतंत्र पक्षाचे मिनू मसानी यांच्याशी बोलणी केली. नंतर संघटना काँग्रेसच्या अधिवेशनात सांगण्यात आले की कम्युनिस्टांपासूनचा

धोका टाळण्यासाठी राष्ट्रीय लोकशाही पक्षांनी एकत्र येण्याची गरज आहे. इंदिरा सरकार खाली खेचायचे असेल तर "ग्रँड अलायन्स" ची गरज आहे. चव्हाणांना या हालचालींची चाहूल लागताच त्यांनी पंतप्रधानांना आणि सहकाऱ्यांना भावी धोक्याची कल्पना दिली. ग्रँड अलायन्सची व्यूहरचना यशस्वी होण्यापूर्वी मध्यावधी निवडणुका घेण्यात याव्यात, अशी सूचना केली. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या बैठकीतही यशवंतरावांनी मध्यावधी निवडणुकीसंबंधीची कल्पना दिली. ते म्हणाले की, स्वतंत्र-जनसंघ-संघटना काँग्रेस अशी अपवित्र युती होण्याची शक्यता आहे. ही युती झाली तर नक्षलवाद्यांपेक्षाही अधिक धोक्याची ठरेल. महाराष्ट्रातील यशवंतरावांच्या भाषणांची माहिती पंतप्रधान इंदिराजींपर्यंत पोहोचली. त्यांनीही चव्हाणांच्या सुचनेमागील अर्थ समजावून घेऊन मनाशी कांही निर्णय घेतला.

लोकसभेचे विसर्जन करून नव्याने निवडणुका घ्याव्यात असे इंदिराजींनी ठरविले आणि सरकारला तशी सूचना दिली. डिसेंबर २७ ला राष्ट्रपतींनी लोकसभेचे विसर्जन करून मार्चमध्ये नव्याने निवडणुका घेण्याचा आदेश दिला. विरोधी पक्ष भांबावून गेले. त्यांना कल्पना नव्हती की इंदिराजी एवढा धाडसी निर्णय घेतील. कांही विरोधकांनी राष्ट्रपतींकडे अर्ज करून लोकसभा विसर्जित करू नये अशी मागणी केली. तथापि त्यांचे सारे मुसळ केरात गेले. सरकारवर टीका करण्याची संधी त्यांनी गमावली होती आणि निवडणुकीची एवढ्या अल्पावधित तयारी करण्याबाबत ते असमर्थ ठरणार होते. या खेपेला जनसंघाजवळ ना साधु होते ना गोवधबंदी. स्वतंत्र पक्षाची पण पंचाईत झाली होती. भारतात राजकीय अस्थैर्य आहे, संसदीय लोकशाही धोक्यात आहे असे चित्र देशी व विदेशी पत्रकारांनी चितारले होते तरी परिस्थिती तशी नव्हती. इंदिराजींच्या पाठीशी लोकमत होते. त्यांच्या सामाजिक-आर्थिक कार्यक्रमावर लोकांचा विश्वास होता. तसेच इंदिराजीच राजकीय स्थैर्य देऊ शकतील अशी लोकांना खात्री वाटत होती. लोकसभा आणि विधिमंडळ यांच्या निवडणुकीची फारकत करून इंदिराजींनी लोकसभा निवडणूक प्रचारात स्थानिक, प्रांतिक प्रश्नांना फाटा दिला. यशवंतराव चव्हाण यांनी काँग्रेसचा निवडणूक जाहिरनामा तयार करण्यात महत्त्वाचा वांटा उचलला. सौम्य शब्दात त्यांनी भावी कार्यक्रमाची दिशा दाखवून मतदारांच्या मनात विश्वास निर्माण केला.

इतर पक्षांचे उमेदवार जाहीर झाल्यावर काँग्रेस पक्षाने आपले उमेदवार जाहीर केले. कांही नावे जानेवारीत आणि कांही फेब्रुवारीत जाहीर करण्यात आली. संघटना काँग्रेसने निवडणूक चिन्हाचा प्रश्न सुप्रीम कोर्टात नेला. काँग्रेसचे चिन्ह बैलजोडी होते. ते दोघांनी कसे वापरायचे. इंदिराजींच्या काँग्रेसने अखेर 'गाय-वासरू' या चिन्हाची निवड करून संघटना काँग्रेसवर निवडणुकीत मात केली. प्रादेशिक पक्षाबरोबर तसेच उजवे कम्युनिस्ट, मुस्लिम लीगबरोबर निवडणूक समझोता करावा याबद्दल बराच खल झाला. काँग्रेसचे अध्यक्ष जगजीवनराम प्रादेशिक व जातीय पक्षाबरोबर समझोत्याला अनुकूल नव्हते. इंदिराजींनी पण महाराष्ट्राबाबत वेगळीच भूमिका स्वीकारली होती. त्यामुळे 'ग्रॅण्ड अलायन्स'ला वाटले की आपण निश्चितपणे बाजी मारणार. तथापि त्यांच्या लक्षात आले नाही की इंदिराजी या गरिबी हटविण्यासाठी झटत आहेत, गरिब, दुर्बल, दलित, गिरीजन यांच्या भल्यासाठी त्या जरूर ती पावले उचलत आहेत. त्या तरुण आहेत आणि त्यांनी 'गाय-वासरू' हे शेतकऱ्यांचे प्रिय चिन्ह स्वीकारले आहे. राजकीय स्थैर्य, ग्रॅण्ड अलायन्सचा धोका, 'गरिबी हटाव' ची आवश्यकता, इंदिरा गांधींचे हात बळकट करण्याची गरज यावर काँग्रेसच्या प्रचारात भर देण्यात आला.

यशवंतराव हे श्रीमती इंदिरा गांधींसाठी, त्यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेससाठी जीवापाड मेहनत घेत असतानादेखील इंदिराजी आणि त्यांचे 'किचन कॅबिनेट' यशवंतरावांबद्दल आदर, आपुलकी, विश्वास, श्रद्धेऐवजी संशयाची भावना बाळगून कारवाया करीत होते. यशवंतरावांना मानणारे लोक कमीत कमी निवडून यावेत म्हणून तिकिट वांटपात ढवळाढवळ करीत होते. महाराष्ट्रात मराठे अधिक आहेत, त्यात पाटील व देशमुखांचा भरणा अधिक आहे, तेव्हा या मंडळींना कात्री लावावी असे श्रीमतीजींचे कान भरविण्यात आले. रजपूत-मराठे-जाट-डोग्रा आदि एकत्र आले तर पंचाईत होईल असे चित्र उभे करण्यात ही मंडळी गर्क होती. महाराष्ट्राच्या उमेदवार यादीतील कांही पाटील व देशमुख यांची नावे कमी करण्याचे श्रीमतीजींनी ठरविले. त्यात अनंतराव पाटील, उस्मानाबाद जिल्ह्यातील टी. ए. पाटील, शिवाजीराव देशमुख, के. जी. देशमुख यांचा समावेश करण्यात आला होता. यशवंतरावांनी या प्रकाराबद्दल वसंतराव नाईक यांचेकडे नाराजी व्यक्त

केली. नाईकसाहेबांनी द्वारकाप्रसाद मिश्राजींची भेट घेऊन त्यांना सांगितले की, महाराष्ट्रातील मराठ्यांना वगळून निवडणुका जिंकता येणार नाहीत. पाटील-देशमुखांबद्दल वावडे वाटण्याचे कारण काय बरे ! ही मंडळी यशवंतरावांची चहाती आहेत म्हणून ! मिश्राजींनी इंदिराजींची त्वरीत भेट घेऊन वसंतराव नाईकांचे म्हणणे त्यांच्या कानावर घातले. एवढेच नव्हे तर अनंतराव पाटील यांचेऐवजी दुसरे कुणाला तिकिट दिले तर सातारा मतदार संघातून आपल्याऐवजी आपण त्यांना उभे करू असे चव्हाणसाहेब म्हटल्याचेही इंदिराजींना सांगून टाकले. श्रीमतीजींना अर्थ उमगला आणि त्यांनी महाराष्ट्राच्या यादीला हात लावावयाचा नाही असे ठरविले. निवडणूक चिन्ह मिळण्यास विलंब लागला, छपाईतील जुनी पोस्टर्स वाया गेली तरी निवडणूक प्रचाराची चपळाईने तयारी करण्यात आली. कांही राज्यात प्रादेशिक पक्षांशी निवडणूक समझोता करण्यात आला. उजवे कम्युनिस्ट, डी. एम. के., मुस्लिम लीग यांचेशी जुळतेमिळते घेण्यात आले. जगजीवनराम यांना कम्युनिस्ट आदि मान्य नव्हते. तथापि श्रीमती गांधी यांच्यापुढे काय बोलणार! तामिळनाडूतही डी. एम. के. ला झुकते माप द्यावे लागले. 'ग्रॅण्ड अलायन्स'कडे पक्षीय संघटना असल्यामुळे ते खुशीत गाजरे खात इंदिराजींच्या काँग्रेसला हंसत होते. त्यांना मतदाराचा 'मूड' समजला नव्हता. म्हणूनच निवडणूक निकालानंतर त्यांना जोराचा धक्का बसला.

काँग्रेसने प्रचारात 'गरिबी हटाव' वर जोर दिला होता. त्याचबरोबर केंद्रात स्थिर सरकारची गरज आहे, इंदिरा गांधींचे हात बळकट करण्याची गरज आहे, चार पक्षांचे ऐक्य हा प्रगतीला अडथळा आहे यावर भर देण्यात आला होता. चव्हाणांनी प्रचार सभेतून मतदारांना विचारले की सर्वसाधारण जनतेची, गरिबांची प्रगती हवी की तुम्हाला संस्थानिकांचे तनखे, खास हक्क चालू रहायला हवेत. मक्तेदार, प्रतिगामी यांना जवळ करायचे की सामान्य माणसाला याचा निर्णय या निवडणुकीत करावयाचा आहे. इंदिराजी या हुकुमशहा नाहीत. त्या तशा असत्या तर तुमच्यापाशी येऊन त्यांनी मतांची मागणी केली नसती. लोकसभेची मुदत संपण्यापूर्वीच दीड वर्षे अगोदरच लोकसभेचे विसर्जन करून नव्या निवडणुका घेण्याचा निर्णय घ्यायचा हे हुकुमशाहीत बसत नाही. लोकांकडून त्यांना कौल हवाय

आणि तुम्ही तो अनुकूल द्याल अशीच खात्री आहे. 'ग्रॅण्ड अलायन्स'मुळे राजकीय पक्षांचे ध्रुवीकरण झाले असे कांही निरिक्षकांनी मत व्यक्त केले होते. तथापि तसे प्रत्यक्षात घडलेले नव्हते. काँग्रेसचा पराभव करायचा एवढाच मर्यादित उद्देश अलायन्सपुढे होता. काँग्रेसने डी. एम. के. सारख्या प्रादेशिक पक्षांशी समझोता केला होता. डाव्या शक्ती विभागलेल्या होता. संयुक्त समाजवादी पक्षाने उजव्या पक्षाशी हातमिळवणी केलेली होती. प्रजासमाजवादी एकलकोंड्यासारखे वावरत होते. मार्क्सिस्ट कम्युनिस्टांनी स्वतःच्या बळावर निवडणुका लढविण्याचे ठरविले होते. त्यामुळे ध्रुवीकरण असे झालेलेच नव्हते. १ ते १० मार्चच्या दरम्यान मतदान होईल असे जाहीर करण्यात आले होते. वृत्तपत्रांनी, ज्योतिषांनी, गॅलप पोलवाल्यांनी जे अंदाज व्यक्त केले होते ते चुकीचे ठरले आणि काँग्रेस पक्ष दोनतृतीयांश बहुमत मिळवून निवडून आला. एकूण ५१६ निकालात काँग्रेसने ३५० जागा मिळविल्या होत्या. काँग्रेसने १९६७ मध्ये ४०.१ टक्के मते मिळविली होती तर १९७१ मध्ये काँग्रेसला ४३.६४ टक्के मते मिळाली.

मुंबई, मद्रास, कलकत्ता, दिल्ली या महानगरातील जागांवरही काँग्रेसने यश संपादन केले. संघटना काँग्रेसला अवघ्या १८ जागा मिळाल्या. त्यांची मतदानाची टक्केवारी १०.५ टक्के एवढी होती. स्वतंत्र पक्षाची ४४ वरून ८ तर संयुक्त समाजवाद्यांची २३ वरून ३ वर घसरगुंडी झाली. प्रजासमाजवादी पक्षाला दोन जागा मिळाल्या. जनसंघाची अशीच घसरगुंडी झाली. मतदारांनी उजव्या प्रतिगाम्यांना अक्षरशः झिडकारले आणि काँग्रेसला प्रचंड बहुमताने सत्तेवर आरूढ केले. मार्क्सिस्ट कम्युनिस्टांनी मात्र २५ जागा मिळवून दुसरा नंबर पटकावला. त्यांची सभासद संख्या गेल्या खेपेपेक्षा ६ जागांनी वाढली. लोकसभेत संघटना काँग्रेस पहिल्याऐवजी पांचव्या स्थानावर गेली आणि मार्क्सिस्ट कम्युनिस्ट पांचव्या स्थानावरून पहिल्या स्थानावर आले. महाराष्ट्रात तर काँग्रेस पक्षाने कमालच केली. एकूण ४४ जागांपैकी ४३ जागा जिंकून महाराष्ट्र काँग्रेसच्या आणि यशवंतराव चव्हाणांच्या शक्तीचा प्रत्यय आणून दिला. यशवंतराव चव्हाण हे सातारा मतदारसंघातून १ लक्ष ७१ हजार मतांची आघाडी घेऊन विजयी झाले. सगळे पाटील व देशमुख प्रचंड मतांनी निवडून आले. महाराष्ट्रात शिवसेनेने काँग्रेसला

आव्हान दिले होते. यशवंतरावांची मुंबईतील प्रचारसभा उधळून लावण्याची भाषा शिवसेनेने वापरली होती. "शिवसेना झिंदाबाद यशवंतराव चव्हाण मुर्दाबाद" असे फलक जागजागी लावले होते. यशवंतराव प्रचार सभेसाठी दिल्लीहून विमानाने मुंबईला आले आणि त्यांनी दादर चौपाटीवर सभा घेतली. सभेला अडीच-तीन लाखांहून अधिक श्रोते उपस्थित होते. सभेवरील बहिष्काराचे शिवसेनेचे आवाहन मुंबईकरांनी फेटाळून सभेला ते हजर राहिले.

निवडणुकीतील काँग्रेसच्या नेत्रदीपक यशाबद्दल पत्रकारांशी बोलताना यशवंतराव म्हणाले, "निवडणुका जिंकण्यासाठी पुढील दोन महत्त्वाच्या गोष्टी लागतात. महत्त्वाचा राष्ट्रीय प्रश्न आणि राष्ट्रीय नेता. या दोन्ही गोष्टी काँग्रेसजवळ होत्या. काँग्रेसच्या सामाजिक-आर्थिक कार्यक्रमावर आणि इंदिराजींच्या नेतृत्वावर लोकांनी विश्वास ठेऊन मतदान केले. केंद्रात स्थिर सरकार हवे होते. संमिश्र मंत्रिमंडळाचा कारभार कसा भोंगळ चालतो याचा अनुभव लोकांनी कांही राज्यात घेतलेला होता. गरीब, मागासवर्गीय, अल्पसंख्य, मुस्लीम, ख्रिश्चन या सर्वांनी काँग्रेसला भरभरून मते दिली होती. १९६७ च्या निवडणुकीत काँग्रसविरोधी मतदान झाले आणि जनसंघाला काही राज्यांत बऱ्यापैकी जागा मिळाल्या. या ठिकाणी काँग्रेसने गेल्या दहा-पंधरा वर्षात विधायक दृष्टीने कांहीच कामकाज केलेले नव्हते. १९७१ च्या निवडणुकीत काँग्रेसवर पुन्हा विश्वास व्यक्त करण्यात आलेला आहे." इंदिरा गांधींचे कौतुक भारतीय वृत्तपत्रांनी तोंड भरून केले. त्याचबरोबर रशियाच्या 'टास' वृत्तसंस्थेने, 'न्यूयॉर्क टाईम्स'नेही. कांही देशी आणि परदेशी वृत्तपत्रांनी असे चित्र रंगवले होते की भारतात राजकीय अस्थैर्य निर्माण होऊन लोकशाही धोक्यात येण्याची, देशाचे तुकडे होण्याची भिती वाटते. त्यांची भीती खोटी ठरली आणि सबंध आग्नेय आशिया खंडात भारत हाच एक देश असा आहे की जेथे स्थिर सरकार अधिकारारूढ आहे याची ग्वाही जगाला द्यावी लागली. एका परदेशी पत्रकाराने यशवंतरावांना विचारले, 'काय हो, निवडणुकीपूर्वी तुम्ही जी आश्वासने दिली होती ती पूर्ण करणार कां ?" त्यावर यशवंतरावांनी उत्तर दिले, "मतदारांना दिलेली आश्वासनें पूर्ण करण्याचा आमचा निष्ठापूर्वक प्रयत्न राहील. आम्ही आमची अभिवचने विसरणार नाही. किंमती स्थिर करणे आणि बेकारी

निवारण करणे हे दोन महत्त्वाचे आणि तांतडीचे प्रश्न आहेत. गरिबी हटविण्यासाठी आम्ही पावले उचलायला सुरुवात केली आहे. सामाजिक आणि आर्थिक विषमता दूर करायलाच हवी. जनतेत नैराश्य निर्माण होता कामा नये याची दक्षता घेऊ. दिलेल्या वचनांपासून दूर पळणार नाही. जटिल प्रश्न सोडविण्याचे आटोकाट प्रयत्न करू."

अर्थखात्याच्या कारभाराला योग्य दिशा देण्यात, निरनिराळ्या देशांना भेटी देऊन त्यांचेशी आर्थिक संबंध प्रस्थापित करण्यात यशवंतराव प्रयत्नशील असतानाच १९७४ मध्ये त्यांचे अर्थखाते बदलून त्यांना परराष्ट्र व्यवहार खाते देण्याचा निर्णय पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींनी घेतला. जगजीवनराम यांचेकडील संरक्षण खाते यशवंतरावांना दिले जाईल अशी बातमी पसरली होती. पण घडले भलतेच. श्रीमती गांधी यांनी चव्हाणांशी चर्चा करून त्यांना परराष्ट्र खाते सांभाळण्याची विनंती केली. यशवंतरावांनी होकार दर्शवून ११ ऑक्टोबर १९७४ पासून नव्या खात्याचा कारभार पाहण्यास सुरुवात केली. संरक्षण, गृह, अर्थ आणि आतां परराष्ट्र व्यवहार अशी एकामागून एक महत्त्वाची खाती सांभाळण्याची जबाबदारी चव्हाणांचेवर सोपविण्यात येत होती. याचा अर्थ त्यांच्या संपन्न अनुभवाचा, प्रशासन कुशलतेचा उपयोग करून घेण्यात येत होता अशी प्रतिक्रिया जाणकारांनी व्यक्त केली. चव्हाण हे ज्येष्ठ नेते होते आणि सर्वांशी जुळवून घेऊन काम करण्याची त्यांची पद्धत होती. देशाचे परराष्ट्र खाते पंडित नेहरूंनी सांभाळले होते, त्यांनी कांही नीती ठरवून दिली होती याची यशवंतरावांना पूर्ण जाणीव होती. कुठल्याही गटात सामील व्हायचे नाही, तटस्थतेच्या धोरणाचा पाठपुरावा करायचा हे नेहरूंचे धोरण डोळ्यांपुढे ठेऊन त्यांनी आपल्या कामावर लक्ष केंद्रित केले. युरोप, अमेरिका, दक्षिण अमेरिका, आफ्रिका आदि खंडांतील विकसित आणि अविकसित देशांना भेटी देऊन त्यांनी भारताच्या परराष्ट्र धोरणाचे सूत्र स्पष्ट करून सांगितले. जास्तीत जास्त देशांशी चांगले संबंध प्रस्थापित केले. चीनने भारतावर आक्रमण केल्यावर देशाच्या संरक्षणासाठी मुख्यमंत्री यशवंतराव मुंबई सोडून दिल्लीला गेले आणि चीनने त्वरीत आक्रमण थांबविले. योगायोगाचा भाग असा की याच चीनशी भारताने सलोख्याचे संबंध निर्माण करावेत अशी चीनी नेत्यांची इच्छा दिसताच चव्हाणांनी अनुकूलता दर्शवून त्या दिशेने पावले टाकली.

विकसनशील देशांनी अर्थविषयक क्षेत्रात एकमेकांशी सहकार्य करून परस्परांना आर्थिक ताकद देण्याची गरज आहे हे अर्थमंत्रिपदी असताना यशवंतराव चव्हाणांना जाणवलेले होते. चलन संकट त्यांना ठाऊक होते. अविकसित देशांच्या प्रश्नांची त्यांना जाण होती. म्हणूनच परराष्ट्र व्यवहार खात्याचा कारभार पाहताना विकसनशील राष्ट्रांशी या दृष्टिकोनातूनच चर्चा-वाटाघाटी करण्यावर त्यांनी भर दिला. ऑक्टोबरमध्ये खात्याची सूत्रे हाती घेतल्यावर महिनाभरात त्यांनी श्रीलंकेला भेट दिली. त्या पाठोपाठ ते बांगला देशाला जाऊन आले. दोन्ही भारताची शेजारी राष्ट्रे म्हणून त्यांना अग्रक्रम दिला. त्यानंतर जानेवारी १९७५ मध्ये त्यांनी युगोस्लाव्हियाला भेट देवून मार्शल टिटो यांचेशी चर्चा केली. मार्चमध्ये ते क्युबा आणि गियानाच्या दौऱ्यावर गेले. त्याच्या पुढच्या महिन्यात त्यांनी जमेका, मेक्सिकोला भेट दिली. त्यानंतर मध्य पूर्वेतील इजिप्त-लेबाननची त्यांची भेट महत्त्वाची ठरली. सप्टेंबरमध्ये त्यांनी युरोप-अमेरिकेचा दौरा केला. राष्ट्रसंघाच्या बैठकीला उपस्थित राहून भारताची भूमिका जोरदारपणे मांडली. १९७६ हे सालही परदेशी भेटी, चर्चा, वाटाघाटीतच गेले. भारताचे इतर देशांबरोबर राजकीय, आर्थिक, औद्योगिक, व्यापार, सांस्कृतिक संबंध वाढवावे हा या देशाटनामागील प्रमुख उद्देश होता. शेजारच्या नेपाळ, तसेच तुर्कस्थान, अल्जेरिया आदि देशांनाही यशवंतरावांनी भेट देऊन स्नेहसंबंध निर्माण केले. अलिप्ततेचे धोरण कायम ठेवून त्यांनी भारत-अमेरिका, भारत-रशिया, भारत-पाकिस्तान, भारत-बांगला देश, भारत-चीन यांच्यामधील राजनैतिक संबंध सुधारण्याचे दृष्टीने नेटाने प्रयत्न केले. परराष्ट्र मंत्रिपदाच्या यशवंतरावांच्या कारकिर्दीत १९७५ च्या मध्याला भारतात एक विशेष घटना घडली आणि त्या घटनेने साऱ्या देशाला अवाक केले. त्याचबरोबर साऱ्या जगालाही एक प्रकारे आश्चर्याचा धक्का दिला. इंदिरा गांधींनी देशात अचानकपणे आणीबाणी (इमर्जन्सी) पुकारण्याचा निर्णय घेतला. राष्ट्रपती फक्रुद्दिन अली अहमद यांनी १५ जूनला वटहुकूम काढून आणीबाणी जाहीर केली आणि अनेक प्रकारचे निर्बंध जाहीर केले.

✦✦✦

# : १३ :

मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांना विश्वासात न घेता पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशावर आणीबाणी लादली. कांही मोजक्या निकटवर्तीयांखेरीज बाकीच्यांना अंधारात ठेवले. यशवंतराव परदेश दौऱ्यावर होते. आणीबाणी जाहीर झाली आणि त्यांना आश्चर्याचा मोठा धक्का बसला. मंत्रिमंडळाची बैठक बोलावून, मंत्र्यांशी विचारविनिमय करून निर्णय घेण्याऐवजी इंदिरा गांधींनी स्वतःच्याच मताने निर्णय घेतला अणि त्याची अंमलबजावणी वटहुकुमाद्वारे केली, याचा विस्मय वांटल्यावाचून राहिला नाही. आणीबाणीमुळे विरोधी राजकीय पक्षांची कोंडी झाली, त्याचबरोबर आम जनतेचीही विविध प्रकारे अडवणूक झाली. वृत्तपत्रांवर जाचक निर्बंध लादण्यात येऊन विचार-आचार स्वातंत्र्याची मुस्कटदाबी करण्यात आली. विरोधी नेत्यांना अटक करणे, तुरुंगात डांबणे आदि प्रकार सर्रास सुरू झाले. लोकशाहीचा संकोच करण्यात आला. आणीबाणीच्या निर्णयाबद्दल यशवंतराव मनातून खट्टू झाले हे खरे. तथापि त्याबद्दल त्यांनी उघडपणे नाराजी व्यक्त केली नाही की विरोध दर्शविला नाही. त्यांनी मुग्धता पाळली. "मी ठरवीन ती पूर्वदिशा" या पद्धतीने इंदिराजींनी कारभार सुरू ठेवला. दिल्लीत एकाधिकारशाही सुरू झाली होती. इंदिरा पुत्र संजय गांधी आणि त्यांचे पित्ते यांनी दिल्लीत धुमाकूळ सुरू केला होता. जुलूम-जबरदस्तीचा मार्ग अवलंबून "संजय ब्रिगेड"वाटेल ते करू लागली होती. इंदिराजी या संजयला आवरू शकत नव्हत्या. इंदिराजींच्या कांही पित्त्यांनी बाईची स्तुती करण्याकरिता आणीबाणीला "अनुशासन पर्व" संबोधून भलामण सुरू केली. कांही राज्यांत कुटुंबनियोजनाबाबत जबरदस्ती करण्यात आली. संजयच्या उपद्रवाबद्दल मंत्रिमंडळातील कित्येक मंत्री नाराज-नाखूष होते, तथापि

ते प्रतिबंधात्मक हालचाल करू शकत नव्हते. मोहन धारिया यांनी मात्र राज्यमंत्रीपदाचा राजीनामा देऊन कांही काळ खळबळ उडवून दिली. तथापि त्याचा श्रीमतीजींवर काडीचाही परिणाम झाला नाही.

यशवंतराव हे द्विधा मनःस्थितीत होते. सत्तेवर रहायचे आणि जनतेतही रहायचे अशी स्वतःशी कसरत करीत होते. "रागाने मोडता येते पण जोडता येत नाही, राष्ट्रीय कार्यात स्वतःचे व्यक्तिमत्त्व विसरायला हवे" असे ते स्नेह्यांना व सहकाऱ्यांना बोलून दाखवायचे. काँग्रेसची स्थिती आणीबाणीमुळे दयनीय झाली होती. विरोधी पक्ष प्रबळ होऊ लागले होते. आणीबाणी लवकर उठवावी किंवा संपवावी असे यशवंतरावांना मनोमनी वाटायचे. श्रीमती गांधींची एके दिवशी भेट घेऊन यशवंतरावांनी त्यांना एकूण परिस्थितीची कल्पना दिली. राजकीय कैद्यांची त्वरित मुक्तता करावी असेही सुचविले. लोकशाहीची प्रतिष्ठा राखायची असेल तर आणीबाणी लवकर संपवून नव्याने निवडुका घ्याव्या असेही आग्रहपूर्वक सांगितले. आणीबाणीतील अन्यायावर, गैरप्रकारांवर, जुलूमांवर वृत्तपत्रातून रोज टीका होत होती. विचारवंतही विरोध प्रगट करू लागले होते. परराष्ट्र मंत्री या नात्याने यशवंतराव परदेशात बुखारेस्टला गेले असताना त्यांना पंतप्रधान इंदिराजींनी पाठविलेला निरोप मिळाला. तो दिवस १८ जानेवारी, १९७७ चा होता. निवडणुका घेतल्या तर आणीबाणीच्या वातावरणातून देश मुक्त होईल हा आपला विचार श्रीमती गांधींना पटला याचा यशवंतरावांना आनंद वाटला. पंतप्रधानांच्या संदेशात म्हटले होते की, "जो महत्त्वाचा निर्णय आपल्याला घ्यायचा होता तो मी उद्यां घेणार आहे. तुम्ही परदेशी जाण्यापूर्वी तुमच्याशी बोलणार होते, तथापि तुम्ही आणि मी कामाच्या गर्दीत होतो, बोलणे राहून गेले. रेडिओवरून तुम्हाला निर्णय कळण्यापूर्वी अगोदर कानी पडावा म्हणून मुद्दाम फोनने कळवित आहे. विदेशातील कार्यक्रम संपण्यापूर्वी तुम्हाला भारतात परत येता आले तर जरूर प्रयत्न करावा."

पंतप्रधानांनी लोकसभा बरखास्तीचा आणि नव्याने निवडणूका घेण्याचा निर्णय जाहीर करून सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला. १९७७ मध्ये लोकसभेची निवडूणक ठरल्याप्रमाणे झाली. काँग्रेसचा पराभव होऊन इंदिरा गांधींची सत्ता संपुष्टात आली. जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली लोकशाहीवादी

काँग्रेसविरोधी प्रमुख पक्ष एकत्र येऊन त्यांनी "जनता पक्ष" या नांवाने पर्यायी पक्षाची स्थापना केली. त्यात संघटना काँग्रेस, समाजवादी पक्ष, भारतीय जनता पक्ष, लोकदल सामील झाल्याने काँग्रेसपुढे मोठे आव्हान उभे राहिले. लोकमत आणीबाणी विरुद्ध बनलेले होते. त्याचा फायदा जनता पक्षाला मिळाला. निवडणुकीत त्यांनी बहुमत मिळविले. पंतप्रधान कोणी व्हायचे याबद्दल बराचसा खल झाला, बराच वादही झाला. मोरारजीभाई, चरणसिंग, जगजीवनराम हे तिघेही इच्छुक होते आणि प्रयत्नांची पराकाष्ठा करीत होते. अखेर मोरारजीभाई पंतप्रधान आणि चरणसिंग उपपंतप्रधान अशी तडजोड होऊन जनता पक्ष केंद्रात सत्तारूढ झाला. काँग्रेस पक्षाने मुरब्बी, मुत्सद्दी आणि नांवाजलेले संसदपटू यशवंतराव चव्हाण यांच्याकडे विरोधी पक्ष नेतेपद सोपविले. इंदिरा गांधी पराभूत झालेल्या होत्या. यशवंतरावांनी विरोधी पक्ष नेत्याची जबाबदारी समर्थपणे सांभाळली. मोरारजींचा हटवादीपणा, संयुक्त समाजवाद्यांचा तऱ्हेवाईकपणा आणि जनसंघाचा जातीयपणा यामुळे जनता पक्षात वर्षभरात मतभेद सुरू झाले. वाजपेयी परराष्ट्रमंत्री होते तर लालकृष्ण अडवानी यांचेकडे सूचना व नभोवाणी खाते दिलेले होते. मंत्रिमंडळात जॉर्ज फर्नांडिस होते आणि राजनारायण पण होते. मधु लिमये, जॉर्ज फर्नांडिस आदि समाजवादी मंडळींनी जनसंघाबद्दल, त्यांच्या दुहेरी निष्ठेबद्दल कुरबुरी सुरू केलेल्या होत्या. जनसंघ नेत्यांनी जनता पक्षातील मतभेद मिटविण्याचा प्रयत्न करण्याऐवजी फूट कशी पडेल अशा दृष्टीनेच पावले टाकण्यास सुरुवात केली. भारतीय जनतेने प्रथमच बिगर काँग्रेसचे सरकार दिल्लीत स्थापण्याची संधी देऊनही या मंडळींनी या संधीचे सोने केले नाही. विरोधी पक्षनेते म्हणून यशवंतरावांनी आपली जबाबदारी उत्तम प्रकारे सांभाळली. त्याबद्दल गृहात आणि गृहाबाहेर त्यांची अनेकदा वाहवा झाली.

विरोधी पक्षनेते म्हणून यशवंतरावांनी राष्ट्राला उद्देशून ५ एप्रिल, १९७७ रोजी आकाशवाणीवरून भाषण केले. त्यांनी लोकमताचा कौल आणि अर्थ विशद करून सांगितला. यशवंतराव म्हणाले, "लोकसभेत काँग्रेसला प्रथमच बहुमत गमवावे लागले आहे. लोकमताचा कौल आम्ही मानतो आणि पंतप्रधान मोरारजी देसाईंना आणि त्यांच्या सरकारला सुयश चिंतितो. भारतीय जनतेने निवडणुकीत कमालीची प्रगल्भता आणि सूज्ञता दाखविली आहे, लोकशाहीच्या आंतरिक

सामर्थ्याचे दर्शन घडविले आहे. कॉंग्रेसच्या मूलभूत धोरणाविरुद्ध किंवा देशात कॉंग्रेसने केलेल्या प्रगतीविरुद्ध जनतेने कौल दिलेला नाही. आणीबाणीत कांही धोरणांची जी अतिरेकी आणि कठोर अंमलबजावणी झाली त्याबद्दल लोक संतापले आणि त्यांनी विरोधी मतदान केले. कॉंग्रेसला यातून मोठा धडा मिळाला आहे. आणीबाणीचे आणि निवडणुकीचे धडे कॉंग्रेस शिकली आहे असे मी देशाला आश्वासन देतो. मोरारजीभाई हे स्वातंत्र्य संग्रामातील सेनानी आहेत, राज्य व केंद्र सरकारातील महत्त्वाची पदे सांभाळलेले अनुभवी प्रशासक आहेत. राष्ट्र उभारणीच्या कामात आमचा पक्ष त्यांच्या सरकारला सहकार्य करील अशी मी ग्वाही देतो. नकारात्मक भूमिका न घेता सरकारने कारभार हांकावा, सूडबुद्धीने वागण्याचा मोह टाळावा. आपण सर्वजण लोकशाही मूल्ये मानणारे असल्याने भूतकाळातील प्रमाद विसरून जाऊन सहकार्याने पुढील वाटचाल करू या. गेल्या कांही वर्षांतील कडवटपणा आता बस्स झाला. सर्व देशबांधवांना सामाजिक मुक्तता, आर्थिक प्रगती, बौद्धिक आणि अध्यात्मिक विकास यांचा लाभ करून देऊ या.'' या भाषणाचा चांगला परिणाम झाला. विरोधी बाकावर असणारा कॉंग्रेस पक्ष उपद्रवी ठरणार नाही याची खात्री मोरारजींना आणि त्यांच्या सरकारला वाटू लागली. यशवंतरावांच्या सकारात्मक भूमिकेचे सर्वांनी कौतुक केले.

जनता पक्षातील कुरबुरी खूपच वाढल्यावर यशवंतरावांनी अविश्वासाचा ठराव मांडण्याच्या दृष्टीने वातावरण निर्मिती केली. तथपि अविश्वासाचा ठराव दाखल करण्यापूर्वीच अंतर्गत मतभेदामुळे मोरारजींचे सरकार कोसळले. त्यानंतर राजकीय घटनांनी जोराने वेग घेतला आणि देशाचे राजकीय चित्रच बदलून टाकले. जनसंघ बाहेर पडला आणि त्याने ''भारतीय जनता पक्ष'' हे नांव घेतले. समाजवाद्यांनी 'जनता पक्ष' हेच नांव पुढे चालू ठेवले. चौधरी चरणसिंगांनी उचल खाल्ली आणि स्वतः मंत्रिमंडळ बनविण्याचे दृष्टीने हालचाली सुरू केल्या. जनसंघ नेत्यांशी त्यांनी बोलणी केली, त्याचबरोबर कॉंग्रेसच्या नेत्यांशीही बोलणी केली. गांठीभेटी सुरू झाल्या. इंदिराजींनी राजकीय खेळी खेळण्याचे ठरवून पावले टाकण्यास सुरुवात केली.

विरोधी पक्ष नेत्याची जबाबदारी पार पाडताना यशवंतरावांचे संसदपटुत्वाचे वैशिष्ट्य खुलून दिसले. लोकसभा गृहातले त्यांचे वक्तव्य अथवा भाषण अभ्यासपूर्ण आणि वस्तुनिष्ठ असायचे. भाषण प्रभावी व्हायचे. प्रसंगावधान, वैचारिक समतोलपणा, समोरच्या बाकावरील (विरोधी) सदस्यांना विश्वासात घेण्याचे कसब यामुळे सगळेजण त्यांना मातब्बर संसदपटू म्हणायचे. लांबलचक भाषण करणे किंवा प्रवचन देणे हे कटाक्षाने टाळून यशवंतराव मोजके आणि प्रसंगोचित असेच बोलायचे. संरक्षणमंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री आणि विरोधी पक्ष नेतेपदावरून लोकसभेत त्यांनी प्रश्नांना ज्या पद्धतीने उत्तरे दिली, चर्चांना ज्या पद्धतीने उत्तरे दिली, प्रतिस्पर्ध्यांचे हल्ले ज्या पद्धतीने परतावून लावले त्यातून त्यांचे संसदीय नैपुण्य पुरेपूर दिसून आले. अटलबिहारी बाजपेयी, प्रा. हिरेन मुखर्जी, प्रा. एन. जी. रंगा, एन. दांडेकर, मिनू मसानी. गोपालन, मधोक यांच्यासारखे विरोधी पक्षांचे खंदे खासदार गृहाच्याबाहेर भेटले की यशवंतरावांची मुक्त कंठाने स्तुती करायचे. पंतप्रधान इंदिरा गांधी मात्र मनातून किल्मिष ठेऊन वागत, बोलत असत. यशवंतरावांची राजनीती आणि मुत्सद्देगिरी यशस्वी होऊ नये म्हणून इंदिरा गांधींनी शक्य ती खबरदारी घेतली होती. पंडित नेहरूंची भूमिका आणि राजवट लोकशाहीवादी होती. इंदिरा गांधींची भूमिका व राजवट एकतंत्री अथवा एकाधिकारशाहीची होती. म्हणूनच त्यांच्या राजवटीत काँग्रेसचे स्वरूप बदलले आणि राज्यकारभाराचेही.

नेहरू आणि शास्त्रीजींनी यशवंतरावांना मानाने, प्रतिष्ठेने, आदराने वागविले. इंदिराजींची वागणूक दुटप्पी असायची. काँग्रेसमधील चांगल्या, गुणी, कर्तबगार नेत्यांना त्यांनी नेस्तनाबूत करून स्वतःची प्रतिमा उभी करण्याचा कसोशीने प्रयत्न केला. "इंदिरा म्हणजे भारत" (इंदिरा इज इंडिया) असे आपल्या सहकाऱ्यांनी म्हणावे येथपर्यंत त्यांची मजल गेली. बँकांच्या राष्ट्रीयकरणासाठी, संस्थानिकांचे तनखे रद्द करण्यासाठी चव्हाणांनी प्रयत्न केले, खटपटी केल्या आणि त्याचे श्रेय मात्र इंदिराजींनी उपटले. आणीबाणीबद्दल मौन बाळगण्याची भूमिका घेवून, तसेच मोरारजींचे अर्थमंत्रिपद काढून घेण्याच्या इंदिराजींच्या निर्णयाबद्दल मौन बाळगून यशवंतरावांना आपला राजकीय पराभव मान्य करावा लागला.

राजकारणात पराभव होतात. पण ज्यांच्या पाठीशी शक्ती उभी करून पंतप्रधानपदावर आरूढ होण्यास मदत केली त्या इंदिरा गांधींनीच सातत्याने यशवंतरावांबद्दल आपला स्पर्धक या कल्पनेने मनात शंका व भीती बाळगली. त्यांच्या अधिक मोठे होण्यात अडथळे आणले. यशवंतरावांना उपपंतप्रधानपद स्वीकारण्याचा आग्रह करण्यामागे त्यांचा कोणता हेतू होता हे सर्व संबंधितांना नंतर उशीरा कळले. चरणसिंग यांचे सरकार अल्पावधीतच पाडायचे, नव्याने निवडणूका घ्यायला लावायचे आणि यशवंतरावांना पंतप्रधान होण्याची संधी मिळू द्यायची नाही असा इंदिराजींचा डाव होता.

काँग्रेसने आणि भाजपने चौधरी चरणसिंगांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेऊन त्यांना पंतप्रधानपदावर बसविले. चरणसिंगांच्या मंत्रिमंडळात यशवंतरावांनी उपपंतप्रधानपद स्वीकारावे अशी इंदिराजींनी गळ घातल्यावर यशवंतरावांनी महाराष्ट्रातील कांही खासदार, कांही नेते, मुख्यमंत्री, मंत्री यांचेशी याबाबत विचारविनिमय केला. खासदार आबासाहेब कुलकर्णी, किसन वीर आदि मंडळींनी उपपंतप्रधानपद स्वीकारण्यास कांही हरकत नसावी असा सल्ला दिला. कांही खासदारांनी मात्र विरोध दर्शविला. या सूचनेमागे इंदिराजींची राजकीय खेळी असण्याची शक्यता असल्याचे यशवंतरावांना सांगितले. 'जनता पक्ष' अधिक खिळखिळा करण्याची इंदिराजींची मनीषा होती आणि त्यासाठी यशवंतरावांनी उपपंतप्रधानपद स्वीकारावे असा त्यांचा आग्रह होता. त्याबरोबर चरणसिंगांवर सूड उगविण्यासाठी त्यांना कोंडीत पकडायचे आणि पंतप्रधानपदावरून हुसकावून लावायचे असाही इंदिराजींचा डाव होता. जनता पक्ष सरकारचे उपपंतप्रधान आणि गृहमंत्री या नात्याने चरणसिंगांनीच इंदिराजींना अटक करण्याची कारवाई केली होती. तो राग इंदिराजींच्या मनात खदखदत होता. चौधरी चरणसिंग हे पंतप्रधानपद मिळाल्याबद्दल मनातून खूष होते, समाधानी होते. इंदिराजींचे डावपेच त्यांना उमगले नाहीत. कांही दिवसांनी चरणसिंगांना दूर करण्याचे प्रयत्न सुरू करण्यात आले.

इंदिराजींच्या भोवतालच्या लोकांनी त्यांना सावध केले. चरणसिंग गेले आणि चव्हाण हे पंतप्रधान बनले तर तुम्ही काय करणार असा इषारा दिला गेला. मग चव्हाणांना पंतप्रधानपद मिळू नये या दृष्टीने खेळी सुरु झाली. चरणसिंगांचा पाठिंबा

काढून घ्यायचा, त्यांचे सरकार कोसळू द्यायचे पण यशवंतरावांना पंतप्रधानपद मिळू द्यायचे नाही या दृष्टीने इंदिराजींनी हालचाली सुरू केल्या. त्यांना साथ देणारे काँग्रेसचे कांही मुखंड चरणसिंगांच्या मंत्रिमंडळात त्यांनी अगोदरच घुसवून ठेवलेलें होते. चरणसिंग यांचा यशवंतरावजींवर विश्वास होता. त्यांच्या सल्ल्यानुसारच चौधरी साहेबांनी कांहीजणांना मंत्रिमंडळात समाविष्ट केले होते. ही मंडळी कृतघ्न बनतील, चरणसिंग आणि यशवंतराव या दोघांनाही एकाच वेळी दगा देतील याची कल्पना कित्येकांना नव्हती. कट, कारस्थान, भाऊबंदकी, दगाबाजी याबद्दल दिल्लीची जी ख्याति होती तिचा पुन्हा एकदा प्रत्यय आला. मंत्रिमंडळ कोलमडल्यावर लोकसभा बरखास्त करून नव्याने निवडणूका घेण्यात आल्या.

या निवडणुकीपूर्वी १९७८ मध्ये काँग्रेस पक्ष पुन्हा एकदा फुटला. इंदिरा गांधी यांनी "भारतीय राष्ट्रीय काँग्रेस" ऐवजी स्वतःच्या नांवाने "इंदिरा काँग्रेस" या पक्षाची स्थापना केली. १९६९ मध्ये काँग्रेस पक्ष फुटून "सिंडिकेट", "इंडिकेट" असे दोन भाग पडले होते. तेव्हांपासून इंदिराजींनी हुकूमशहाची भूमिका अंगिकारली होती. दिल्लीतील विठ्ठलभाई पटेल सदनमध्ये एके दिवशी इंदिरानिष्ठ काँग्रेसजन एकत्र जमले. त्यांनी आपल्या भाषणातून इंदिराजींची आरती ओवाळली आणि पितृसंघटनेतून फुटून नवा पक्ष काढण्याचा मानस व्यक्त केला. त्यांत महाराष्ट्रातील वसंत साठे होते आणि नासिकराव तिरपुडे पण होते. इंदिरा काँग्रेस आणि रेड्डी काँग्रेस अशी दोन छकले केंद्रस्थानी पडल्यावर त्याची प्रतिक्रिया राज्याराज्यातून उमटली. जागजागी "आय" काँग्रेस आणि "आर" काँग्रेस अशा वेगवेगळ्या राहुट्या उभ्या राहिल्या. एका व्यक्तीच्या नांवाने वेगळा काँग्रेस पक्ष स्थापन करण्याची कल्पना यशवंतरावांना कशीशीच वाटली. ते बेचैन झाले. त्यांना सुरत काँग्रेसच्या वेळचे लोकमान्य टिळक आणि अन्य नेते यांच्यातील मतभेद आठवले. सुभाषचंद्र बोस आणि इतर नेते, आचार्य कृपलानी आणि इतर नेते यांच्यातील मतभेद आठवले. परंतु या प्रसंगी काँग्रेस पक्ष फोडून स्वतःच्या नांवाचा नवा पक्ष कोणी काढलेला नव्हता. निवडणुका तोंडावर आलेल्या असताना काँग्रेसची दोन छकले पडली आणि विरोधकांना आनंदाच्या उफळ्या फुटल्या. बहुतेक मतदारसंघात "आय" काँग्रेसचा आणि "आर" काँग्रेसचा असे दोन उमेदवार उभे राहिल्याने विरोधकांना वाटले की, आपण सहज जिंकू. तथापि घडले वेगळेच.

इंदिराजींनी या निवडणुकीत चांगले यश संपादून त्या सत्तारूढ झाल्या. त्यांनी आपले मंत्रिमंडळ बनिविले. तथापि या मंत्रिमंडळात यशवंतरावांचा मंत्री म्हणून समावेश केला नाही. १९८२ मध्ये ते इंदिरा कॉँग्रेसमध्ये परतल्यावर त्यांना आठव्या वित्त आयोगाचे (फायनान्स कमिशन) अध्यक्ष केले. इंदिराजींच्या महाराष्ट्रातील हस्तकांनी १९८० च्या निवडणुकीत यशवंतरावांना पराभूत करण्याचा अटोकाट प्रयत्न केला. तथापि त्यांना ते जमले नाही. यशवंतरावांबद्दल जनतेला जी आपुलकी, प्रेम वाटत होते, त्यांचा जो लोकसंग्रह होता, त्यांची जी राजकीय पुण्याई होती ती त्यांना उपयोगी पडली. महाराष्ट्रातील त्यांच्या नेतृत्त्वाची पाळेमुळे उखडून टाकण्याचा दिल्लीकरांचा डाव उधळला गेला आणि महाराष्ट्रातील कृतघ्न नेते-कार्यकर्ते उघडे पडले. यशवंतरावांच्या निवडणुकीतील यशानंतर आणि त्यांनी मुख्य प्रवाहात फेरप्रवेश केल्यावर श्रीमती गांधींच्या मनातील आकस दूर होईल असे सर्वांना वाटत होते. तथापि तसे घडू शकले नाही. यशवंतरावांना सत्तेपासून दूर ठेऊन इंदिराजींनी त्यांचेशी राजकीय सल्लामसलत सुरू ठेवली. दोघांच्या गांठीभेटी होऊन चर्चा-विचारविनिमय होणे हा क्रम बरेच दिवस चालू होता. यशवंतरावांच्या राजकीय शहाणपणाचा, परिपक्वतेचा उपयोग करून घ्यायचा पण सत्तेच्या वर्तुळापासून त्यांना बुद्धिपुरस्सर दूर ठेवायचे असा इंदिराजींचा खाक्या दोन-अडीच वर्षे चालू होता. यशवंतराव दिल्लीत एक प्रकारे अपमानित जिणे जगत होते.

पन्नास वर्षांहून अधिक काळ त्यांनी कॉँग्रेस पक्षासाठी अनेक खस्ता खाल्ल्या होत्या. तुरुंगवास भोगला होता, संसाराकडे दुर्लक्ष केले होते, रक्त अटविले होते. त्या कॉँग्रेसची दुःस्थिती पाहून यशवंतराव रोज हळहळायचे, जीवाला लावून घ्यायचे. व्यक्तिवाचक कॉँग्रेसला, व्यक्तिवाचक नेतृत्वाला लोकांनी डोक्यावर घ्यावे याचा अर्थच त्यांना कळेनासा झाला. इंदिराजींची कॉँग्रेस हाच मुख्य प्रवाह आहे याला मतदारांनी मान्यता दिल्यावर त्या मुख्य प्रवाहात सामील होण्याखेरीज दुसरा मार्गच उरलेला नव्हता. इंदिरा कॉँग्रेसमध्ये परतण्याची इच्छा त्यांनी प्रकट केली, तथापि त्यासाठी त्यांना कांही महिने ताटकळत बसावे लागले. केंद्रातील सत्ताधारी इंदिरा कॉँग्रेसचे पदाधिकारी यांनी यशवंतरावांना पूर्वीची प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याबाबत खळखळ केली. यशवंतराव एकाकी पडले. या काळात त्यांच्या मनावर चोहोबाजूंनी

प्रहार होत राहिले. त्यांच्यावर कौटुंबिक संकटे या काळातच कोसळली. कर्तासवता डॉक्टर पुतण्या राजा चव्हाण याचे अपघातात निधन झाले. पत्नी सौ. वेणूताईंना काळाने हिरावून नेले. स्वीय सचिव श्रीपाद डोंगरे यांचेही निधन झाले. मनाने यशवंतराव खचून गेले. आंता कुणाकरिता आणि कशाकरिता जगायचे अशी भाषा खाजगीत करू लागले. जगण्याची उमेदच ते संपवून बसले. वेणूताईंच्या आठवणीने डोळ्यातून अश्रूधारा वहायच्या आणि घराला देवघर बनविलेल्या पत्नीच्या आठवणीने मन विव्हळायचे. हे दुःख थोडे की काय म्हणून इंदिराजींच्या हत्येची त्यांत भर पडली.

इंदिराजींशी त्यांचे मतभेद झाले होते, प्रसंगी दुरावाही निर्माण झाला होता. तथापि इंदिराजींच्या हत्येचा त्यांना जबरदस्त धक्का बसला. एकामागून एक घडलेल्या घटनांचा त्यांच्या प्रकृतीवर परिणाम झाला होता. त्यांना बरीच वर्षें किडनीचा विकार होता. एका किडनीवर ते तगून होते. ती किडनीही काम करेनाशी झाल्यावर प्रकृती एकदम ढासळली. जगण्याची इच्छाच संपली. व्यक्तीपेक्षा पक्ष मोठा आणि पक्षापेक्षा देश मोठा या भूमिकेशी घट्ट राहून यशवंतरावांनी मुंबईत आणि दिल्लीत काम केले. इंदिराजींना काँग्रेसचे अध्यक्ष करा असा आग्रह १९६० मध्ये नेहरूंजवळ धरला. शास्त्रीजींच्या निधनानंतर इंदिराजींनी पंतप्रधान व्हावे यासाठी खटपट केली, आपली शक्ती त्यांच्या पाठीशी उभी केली. केंद्रात वीस वर्षें एकत्र राहून इंदिराजींच्या समवेत राष्ट्राला पुढे नेण्याचा जिद्दीने प्रयत्न केला. कुणाबद्दल कधीही शत्रूत्वाची किंवा सूडाची भावना बाळगली नाही. इंदिराजी गेल्यावर पाठोपाठ भारताचा हा सुपूत्र, महाराष्ट्राचा लाडका नेता, शेकडोंचा सन्मित्र आणि सहकारी २५ नोव्हेंबर १९८४ रोजी सर्वांना मागे ठेऊन परत न येण्याच्या प्रवासाला निघून गेला. दिल्लीत सूर्यास्त झाला, सह्याद्रिवर सूर्यास्त झाला.

१९८५ च्या लोकसभा निवडणुकीची तारीख जाहीर झाली होती. सातारा मतदार संघातून निवडणुकीसाठी अर्ज भरण्याकरिता १९८४ च्या नोव्हेंबर अखेरीस साताऱ्याला जाण्याचे यशवंतरावांनी ठरविले होते. मुंबईत २२ व २३ असे दोन दिवस राहून पुण्याला एस. एम. जोशी यांच्या सत्कार समारंभास हजर राहायचे आणि मग सातारला जायचे असे त्यांनी पुण्यातील नेत्यांना कळविले होते. तारीख

२६ नोव्हेंबरला ते निवडणूक अर्ज दाखल करणार होते. तथापि २३ नोव्हेंबरपर्यंत ते मुंबईत पोहोचलेले नाहीत असे समजल्यावरून पुतण्याने रात्री दिल्लीला फोन लावला. त्यावेळी समजले की यशवंतरावांची प्रकृती अचानकपणे बिघडली असून त्यांना हॉस्पिटलमध्ये दाखल केले आहे. नोव्हेंबर २४ चा एकच दिवस मध्ये गेला आणि तारीख २५ ला रात्री दिल्लीहून दुःखद बातमी येऊन धडकली की यशवंतरावांचे निधन झाले. दिल्ली-मुंबई-पुणे-सातारा या योजलेल्या प्रवासाऐवजी एका वेगळ्या परत न येण्याच्या प्रवासासाठी यशवंतरावांनी प्रस्थान ठेवले. नियतीने त्यांचा असा प्रवास ठरविलेला होता हे तारीख २५ ला त्यांच्या ध्यानीमनीही आले नव्हते. दुसऱ्या दिवशीच्या वृत्तपत्रांतून निधनाची दुःखद बातमी साऱ्या महाराष्ट्राला, देशाला आणि जगाला समजली. त्यांच्या आकस्मिक जाण्याने कोट्यवधी लोक हळहळले. माणूस ठरवितो एक आणि घडते दुसरेच याची प्रचिती आली. मनुष्य किती पराधीन असतो याचा प्रत्यय आला.

पंतप्रधान राजीव गांधी यांनी यशवंतरावांचा पार्थिव देह दिल्लीहून मुंबईला नेण्यासाठी खास विमानाची सोय केली. तारीख २६ नोव्हेंबरला विमानाने दिल्ली सोडली आणि मुंबईकडे झेप घेतली. पार्थिव देहासह विमान जेव्हा मुंबई विमानतळावर उतरले तेव्हां हातात छोटी ॲटॅची घेऊन विमानातून उतरणारे यशवंतराव दिसले नाहीत. त्यांचा पार्थिव देह पहावा लागला. शवपेटी जेव्हां विमानाबाहेर काढण्यात आली तेव्हा विमानतळावर जमलेल्या हजारो लोकांना आपले हुंदके आवरणे, अश्रू थोपवून धरणे कठीण होऊन बसले. "हे असे कसे घडले, यशवंतराव आम्हांला सोडून असे अचानक कसे गेले" असे उद्गार अनेकांच्या तोंडून बाहेर पडले. "सह्याद्रि" या त्यांच्या पूर्वीच्या निवासस्थानी अचेतन देह आणण्यात आला. मुख्यमंत्री या नात्याने "सह्याद्रि" वर वावरणारे, लोकांशी बोलणारे, हंसणारे यशवंतराव त्या दिवशी चिरशांत पडून होते. त्यांच्या दर्शनासाठी हजारो लोकांनी रांगा लावलेल्या होत्या. त्यात मुख्यमंत्री, मंत्री, आमदार, खासदार, सिने कलावंत, नाट्यकलावंत, साहित्यिक, श्रीमंत, गरिब, मालक, कामगार, हिंदू-मुस्लिम-पारशी-ख्रिश्चन या साऱ्या धर्मांचे, जातीजमातीचे लोक होते. मुंबईतील आणि महाराष्ट्रातील विविध शहरातील बाजारपेठा, शाळा-

कॉलेजे,शासकीय-निमशासकीय कार्यालये त्या दिवशी बंद ठेवण्यात आली. मुंबईत शासकीय इतमामाने अत्यंसंस्कार करण्यात यावा असा आदेश पंतप्रधान राजीव गांधी यांनी मुख्यमंत्री वसंतरावदादा पाटील यांना दिला होता. त्या दृष्टीने राज्य सरकारकडून हालचाली पण सुरू झाल्या होत्या. अंत्यदर्शन आणि अंत्यविधी यासाठी ठिकठिकाणाहून असंख्य स्त्री-पुरुष मुंबईत येऊन दाखल झाले होते.

कराडच्या नागरिकांना आणि सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांना-लोकांना मुंबईत अंत्यविधी व्हावा हे मान्य झाले नाही. त्यांनी पंतप्रधानांना तारा करून, टेलिफोन करून त्यांच्याकडून कराडला अंत्यसंस्काराची परवानगी मिळविली. पंतप्रधानांनी मुख्यमंत्र्यांना तसे कळविले. दादांची इच्छा होती की, मुंबईत मोठ्या इतमामाने अंत्यसंस्कार करावेत. तथापि लक्ष्मणशास्त्री जोशी, कराडचे नगराध्यक्ष श्री. पी. डी. पाटील यांनी दादांचे मन वळविले. कराडच्या प्रीति संगमावर अंत्यविधी होणे कसे औचित्यपूर्ण ठरेल हे त्यांना पटवून दिले.या सर्व घडामोडीनंतर कराडला प्रीति संगमावर अंत्यविधी करायचा असा निर्णय झाला. हवाई दलाच्या खास विमानाने दिल्लीहून आणलेला पार्थिव देह वायुदलाच्या खास हेलिकॉप्टरने राजभवनाच्या हेलिपॅडवर आणण्यात आला तेव्हां सेनेच्या तिन्ही दलातील जवानांनी आणि पोलिसांनी आपल्या बंदुका उलट्या करून शोक सलामी दिली. नंतर फुलांनी सजविलेल्या तोफगाडीवर पार्थिव देह ठेवण्यात येवून मिरवणुकीने ''सह्याद्रि'' अतिथीग्रहावर आणण्यात आला. तोफगाडी गेटमधून आंत आली तेव्हा अनेकांचे हंबरडे कानी पडले. असेच दृष्य कराडमध्येही पहावयास मिळाले. तारीख २७ ला मुंबईहून हेलिकॉप्टर जेव्हा कराडला आले आणि पार्थिव देह खाली उतरविण्यात आला तेव्हां हजारो हुंदके ऐकून आणि डोळ्यातून वाहाणाऱ्या अश्रूधारा पाहून अनेकांचे जीव गलबलून गेले. विमानतळापासून ''विरंगुळा'' या निवासस्थानापर्यंत शोकाकूल लोकांची दुतर्फा गर्दी जमली होती. अंत्यदर्शनासाठी लोक सकाळपासूनच रांगा लावून होते. यशवंतरावांचा तिरंगी ध्वजात गुंडाळलेलऋ पार्थिव देह पाहण्याची पाळी आली असे ओक्साबोक्शी रडत लोक चरणावर फुले वाहात होते, चरणावर डोके ठेवीत होते.

अंत्ययात्रा दुपारी एक वाजता "विरंगुळा" बंगल्यातून निघाली. प्रीति संगमावर अंत्ययात्रा पोहोचण्यापूर्वी लक्षावधी लोक नदीकांठी मिळेल तेथे जागा पकडून उभे होते. घरावर आणि झाडावर देखील माणसे उभी होती, बसलेली होती. सारे कराड गांव तर हजर होतेच पण त्याचबरोबर शेजारच्या तालुक्यातील, जिल्हयातील लोकही अंत्यविधीसाठी आवर्जून उपस्थित होते.सुमारे चार ते पांच लक्ष लोक हजर होते असा अंदाज वृत्तपत्रांनी प्रसिद्ध केला होता. संगमावरील दोन एकर जागा स्वच्छ साफसूफ केलेली होती. नदीच्या बाजूला एक प्रशस्त चौथरा बांधलेला होता. त्यावर चंदनी चिता रचलेली होती. चितेला अग्नी देण्यात आल्यावर निळ्या-तांबड्या ज्वाळा वर झेपावू लागल्या. त्यावेळी जो आकांत कानी पडला तो कित्येक दिवस कानात घुमत होता. अग्नीनारायणाने आपले काम केले. सायंकाळी सहा वाजता यशवंतरावांचा देह भस्मीभूत झाला. महाराष्ट्राचा हा महापुरुष चिरनिद्रेसाठी संगमावर निरंतरचा पहुडला.

प्रीतिसंगमाबद्दल यशवंतरावांना लहानपणापासून आकर्षण होते. या परिसरासंबंधी त्यांच्या मनाला एक प्रकारची ओढ होती. संगामाचा परिसर नितांत सुंदर बनावा, ते आकर्षक स्थान बनावे अशी त्यांना तळमळ वाटायची. नगराध्यक्ष पी. डी. पाटील यांचेशी याबाबत यशवंतराव अधूनमधून बोलायचे. मुंबईहून पत्र लिहून आपले विचार कळवायचे. एका पत्रात यशवंतरावांनी म्हटले होते, "कराडचे महत्त्वाचे आकर्षण म्हणजे प्रीतिसंगम. परंतु तेथे जाण्यासाठी नीट रस्ता नाही की वातावरण अनुकूल नाही. घाटाच्या समोर खड्डे आहेत, अस्वच्छता आहे, परिसर उपेक्षित आहे. स्वामीच्या बागेची जागा ताब्यात घेवून तेथे सुंदर उद्यान बनविता येईल. भुईकोट किल्ल्याचा तट दुरुस्त करता येईल आणि संगमाचे अलौकिक दृष्य पाहण्यासाठी तटाचा उपयोग करता येईल. हा परिसर प्रवाशांचे आकर्षण ठरावे."प्रीतिसंगामावरील या परिसरातच यशवंतरावांवर अंत्यसंस्कार व्हावेत, त्यांची समाधी बांधण्यात यावी याला योगायोग म्हणायचे की दुसरे कांही ! यशवंतरावांची समाधी इतर समाध्यांपेक्षा वेगळी आहे. यशवंतरावांनी रशिया भेटीच्या वेळी टॉलस्टॉयच्या समाधीला भेट दिली होती. त्यांना या समाधीची कल्पना फार आवडली होती. त्याबद्दल त्यांनी १९६४ मध्ये वृत्तपत्रातून लिहिले पण होते.

यशवंतरावांच्या निधनानंतर १९८४ मध्ये प्रीतिसंगमावर जी समाधी उभारण्यात आली ती त्यांच्या कल्पनेतील समाधी आहे असे म्हटल्यास चूक होणार नाही. समाधी उघड्यावर आहे. तेथे छायाचित्र नाही की कसली खूण नाही. पादुका नाहीत की पुतळा नाही. दर्शनासाठी सदैव ती खुली आहे. समाधीचे एकूण बांधकाम कलापूर्ण व भक्कम आहे. स्लॅबच्या खाली एक ताम्रमंजूषा ठेवलेली आहे. या ताम्रमंजूषेत यशवंतरावांचे साहित्य, त्यांच्या विषयीचे साहित्य, लेख, मुलाखती, पत्र, फोटो आदि वस्तू ठेवलेल्या आहे. ज्ञानाचे हे भांडार, सेवा, श्रद्धा, निष्ठा, माणुसकी यांची अनुभूति देणारे आहे.

चव्हाणसाहेबांनी पूर्वी पत्रांतून व्यक्त केलेल्या इच्छेनुसार नगराध्यक्ष पी. डी. पाटील यांनी संगम परिसराचे रूप पार पालटून टाकण्याचा आराखडा तयार करून घेतला. किल्ल्याचा तट व नदी यांच्या दरम्यानची संगमालगतची साडेसात एकर सपाटीची जागा पंतप्रतिनिधीकडून संपादन केली. सभोवार तारेचे कुंपण घालून घेतले आणि बाग तयार करण्याचे काम सुरू केले. तथापि १९७६ च्या पुराने नगरपालिकेने केलेले सारे काम वाहून गेले. त्यानंतर पुन्हा राज्य सरकारकडे सुधारित प्रकल्पाचे आराखडे पाठविले. वर्ष-सव्वा वर्षाचा काळ लोटतो न लोटतो तोच यशवंतरावांचे आकस्मित निधन झाले. त्यांच्या पार्थिव देहावर अंत्यसंस्कार करण्यात आला. तेथे राष्ट्रीय स्मारक उभे करावे, विस्तीर्ण बाग तयार करावी, तिला ''यशवंतराव उद्यान'' असे नांव द्यावे असे ठरविण्यात आले. ''यशवंतराव चव्हाण स्मारक समाधी समिती'' गठन करण्यात आली. या समितीला सह्याद्रि सहकारी साखर कारखान्याने, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने आर्थिक मदत दिली. समाधीनजीक एक पर्णकुटी बांधण्यात आली. आर्किटेक्ट बेरी यांनी समाधीचे प्लॅनस् करून दिल्यावर अंत्यसंस्काराचे जागी सुंदर समाधी बांधण्यात आली. सभोवार घनदाट वृक्षछाया, कृष्णा-कोयनेचा प्रीतिसंगम यामुळे समाधीस्थान हे देशी-विदेशी पर्यटकांसाठी एक आकर्षक स्थळ बनले.

''यशवंतरावं चव्हाण स्मृति सदन'', ''सौ. वेणूताई चव्हाण स्मारक भवन'' ही दोन्ही स्थळेही यशवंतरावांच्या चाहत्यांची, तसेच जिज्ञासूंची, अभ्यासकांची आकर्षणे बनली आहेत. कराड नगरपालिकेने पी. डी. पाटील यांच्या नेतृत्वाखाली

यशवंतरावांचे यथार्थ असे स्मारक उभे केले आहे. सांस्कृतिक केंद्राची भव्य वास्तू उभारून त्या वास्तूत विस्तीर्ण ग्रंथालय उभे केले आहे. दोन लाख पुस्तके ठेवता येतील एवढी सोय केलेली आहे. अभ्यासकांसाठी केबिन्स केल्या आहेत. दैनिके, साप्ताहिके, नियतकालिके यासाठी वेगळा विभाग ठेवला आहे. पाठीमागे दोन अथिती रूम्स बांधल्या आहेत. ग्रंथालयात सध्या सत्तर हजाराहून अधिक ग्रंथ आहेत. ग्रंथालयाला जोडून कला-दालन आहे. प्रदर्शन भरविण्यासाठी याचा उपयोग होतो. वरच्या मजल्यावर यशवंतराव स्मृतिसदनाचे भव्य सांस्कृतिक केंद्र (नाट्यगृह) आहे. स्मृति सदनाच्या प्रवेशद्वारी यशवंतरावांचा पूर्णाकृती पुतळा उभा केला आहे. या सांस्कृतिक स्मृतिसदनामुळे कराडच्या तसेच सातारा जिल्ह्याच्या कलाप्रेमींची, ग्रंथप्रेमींची चांगलीच सोय झालेली आहे.

✦✦✦

## : १४ :

यशवंतराव ही निव्वळ व्यक्ती नव्हती तर तो एक विचार होता. तो जसा विचार होता तसाच तो एक आचार होता. किंबहुना ती एक अचारसंहिता होती. कर्तव्यदक्ष प्रशासक, चतुर आणि मुत्सद्दी राजकारणी, साहित्यप्रेमी, थोर ज्ञानपिपासू, रसिक नेता, कनवाळू माणूस अशा कितीतरी विविध पैलूंनी त्यांचे दर्शन महाराष्ट्राला आणि देशाला घडले आहे. शुद्ध देशभक्ती आणि विशुद्ध चरित्र आणि चारित्र्य हे यशवंतरावांचे वैशिष्ट्य. त्यांच्यावर वृत्तपत्रांतून, भाषणातून टीका झाली. तथापि हा माणूस भ्रष्ट आहे, चारित्र्यहीन आहे असे म्हणण्यास किंवा लिहिण्यास कोणीही धजले नाही. यशवंतराव पन्नास-पंचावन्न वर्षे सक्रीय राजकारणात होते. तीस वर्षांहून अधिक काळ सत्तेत उच्चस्थानी होते. त्यांच्या सरकारी आज्ञेने हजारो कोटी रुपयांच्या उलाढाली झाल्या. श्रीमंत, कारखानदार, व्यापारी त्यांच्या जवळ घुटमळले. तथापि साहेबांनी कुठल्या एका व्यवहारात व्यक्तिगत लाभ उठविला असे कोणीही म्हणू शकला नाही. देशातील कोणत्याही मोठ्या शहरात त्यांचा बंगला नाही की चाळी नाहीत. कराडमध्ये त्यांनी "विरंगुळा" या नांवाचे छोटे निवासस्थान तेवढे बांधले. शासकीय मोटारीखेरीज कुठलीही अलिशान गाडी घेतली नाही. साहेब गाडीत शेजारी असले तरच सौ. वेणूताई सरकारी लाल दिव्याच्या गाडीत बसायच्या. एवढे पथ्य पाळणाऱ्या वेणूताईंसाठी यशवंतरावांनी एक देशी बनावटीची मोटार घेऊन दिली होती. ती त्यांनी वीस वर्षे वापरली. नंतर ती जुनी गाडी १९८५ मध्ये कराडात वेणूताई स्मारकात आणून ठेवण्यात आली. सौ. वेणूताई १९४४ पासून आजारी. तब्येत

तोळामासा. अपत्य नाही. तरीही यशवंतरावांनी द्वितीय विवाहाचा विचार कधीही मनात आणला नाही. अखेरपर्यंत दोघेही एकमेकांसाठी जगले. चरित्र आणि चारित्र्य निर्लेप ठेवले. कनक-कांता यांचा मोह टाळून, त्यांना अस्पर्श मानून यशवंतरावांनी सार्वजनिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या नेत्यांसमोर, कार्यकर्त्यांसमोर एक आदर्श उभा केला. यशवंतरावांचे बोलणे, वागणे सारेच आगळे-वेगळे वाटायचे. राग नाही, लोभ नाही, द्वेष-मत्सर नाही. सर्वांवर प्रेम करावे, सांभाळून घ्यावे हे त्यांचे स्वभाव वैशिष्ट्य.

पार्लमेंटच्या सेंट्रल हॉलमध्ये खासदारांच्या घोळक्यात बसून चकाट्या पिटण्यात किंवा गॉसिपिंग करण्यात त्यांनी कधीही वेळ घालविला नाही. इतरांनाही उत्तेजन दिले नाही. यशवंतराव पार्लमेंट सभागृहात वेळेवर यायचे, जरूर तेवढे बोलायचे. गृहात काम नसेल तेव्हा ते संसद भवनातील आपल्या कचेरीत बसून कामकाज करायचे. फावल्या वेळेचा उपयोग फायली पाहण्यासाठी करायचे. भेटीला येणाऱ्यांनाही ते कचेरीत भेट द्यायचे, त्यांचे प्रश्न-अडचणी ऐकून घ्यायचे. आपल्या खात्याच्या राज्यमंत्र्यांशी चर्चा करून, त्यांना जरूर त्या सूचना देऊन गृहातील कामकाजाविषयी तत्पर, वाकबगार तयार करायचे. राज्यमंत्री विद्याचरण शुक्ला नेहमी म्हणायचे की, शिक्षक वा गुरू असावा तर चव्हाणांसारखा. के. सी. पंत, प्रकाशचंद्र सेठी यांच्यासारखे तरुण राज्यमंत्री सांगायचे की वरिष्ठ मंत्री असावा तर यशवंतरावांसारखा. विरोधी पक्ष नेता म्हणून काम करताना त्यांनी गृहातील सर्व बाजूंच्या खासदारांचे प्रेम संपादन केले. भाषणात ते कधी कुणाचा अनादन करायचे नाहीत की रागावून बोलायचे नाहीत. "गृहावर प्रेम करायला शिका" असे ते आपल्या ज्युनियर्सना नेहमी सांगायचे.

महाराष्ट्रातील खासदार दरवर्षी १२ मार्चला यशवंतरावांचा वाढदिवस दिल्लीत साजरा करायचे. राज्यमंत्री अण्णासाहेब शिंदे यांच्या निवासस्थानातील हिरवळीवर हा कार्यक्रम व्हायचा. अनंतराव पाटील, शिवाजीराव देशमुख, अण्णासाहेब कवडे, देवराव पाटील, आबासाहेब कुलकर्णी आदि खासदार या कार्यक्रमासाठी पुढाकार घेत. केंद्रिय मंत्री, खासदार, दिल्लीतील विविध

क्षेत्रातील प्रमुख मंडळी आवर्जून उपस्थित रहात. पंतप्रधान इंदिरा गांधी याही थोडा वेळ येऊन भाग घेत. यशवंतरावांना शुभेच्छा देत, सर्वांशी बोलत आणि परत जात. वाढदिवसाचा कार्यक्रम दरसाल नियमाने पार पडत असल्याबद्दल इतर राज्यातील खासदार कौतुक करायचे. यशवंतराव दरवर्षी हिवाळी अधिवेशनात सर्व मराठी व इतर राज्यातील निवडक खासदारांना आपल्या निवासस्थानी आग्रहाने भोजनाला निमंत्रित करीत असत. यामागे त्यांचा उद्देश हा असे की खासदारांच्या अडचणी-प्रश्न ऐकून घ्यावेत, त्यांना आवश्यक ती माहिती द्यावी. दोन-अडीच तासांचा अवधी खेळीमेळीने गप्पागोष्टीत जायचा. यशवंतराव अबोल आहेत, रिझर्व्हड् आहेत, फारसे मिसळत नाहीत हा गैरसमज दूर होण्यास यामुळे मदत व्हायची.

यशवंतरावांना वाचनाचा जसा छंद होता त्याप्रमाणेच लेखनाची आवड होती. अधून मधून ते लिहित. भाषणामधून जे विचार ते मांडीत असत. ते आपल्याला फार आवडले अशा प्रतिक्रिया त्यांचे स्नेही, सहकारी त्यांना कळवीत. त्यांचे चिंतनाचे प्रमुख विषय राजकारण-समाजकारण असत. साहित्याच्या क्षेत्रातील आपली भूमिका रसिक वाचकाची आहे असे ते सांगत. यशवंतराव म्हणायचे, "शब्दांच्या सामर्थ्यावर आणि सौंदर्यावर आपला नितांत विश्वास आहे. साम्राज्यशाही धुळीला मिळविण्याचे संहारक सामर्थ्य शब्दांत आहे. कल्पना, विचार, आणि शब्द यांचा त्रिवेणी संगम ही मानवी इतिहासातील जबरदस्त शक्ती आहे. शब्द हे साहित्यिकांचे प्रमुख शस्त्र मानले जाते. तसेच राजकारणाचे प्रमुख माध्यम पण शब्दच आहेत." यशवंतरावांनी आपल्या लेखनात आणि राजकारणात शब्दांचा योग्य आणि परिणामकारक वापर करून लेखनाला समृद्धी प्राप्त करून दिली आणि राजकारणाला योग्य असा घाट दिला. महाराष्ट्राचे राजकारण करताना त्यांनी कटु शब्दांचा वापर कधी केला नाही की दुसऱ्यांच्या भावनांना, प्रतिमांना धक्का दिला नाही.

कार्यकर्त्यांची कदर करणे हे यशवंतरावांचे वैशिष्ट्य होते. त्यांना माणसांची पारख होती. पारखून घेतलेल्या कार्यकर्त्यांच्या अंगच्या गुणांचा ते संघटनेसाठी आणि समाजासाठी उपयोग करून घेत. असेंब्लीच्या निवडणुकीत

मामासाहेब मोहोळ, नामदेवराव जगताप, नामदेवराव मते या तिघां नामदेवांना काँग्रेसची उमेदवारी दिल्याबद्दल कित्येकांनी नाके मुरडली. तिघेही चांगल्या मतांनी निवडून आले. एके दिवशी एका शहरी, विद्वान नेत्याने यशवंतरावांना विचारले, "जगताप, मते, मोहोळ यांचा तुम्हाला असेंब्लीत काय उपयोग होणार आहे. त्यांचे शिक्षण बेताचे आणि संसदीय कामाचा आवाकाही बेताचा." यशवंतरावांनी शांतपणे उत्तर दिले, "काँग्रेसच्या दोनशे आमदारांत मला पांच-दहा नामदेव सहज चालतील. ज्या कार्यकर्त्यांनी स्वातंत्र्य लढ्यात तुरुंगावास भोगला, संघटनेसाठी खस्ता खाल्ल्या, लोकांच्या अडीअडचणीला जे धांवले, ज्यांच्याबरोबर लोक आहेत त्यांची जाण ठेवायला हवी कां नको ! शिक्षणानेच माणूस शहाणा होतो असे नाही. असेंब्लीवर निवडून आलेले तिघेही नामदेव शहाणे आहेत. समाजाला, राष्ट्राला उपयोगी पडणारे आहेत.

दौंडच्या जगन्नाथ पाटसकर यांना काँग्रेसचे तिकिट देऊन असेंब्लीवर निवडून आणण्याचे जे कसब यशवंतरावांनी दाखविले ते दुर्मिळच. जगन्नाथ म्हणजे वृत्तपत्रे विकणारा एक साधा, सरळ, गरिब कार्यकर्ता. गळ्यात पिशवी आणि पिशवीत वृत्तपत्रे. एस. टी. मोटार स्टँडवर सदैव हजर. जगन्नाथाला काँग्रेसचा अतिशय अभिमान. अशा गरिब कार्यकर्त्याला जाणीव ठेवून यशवंतरावांनी प्रतिष्ठा मिळवून दिली. यांत कुणाचे कांही बिघडण्याचा किंवा काँग्रेस पक्षाची हानी होण्याचा प्रश्न नव्हता. नेत्याची दृष्टी किती विशाल असावी लागते आणि मन किती मोठे असावे लागते याची ही दोन्ही बोलकी उदाहरणे. जिल्हा परिषदांचे पदाधिकारी, पंचायत समित्यांचे पदाधिकारी, साखर कारखाने, गिरण्यांचे अध्यक्ष निवडताना शैक्षणिक पात्रतेबरोबरच त्या व्यक्तीचे कार्य, अनुभव या बाबींचाही विचार केला जावा असा पायंडा यशवंतरावांनी घालून दिला. यांतूनच काँग्रेसला तरुण रक्ताचे, सुशिक्षित, सुविद्य असे नवे 'केडर' मिळाले आणि संघटना बलवान झाली.

यशवंतराव कार्यकर्त्यांच्या शिबिरावर विशेष भर देत. ते म्हणायचे, "कार्यकर्ते राजकीयदृष्ट्या, सामाजिक दृष्ट्या जाणकार आणि कृतिशील व्हायचे असतील तर त्यांचे शिक्षण शिबिरातून होण्याची गरज आहे. प्रश्नांवर

चर्चा व्हायला हवी, विविध बाजू मांडल्या जायला हव्यात. काँग्रेस पक्ष हा कांही 'केडर' पक्ष नाही. ती एक जनतेची चळवळ आहे. (मास मुव्हमेंट). या चळवळीत कुणालाही सहभागी होता येते. पक्षात आलेल्या कार्यकर्त्याला माहिती असणे, त्याचे शिक्षण केले जाणे गरजेचे आहे.'' राहुरी, महाबळेश्वर, खुलताबाद, आळंदी अशी एकामागून एक कितीतरी शिबिरे घेण्यास यशवंतरावांनी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीला प्रोत्साहित केले. या शिबिरांत सरकारी निर्णयावर, धोरणांवर कार्यकर्त्यांनी कितीतरी वेळा कडाडून टीका केली. या टीकेबद्दल यशवंतरावांनी कधीही गैरसमज करून घेतला नाही की राग मानला नाही. वाद-संवादाला ते महत्त्व द्यायचे. कृषि-उद्योग, लघुउद्योग याबद्दल त्यांचा आग्रह असायचा. म्हणूनच कृषि मालावर प्रक्रिया करणाऱ्या सहकारी कारखानदारीला त्यांनी उत्तेजन दिले. एम. आय. डी. सी. ची स्थापना करून जिल्ह्या-जिल्ह्यात कारखानदारी उभी राहण्यास सर्वतोपरी साहाय्य केले. कृषि विद्यापीठे स्थापन करून देशातील आधुनिक ज्ञान शेतकऱ्याचे दारापर्यंत पोहोचविण्यासाठी व्यवस्था केली. दलित-आदिवासी यांच्या विकासासाठी समाज कल्याण खात्यास महत्त्व प्राप्त करून दिले. गरिब-दुर्बलांचे यशवंतराव आशास्थान बनले.

महाराष्ट्रातील गांवे, तेथील कार्यकर्ते, कर्ती माणसे, गांवाचे प्रश्न हे यशवंतरावांच्या दीर्घकाळ स्मरणात रहायचे. दौऱ्यात खूप दिवसांनी एखाद्या गांवात गेले की ते जुन्या माणसांची विचारपूस करायचे. ''आबा काय म्हणतात, महिपतीचे कसे काय चाललं आहे'' असे ब्लॉक काँग्रेसच्या अध्यक्षाला विचारले की तो अवाक व्हायचा. एकदा नगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर मोटारने जात असताना त्यांनी शिरूरला गाडी थांबवायला सांगितले. धनराज नहार नांवाच्या कार्यकर्त्याला निरोप पाठविला. धनराज आल्यावर त्याला विचारले, ''नहार, १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यात ज्यांच्या घरी मी भूमिगत अवस्थेत राहात होतो ते तात्या आहेत का ?'' ''नाहीत'' असे धनराजने उत्तर दिले. ''चला, त्यांच्या घरी जाऊ, पत्नी, मुलाबाळांना भेटू, त्यांचे क्षेम विचारू.'' असे म्हणत यशवंतराव शिरूर गांवच्या एका टोकाकडील

वस्तीकडे निघाले. कार्यकर्त्यांची गडबड उडाली. त्या घरी पोहोचल्यावर यशवंतराव कांबळ्यावर बसले. प्रेमाने-आदराने दिलेला चहा प्यायले. घराची एकूण अवस्था पाहिल्यावर स्वीय सचिव डोंगरे यांना जवळ बोलावून मुलाच्या हातात गुपचूप हजार रुपये ठेवा असे सांगितले. यशवंतराव हे 'माणूस' म्हणून फार मोठे होते. असा नेता, साहित्यिक, रसिक राज्यकर्ता पुन्हा होणे नाही.

यशवंतरावांनी संरक्षणमंत्रीपदाची सूत्रे हाती घेतल्यावर चीनने एकतर्फी युद्ध थांबविले. त्यानंतर थोड्या दिवसांनी महाराष्ट्रातील कांही पत्रकार, कांही लेखक, साहित्यिक यांना यशवंतरावांनी लडाखची युद्धभूमी पाहण्यासाठी तिकडे पाठविले. त्यांची नेण्याची-आणण्याची, निवासाची, विशिष्ट स्थळे दाखविण्याची सगळी व्यवस्था केली. वसंत सबनीस, ग. दि. माडगूळकर आदि मंडळी प्रत्यक्ष परिस्थिती पाहण्यासाठी तिकडे रवाना झाली. लडाख प्रदेश किती बिकट आहे, भारतीय जवान किती प्रतिकूल परिस्थितीत आक्रमणास तोंड देत होते, संरक्षण व्यवस्थेत आपण कुठे कमी पडत होतो ही माहिती संग्रहित करून लेखक मंडळी परतली. त्यांनी या अमोल संधीबद्दल यशवंतरावांचे आभार मानले. प्रसार, प्रचार, प्रसार माध्यमे, लेखक यांनाही महत्त्वाची भूमिका बजावता येते, त्यासाठी त्यांचा योग्य तो उपयोग करून घ्यायला हवा हे यशवंतरावांनी या उपक्रमातून पटवून दिले.

महाराष्ट्र परिचय केंद्राचे वतीने दिल्लीत विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जायचे. कधी संगीताचा कार्यक्रम, तर कधी चांगले मराठी नाटक वा सिनेमा यांचे आयोजन केले जायचे. यशवंतराव आवर्जून हजर रहायचे. संगीताची त्यांना विशेष आवड असायची. पंडित भीमसेन जोशी आकाशवाणीवर गायनाच्या कार्यक्रमासाठी दिल्लीला आले असताना यशवंतरावांनी त्यांना आपल्या निवासस्थानी पाचारण केले. निमंत्रितांसाठी गायनाचा कार्यक्रम करावा, अशी विनंती केली. भीमसेननी ती मान्य केली. यशवंतरावांनी निवडक मंत्री, खासदार, अधिकारी, स्नेही यांना निमंत्रित केले. वेळ रात्री नऊ ते बारा असे कळविले होते. साडेनऊ-दहा वाजले तरी पंडित भीमसेन यांचे आगमन झाले नाही. निमंत्रित ताटकळत बसले होते. स्वीय

सचिव डोंगरे यांना भीमसेन उतरलेल्या हॉटेलात पाठविले. पंडितजी "एकच प्याल्यात" रमलेले होते. डोंगरेंनी त्यांना आठवण दिली, तयार केले आणि साथीदारांसह १ रेसकोर्स रोडवर हजर केले. पंडितजी मागील दरवाजाने आंत गेले. गार पाण्याने तोंड धुतले. कपडे व्यवस्थित केले आणि हॉलमध्ये दाखल झाले. सर्वांचा जीव भांड्यात पडला. भीमसेनजींनी बैठक मारून गायनाला सुरुवात केली ती श्रोत्यांना डोलावतच. बंदिशी, तुकोबांचे अभंग, गझल यांची बरसात करीत निमंत्रितांकडून वाहवा मिळविली. रात्री दीड-दोन पर्यंत कार्यक्रम चालला. नभोवाणीमंत्री के. के. शहा यांनी पंडितजींची पाठ थोपटली. गायनापूर्वीचा किस्सा सगळेजण विसरून गेले.

✦✦✦

# परिशिष्ट



# प्रिय सौ. वेणूबाईस --

संरक्षणमंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारण्याकरिता दिल्लीला गेल्यानंतर यशवंतरावांनी १९६३ मध्ये भारताची हद्द ओलांडून प्रथमच विदेश दौरा केला. त्यानंतर ताश्कंद करारासाठी ते १९६६ मध्ये शास्त्रींबरोबर ताश्कंदला गेले. त्यानंतर १९७० ते ७७ या आठ वर्षांच्या कालावधीत अर्थमंत्री, परराष्ट्रव्यवहार मंत्री म्हणून त्यांनी जगाच्या पाठीवरील कित्येक देशांचा दौरा केला. १९७७ मध्ये लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचा पराभव झाला आणि परदेश भ्रमण थांबले. विदेश यात्रेवर असताना यशवंतराव मुक्कामाच्या ठिकाणी वेळ काढून सौ. वेणूताईंना पत्रे लिहीत. त्यात प्रवासवर्णन, स्थळांचे वर्णन तर असायचेच पण त्याचबरोबर चर्चेसंबंधीचे, वाटाघाटीसंबंधीचे छोटे टिपण पण असायचे. व्यक्तीच्या स्वभावाचे, मैत्रीचे, सुंदर चित्रण पण असायचे. यशवंतरावांचे प्रवासवर्णन म्हणजे ललित साहित्याचा एक सुरेख आकृतिबंधच. विदेशात त्यांनी लिहिलेल्या या पत्रसंग्रहात त्या त्या देशाच्या व प्रदेशाच्या निसर्गाचे वर्णन आहे, इतिहास आहे, कला-संस्कृती आहे, राजकारणाचा, अर्थकारणाचा घेतलेला वेध पण आहे. वस्तुसंग्रहालयांबरोबरच रंगमंदिरांना, पुस्तक भांडारांना भेटी देऊन आपली रसिकता, कलाप्रेम आणि वाचनाची आवड याची प्रचिती यशवंतरावांनी आणून दिली. विदेश भेटीत राजकारण आणि अर्थकारण हा महत्त्वाचा भाग असायचा, त्याचबरोबर यशवंतराव तत्त्वचिंतनही करीत असायचे हे त्यांच्या काही पत्रांवरून हे स्पष्टपणे दिसून येते. त्यांच्या पत्रलेखनातून उच्च ध्येयवाद, तात्त्विक चिंतन, साहित्य कौशल्याचे मनोहारी चित्र पाहावयास मिळते. हा पत्रसंग्रह भारताच्या ४० वर्षातील राजकीय इतिहासात महत्त्वाची, मोलाची देणगी ठरणारा आहे, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

सौ. वेणूताईंची प्रकृती नाजूक, अस्वस्थ असायची. केंद्रीय मंत्री म्हणून यशवंतराव विदेश यात्रेला निघाल्यावर पत्नी सौ. वेणूताई त्यांच्यासमवेत असणार हे क्रमप्राप्त आणि उचित होते. तथापि सौ. वेणूताईंची प्रकृती तोळामासा. यशवंतरावांच्या कार्यक्रमात, गांठीभेटीत, चर्चा-वाटाघाटीत आपल्या प्रकृतीच्या काळजीचा अडसर नको म्हणून सौ. वेणूताईच पतिसमवेत जाण्याचे नाकारीत. ही स्थिती यशवंतरावांना अस्वस्थ करायची. तथापि नाइलाज व्हायचा. सौ. वेणूताईंना पत्राद्वारे विदेशदर्शन घडवावे म्हणून यशवंतरावांनी परदेशातून पत्रे लिहिण्यास सुरुवात केली. या पत्रात भारताचा एक दूरदर्शी, बहुश्रुत, प्रज्ञावंत मुत्सद्दी या रूपांत यशवंतरावांचे दर्शन घडते. या पत्रातील लेखनाद्वारे एका मुत्सद्याचे, विचारवंताचे अभ्यासपूर्ण आणि अनुभवसंपन्न असे विचारधन उपलब्ध होऊ शकले आहे.

ज्या राष्ट्राला वा शहरांना यशवंतरावांनी भेटी दिल्या तेथील इतिहास, भूगोल, ऐतिहासिक स्थळे, कलादालने, वस्तुसंग्रहालये, शिक्षणसंस्था, संशोधन संस्था, वैज्ञानिक संस्था यांची माहिती आहे. तेथील कारखानदारी, विद्यापीठे, सांस्कृतिक जीवन, लोकजीवन, निसर्ग, डोंगर-किल्ले, प्रसार-माध्यमे असे जे जे पाहिले ते ते यशवंतरावांनी पत्रांतून शब्दबद्ध केले आहे. हा पत्रव्यवहार पति-पत्नीमधील असला तरी त्याचा संदर्भ व्यक्तीपुरता मर्यादित नाही. संरक्षण मंत्री, अर्थमंत्री, विदेश मंत्री या नात्याने काम करीत असताना स्वतंत्र भारताच्या विशिष्ट काळात जी परिस्थती होती तिचे, त्याचबरोबर विकसनशील देशांच्या भूमिकांचे विश्लेषण या पत्रांत असल्याने ते सर्वांकरिता विचारधन बनले आहे. आशिया-आफ्रिकेतील विकसनशील देश आणि विकसित देश यांच्यांतील कोणते प्रश्न सुटण्यासारखे आहेत, कोणते नाहीत याचे सखोल विवेचन यशवंतरावांच्या पत्रांतून आढळून येते. त्या देशातील महत्त्वाच्या व्यक्तींशी निव्वळ परिचय करून न घेता त्याचे रूपांतर मैत्रीत करण्याची यशवंतरावांची हातोटी विलक्षण म्हणावी लागेल. जागतिक बँकेचे अध्यक्ष मॅक्नमारा (अमेरिका) आणि पट्टीचे राजकारणी व मुत्सद्दी किसिंजर यांच्याशी मैत्रीसंबंध जोडणे ही सोपी गोष्ट नव्हती. यशवंतरावांनी ती साध्य केली. आठव्या हेन्रीच्या राजवाड्याचे वर्णन आणि इंडोनेशियाच्या बाली बेटाचे वर्णन करताना रसिक, साहित्यिक, तसेच हिंदू संस्कृतीचा सार्थ अभिमान बाळगणारे यशवंतराव दिसून येतात.

हेन्रीच्या राजवाड्यासंबंधी यशवंतरावांनी एका पत्रात लिहिले आहे, "पंधराव्या शतकातील आठवे हेन्री म्हणजे एक विलक्षण प्रकरण होते. त्यांनी अनेक लग्ने केली, अनेकांच्या इस्टेटी हडपल्या. हेन्री फार लहरी होते. त्यांच्या मर्जीतून एखादी व्यक्ती उतरली की त्याचे घरदार, जमीन जुमला हेन्री स्वतःकडे घ्यायचे. राजवाड्यात प्रचंड मोठी अशी लागोपाठ तीन प्रांगणे, एक कलापूर्ण दिवाणखाना, जुन्या शस्त्रांनी सजविलेल्या राजवाड्याच्या भिंती, रेखीव सुंदर बाग, सारे काही अजूनही नीटनेटके ठेवण्यात आले आहे.

काबूल शहराबद्दल यशवंतरावांनी लिहिले आहे, "दहा लाख वस्तीचे हे शहर विस्तृत क्षेत्रफळात पसरलेले आहे. नवे विभाग आधुनिक आणि जुने काबूल तसेच जुने आहे. इंटर कॉंटिनेन्टलच्या खैबर सूटमधून काबूल शहराकडे दृष्टी टाकली तेव्हां एक विलक्षण, शांत, सुंदर, मनोहारी दृष्य दिसले. भारतीय शास्त्रीय संगीत काबूलमध्ये फार लोकप्रिय आहे. 'बामीयान'ला गेलो तर तेथे भगवान बुद्धाचे पंधराशे-सोळाशे वर्षापूर्वीचे दोन भव्य पुतळे पाहावयास मिळाले. डोंगरकपारीत असंख्य लेणी पाहिली. बुद्ध धर्माचा प्रसार येथपर्यंत झाला होता हे स्पष्टपणे दिसून आले. बामियानच्या खोऱ्यात करुणामूर्ती भगवान बुद्धही आहेत आणि चेंगीजखानाचे क्रौर्यही शेजारीच उभे आहे. इतिहासात क्रौर्य आणि करुणा यांची स्पर्धा सुरू आहे.

बाली बेटाबद्दल यशवंतरावांनी लिहिले आहे, "ज्या बेटासंबंधी वर्षानुवर्षे ऐकले होते ते बाली भेट आज पाहिले. बेटावरील हिंदू संस्कृतीही पाहिली. महाभारतकालीन हिंदूंचा पेहराव करून दोन तरुणांनी हातात छत्र-चामरे घेऊन राजस्वागत केले. कपाळावर कुंकू लावलेल्या, गौरवर्णीय कांती असलेल्या, हातात पुष्पमाला घेतलेल्या दोन प्रौढ कुमारी सामोऱ्या आल्या. क्षणभर वाटले की आपण महाभारताच्या काळातच आहोत. येथील नागरिक शेकडो वर्षे हिंदू संस्कृतीचे जतन करीत असल्याने हा हिंदूंचा मुलूख वाटतो. बेट फारच सुंदर आहे. केरळ-कोकणसारखी गर्द झाडी, जमीन उत्तम, शेती उत्तम, लोक उद्योगी, कलेचे चाहते. म्हणूनच येथे नृत्य, कला, चित्रकला बहरलेली आढळते." कॅलिफोर्नियातील निसर्गसौंदर्याबद्दलही यशवंतरावांनी आपल्या एका पत्रात बहारदार वर्णन केलेले

आहे. ही पत्रे वाचताना त्यांच्या रसिकतेचे, साहित्यिक भाषाशैलीचे दर्शन घडते.

सौ. वेणूताई ही पत्रे आवर्जून वाचीत. ती वाचताना आपण जणू काही हे सारे डोळ्याने पाहात आहोत याचा त्यांना आनंद मिळायचा. शिष्टमंडळातील मंत्री-अधिकाऱ्यांची तसेच यजमान देशातील यजमानांची, पाहुण्यांची, लंचला किंवा डिनरला सपत्निक उपस्थिती असायची. यशवंतराव मात्र एकटेच असायचे. याचे शल्य यशवंतरावांपेक्षा वेणूताईंना अधिक जाणवायचे. त्या म्हणायच्या, "माझी तब्येत चांगली धडधाकट असती तर मी नसते का गेले त्यांच्याबरोबर परदेशात! तब्येत अस्वस्थ असताना बरोबर जायचे म्हणजे यशवंतरावांच्या कामात, गांठीभेटीत, चर्चेत, प्रवासात अडथळे, अडचणी निर्माण व्हायच्या. म्हणूनच मी परदेश प्रवास टाळीत आले आहे. ती उणीव यांची पत्रे भरून काढीत आहेत. वाचनाचा जसा यांना छंद त्याप्रमाणेच वेळात वेळ काढून पत्रे लिहिण्याची फार हौस." यशवंतरावांची सारी विदेश पत्रे सौ. वेणूताईंनी आपल्या बॅगमध्ये नीटपणे जपून ठेवलेली होती. त्यांच्या निधनानंतर काही दिवसांनी बॅग उघडून पाहिली असता, फाईल केलेली बरीच पत्रे हाती लागली. यशवंतरावांनी ती स्नेही पत्रकार रामभाऊ जोशी यांच्या स्वाधीन केली. रामभाऊंनी 'विदेश प्रवास' या शीर्षकाखाली पुस्तकाद्वारे ती प्रकाशित केली. रामभाऊंच्या या कार्यामुळे हा पत्रसंग्रह पुस्तक रूपाने वाचायला मिळतो. त्याचबरोबर प्रवास वर्णनाचा आनंद पण मिळतो.

पितृसुखाला लहानपणीच पारख्या झालेल्या यशवंतरावांचे मातोश्री अक्कांनी संगोपन आणि शिक्षण अनेक अडचणी सोसून केले. अक्कांच्या मायेमुळे, मार्गदर्शनामुळे यशवंतराव मोठे झाले. मोठेपणात यशवंतरावांनी मातृप्रेमाचा विसर कधी पडू दिला नाही. अक्कांच्या दुःखद निधनानंतर सौ. वेणूताईंनी यशवंतरावांना सातत्याने समर्थ साथ दिली. यशवंतरावांच्या कर्तृत्वात, नेतृत्वात, संस्कारात मातोश्रींचा जसा मोठा हात होता तितकाच महत्त्वाचा आणि मोठा वांटा सौ. वेणूताईंचा होता. फलटणच्या मोरे यांच्या सुखी घरातून १९४२ च्या जून महिन्यात चव्हाणांची सून म्हणून वेणूताईंनी गृहप्रवेश केला आणि जवळजवळ दहा वर्षांचा काळ कौटुंबिक संकटांशी तोंड देण्यात घालविला. थोरले दीर गणपतराव

यांचा तुरुंगवास, यशवंतरावांचा भूमिगत संचार, गणपतरावांचे गंभीर आजारपण, दीरांची घरात चार लहान मुले, वृद्ध सासू, आर्थिक दुरावस्था यांतून संसाराची वाटचाल करताना त्यांनी देशभक्त पतीलाही आवश्यक ती साथ दिली. वाईट दिवसांनंतर चांगले दिवस आल्यावरही त्यांनी पैशाचा, कपडे-लत्ते-दागिन्यांचा मोह कधी धरला नाही. मोठेपणा कधीही मिरविला नाही. पतीच्या जीवनाशी त्या समरस झाल्या, एकरूप झाल्या आणि आदर्श गृहिणीची प्रतिमा निर्माण करताना यशवंतरावांची प्रतिमाही काटेकोरपणे सांभाळली. प्रकृतीने त्यांना साथ दिली नाही, तथापि त्यांनी त्याबद्दल कधी तक्रार केली नाही. पुतण्यांचे शिक्षण केले, त्यांची लग्ने लावून दिली, त्यांचे संसार उभे केले. दीरांची मुले, सेवकांची मुले या सगळ्यांना आईची माया दिली. दिल्लीतील त्यांचे निवासस्थान मुलाबाळांनी सदैव भरलेले असायचे. सौ. वेणूताई धार्मिक वृत्तीच्या होत्या, श्रद्धाळू होत्या. पण आपल्या धार्मिकतेचे त्यांनी कधी प्रदर्शन केले नाही. यशवंतराव भावनाविवश होऊन म्हणायचे, ''वेणूबाईने फार सहन केले. माझ्या मागे सावलीसारखे उभे राहून मला सदैव साथ दिली.''

# असे होते यशवंतराव !

यशवंतरावांच्याबद्दल स्वपक्षातील नेते-कार्यकर्ते अभिमानाने चांगले बोलायचेच पण त्याचबरोबर विरोधी पक्षातील कार्यकर्तेही आदराने आणि आपुलकीने बोलायचे. एस. एम. जोशी, ना. ग. गोरे, आचार्य प्र. के. अत्रे, भाई माधवराव बागल, वसंतदादा पाटील, वसंतराव नाईक, वि. स. पागे, अण्णासाहेब शिंदे, नरुभाऊ लिमये, संपादक गोविंदराव तळवलकर, दिल्लीतील ज्येष्ठ पत्रकार मो. ग. तपस्वी, निवृत्त लष्करी सेनापती ले. ज. एस. पी. थोरात, उद्योगपती नीलकंठराव कल्याणी, ह. भ. प. भास्करबुवा सातारकर आदि विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी यशवंतरावांच्याबद्दल ते हयात असताना आणि दिवंगत झाल्यावर जे गौरवोद्‌गार काढले ते संकलित करून येथे वाचकांसाठी थोडक्यात दिले आहेत. यशवंतरावांची थोरवी वाचल्यावर वाचकांच्या तोंडून उद्‌गार बाहेर पडतील, "असे होते यशवंतराव" !

"विशाल द्विभाषिकाच्या मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी यशवंतरावांनी स्वीकारली त्यावेळी ते सत्तारूढ सरकारचे नेते आणि मी सरकार विरोधी आंदोलनाचा नेता असे संबंध होते. देव, हिरे, गाडगीळ यांनी आपल्याला विश्वासात न घेताच दिल्लीला विशाल द्विभाषिकाचा पर्याय ठेवला हे यशवंतरावांना रुचले नव्हते. समितीचा सरचिटणीस या नात्याने विरोधी पक्षनेत्यांबरोबर मलाही यशवंतरावांकडे जायला लागे. सर्व समस्यांची उकल शांततेने, सामंजस्याने व्हावी अशी आम्हा दोघांचीही भूमिका असल्याने, यशवंतरावांची आणि माझी 'वेव्हलेंग्थ' चांगली जुळली होती. खाजगी जीवनातही अगदी घरोबा असल्यागत आम्ही एकमेकांचे क्षेमकुशल विचारीत असू. त्यामुळे यशवंतरावांच्या स्नेहाला एक

आगळेपणाची व आपलेपणाची किनार लाभली होती. विरोधकांना विश्वासात घेऊन पावले टाकण्याची त्यांची नीती होती. त्यामुळे विरोधकांनाही त्यांच्याबद्दल आदर वाटायचा.

टाटा मेमोरिअल हॉस्पिटलमध्ये मी आजारी असताना यशवंतराव मला भेटायला मुद्दाम आले होते. मी त्यांना विचारले, 'चरित्राचा पुढचा भाग कधी लिहिणार ?' त्यावर यशवंतराव म्हणाले, ''वेणूबाईंच्या आग्रहास्तव आत्मचरित्र लिहावयास घेतले. त्यांच्याच आग्रहामुळे ते घडले. पण आता वेणूबाई नाहीत. त्यामुळे निकड वाटत नाही. लिहिण्याचा मानस आहे पण फुरसद मिळायला हवी.'' आधुनिक महाराष्ट्राच्या जडण-घडणीबद्दल यशवंतरावांकडून मिळणाऱ्या अधिकृत माहितीला महाराष्ट्र आाणि देशही वंचित राहिला. दुर्दैव असे की वेणूताई गेल्या आणि यशवंतराव पण गेले.

-- एस एम. जोशी

× × ×

१९४६ ते १९७५ हा उन्नतीचा काळ यशवंतरावांच्या जीवनात बहारीचा गेला. एका पदावरून दुसऱ्या पदावर ते चढतच गेले. अनेक उच्च पदे त्यांनी समर्थपणे भूषविली. यशवंतराव म्हणजेच महाराष्ट्र, अशीच परिस्थिती त्या काळात होती. 'यशवंतराव बोले आणि कॉंग्रेस हाले' अशी अवस्था कॉंग्रेसची होती. संपूर्ण मराठा समाजाचे नेतृत्व त्यांच्याकडे आले होते. यशवंतरावांचे विरोधी जाण्याची कुणाची ताकद होत नव्हती. केंद्रीय नेतृत्वाने यशवंतरावांना राष्ट्रीय प्रवाहात नेले आणि तेथेही त्यांनी आपली वैशिष्ट्यपूर्ण छाप पाडली. लाघवी वाणी, गाढ वाचन, अभ्यासू वृत्ती यामुळे त्यांनी पार्लमेंटमध्ये विशिष्ट स्थान मिळविले. मराठी भाषेवर त्यांचे अपरंपार प्रेम होते, प्रभुत्व होते.

-- ना. ग. गोरे

× × ×

कै. यशवंतराव भारताचे अर्थमंत्री होते तेव्हा एकदा कऱ्हाडला आले होते. त्यांना भेटायला मी गेलो. यशवंतराव कऱ्हाडच्या विश्रामगृहात उतरले होते. आम्ही दोघे बोलत असताना एक वृद्ध स्त्री आपल्या फाटक्या लुगड्यात कांही तरी गुंडाळून

घेऊन आली होती आणि तिला यशवंतरावांना भेटावयाचे होते. म्हातारपणामुळे ती कापत होती. पोलिसांनी तिला आडवले. यशवंतरावजींनी आपल्या खोलीतून ते पाहिले. त्यांनी तिला जवळ बोलावून घेतले आणि विचारले, "कां आली होतीस आई ?"

म्हातारी कापऱ्या स्वरात म्हणाली, "सारा गांव यशवंतरावाला नावाजतोय. तेव्हां त्याला भेटावं आणि हार द्यावा म्हून आली व्हते.' त्या फाटक्या लुगड्यातून तिने हार बाहेर काढला आणि यशवंतरावजींना दिला. यशवंतरावांनी तो हार घेतला आणि म्हातारीच्या गळ्यात घालून ते तिच्या पायी पडले. सौ. वेणूताईंनी म्हातारीला जेवू घातलं आणि मगच परत जाऊ दिले. यशवंतरावांजवळ फार माणुसकी होती. विरोधकांनी पातळी सोडून टीका केली, मानहानी केली तरी यशवंतरावांनी विरोधकांचा कधी राग केला नाही. विरोधकांना ते कधी टाकून-रागावून बोलले नाहीत. त्यांचा लोकसंग्रह फार मोठा होता.

-- भाई माधवराव बागल

× × ×

वयाच्या १६ व्या वर्षापासून एखाद्या वारकऱ्याप्रमाणे यशवंतरावांनी देशभक्तीची पताका जी खांद्यावर घेतली ती अखेरपर्यंत सोडली नाही. १९३० पासून स्वातंत्र्य मिळेपर्यंत चव्हाणांना अनेक वेळा तुरुंगवास भोगावा लागला. सक्तमजुरीची शिक्षा भोगावी लागली. कारावासात त्यांनी देशभक्तीची पदे रचली आणि स्वातंत्र्य प्राप्तीनंतर अनेक पदे भूषविली. अशा या देशभक्ताचे आणि महाराष्ट्राच्या पहिल्या मुख्यमंत्र्यांचे नांव वगळून भारताचा इतिहास कुणालाच लिहिता येणार नाही.

यशवंतरावांच्या रक्तात समाजवाद मुरलेला आहे. राजे लोकांच्या तनख्याबाबत त्यांनी जे पुरोगामी धोरण स्वीकारले त्यावरून हे स्पष्ट झाले आहे. यशवंतरावांशी आमचे कितीही राजकीय मतभेद असले तरी आम्ही त्यांना मित्र मानतो आणि तेही आमच्याशी सदैव मैत्रीचे वर्तन ठेवतात. यशवंतरावांच्या बुद्धिमत्तेचा पल्ला केवळ राजकारणापुरताच मर्यादित नाही. ते साहित्यप्रेमी, कलाप्रेमी, नाट्यप्रेमी रसिक आहेत. संभाषण चतुर आहेत, शिष्टाचार निपुण

आहेत. त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रसन्न आहे. म्हणूनच त्यांच्याविषयी आम्हाला आपुलकी वाटते.

यशवंतराव ग्रंथप्रेमी होते. उत्कृष्ट ग्रंथांचा संग्रह करणे ही त्यांची खास आवड होती. मुंबईत मलबार हिलवरील बंगल्यावर आणि दिल्लीत १ रेसकोर्सवरील बंगल्यावर त्यांनी आपले जे वैयक्तिक ग्रंथालय उभे केले होते त्यात उत्तमोत्तम ग्रंथ सांपडायचे. त्यांची वाचनाची संवयही जरा वेगळी होती. त्यांचा एखादा ग्रंथ काढून पाहिला की त्यावर टाचलेला कागद असे. हा ग्रंथ मी संपूर्ण वाचलेला आहे, चांगला आहे, जरूर वाचावा. प्रशासकीय कामाच्या प्रचंड गर्दीत ते वाचायला कसा वेळ काढीत कुणास ठाऊक !

-- आचार्य अत्रे

× × ×

यशवंतराव हे कुशल व कर्तबगार प्रशासक होते. त्यांनी महाराष्ट्राला व देशाला स्वच्छ प्रशासन दिले. सत्तेचा कधीही गैरवापर केला नाही. विरोधकांना विश्वासात घेऊन पावले टाकण्याची त्यांची नीती होती. त्यामुळे विरोधकांनाही त्यांच्याबद्दल आदर वाटायचा.

प्रशासन हे लोकाभिमुख असावे अशी ते काळजी घेत. एक आदर्श मुख्यमंत्री म्हणून लोक त्यांचे नांव घेतात. त्यांची लोकशाहीवर नितांत निष्ठा होती. समाजवादाबद्दल त्यांना आस्था होती. आपल्या जवळचे जे काही चांगले असेल ते महाराष्ट्रासाठी, देशासाठी द्यायला हवे असे ते सांगत. ते स्वतः खेड्यात जन्मलेले आणि गरिबीत वाढलेले. त्यामुळे त्यांना ग्रामीण भागाबद्दल आणि गरिबांबद्दल विशेष ओढ वाटत असे.

कृषि-औद्योगिक समाजरचना केल्याशिवाय ग्रामीण भागाचा कायापालट होणार नाही अशी त्यांची धारणा होती. अशा प्रकारची संकल्पना मांडणारे, सहकारातून समाजवाद आणण्याचा प्रयत्न करणारे ते देशातील पहिले राजकारणी म्हटल्यास चूक होणार नाही. सहकारी सूत गिरण्या, सहकारी तेलगिरण्या, सहकारी साखर कारखाने उभे करण्यात आले. त्यांचे जाळे विणण्यास प्रोत्साहन देऊन यशवंतरावांनी महाराष्ट्राचा चेहरामोहराच बदलून टाकला ही सत्यस्थिती आहे.

महाराष्ट्राचे प्रशासन स्वच्छ रहावे, कार्यक्षम असावे, गतिमान राहावे यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील राहिले. यामुळेच महाराष्ट्र शासनाची सदैव प्रशंसाच होत गेली.

सत्तेचे विकेंद्रीकरण ही यशवंतरावांची महाराष्ट्राला अमोल देणगी होय. जिल्हा परिषदा, पंचायत समित्या यांची निर्मिती झाली. सत्तेच्या विकेंद्रीकरणातून सामान्य जनता विकासाच्या प्रक्रियेत सहभागी करून घेण्यास या उपक्रमाने चालना मिळाली. ग्रामीण नेतृत्व तयार करण्यास मदत होऊ लागली. हा प्रयोग नव्हे तर प्रयत्न ठरला आणि महाराष्ट्रात अल्पावधित यशस्वी ठरला.

**-- वसंतदादा पाटील**

× × ×

महाराष्ट्राच्या निर्मितीच्या कार्यात खुद्द यशवंतरावांनी किती महत्त्वाची कामगिरी बजावली होती, हे सर्वश्रुत आहे. त्या कामगिरीचे मूल्यमापन इतिहासच करील. महाराष्ट्र व गुजरात ही दोन वेगळी राज्ये अस्तित्वात येण्यापूर्वी जी परिस्थिती निर्माण झाली होती ती यशवंतरावांनी मोठ्या चातुर्याने व संयमाने हाताळली. कोणतीही बाब असो, कटुता निर्माण होऊ न देता, ती सामोपचाराने सोडविली जावी, अशी त्यांची भूमिका असे. विरोधकांशी सौजन्याने वागण्याची व त्यांच्या मतांचा योग्य तो आदर करण्याची त्यांची वृत्ती वाखाणण्यासारखी होती. या वृत्तीमुळेच त्यांनी महाराष्ट्र राज्य निर्मितीच्या वेळची सारी परिस्थिती कुशलतेने हाताळली. त्यांच्यातील श्रेष्ठ शासकीय कौशल्य त्यावेळी पणाला लागले होते. महत्त्वाच्या प्रत्येक बाबतीत ते आपल्या सहकाऱ्यांना विश्वासात घेत असत. सहकाऱ्यांवर विश्वास टाकून आणि त्यांना वाढत्या जबाबदारीची कामे करण्याची संधी देऊन, त्यांच्यातील शासकीय आत्मविश्वास वाढीला लावण्याचे यशवंतरावांचे धोरण मला तरी फार महत्त्वाचे वाटले.

महाराष्ट्राच्या मातीवर, महाराष्ट्राच्या संस्कृतीवर, मराठी भाषेवर आणि मराठी जनतेवर त्यांचे अपरंपार प्रेम होते. हे प्रेम केवळ प्रांतीय स्वरूपाचे नव्हते. भारताला बलवान करावयाचे झाल्यास, महाराष्ट्राचा विकास झाला पाहिजे, अशी त्यांची निष्ठा होती. ही निष्ठा महाराष्ट्रापुरतीच मर्यादित नव्हे, तर भारतातील प्रत्येक घटक राज्याची एकत्रित शक्ती, हीच भारताची संघशक्ती, अशी त्यांची व्यापक

धारणा होती. याच राष्ट्रीय दृष्टिकोनातून ते महाराष्ट्राकडेही पहात.

**-- वसंतराव नाईक**

× × ×

'महाराष्ट्र राज्याला मोठे करण्यासाठी यशवंतरावांनी कार्यकर्त्यांचे मोहोळ उभे केले आणि या कार्यकर्त्यांना कामाला लावून अनेक संस्था उभ्या केल्या. राजकीय आणि सार्वजनिक क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्याला संस्थेचा पाया असला पाहिजे असे ते म्हणत. यातूनच महाराष्ट्रात सहकारी, शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा संस्था उभ्या राहिल्या. लोकशाही समाजवादातील संकल्पना त्यांनी महाराष्ट्रापुढे आणि देशापुढे मांडली. सहकारी चळवळीत सर्वांचा सहभाग व सर्वांना समान अधिकार ही नीती सांगितली. यशवंतराव समाजवाद केवळ बोलत नसत तर तो आचरणात आणावा यादृष्टीने प्रयत्नशील राहात. महाराष्ट्राने देशाच्या मुख्य प्रवाहापासून अलग होऊ नये, त्या प्रवाहातच रहावे हा त्यांचा ठाम दृष्टीकोन होता आणि १९५६-५७ पासून १९८० पर्यंत त्यांनी तो अंमलात आणला. मध्यंतरी वर्ष-दीड वर्ष, इंदिरा काँग्रेसपासून ते दूर राहिले.पण त्यात त्यांना बेचैनी वाटत असायची आणि अखेर त्यांनी निर्णय घेतला की, मुख्य प्रवाहात जाण्यासाठी इंदिरा काँग्रेसमध्ये प्रवेश करावयाचा. साहेबांनी आपला निर्णय अंमलात आणला. तथापि इंदिरा काँग्रेसमध्ये प्रवेश मिळण्यासाठी त्यांना वर्ष-सहा महिने थांबावे लागले. काही मिळविण्यासाठी, मागण्यासाठी यशवंतराव इंदिरा काँग्रेसमध्ये गेले नव्हते. त्यांच्यासारखा कुशल प्रशासक, लोकप्रिय नेता, सन्मित्र, सहकारी विरळा !

**- अण्णासाहेब शिंदे**

× × ×

यशवंतराव मित्र जाणत असत. मित्रासाठी योग्य ते करीत असत. पण राजकारण आणि खाजगी मैत्री याचा गोंधळ त्यांनी कधीही केला नाही. कोणत्याही पक्षाचा पुढारी व कार्यकर्ता असो किंवा कोणत्याही क्षेत्रात वावरणारी व्यक्ती असो, यशवंतरावांच्या कचेरीचा आणि निवासस्थानाचा दरवाजा त्याला मोकळा असे. महाराष्ट्रातल्या सर्व थरातील लोकांना यशवंतरावांच्या घरी मुक्तद्वार असे. त्या प्रत्येकाच्या मनाप्रमाणे होणे शक्य नव्हते, पण आपले मनोगत यशवंतरावांच्या

कानावर घातले यातच अनेकांना मानसिक समाधान मिळत असे. लोकांच्या अनंत अडचणी असतात. त्यांना आपले मन कोणातरी जबाबदार व्यक्तीपुढे मोकळे करावेसे वाटते. सहानुभूतिने ऐकणारा आणि जमेल तेवढे सहाय्य करणारा, यशवंतरावांसारखा नेता ही लोकांची मानसिक गरज होती. म्हणूनच मराठी जनतेने त्यांच्यावर उदंड प्रेम केले. राजकीय मतभेद होऊनही सर्वांना यशवंतराव हे आपल्या आप्तासारखे वाटतात.

आपल्या स्वभावाविषयी यशवंतराव सांगायचे, "माझा स्वतंत्र स्वभाव बनला आहे, तो स्वभाव आहे मिळते घेऊन पुढे जाण्याचा व नेण्याचा. कोणाला मुद्दाम दुःख द्यावे, कोणाचा अवमान करावा, हे माझ्या स्वभावात नाही. कोणी अवमान केला तरी त्यासाठी उगाच शत्रुत्व करावे, असे वाटत नाही. कटुता न ठेवणे आणि कटुता नसणारे वातावरण वाढविणे, हा माझा स्वभावधर्म आहे." 'अनेक राजकीय पेचप्रसंगात यशवंतरावांच्या भूमिकेने त्यांना प्रसिद्धी व सामर्थ्य दिले. विशेषतः अनुयायांचे बल त्यांच्या व्यवहारवादाने त्यांना लाभले. बुद्धीचा निश्चय झाला की ते भावनेला बळी पडले नाहीत. अक्षरशः नेत्रातून अश्रू वाहत असताना, कठोर निर्णय स्वीकारताना, त्याप्रमाणे प्रामाणिक वाटचाल करीत असताना मी त्यांना पाहिले आहे.

-- वि. स. पागे

× × ×

मा. कृष्ण मेनन याच्यानंतर संरक्षणमंत्री कोण होणार याबद्दल साऱ्यानाच औत्सुक्य वाटत होते. संरक्षण खाते बदनाम झाले होते आणि कोणीही ज्येष्ठ नेता वा मंत्री आपले राजकीय भवितव्य धोक्यात घालण्यास तयार नव्हता. पं. नेहरुंनी खंबीरपणे आणि जिज्ञासूपणे निर्णय घेतला आणि यशवंतराव चव्हाणांना संरक्षणमंत्रीपद स्वीकारण्याची विनंती केली. यशवंतरावांनीही पंतप्रधानांना साथ देण्यासाठी आपल्या राजकीय भक्तिव्याचा विचार न करता 'हो' म्हटले. नोव्हेंबर १९६२ मध्ये ते दिल्लीला आले.

लष्करात मनोधैर्य पुन्हा निर्माण करणे आणि लष्कर व संरक्षण मंत्रालय यातील संघर्षाची कारणे निपटून काढणे हे आपले प्रमुख कर्तव्य आहे, हे

यशवंतरावांच्या त्वरित लक्षात आले. कृष्ण मेनन यांचा उद्दाम स्वभाव, अहंमन्य वृत्ती हे असंतोषाचे मूळ आहे हे त्यांनी ओळखले. आपल्या सौजन्यपूर्ण व्यक्तिमत्वाने आणि सुसंस्कृत वागणुकीने त्यांनी दिल्लीच्या राजकीय जीवनावर आपला ठसा उमटविला. त्यांची विद्वता आणि अभ्यासूवृत्ती यामुळे संरक्षण मंत्रालयात त्यांच्याबद्दल अतीव आदर निर्माण झाला. संरक्षण दलाला त्यांनी नैतिक बळ दिले. संरक्षण व्यवस्थेची पुनर्रचना केली. लष्करी अधिकारी व जवानांसाठी, त्यांच्या कुटुंबियांसाठी सुविधा निर्माण केल्या.

**-- ले. जनरल एस. पी. पी. थोरात**

× × ×

राजकीय, सामाजिक, आर्थिक क्षेत्रात ज्या ज्या जबाबदाऱ्या यशवंतरावजींनी स्वीकारल्या, त्या त्यांनी यशस्वीपणे पार पाडल्या. आपल्या देशाच्या सर्वांगीण विकासाचे एकमेव उद्दिष्ट त्यांनी आपल्यासमोर ठेवले होते. देश स्वतंत्र झाल्यानंतर यशवंतरावांनी एकामागून एक उच्च पदे भूषविली. स्वातंत्र्य म्हणजे काय आणि त्याचा लाभ कोणाला मिळायला पाहिजे याची त्यांना स्पष्ट कल्पना होती. स्वातंत्र्य ही प्रतिष्ठेची, त्याचप्रमाणे आर्थिक विकासाची बाब आहे आणि त्यामुळे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर विकासाचे जे युग सुरू झाले, त्यात समाजातील गरिबातल्या गरीब व्यक्तीला विकासाची फळे उपभोगता आली पाहिजेत यावर त्यांनी भर दिला. यशवंतराव २५ वर्षे महाराष्ट्रातील समाजजीवनाशी एकरूप झाले होते.

कारखान्यात, जिल्हा सहकारी बँकांत, सहकारी साखर कारखान्यात, कापूस कारखान्यात ठळक जागी यशवंतरावाचे छायाचित्र आढळून येते. स्वतंत्र भारतात लोकांच्या गरजांबद्दल प्रशासनाने अधिक आदर-आपुलकी दाखवावी म्हणून सत्तेचे विकेंद्रीकरण करणे आवश्यक होते. स्थानिक विकासाच्या योजनांची अमंलबजावणी करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्रात जिल्हा परिषदा स्थापन करण्यात आल्या. यशवंतरावांच्या प्रयत्नांचे हे फळ होय. यशवंतरावांनी लेखन-भाषण इत्यादी मार्गाने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनावर आपल्या वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्वाचा ठसा उमटविला. त्यांचे तत्वज्ञान आणि अनेक विषयावरील त्यांचे विचार, याबद्दल योग्य

तो आदर बाळगून, आपण त्यांचा अभ्यास केला पाहिजे. त्यातून आपणास निश्चित मार्गदर्शन मिळू शकेल.

— नीळकंठराव कल्याणी

× × ×

राजकारणातील एक पट्टीचा मुत्सद्दी, राजकारणी पण मित्र मानला त्याच्याशी क्षत्रिय बाण्याने मित्रत्व जपणारा, राजकारणातील गणित सरळ नसते म्हणून सतत जागरूक, कदाचित जास्त सावध व पराकाष्ठेचा स्वच्छ नेता म्हणून यशवंतरावांकडे पाहावे लागेल. स्वातंत्र्यपूर्व काळात स्वार्थाचा विचार सुचत नसे, कारण तशी संधीच नसे. तथापी प्रचंड सत्ता आणि सत्तेभोवती हरहमेशा घोटाळणाऱ्या कनक, कांता, मदिरा, मदिराक्षी यांच्या खाऱ्या महासागरात पोहत असताना यशवंतरावांच्या शरीराभोवती जणू घामापासून दूर अलिप्ततेचे जन्मजात कवच त्यांना लाभले होते. प्रचंड व्यवहार त्यांच्या हातून आणि त्यांच्या सहीने झाले. तथापि त्यांच्या दिशेने कुणा टीकाकाराने वा संशयी निरिक्षकाने बोट उचलले नाही. पंतप्रधान शास्त्रीजींच्या संगतीत शोभणारा हा त्यांचा संरक्षणमंत्री होता.

प्रीती संगमावरील या गरुडाने १९५२ मध्ये मुंबईला सह्याद्रीवर यशस्वी झेप घेतली. तेथून आपले विशाल बळकट पंख पसरुन ते हिमालयाच्या मदतीला धांवले. पंडितजींनी हांक मारली आणि गरुड झेपावला. तेव्हांपासून महाराष्ट्राचे 'थोरलेसाहेब,' संरक्षण, गृह, अर्थ, परराष्ट्र व्यवहार अशी तोलामोलाची खाती सांभाळत एक उत्कृष्ट, दमदार कारभारी म्हणून मान्यता पावले. ते एकदा म्हणाले. "पंडितजींचे आम्हा तरुणांना आकर्षण आहे. तथापि पटेल आणि पंडित पंत यांना पाहिल्या-अभ्यासल्याशिवाय कारभारी अर्धाच राहिला असे होते."

व्यवहार आणि तत्वनिष्ठा यांची सांगड घालताना त्यांना अनेकवेळा फार मोठी कसरत लागली. नेहमीच यश लाभले असे नाही. पण देशाची एकता, संसदीय लोकशाही, आर्थिक, सामाजिक विषमतेतून शासनामार्फत समतेकडे नेण्याचा त्यांचा प्रयत्न, व्यक्तिनिरपेक्ष कारभाऱ्याला आवश्यक असा सद्‌भाव आणि सहिष्णुता या गुणांची त्याना जन्मजात देणगी होती. त्यातच त्यांचे राजकारणी व मुत्सद्दी म्हणून यश सामावलेले आहे. हृदयाला भिडणारे गोड बोलणे, अथांग श्रोतृसमुदाय डोलत ठेवणे हे त्यांचे आणखी वैशिष्ट्य. इतिहासाशी लगट करत दृष्टांत द्यावेत, पुर्वसुरीच्या संतमहंतांचे ऋण मान्य करीत पुढे जावे, लोकांनी

थट्टाउपहासाने प्रतिशिवाजी म्हणावे, इतकी निष्ठा तुळजापूर-प्रतापगडच्या भवानीच्या आणि शिखर शिंगणापूरच्या महादेवाचे चरणी.

**-- नरुभाऊ लिमये**

× × ×

यशवंतरावांची व्याख्याने भावनात्मक आवाहनाने बहरलेली असत. निर्णय नेहमीच सर्वसामान्य समाजाच्या हिताचे असत. आर्थिक व बुद्धिवादी थरातील लोकांशी समजूतदारपणाचे, प्रेमाचे, सभ्यतेचे त्यांचे वर्तन असे. मित्रांशी खाजगीत प्रेमाचे पण सार्वजनिक व्यवहारात कांटेकोरपणाचे संबंध असत. त्यांचे व्यक्तिमत्व व नेतृत्व जटिल स्वरूपाचे होते. याला खंबीर आधार मात्र होता भारताविषयीचे अपार प्रेम, महाराष्ट्राविषयीचा अभंग आशावाद, बहुजन समाजाबद्दल जिव्हाळा, समाजवादाची सुस्पष्ट दिशा, मागेपुढे, वर खाली पाहण्याची सूक्ष्म नजर, मागे येणाऱ्यांबाबत जबाबदारी, नेत्यांविषयी आदर, सफल राजकीय महत्त्वाकांक्षा, पण तिचाही सुखाने त्याग करता येईल असा देशबांधवांच्या सेवेचा सोस.

महाराष्ट्राच्या सर्व भागातल्या, सर्व थरातल्या लोकांना यशवंतराव हे एखादे अपील कोर्ट आहेत असे वाटे. या प्रत्येकाच्या मनाप्रमाणे होणे शक्य नव्हते. पण आपले मनोगत यशवंतरावांच्या कानावर घातले यातच अनेकांना मानसिक समाधान मिळत असे. व्यक्तिगत दुरावा व कटुता ठेवण्याचा वा वाढविण्याचा त्यांचा स्वभाव नव्हता. या स्वभावाला अनुसरूनच त्यांचे वागणे, बोलणे होते. मराठी भाषा दणकट, काहीशी रांगडी. पण ती मृदू, मुलायम होऊ शकते, हे महाराष्ट्रात आधुनिक काळात ज्यांनी दाखवून दिले त्यात यशवंतरावांचा क्रम फार वरचा लागेल.

कारावासात असताना, वाचन व चर्चा याद्वारे यशवंतरावांनी आपल्या मनाची मशागत केली होती. अखेरपर्यंत त्यांचे ग्रंथप्रेम कमी झाले नाही. मराठी व इंग्रजी पुस्तके ते आवडीने घेत व चोखंदळपणे वाचीत. परदेशात जात तेव्हांही पुस्तकांच्या दुकानात वेळ घालवून खरेदी केल्याशिवाय ते परत येत नसत. तरुणपणी कऱ्हाडहून कोल्हापूरला जाऊन पिटात बसून त्यांनी नाटके पाहिली. म्हैसूरकर महाराज, भागवतबुवा, बाबा आळतेकर यांची संगीत भजने व औंधाचा दाजी गुरवाचा पखवाज ऐकण्यात अनेक रात्री घालविल्या. गडकऱ्यांच्या नाटकातले

संवांद त्यानी पाठ केले होते. 'राजसंन्यास' हे तर त्यांचे आवडते नाटक होते. कुस्ती आणि क्रिकेट खेळाचीही त्यांना आवड होती.

**-- गोविंदराव तळवलकर,**

संपादक

× × ×

त्या काळात केंद्रीय मंत्रीपद मोठे तपश्चर्येचे मानले जात असे. पंतप्रधान नेहरूंनी राज्याच्या मुख्यमंत्र्याला दिल्लीला आग्रहाने बोलावून घेऊन आपल्या मंत्रिमंडळात मंत्रीपद देणे अधिकच भूषणावह होते. नेहरूंनी यशवंतरावांना पाचारण करून संरक्षण मंत्रालयाची सूत्रे त्यांच्या हातात सोपविली. १९६२ च्या चीनच्या आक्रमणाच्या वेळी भारताच्या पदरी नामुष्की पत्करावी लागल्यावर कृष्ण मेनन यांना राजीनामा द्यावा लागला आणि देशाच्या संरक्षणाची जबाबदारी यशवंतरावांवर टाकण्यात आली. मराठी माणसाचा ऊर अभिमानाने भरून आला. यशवंतरावांबद्दलच्या अपेक्षा खूप खूप वाढल्या.

ऑक्टोबर १९६२ ते डिसेंबर १९८४ असा हा २२ वर्षांचा काळ यशवंतराव दिल्लीत होते. केंद्रात १९६२ मध्ये मंत्रिपदाचा दर्जा प्राप्त झाल्यावर पुढील बावीस वर्षांच्या संपूर्ण काळात मंत्रीपद त्यांना चिकटून राहिले. विरोधी पक्षनेते म्हणून मंत्रीपदाने, उपपंतप्रधान म्हणून मंत्रीपदाने, अर्थ आयोगाचे अध्यक्ष म्हणून मंत्रीपदाने त्यांना सोडले नाही. सन १९८० ते ८२ अशी दोन वर्षे मात्र त्यांनी राजकीय विजनवास काढला. दोन दशकातील त्यांच्या मंत्रीपदाचे तीन कालखंड पडतात. पहिला नेहरू-शास्त्रींचा काळ, नंतर काँग्रेसमध्ये दुसरी फूट पडेपर्यंतचा (१९७७ अखेर) काळ आणि तिसरा १ जानेवारी १९७८ ते २५ नोव्हेंबर १९८४ पर्यंतचा. हे तिन्ही कालखंड योगायोगाने सात वर्षांचे राहिले. या तीन कालखंडात यशवंतरावांची तीन रुपे साकारली. या दरम्यान त्यांनी तीन पंतप्रधानांचे मृत्यू पाहिले. नेहरू गेले तेव्हा यशवंतराव पन्नाशीत होते. शास्त्रीजी गेल्यानंतर यशवंतरावजींचे नांव पंतप्रधानपदासाठी घेतले जात होते. त्यावेळी इंदिरा गांधींना पाठिंबा देण्याच्या त्यांच्याच भूमिकेमुळे ही संधी त्यांनी स्वतः घालविली. दिल्लीतील सत्तेचे राजकारण कसे चालते याचा त्यांना पहिल्या दहा वर्षात चांगलाच अनुभव आला.

यशवंतराव तात्विक भूमिका घेऊन चालत आणि त्या भूमिकेसाठी झीज सोसण्याची तयारी करीत. कष्ट उपसण्याची उमेद दाखवित. त्यांच्या मनात धरसोडपणा नसे. यशवंतरावांनी आपली मूल्ये कायम सांभाळली. आपले मोल दिल्ली करीत नाही याची त्यांना खंत वाटायची पण त्याची तमा त्यांनी कधी बाळगली नाही. केंद्रिय मंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांच्यापेक्षा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव मोठे होते. मुख्यमंत्र्यापेक्षा माणूस म्हणून यशवंतराव त्याहूनही मोठे होते. माणूस कसा असावा तर यशवंतरावांसारखा, मुख्यमंत्री कसा असावा तर यशवंतरावांसारखा. आम्हा दिल्लीकरांना वाटायचे की, केंद्रीय मंत्री यशवंतरावांसारखा असावा, रहावा आणि उरावा. ते भाग्य आम्हांला लाभले नाही.

**-- मो. ग. तपस्वी**

पत्रकार, दिल्ली

× × ×

आळंदी येथे ज्ञानेश्वर माऊली देवस्थान ट्रस्टने बांधलेल्या वसतिगृहाच्या उद्घाटनासाठी यशवंतरावजी आळंदीला आले होते. इंद्रायणीच्या पुलावर वारकरी मंडळी त्यांच्या स्वागतासाठी उभी होती. यशवंतरावजी मोटारीतून उतरले आणि दिंडीत सामील झाले. ते म्हणाले. "विश्वाची माऊली झालेल्या ज्ञानेश्वर महाराजांच्या दर्शनासाठी वारकरी दिंडीबरोबर दोन पावले चालून दर्शनाचा अनुभव मला घेऊ द्या !" "दिंडीबरोबर चालत यशवंतराव माऊलींच्या मंदिरापर्यंत गेले आणि त्यांनी ज्ञानेश्वर माऊलींचे दर्शन घेतले.

वसतिगृहाच्या उद्घाटनाचे त्यांचे भाषण फारच प्रभावी झाले. यशवंतराव म्हणाले, "जेव्हां जेव्हां मी आळंदीला माऊलींच्या दर्शनासाठी आलो, तेव्हां तेव्हां मी अजानुवृक्षाखाली पांच-दहा मिनिटे डोळे झांकून बसलेलो आहे. यात मला फार समाधान वाटायचे. राजकारणातील तणावाचे ओझे कमी व्हायचे." मी नव्याने काय लिहित आहे असे विचारून यशवंतराव मला म्हणाले, "माऊलींचा ओवीबद्ध ग्रंथ लिहून काढा आणि प्रकाशित करा." त्यावर मी म्हटले, 'पण ग्रंथ प्रकाशित कसा होणार ? त्यासाठी अर्थसहाय्य कोण देणार ?' यशवंतराव पटकन म्हणाले, "निवृत्ती विजय, सोपानदेव ग्रंथ कागदावर छापण्यात आला. माऊलींचा ग्रंथ सोन्याच्या पानावर छापतील, इतकी जगाला माऊलींची ओढ आहे."

**-- भास्करबुवा सातारकर**

# संदर्भ ग्रंथ


१) यशवंतराव चव्हाण – लेखक : बाबूराव काळे

२) यशवंतराव इतिहासाचे एक पान –लेखक : रामभाऊ जोशी

३) विदेशी पत्रे – लेखक : रामभाऊ जोशी

४) सह्याद्रिवरील सूर्यास्त – संपादन : रामभाऊ जोशी

५) चव्हाण ॲण्ड द ट्रबल्ड डिकेड (इंग्रजी) – लेखक : कुन्ही कृष्णन्

६) वादळमाथा – लेखक : राम प्रधान

७) यशवंतराव चव्हाण (विविधांगी व्यक्तिमत्त्व) :
लेखक - वि. वि. पाटील

८) ऋणानुबंध – लेख, भाषणे संकलन : यशवंतराव चव्हाण

९) सह्याद्रीचे वारे

१०) भूमिका

११) कृष्णाकांठचा माणूस – लेखक : राम शेवते

१२) यशवंतराव चव्हाण : लेखक - ना. धों. महानोर



M
923.254
CHA/PAT
Cop.3

यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय
9699



अनंतराव पाटील हे संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या देहू गांवचे. कॉलेजात असताना १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यात भाग. येरवडा तुरुंगात स्थानबद्ध. विद्यार्थी दशेतच पत्रकारितेत प्रवेश. 'सकाळ'चे सहसंपादक असताना यशवंतरावांचा परिचय. १९४६ नंतर निकटचा सहवास आणि त्यातून स्नेह. काँग्रेस संघटनेत सहकारी. यशवंतरावांच्या इच्छेला मान देऊन विशाल सह्याद्रि दैनिकाची स्थापना. मुख्य संपादकाची जबाबदारी स्वीकारून चोवीस वर्षे संपादकपद भूषविले.

लोकसभेवर दोनदा निवड. जगभर प्रवास. उत्तम लेखक आणि वक्ते. संत साहित्याचे गाढे अभ्यासक. संत तुकाराम, चोखा मेळा, संत मुक्ताबाई, ज्ञानोबा ते तुकोबा, महात्मा गौतम बुद्ध, यमुनेच्या तीरावरून, सत्तांतर, जनादेश आदि चौदा पुस्तकांचे लेखक. राजकारणात यशवंतरावांना सदैव साथ आणि पाठिंबा. चव्हाणांचे निष्ठावान चहाते आणि शिष्यवत् अनुयायी. लोकसभेत दहा वर्षे सावलीप्रमाणे बरोबर राहिलेला विश्वासू सहकारी. पन्नास वर्षांहून अधिक काळ पत्रकारितेत आणि राजकारणात कार्यमग्न.